पुष्पगुच्छ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०६७



आचार्य प्र. के. अत्रे यांच्या

- ये स्वातंत्र्या ये !
- भारताचा महान् मूर्तिभंजक
- द
- क

REFBK-0007922

अशा ... लेखांचा संग्रह

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

Dadar
64392
9C/3/69.
2060

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

पत्रकार अत्रे

[आचार्य अत्रे यांचे 'नवयुग' मधील निवडक लेख]

: संपादिका :

शिरीष पै (अत्रे)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६५३९२ दि: निवेदन
क्रमांक २०८ दि: २८३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. ६९२२
शाखा (ठाणे जिल्हा)



प्रकाशन क्रमांक ८८

REFBK-0007922

. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबई ४

मूल्य साडेतीन रुपये

प्रकाशक :

ग. पां. प र चु रे,

ग. पां. प र चु रे
प्र का श न म न्दि र,
गोरेगांवकर चाळ, क्र. २,
गि र गां व, मुं ब ओ ४

●

सर्वाधिकार :

प्र. के. अत्रे
यांचे स्वाधीन

●

पहिली आवृत्ति :

जू न १९५३

●

मुद्रक :

प्र. के. अ त्रे
अ त्रे प्रिं टिं ग प्रे स,
३६२, विठ्ठलभाओ पटेल
र स्ता, मुं ब ओ ४

म नो ग त

साप्ताहिक 'नवयुग' मधल्या 'अत्रे उवाच' ह्या माझ्या सदरामधले कांहीं निवडक लेख ह्या संग्रहांत एकत्रित केले आहेत. वृत्रपत्रांतले लेखन हें बहुधा नैमित्तिक आणि तात्कालिक महत्त्वाचे असते. वाङ्मयीन गुणांची त्यामधें सहसा कोणी अपेक्षा करीत नाहीं. अर्थात्, दैनिक पत्राच्या संपादकाइतकी साप्ताहिकाच्या संपादकाची कुतरओढ होत नसली, तरी आठवड्याच्या प्रारंभीं तो थोडेंच आपले लिखाण करून ठेवतो? कोणत्या आठवड्यांत कोणता विषय महत्त्वाचा आहे, हें आठवडा संपतासंपतच ध्यानांत येते. अन् मग उरलेल्या वेळांत शक्य तितकी माहिती गोळा करून झपाट्यानें लेख पुरा करावा लागतो. म्हणून ललित वाङ्मय लिहिणाऱ्याला जेवढी सवड आणि मनस्वास्थ्य मिळते, तेवढें पत्रकाराला मिळूं शकत नाहीं. एका एका शब्दासाठीं दिवसचे दिवस जरी कवि अडून बसला, तरी त्यामुळें कोणाचीही अडचण होण्याचा संभव नसतो. कादंबरीकाराला अन् नाटककाराला तर आपल्या लेखनांत वाटेल तितक्या दुरुस्त्या करावयाला अवधि मिळतो. पण काळ हा पत्रकाराचा मोठा शत्रू असतो. हत्तीच्या गंडस्थळावर माहूत ज्याप्रमाणें अंकुश घेऊन बसलेला असतो, त्याप्रमाणें काळ हा हातामधें हातोडा धरूनच पत्रकाराच्या मानगुटीवर आरूढ झालेला असतो. किंवा अधिक परिचयाची उपमा घेऊन बोलावयाचे झाल्यास, परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्याप्रमाणें पत्रकाराची नेहमीं अवस्था असते. ठराविक काळांमधें त्याला जशी आपली प्रश्नपत्रिका सोडवून द्यावी लागते, त्याप्रमाणें पत्रकाराला प्रत्येक लेख घड्याळ समोर ठेवूनच पुरा करावा लागतो. घाई ही जणूं कांहीं त्याच्या पाचवीलाच पुजलेली असते.

घाईघाईनें लिहावयाचें अन् तें पुन्हां चांगलें म्हणजे वाचनीय लिहावयाचें ही तर तारेवरची कसरत आहे. ह्या बाबतींत दैनिक पत्रांच्या संपादकापेक्षां साप्ताहिक पत्राच्या संपादकावर अधिक जबाबदारी आहे. दैनिक पत्राच्या संपादकाला विषयाच्या नि शैलीच्या दृष्टीनें फारसें चोखंदळ राहून चालत नाहीं. शिवाय दोन स्तंभापेक्षां अधिक मजकूर लिहिण्याची त्याला

आवश्यकताहि नसते. तसे साप्ताहिकाच्या संपादकाचें नसतें. त्याचा अग्रलेख हेंच त्याच्या पत्राचें प्रमुख आकर्षण असल्यानें, त्याला आपला विषय फार काटेकोरपणें निवडावा लागतो. आणि त्याचें निरूपण विस्तारानें करावें लागतें. दैनिक पत्रांच्या संपादकांना वाटतें कीं आपलेंच काम जास्त जिकीरीचें आहे. पण हा केवळ त्यांचा गैरसमज आहे. साप्ताहिकाच्या संपादकावर सात दिवसांचा बोजा एकदम येऊन पडतो हें त्यांना माहित नाहीं.

खरें म्हटलें तर सगळेंच लेखन हें कष्टाचें आहे. अन् चांगल्या लेखनाला तर फारच श्रम पडतात. वाङ्मयांत स्फूर्तीचा गवगवा निष्कारण झाला आहे. पण स्फूर्ति म्हणजे कांहीं जादू नाहीं कीं तिचा झटका आला कीं, कोंबडीच्या अंगांतून जसें अंडें बाहेर पडतें, तसें लेखकाच्या डोक्यांतून लेखनाचें पुडकें एकदम प्रकट होतें. मी माझेंच सांगतों ना, मला आठवते तसा मी लिहितोच आहे. लेखनाचा मला मनस्वी हौस आहे. तरी देखील आपल्याला आतां लिहावयाचें आहे हा विचार मनांत आला कीं, अद्याप अंगावर कांटा उभा रहातो. नको वाटतें लिहिणें. तासन् तास सारखें बैठक मारून बसावें लागतें. बुद्धिला अन् शरीराला कष्ट पडतात, पण लिहिण्यावाचून गत्यंतरच नाहीं. म्हणून आळोखे पिळोखे देत देत शेवटीं लेखणी हातांत धरावीच लागते. गेलीं चौदा वर्षे माझ्या साप्ताहिकानें मला वेठीवर धरून भारेच्या भारे माझ्याकडून लिहून घेतले आहेत. नाहींतर माझ्या हातून कांहीं एवढें लिखाण कधीं झालें नसतें. अन् अजूनहि ही बिगार संपलेली नाहीं.

त्यांतून मी कांहीं नुसताच पत्रकार नाहीं. माझ्या मागें अनेक व्यवधानें. अगदीं शेवटचा दिवस उगवला म्हणजे मी जागा होतों. ऐन वेळेपर्यंत कोणत्या विषयावर लिहायचें याचा बहुधा माझ्या मनांत निर्णय झालेला नसतो. लेखनाला सुरवात करावी तर कोणीतरी भेटायला येते. भेटायला आलेले माणूस लौकर थोडेंच उठते ? उलट 'माझ्या येण्यामुळें व्यत्यय तर आला नाहीं !' असें म्हणत म्हणत तें आपला मुक्काम वाढवित असते. मग अर्धवट त्याच्याकडे लक्ष्य, अर्धवट विषयाकडे लक्ष्य, अशा थाटांत हळू हळू लिहिणें चालू होतें. मधून मधून 'फोन'ही येतच असतो. जसे जसे कागद लिहिले

जातात, तसे तसे तें जुळाऱ्यांकडे जाऊं लागतात. त्यामुळें मागला सर्व संदर्भ डोक्यांतच ठेवावा लागतो. छापखान्याचे यंत्र बाहेर धडाधड वाजत असते. मजकुरासाठीं जुळाऱ्याची ये जा अधिक झपाट्यानें सुरूं होते. अशा वेळीं एकादा मुद्दा न सुचल्यानें किंवा वाक्यांची रचना मनाप्रमाणें न झाल्यानें लेखनाच्या गतीमध्यें क्षणमात्र खंड पडला तर जीव असा कासावीस होतो म्हणतां. तशांत खोडाखोड का सुरू झाली म्हणजे अशी चीड येते स्वतःची स्वतःच्याबद्दल. वाटते, कीं सारा मजकूर फाडून फेकून द्यावा. पण सबंध लेख पुरा केल्यावांचून त्या चरकामधून बाहेर थोडेंच पडतां येते ? वाघाच्या तोंडांत सांपडलेल्या जनावराप्रमाणें कितीही तडफड केली तरी शेवटचा पूर्णविराम दिल्याखेरीज लेखाच्या जबड्यांतून सुटका होत नाहीं.

स्वतः हातांनीं लेख लिहिण्यापेक्षां तो दुसऱ्याला तोंडीं लिहावयाला सांगणें हें ह्या दृष्टीनें मला फार सोयीस्कर वाटतें. शारीरिक कष्टाची त्यामुळें केवढी तरी बचत होते. सांगितलेले वाक्य लेखक लिहित असतां पुढल्या वाक्याचा विचार करावयाला सवड मिळते. अन् म्हणून विचाराचें सूत्र अखंड नि सुसंगत रहाते. 'नवयुग' मधले माझे कित्येक महत्त्वाचे लेख मी ह्याच पद्धतीनें लिहिले आहेत. तथापि, तोंडानें लेखन सांगण्याची ही पद्धत सर्वांनाच जमत नाहीं. तिची संवय व्हावी लागते. अन् अंगांत आत्मविश्वासही असावा लागतो. तथापि, असें असूनही कित्येक विषय असे असतात, कीं त्यावर स्वतःच्या हातांनीं लिहिल्यावांचून बरेंच वाटत नाहीं. पत्रकारावर वेळेचें जसे बंधन असतें, तशी स्थळाचीही मर्यादा असते. चार स्तंभ मजकूर पाहिजे असें जुळाऱ्यांनीं सांगितलें म्हणजे नेमका तेवढाच मजकूर लिहून द्यावा लागतो. एक ओळही जास्त खपत नाहीं. कित्येकदां ऐनवेळीं जाहिराती येतात. अन् मग लिहिलेल्या नि जुळलेल्या मजकूरातील दहावीस ओळी एकदम कमी करा असा 'आतूच' हुकूम होतो. विषयाची हानि न होऊं देतां मधलाच मजकूर सांगितल्याबरोबर 'कटाप' करण्याचें हें तंत्र फार अवघड आहे. ह्याच्या उलट अधिक मजकूर हवा अशीही कित्येकदां मागणी होते. विषय कधींच संपण्याच्या बेताला आलेला असतो. अशा वेळीं पुनरावृत्ती टाळून पुन्हां विषयाला फोडणी द्यावयाची म्हणजे कांहीं चेष्टा नव्हे. अशी एक ना दोन अनेक व्यवधानें संपादकाला सांभाळावीं लागतात.

लेख संपला म्हणजे शेवटीं त्याला मथळा देणें हें तर सर्वांत अवघड काम होय. पत्रकाराच्या कौशल्याची अन् कर्तृत्वाची ही तर सर्वांत मोठी कसोटी होय. लेखाचें आकर्षकत्व आणि वाचनीयत्व कितीं तरी पटींनें नुसत्या मथळ्यानें वाढवतां येतें. मथळा तर अन्वर्थक असेल तर अगदीं सामान्य लेखांतही तो जिवंतपणा निर्माण करूं शकतो. त्याच्या उलट, वाईट मथळ्यानें उत्तम लेखाचेही मातेरें होतें. फर्मास मथळे देण्याच्या कामीं अच्युतराव कोल्हटकर अन् काकासाहेब लिमये ह्यांचा मोठा हातखंडा होता. त्यांच्यापासूनच मी ही कला शिकलों असें म्हटलें तरी चालेल. वाचकांच्या मनावर जास्तींत जास्त परिणाम कसा होईल इकडे पत्रकाराला अधिक लक्ष्य द्यावें लागतें. हा अर्थात् वाङ्मयाचा भाग आहे. पूर्वीच्या पत्रकारांना भाषेचें शास्त्र उत्तम प्रकारें अवगत असे. म्हणूनच त्यांच्या लेखनाची विशिष्ट शैली तयार होई. विषयाच्या ज्ञानाइतकेंच भाषेच्या शैलीलाही त्यावेळीं महत्त्व असे. वाङ्मयानें वृत्तपत्राची अप्रतिष्ठा होते अशी आजकालच्या कित्येक पत्रकारांनी आपली समजूत करून घेतलेली आहे. वृत्तपत्रीय लेखन ललित वाङ्मय आहें असें मी म्हणत नाहीं. केवळ आकर्षक शब्दांचीं आरास मांडून कांहीं अग्रलेख तयार होत नाहीं. त्याचबरोबर एखाद्या सरकारी अहवालाप्रमाणें उताऱ्यांचा, आकड्यांचा, अन् कोष्टकांचा वाचकांवर भडिमार केला म्हणजे आपण कृतकृत्य झालों असेंहि पत्रकारांनीं मानण्याचें कारण नाहीं. लालित्याच्या अतिशयोक्तीप्रमाणें गांभीर्याचाहि अतिरेक पत्रकारानें टाळावयास हवा. पुष्कळशा वृत्तपत्रांतील अग्रलेख इतके क्लिष्ट आणि दुर्बोध असतात, कीं सर्वसामान्य वाचक त्यांच्याकडे ढुंकूनहि बघत नाहींत. कित्येकदां तर संपादक हे लेख कां लिहितात ह्याचाच मुळीं भ्रम पडतो. विवेचनाची सुबोधता आणि भाषेचा प्रसाद हे दोन वाङ्मयीन गुण तरी कमींत कमी प्रत्येक पत्रकाराच्या अंगीं असावयासच पाहिजेत.

वाचकांच्या विचाराला चालना देणें हें जसें पत्रकाराचें काम आहे, त्याप्रमाणें त्याची भावना चेतविणें हेंहि त्याच कलेचें एक अंग आहे. राजकारण हें मूलांतच मोठें प्रक्षोभक आहे. प्रभावी भाषाशैलीमध्यें जर एकादा राजकीय लेख लिहिला तर आगींत घासलेट ओतावें असा भडका उडतो. स्वकीयाचे डोळे दिपतात, तर विरोधकांच्या अंगाचा दाह उडतो. स्तुतीच्या नि शिव्यांच्या पत्रांचा


त्याजवर पाऊस पडतो. गेल्या चौदा वर्षांमधें अनेकदां हा अनुभव मला आलेला आहे. नुसत्या एका एका लेखामुळें माझ्यावर प्राणांतिक हल्ले झालें आहेत अन् फौजदारी फिर्यादींचें मोहोळ उठलें आहे. सत्तेचाळीस सालीं देशाची फाळणी झाली, तेव्हां फाळणीला संमति देणाऱ्या राष्ट्रघातकी राजकीय धोरणावर जवळ-जवळ एक वर्षपर्यंत मी जो 'नवयुग' च्या अन् 'जयहिंद' च्या स्तंभांमधून तोफखाना डागला, तो वृत्तपत्रीय लेखनाचा एक वैशिष्ट्यपूर्ण विक्रम म्हणून समजावयाला कांहीं हरकत नाहीं. सरकारी अवकृपेचा मी त्यावेळीं जवळ जवळ उच्चांकच मोडला म्हणानांत. 'तुमचें हें लिखाण वाचवत नाहीं !" असा त्यावेळीं माझ्या एका विद्वान् व्यवसायबंधूनें मला बघतांच हंबरडा फोडला, तो मी तरी कधीं विसरणार नाहीं. राजकीय प्रतिपक्ष्यांच्या विचाराची आणि युक्तिवादाची बंभेरी उडविणें एवढेंच कांहीं पत्रकारांचें काम नाहीं. सज्जनांचा पुरस्कार, अनाथांचा कैवार अन् दांभिकाचा धिःकार अशा विचारांच्या नि भावनेच्या विविध क्षेत्रामधून पत्रकाराला विहार करावा लागतो. अनेक रसांचीं कारंजीं त्याला आपल्या प्रतिभेमधून खेळवावीं लागतात. 'मृत्युलेख' हा तर पत्रकाराच्या लेखन सामर्थ्याची सर्वांत मोठी कसोटी आहे. किंबहुना, मृत्युलेख हा पत्रकाराची 'वार्षिक परीक्षा'च होय, असें मी समजतों. सार्वजनिक माणसाचा मृत्यु हा वृत्तपत्रीय जीवनामधली एक अत्यंत महत्त्वाची घटना होय. त्या व्यक्तीच्या जीवनाचें आणि कार्याचें मूल्यमापन करतांना केवळ त्याच्या चरित्रामधल्या प्रसंगाचीं जंत्री देऊन भागत नाहीं. तर तो ज्या राजकीय, सामाजिक वा वाङ्मयीन प्रवृत्तींचा प्रतिनिधी असेल, त्याचें अत्यंत रसपूर्ण आणि मार्मिक विश्लेषण संपादकाला करावे लागते. ही सर्व माहिती जमा करावयला वेळही फारसा नसतो. व्यापक सहानुभूति आणि प्रखर स्मरणशक्ति ह्यांचे भरपूर भांडवल जर संपादकाजवळ नसेल तर तो ह्या कसोटीमधून उत्तीर्ण होणें कठीण आहे.

माझा पिंड साहित्यिकाचा आहे. तथापि, वृत्तपत्राच्या व्यवसायाचे मला पहिल्यापासूनच आकर्षण आहे. आगरकर; शिवरामपंत परांजपे आणि अच्युतराव कोल्हटकर ह्यांच्या उज्ज्वल ध्येयवादानें आणि लेखनानें मला ह्या क्षेत्रांत ओढून आणलेलें आहे. राजकीय तत्त्वज्ञानाचा मी कांहीं शास्त्रीय अभ्यास केलेला नाहीं. मानवतेचा मी उपासक आहे. स्वातंत्र्य आणि समता हीं मानवी जीवनांतील अत्युच्च

मूल्ये आहेत, असें मी मानतों. ह्या मूल्यांची पूजा करावयास जास्तींत जास्त संधि मला वृत्तपत्रव्यवसायांत मिळते, म्हणूनच मी ह्या व्यवसायांत अजूनही वावरतों आहे. माझ्या लेखनाच्या सर्व मर्यादा मी जाणतों. तथापि, कोणत्याही प्रतिगामी किंवा विकृत विचारसरणीचा मी माझ्या लेखनांत आजपर्यंत कधीं पुरस्कार केलेला नाहीं किंवा दुष्टपणानें वा मत्सरानें प्रेरित होऊन मी कोणावरही हात उगारलेला नाहीं. सहानुभूतीचा अन् सद्भावनेचा पुरस्कार करण्यासाठींच मी माझी लेखणी आतांपर्यंत झिजवली आहे, एवढें जरी मला श्रेय मिळालें तरी पुष्कळच आहे !

१० जून १९५३ } —प्रल्हाद केशव अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाधीन
अनुक्रम ०५३९२ वि: निर्बंध
क्रमांक २०६० दि: २८/३/८१



काशीबाईची करुण किंकाळी

"मी पाया पडतें ! माझें लुगडें फेडूं नका ! माझी अब्रू घेऊं नका !" अशी एका असहाय्य मातेची आर्त किंकाळी १९ ऑक्टोबर १९४४ रोजीं दुपारीं बारा वाजतां कोल्हापूर संस्थानांतील चिखलव्हाळ गांवच्या चावडीमधून बाहेर उठली ! पोलिसाचे काळे डगले घातलेल्या दोन नरपशूंनी एका अनाथ अबलेच्या दंडाला धरून तिच्या लुगड्याला हात घातला होता. आणि हातांत चामड्याचा पट्टा घेऊन, फौजदाराचा पोशाख चढविलेला एक मदोन्मत्त राक्षस त्या स्त्रीचा वुचडा धरून गरगरा डोळे फिरवीत, मोठमोठ्यानें ओरडत होता, "फेडा-फेडा रांडेचा कासोटा !" त्या स्त्रीचा दीनदुबळा नवरा हात जोडून त्या राक्षसाच्या पायांपाशीं लोळण घेत होता. आणि तिच्या पोटीं जन्म घेतलेली पांच बालकें हंबरडा फोडून धाय मोकलून रडत होतीं; पण त्या अनाथ मातेच्या करुण किंकाळीचा, तिच्या असहाय्य पतीच्या विनवणीचा किंवा तिच्या त्या पांच अर्भकांच्या आक्रोशाचा त्या फत्तर काळजाच्या फौजदारावर एवढासा देखील परिणाम झाला नाहीं ! उलट त्या स्त्रीच्या कासोट्याला स्पर्श करतांना त्या नादान नोकरांचे हात थरथर कापूं लागले, म्हणून संतापून जाऊन त्या नरपशू फौजदारानें स्वतःच्या हातानें त्या साध्वीचा कासोटा फर्रकन् सोडला आणि तिच्या कमरेंत लाथ मारून, तिला खालीं पाडलें ! एका क्षणांत तिच्या अंगावरचें वस्त्र हिसकावलें गेलें. आणि तिची लाज भरदिवसां एका सार्वजनिक चावडीवर चार चौघां-समोर, तिच्या नवऱ्यादेखत आणि तिच्या पांच मुलांसमक्ष अक्षरशः उघडी पडली ! चामड्याच्या पट्ट्याचें निर्घृण घांव सपासप तिच्या उघड्या अंगावर वाजूं लागलें ! पण त्या कठोर घावांच्या तीव्र वेदनेचे तिला त्यावेळीं कांहींच वाटलें

नाहीं! आपलें तोंड दोन्हीं हातांनीं झांकून जमिनीवर गडबडा लोळत तिनें हंबरडा फोडला, "माझी अव्रु गेली हो गेली! माझी अव्रु गेली हो गेली!"

ढगांची काळीकुट्ट काळीजें टराटर फाडीत वीज ज्याप्रमाणें आभाळांतून आरपार जाते, तशी काशीबाईची ती करुण किंकाळी दाहीं दिशांच्या छातीच्या चिंधड्या करीत, आकाशाची कड्याकपाटें फोडून स्वर्गामधल्या तेहतीस कोटीं देवांच्या कानांपर्यंत जाऊन थडकली असेल! पण काशीबाईच्या बेअब्रूवर पांघरूण घालण्यासाठीं एकही स्वर्गस्थ देव त्यावेळीं चिखलव्हाळच्या चावडीवर धांवून आला नाहीं! किंवहुना, भगवान् सूर्यनारायण आपले बाराही डोळे सताड उघडें ठेवून दिवसाढवळ्या चाललेली एका सतीची अघोर विटंबना आभाळांतून गमतीनें पहात होता! त्यानें मनांत आणलें असतें तर आपल्या तेजःसंपन्न नेत्राच्या नुसत्या एका कटाक्षानें त्या दुरात्म्या इंगवल्याच्या देहाचा एका क्षणांत भडका उडवून दिला असता! पण तसें कांहीं एक झालें नाहीं! काशीबाईच्या करुण किंकाळीनें आकाश हादरलें, स्वर्ग हादरला, तें टीचभर रुंदीचें चिखलव्हाळ हादरलें, तें वीतभर रुंदीचें कोल्हापूर हादरलें; एवढेंच नव्हें तर ती किंकाळी ऐकून ज्याच्या अंगावर सरसरून शहारा उभा राहिला नाहीं असा ह्या महान् भरतखंडामधल्या चाळीसकोटी रहिवाशांपैकीं क्वचित्च एकादा मुर्दाड प्राणी सांपडूं शकेल! पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं! कोल्हापूर संस्थानांत जन्मलेल्या ह्या सवाई दुःशासनानें भरदिवसां गांवच्या चव्हाट्यावर एका सतीचें केवळ वस्त्रहरण करूनच तिची लाज नागवीउघडी केली नाहीं, तर तिच्या मातृत्वाची अघोर हत्या करून तिच्या अंगावर रक्ताचे ओघळ वहावयाला लावलें! पण या अत्याचारी दुःशासनाचा हात त्याच्या धडापासून उखडून काढावयास त्यावेळीं स्वर्गांतल्या तेहतीस कोटी देवांपैकीं एकहि पाठीराखा देव जसा खालीं उतरला नाहीं, तसा चाळीस कोटी वसतीच्या या देशामधला एकहि मायेचा पूत त्या क्षणीं पुढें झाला नाहीं! तेहतीस कोटी देवांनीं आणि चाळीस कोटी माणसांनीं उघड्या डोळ्यांनीं काशीबाईची तो विटंबना सहन केली. आणि "माझी अब्रू गेली हो गेली!" हा तिचा हृदयभेदक हंबरडा कानांत बोटें न घालतां तसाच उघड्या कानानें ऐकून घेतला!

या जगाचा उद्धार करण्यासाठीं प्रत्येक युगांत परमेश्वर अवतार घेत असतो, असें या देशांतील आपण श्रद्धाळू हिंदू आजपर्यंत मनोभावानें मानीत

आलों. आम्हांला कांहीं हें ठाऊक नव्हतें; पण खुद्द भगवंतांनीच हें आपल्या गीतेमध्यें आम्हांला आश्वासन देऊन ठेवलेलें आहे. मग हें जर खरें असेल, तर या जगाचें वाटोळें करण्यासाठीं प्रत्येक युगांत कलिपुरुषही उत्पन्न होत असले पाहिजेत असें मानल्यावांचून गत्यंतर उरत नाहीं ! किंबहुना, जगांत वारंवार थैमान घालणाऱ्या दुष्ट दानवांना जमिनदोस्त करण्यासाठींच परमेश्वराला वरचेवर खालीं उतरावे लागत असलें पाहिजे. भारताच्या त्या भाग्यशाली काळांत दुर्योधन-दुःशासनादि कौरवांनीं आमच्या या पवित्र भूमीवर अगणित पापांचें डोंगर रचून ठेवलें, म्हणूनच त्यांचें निर्दालन करण्यासाठीं भगवान् श्रीकृष्णाला आमच्या या देशांत अवतार घ्यावा लागला. आतां इतिहासाची एकसारखी पुनरावृत्ति होत असते असें आमचें आधुनिक इतिहासपंडित आम्हांला सांगतात. म्हणून आम्हीं विचारतो, "इतिहासाची ही प्राचीन प्रवृत्ति किंवा पुनरावृत्ति सध्यां काय आजारी पडली आहे किंवा काय ? म्हणजे इतिहासांतल्या वाईट गोष्टी तेवढ्या नेमक्या पुन्हां पुन्हां घडून आलेल्या आम्हांला दिसतात आणि चांगल्या मुळींच घडून येत नाहींत, हें आहे तरी काय ? तसें नसतें तर, सध्यांच्या या युगांत इंगवल्यासारख्या कलिपुरुषांना निष्कारण ऊत कां आला असतां ? आणि आमच्या पोलिसांप्रमाणें गुन्ह्याच्या ठिकाणीं परमेश्वर तरी नेमका बेपत्ता कां झाला असतां ?

परमेश्वरानें ह्या भारतवर्षांत जन्म घ्यावा, एकदांच नव्हे पण शेंकडों वेळां घ्यावा, असें एकापेक्षांहि एक भीषण अत्याचार गेल्या दोनशें वर्षांत या दुर्दैवी देशांत अनेक वेळां घडून आलेले आम्हांला माहित नाहीं काय ? धनधान्यानें भरलेला, सुवर्ण संपत्तीनें शोभविलेला आणि मुलांमाणसांनीं फुललेला एवढा आमचा हा प्रचंड देश ! तो हा देश गेलीं दीडशें वर्षें चाळीस कोटी गुलामांचा एक भेसूर कोंडवाडा होऊन बसलेला आहे, तरी देखील तो आमचा परमेश्वर अद्यापि इथें अवतार घेऊन प्रकट होत नाहीं याचा अर्थ काय आहे ? परकी राज्यकर्त्यांनीं या देशांतील लाखों लोकांची अन्नान्नदशा करून टाकलेली आहे. अंगावर कपडा नाहीं. डोक्यांत शिक्षण नाहीं. हातांत शस्त्र नाहीं. रहावयाला घर नाहीं. पेरायला शेत नाहीं. जगायला काम नाहीं आणि लढायला धाम नाहीं ! असें नरकांतील किड्यांपेक्षांहि लाचारीचें जिणें आज लक्षावधि लोकांवर बळजबरीनें

लादलें गेलें, तरी त्या परमेश्वराला वर स्वस्थ बसविलें तरी कसें? कांहीं वर्षांपूर्वी आमच्या दयाळू राज्यकर्त्यांनीं अमृतसरमधील जालियनवाला बागेंत निरपराधी जीवांचा जो कसाईखाना उघडून दाखविला, तो त्या परम कारुणिक परमेश्वराला उघड्या डोळ्यांनीं पहावला तरी कसा? आणि आज! आज पांच हजार मैलांवरच्या एका परकी राष्ट्रांच्या नरड्याला लागलेली जर्मन तात तोडण्यासाठीं आमचे लाखों सैनिक आपल्या रक्तामासांच्या नद्या वाहवीत असतां त्यांच्या हातांपायांतील गुलामगिरीच्या बेड्या काढून त्यांना स्वातंत्र्य देण्याची नुसती भाषा देखील ज्या राष्ट्रांतील कृतघ्न नेत्यांच्या तोंडून निघत नाहीं, त्या लोकांच्या साम्राज्यलोभी दुष्टपणाचा कायमचा एकदां निकाल लावून टाकावा, अशी कल्पना देखील त्या परमेश्वराच्या डोक्यांत अद्यापि कां येत नाहीं? एवढा मोठा आमचा सुजल, सुफल आणि सस्यश्यामल बंगाल! पण या अन्नोदकसंपन्न भूमीला पस्तीस लाख मुडद्यांच्या स्मशानाची जेव्हां कळा आली, तेव्हां तें दृश्य स्वर्गांमधून त्या दयामय आणि दीनवत्सल परमेश्वराला पहावलें तरी कसें? पारतंत्र्यांत पिचत पडलेली आपली मातृभूमि स्वतंत्र व्हावी म्हणून देशांतील तारुण्य, सामर्थ्य आणि प्रतिभा वर्षानुवर्ष कारागृहांत कुजत पडलेली असतां आणि आपल्या सर्वस्वाचें बलिदान करावयासहि सिद्ध असतां, या प्राणाच्या आणि रक्ताच्या नैवेद्यानें तो भक्तांच्या नवसास पावणारा परमेश्वर अद्यापि कां प्रसन्न झाला नाहीं बरें?

तेव्हां ह्या सर्व गोष्टींचा अर्थ एवढाच आहे कीं, दुःखितांच्या किंवा अनाथांच्या किंकाळ्या ऐकून त्यांच्या सहाय्यासाठीं, संरक्षणासाठीं किंवा उद्धारासाठीं अवतार घेण्याच्या आपल्या जुन्या वचनाला परमेश्वरानें या युगांत तरी हरताळ फासल्यासारखे दिसतें. हो, तसेंच असलें पाहिजे! कारण तसें नसतें, तर त्या नराधम इंगवल्यानें चिखलव्हाळच्या चावडीवर दीनदुबळ्या काशीबाईला नागवी करण्यासाठीं आपला पापी हात जेव्हां तिच्या कासोट्याला घातला आणि "माझें लुगडें फेडूं नका!" असा त्या अनाथ माऊलीनें जेव्हां शेवटचा हृदयभेदक हंबरडा फोडला, तेव्हां तिच्या मदतीसाठीं त्या चावडीच्या खांबाखांबामधून नरसिंहाप्रमाणें कडकडून आणि गडगडून, परमेश्वर त्या ठिकाणीं प्रकट झाला नसतां काय? बोला, झाला नसतां काय? काशीबाईच्या कमरेंत लाथ घालणाऱ्या त्या उन्मत्त इंगवल्याला आडवा

पाडून त्याचा एका क्षणांत हिरण्यकश्यपू करून टाकणें हें त्या परमेश्वराला काय अशक्य होतें ? अर्धनग्न स्थितींत द्रौपदीला दुःशासनानें राजसभेंत फरफरा ओढीत आणले, पण तिची लाज, साऱ्या सभाजनांपुढें उघडीनागडी करण्याचा त्याचा पापी प्रयत्न परमेश्वरानें त्यावेळीं यशस्वी होऊं दिला नाहीं ! त्या राजसभेंत द्रौपदीनें जसा आपल्या पाठीराख्या परमेश्वराचा धांवा केला, तसा धांवा गरीब बिचाऱ्या काशीबाईंनें त्या अनाथाच्या नाथाच्या नांवानें त्या वेळीं केला नसेल काय ? अरेरे, काशीबाईनें परमेश्वराचा कसा आणि किती धांवा केला तें फक्त तिची विटंबना करणाऱ्या त्या इंगवल्याला आणि तिची उपेक्षा करणाऱ्या त्या परमेश्वरालाच ठाऊक ! पण काशीबाईनें फोडलेला तो करुण टाहो ऐकून, त्या इंगवल्याचें फरसबंदी काळीज जसें द्रवलें नाहीं, तसा तिचा तो हृदयभेदक हंबरडा ऐकून क्षीरसागरांत वामकुक्षी घेत बसलेल्या शेषशायी भगवंताचें अंतःकरण देखील द्रवलें नाहीं ! दुःशासनानें द्रौपदीचा नुसता पदर ओढला तर तिच्या अब्रूवरचें पांघरूण उघडें पडूं नये म्हणून वस्त्राचा डोंगरच्या डोंगर खांद्यावर घेऊन प्रत्यक्ष परमेश्वर तेथें धांवत आला ! आणि इकडे त्या सवाई दुःशासनानें काशीबाईला मुलामाणसांदेखत नागवीउघडी करून तिच्या स्त्रीत्वाची अमानुष विटंबना केली–नव्हे तिच्या मातृत्वाचा अघोर विध्वंस केला, तरी तिची लाज राखण्यासाठीं परमेश्वर राहूं द्या—निदान परमेश्वराचा एकादा औरस किंवा दत्तकपुत्र देखील धांवून पुढें येऊं नये का ? राजसभेमध्यें द्रौपदीवर झालेल्या विटंबनेबद्दल परमेश्वरानें केवळ दुःशासनाचाच नव्हे तर त्याच्या मागें असलेल्या साऱ्या पाशवी राजसत्तेचाहि विध्वंस करून सूड घेतला ! आणि भगवान् सूर्यनारायणाला साक्षी ठेवून काशीबाईवर अमानुष अत्याचार करणाऱ्या त्या नराधम इंगवल्याला मात्र परमेश्वरानें आहे तसाच अद्यापि शाबूत ठेवलेला आहे ! उलट, त्याच्या पापावर निर्लज्जपणें पांघरूण घालणारी नादान नोकरशाही आपलें बेमुर्वतखोर नाक उडवीत जगासमोर मोठ्या दिमाखानें मिरवीत आहे, तरी परमेश्वराचे हात अद्यापि शिवशिवत नाहींत म्हणजे काय आहे बरें ?

तेव्हां त्या सर्व गोष्टीचा अर्थ एवढाच आहे कीं, यापुढें तुमचाआमचा उद्धार तो परमेश्वर करील या आशेनें आभाळाकडे तोंड करून बसण्यांत

कांहीं एक अर्थ नाहीं. पुष्कळ वर्षांपासून परमेश्वराचें आणि या देशाचें वांकडें आलेलें आहे. आणि सध्यांतरी परमेश्वर तुमचा–आमचा नव्हेच नव्हे. परमेश्वर ब्रिटिश सरकारचा आहे! परमेश्वर चर्चिलचा आहे! परमेश्वर ट्रूमनचा आहे! परमेश्वर स्टॅलिनचा आहे! दीडशें वर्षें हिंदुस्थानला गुलामगिरींत ठेवणाऱ्या साम्राज्यशाहीच्या गळ्यांत फिरून फिरून विजयाचे हार घालणारा परमेश्वर हा हिंदुस्थानचा नसून ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आहे हें खोटें आहे काय? एकाद्या पांढऱ्या रंगाच्या काशीबाईच्या झग्याच्या नुसत्या किनारीला कोणी हात लावला असता तर तो हात कलम करून चर्चिल–स्टॅलिनला खूष करण्यासाठीं परमेश्वरानें आपल्या जिवाचें रान केलें असतें; पण गुलाम राष्ट्रांतील एका काळ्या काशीबाईच्या संरक्षणासाठीं परमेश्वरानें तरी आपल्या अनंत हस्तांपैकीं एकाद्या हस्ताला काय म्हणून कष्ट द्यावेत? नका, नका, परमेश्वरा! भारतवर्षांतील आम्हां नादान गुलामाच्या रक्षणासाठीं इतक्या लांबून आकाशामधून धांवत येण्याचें किंवा येथेंच येऊन एकादा अवतार घेण्याचे कष्ट तुम्हीं घेऊं नका!

देव म्हणा किंवा दैव म्हणा—हें दीन दुबळ्याचे पाठीराखें नसतेंच नसतें हें आम्हांला आतां चांगलें कळून आलेलें आहे! ज्याच्या मनगटांत सामर्थ्य असतें, त्याच्या पायाशीं परमेश्वर लोळण घेतो आणि त्याच्याच घरांत परमेश्वर शागिर्दी करतो हें अगदीं खरें! आमच्या दंडांत जर ताकद असती आणि आमच्या अंगांत जर पौरुष असतें तर काशीबाईच्या सहाय्यासाठीं आम्हांला सरकारच्या कायद्याकडे किंवा परमेश्वराच्या वायद्याकडे आशाळभूतपणें डोळे लावून कशाला बसावें लागलें असतें? परमेश्वर तेथें जाऊन पोहोंचावयाच्या आधींच आम्हीं तेथें जाऊन थबकलों नसतों कां! पण आम्हीं गुलाम आहोंत. आम्हीं परतंत्र आहोंत. निःशस्त्र आहोंत. आम्हीं षंढ आहोंत. आमच्याजवळ सामर्थ्य नाहीं. आम्हांला अभिमान नाहीं. आम्हाला लाज नाहीं कीं लज्जा नाहीं. आम्ही नादान आहोंत. आम्ही भ्याड आहोंत. कोणीहि उठावें आणि आमच्या बायकांना फरफर ओढीत चावडीवर न्यावें आणि त्यांना नागवे करून त्यांच्या अब्रूचे दिवसाढवळ्या धिंडवडे काढावेंत! पशूनें पशूवर देखील अत्याचार करूं नयेत ते माणसांना आपल्या रक्ता-

मांसांच्या देशवांधवावर करावेत ! अेरेरे, आणि ही सारी बेअब्रू आणि विटंबना आम्ही उघड्या डोळ्यांनी पहावी आणि आपले निर्लज्ज जिणें चिखलांतील किड्याप्रमाणें तसेंच कंठावें ! छें, छे, परमेश्वराला हांकसुद्धां मारण्याची आमचीं लायकी नाहीं. जोंपर्यंत आम्हीं गुलाम आहोंत तोंपर्यंत तो आम्हांला कसलेंहि सहाय्य करूं शकणार नाहीं ! आमच्या हातापायांतल्या बेड्या जेव्हां आम्हीं तोडून टाकूं आणि आमची पोलादी मनगटें जेव्हां आम्हीं मोकळीं करूं, तेव्हां परमेश्वरासकट सर्व जगाला वठणीवर आणावयाला आम्हांला फारसा वेळ लागणार नाहीं !

पण तोंपर्यंत अभागिनी काशीबाई, तुला असेंच रडत बसावें लागेल ! तुझ्या गालावरच्या अश्रूंच्या धारा आणि तुझ्या देहावरचे रक्ताचे ओघळ पुसून काढण्याचें सामर्थ्य गुलामगिरीच्या बेड्यांनीं बांधलेल्या ह्या हातांमध्यें नाहींच नाहीं ! अत्याचारी हातांनीं फेडलेले तुझें पवित्र वस्त्र, तुला पुन्हां नेसवून तुझी उघडीनागडी पडलेली लाज झांकून टाकण्याची ताकद या शृंखलाबद्ध बाहूंमध्यें नाहींच नाहीं ! रड, अभागिनी काशीबाई, माते काशीबाई, रड, ! तुझ्या आक्रोशाच्या ह्या करुण किंकाळ्या दशदिशांत आणि साऱ्या देशांत एकसारख्या निनादूं देत ! "चाळीस कोटी गुलामांच्या या नादान देशांत माझ्या अब्रूवर पांघरूण घालणारा एकहि मायेचा पूत पुढें आला नाहीं ? माझी अब्रू गेली हो गेली ! " असा मोठमोठ्यानें तूं हंबरडा फोडीत रहा ! दुराचारी दुःशासनाचें पारिपत्य करणारा एकहि बलाढ्य भीम या भारतवर्षात आजच्या घटकेला उरलेला नाहीं, म्हणून मोठमोठ्यानें तूं टाहो फोडीत रहा ! तुझ्या ह्या आक्रोशामध्यें, तुझ्या ह्या आक्रंदनांमध्यें आपल्या गुलाम राष्ट्राचा खरा उद्धार आहे ! तुझ्या करुण किंकाळींमधूनच आमचा उद्यांचा उद्धारकर्ता परमेश्वर निर्माण होणार आहे ! काशीबाई, ही केविलवाणी किंकाळी केवळ तुझीच नाहीं ! दीडशें वर्षे नाडल्या आणि ताडल्या गेलेल्या आपल्या मायभूमीची ती किंकाळी आहे ! तुझ्यावर जसा एका इंगवल्यानें अत्याचार केलेला आहे, तसे अनेक अत्याचार या आपल्या मायभूमीवर अनेक इंग्रज इंगवल्यांनीं आजपर्यंत केलेले आहेत ! तुझी अमानुष विटंबना डोळे उघडे ठेवून तुझ्या पांच पुत्रांना जशी मुकाट्यानें पहावी लागली, तशी आपल्या मातृभूमीची राक्षसी विटंबना चाळीस कोटी मुलांना आपलें डोळे उघडे ठेवून आणि आपल्या जिभा हातांत धरून इतकीं वर्षे पहात बसावी लागली आहे ! म्हणून म्हणतों,

काशीबाई, तुझी ही करुण किंकाळी साऱ्या देशाला आणि साऱ्या जगाला ऐकूं येऊं दे ! या तुझ्या किंकाळीमधून एकादा भीम, एकादा अर्जुन, एकादा पृथ्वीराज किंवा एकादा शिवाजी जर पुन्हा या देशांत निर्माण होऊं शकला तर तोच-तोच तुझी आणि आपल्या मायभूमीची अब्रू आणि प्राण वांचवूं शकेल ! साऱ्या जगासमोर एका पुण्यशील माऊलीला नागवीउघडी करून बेअब्रू करणाऱ्या 'दुःशासनांना आणि 'इंगवल्यांना' तोच खेरं शासन करूं शकेल ! या अभागी देशाला स्वतंत्र करण्याचें सामर्थ्य काशीबाई, केवळ तुझ्याच ह्या करुण किंकाळींत आहे !

———

ये, स्वातंत्र्या ये ! : : २

ये, स्वातंत्र्या ये ! इतकें दिवस तुझीच आम्ही वाट पहात होतो. शतकेंच्या शतकें आणि वर्षेंच्या वर्षें तुझ्याच मंगल चरणाकडे डोळे लावून आम्ही बसलों होतो. इतकें दिवस तुझ्याच नांवाचा आम्ही जप करीत होतों. इतक्या रात्रीं तुझ्याच नांवानें घरांत बसून आम्ही आक्रोश करीत होतों. आम्हांला सोडून तूं इतकीं वर्षं कोठें दडी मारून बसला होतास बरें ? जगामधल्या अनेक देशांना आणि लोकांना शतकानुशतकें तुझें दर्शन मनसोक्तपणें घडत असतांना, आम्हांलाच तेवढा तुझा सुंदर चेहरा पहायला मिळूं नये याचें आम्हाला आश्चर्य वाटत होतें. गेल्या दीडशें दोनशें वर्षांत एकदां देखील तुला आमची आठवण येऊं नये; असा कोणता अपराध आम्ही तुझा केला होता बरें ? जगांतल्या अत्यंत दरिद्री आणि नापिक देशावर तुझी कृपा असावी आणि 'सुवर्णभूमि' म्हणून ज्या आमच्या देशाची हजारों वर्षें त्रिखंडांत कीर्ति दुमदुमत आहे त्या भारतवर्षावर मात्र तुझी अवकृपा असावी, हे चमत्कारिक नाहीं काय ? दुसऱ्यांच्या देशाचा आणि वित्ताचा अपहार करणाऱ्या क्रूर आणि जुलमी लोकांना तुझा आश्रय असावा आणि सारें विश्व आपलें कुटुंब आहे असें समजून साऱ्या मानवतेला आपल्या घराचे दरवाजे उघडे ठेवणाऱ्या आमच्यासारख्या सज्जन आणि पापभीरू लोकांवर मात्र इतकीं वर्षें तुझें कृपाछत्र असूं नये हें अद्भुत नव्हें काय ? आम्हाला वाटतें : जबरदस्ताचें तुला भय वाटतें म्हणूनच तूं त्यांची मनधरणी करीत असावास आणि आमच्यासारख्या गरीब लोकांची तुला पर्वा वाटत नाहीं म्हणूनच इतकीं वर्षें तूं आमच्याकडे ढुंकून पहात नसावास. हजारों वर्षांपासून साऱ्या जगाचें लक्ष एकट्या या

आमच्याच देशावर खिळून बसलें असतांना तुझेंच तेवढें लक्ष आमच्याकडे असूं नये यावद्दल राहून राहून आम्हांला दुःख होत होतें. जगामध्यें कोणत्याहि देशांत आजपर्यंत कधीं होऊन गेले नाहींत असे मोठमोठे ऋषी, साधू आणि वीर आमच्यामध्यें होऊन गेले असतांना तुला आमच्या देशाचें आकर्षण कां वाटूं नये बरें? हिमालयाची बर्फाच्छादित शिखरें पहाण्यासाठीं, गंगा नदीच्या पवित्र जळांत अवगाहन करण्याकरितां, किंवा काश्मीरमधल्या गुलाबांच्या वाटिकेंत विहार करणाच्या हेतूनें तरी तूं एकादे वेळीं या देशाकडे चक्कर मारशील अशी आमची अपेक्षा होती. तुझ्या वाटेकडे डोळे लावून लावून आणि तुझ्या नांवाच्या धांव्रण्या धावून धावून आम्ही अगदीं कंटाळून गेलों होतो रे! आम्हांला वाटलें कीं आतां कांहीं तूं येत नाहींस. लोकमान्य टिळक तर कंटाळून कंटाळून निघून गेले. तें म्हणाले, "आमच्या आयुष्यांत कांहीं आम्हांला हें स्वातंत्र्य पहावयाला मिळत नाहीं." आम्हांला देखील असेंच वाटलें होतें, कीं तुझी आणि आमची गांठभेट आतां कांहीं आमच्या या जन्मामध्यें होत नाहीं. पण अखेर शेवटीं तुला आमची दया आली आणि तूं आज आलास. ये, स्वातंत्र्या ये. आम्ही तुझें स्वागत करतों.

ये स्वातंत्र्या ये. जवळ ये. अगदीं जवळ ये. असा तिऱ्हाइतासारखा दूर उभा राहूं नकोस. इथले सगळे अनोळखी चेहरे बघून तूं जरा गोंधळून गेला असशील, बिचकून गेला असशील. गांगरून गेला असशील. आमच्या देशामधलें कोणीच तुझ्या ओळखीचें नाहीं. म्हणून कदाचित् तुला चुकल्यासारखें वाटेल. पण थोड्याच दिवसांत तुझी आणि आमची चांगली गट्टी होईल. आणि मग तुला आमच्याबरोबर करमायला लागेल. तसें आम्ही तुझें निस्सीम भक्त आहोंत रे. आमच्या हृदयाला कान लावून आंतले ठोके ऐक. बघ, प्रत्येक ठोका तुझ्या नांवाची घोकणी घोकतो आहे कीं नाहीं. ही आमच्या हाताची नाडी बघ. तुझ्या दर्शनासाठीं उतावीळ होऊन पहा कशी उड्या मारते आहे ती. ह्या आमच्या अंगाला हात लाव. कढत लागते आहे ना तुला तें! पहा, तुझ्या स्वागतासाठीं आमचें रक्त आंत कसें उसळ्या मारतें आहे तें. म्हणून म्हणतो जवळ ये. असा लांब उभा राहूं नकोस. आम्हांला तुला कडकडून भेटूं दे. आम्हांला तुला डोळे भरून नीट बघूं दे!

डोळ्यांत अश्रु भरून आल्यामुळें तुझें तेजस्वी मुखकमल आम्हांला नीट दिसत नाहीं. आजपर्यंत तुझी आम्ही पुस्तकामध्यें नुसती वर्णनेंच वाचीत होतो. तुझ्या जादूचीं काव्यें, तुझ्या सामर्थ्याचीं स्तोत्रें आणि तुझ्या पराक्रमाचे पोवाडे आम्हीं नुसतें तोंडानेंच म्हणत होतो. दूरदूरच्या देशाचे लोक तुझ्या गोड गोड गोष्टी आम्हांला सांगत होते. पण तुझा चेहरा प्रत्यक्ष असा कधींच आम्हांला पहावयाला मिळाला नव्हता. त्यामुळें आम्हांला अशी काळजी वाटत होती कीं, तूं आल्याबरोबर आम्ही तुला नीट ओळखूं कां नाहीं ? नाहीं तर तूं अचानक यायचास आणि आम्ही तुला न ओळखतां तसेंच दारांत मख्खासारखें उभे रहावयाचे. आणि मग तूं आमच्यावर रागावून तसाच माघारीं निघून जायचास. पूर्वीची ओळख नसली म्हणजे होते माणसाच्या हातून अशी चूक. दुसरेंहि एक भय आम्हांला असें वाटत होतें कीं, तुझी आमची पहिली ओळख नसल्यानें भलतेंच कोणी तरी तुझें नांव घेऊन आमच्या घरांत शिरावयाचें आणि आम्हांला फसवून निघून जायचें. आम्हीं आपली सरळ साधी भोळीं माणसें. कोणीही आमच्या देशांत यावें आणि आम्हाला फसवून जावें, असा आजपर्यंतचा इतिहास आहे. पण तूं आलास. अगदीं नक्की आलास. आम्हीं तुला ओळखलें, म्हणून म्हणतों जवळ ये. तुझा सुंदर चेहरा अगदीं जवळून आम्हांला नीट न्याहळून बघूं दे.

ये स्वातंत्र्या ये. तुझें कोणत्या शब्दांनीं आणि कसें स्वागत करावें हेंच मुळीं आम्हांला कळत नाहीं. बोलून चालून आमचा देश खेड्यांचा. आम्हीं आपले अडाणी गांवढळ लोक. तुझ्यासारख्या थोर पाहुण्यांचा सत्कार कसा करावा हें आम्हांला कसें माहित असणार ? म्हणून आम्हीं करीत असलेल्या तुझ्या स्वागतांत जर कुठें उणेपणा राहिला तर त्यावद्दल तूं आम्हांला क्षमा कर. आणि आम्हांला संभाळून घे. तुझ्या स्वागतासाठीं बघ हे राष्ट्रीय झेंडे कसे घराघरावर लोकांनीं उभारलेले आहेत. तुझ्या सन्मानासाठीं तिरंगी निशाणाच्या ह्या माळा बघ कशा साऱ्या रस्त्यावर फडकत आहेत ह्या. तुझ्या स्वागतासाठीं चौकाचौकांतून आणि मोहल्यामधून लतावृक्षांच्या आणि पानांच्या हिरव्यागार सुंदर कमानी पहा कशा बांधून ठेवलेल्या आहेत ह्या ! तुझ्या स्वागतासाठीं देशामधलें कोटयवधि लोक आज तयार होऊन बसलेले आहेत. तुला रथावर बसवून तुझी

वाजत गाजत मिरवणूक काढावी कां तुला अंगाखांद्यावर आणि डोक्यावर गणपतिबाप्पाप्रमाणें घेऊन मिरवीत मिरवीत आम्हीं न्यावें, हेंच आम्हांला कळत नाहीं. तूं आल्यामुळें आम्हांला किती हर्ष झाला आहे म्हणून सांगूं. शेंकडों पाडवे किंवा दसरे आणि हजारों दिवाळ्या एकत्र होऊन आज आलेल्या आहेत असें आम्हांला वाटतें. असा सोन्याचा दिवस आमच्या आयुष्यांत उगवेल आणि तो आम्हाला आमच्या डोळ्यांनीं पहावयाला मिळेल असें कांहीं आम्हांला कधीं वाटलें नाहीं. आमच्या डोळ्यावर आमचा अजून विश्वासच वसत नाहीं. आम्हीं जागे नसून स्वप्नांत आहोंत असेंच आम्हांला वाटतें. स्वप्नच असेल तर केवढें हिमालयासारखें सुंदर गगनचुंबी आणि विशाल स्वप्न ! पण नाहीं, हें स्वप्न नाहीं. उलट आमच्या आतांपर्यंतच्या हजारों स्वप्नांचें हें साफल्य आहे. अनेक वर्षांच्या आमच्या मानसपूजेची ही पूर्तता आहे. खरेंच तूं आज आला आहेस. म्हणून म्हणतों, ये स्वातंत्र्या ये !

आतां मी म्हणालों कीं तुझ्या ओळखीचे चेहेरे इथें तुला दिसणार नाहींत. पण अगदींच तसें मात्र नव्हें बरें कां. तुझ्या परिचयाची अनेक थोर थोर माणसें इथें आहेत. गांधीजींचा चेहरा तर तुझ्या चांगलाच ओळखीचा आहे ना? तुझी न् त्यांची चांगली दोन तपांची मैत्री आहे. जवाहरलाल नेहरूंना तूं उत्तम ओळखतोस हें आम्हांला ठाऊक आहे. अंदमानच्या तुरुंगांत वीर सावरकरांची आणि तुझी चांगली गट्टी जमलेली होती ही गोष्ट सर्वांना माहित आहे. आजपर्यंत अनेक वेळां तुला भेटून आलेले आणि प्रत्यहि तुला भेटणारे शेंकडों शूर लोक ह्या आमच्या देशामध्यें आहेत. त्यांची आतां तुला एकसारखी सोबत मिळेल. म्हणून तुला बुजल्यासारखें वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. ये. स्वातंत्र्या ये. अगदीं निर्धास्तपणें ये. भिऊं नकोस. आमच्याजवळ शस्त्रास्त्रें नाहींत किंवा आमच्याजवळ सामर्थ्य नाहीं म्हणून तुला आपल्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटत असली पाहिजे. तुझें रक्षण आणि तुझा सांभाळ आम्हीं दुबळे लोक कसा करूं ह्याबद्दल तुला चिंता वाटत असली पाहिजे. आम्हीं तें जाणून आहोंत. पण स्वातंत्र्या, त्याबद्दल तुला संशय बाळगण्याचें कारण नाहीं. अरे, तूं आल्यामुळें आतां हजारों हत्तींचे बळ आमच्या अंगांत आलें आहे. तुझ्या स्पर्शांत एवढी संजीवनी आहे कीं, त्यामुळें मुडदेसुद्धां जिवंत होऊन मोठ्या मोठ्या मर्दाप्रमाणें

पराक्रम करतात. मग काय तर? आजपर्यंत आम्हीं प्रेतासारखें जे पडून राहिलों होतों त्याचें कारण आम्हांला सोडून गेला होतास! तुझ्यावांचून इतकीं वर्षें आम्ही जिवंत राहूं शकलों हाच मुळीं चमत्कार आहे. स्वातंत्र्या, अरे तूंच तर मुळीं राष्ट्राचा आणि देशाचा प्राण आहेस. आतां तूं आल्यानें वर्ष-सहा महिन्यांत वघ कसा आमच्या चेहऱ्यांत, शरीरांत आणि वागण्यांत एकदम फरक पडतो ते! वसंतऋतूंत झाडाला जशी नवीन पालवी फुटते आणि मोहर येतो, तसे तुझ्यामुळें देशांत कोव्यवधि जनतेला आतां नवीन जीवन मिळेल आणि त्यांच्या पराक्रमांना मोहर येईल! वालामृत पिऊन मुलें जशीं गुटगुटीत आणि बाळसेदार होतात तशी देशांतील कोव्यवधि जनता तुझ्या प्रेमाचें अमृत पिऊन धष्टपुष्ट होईल. एका वर्षाच्या आंत या देशाचा चेहरा जगाला ओळखतां यावयाचा नाहीं. एवढें या देशाचें स्वरूप तुझ्यामुळें वदलून जाईल हें लक्षांत ठेव. आम्हीं भांडखोर आहोंत. आम्ही दुधखुळें आहोंत. आम्हीं मूर्ख आहोंत अशी आजपर्यंत जगांत आमची वदनामी होत होती. ती तुझ्या कांनावर आलीच असेल. त्यामुळें तुझें आमच्याबद्दलचें मत कलुषित झालें असेल. पण खरें सांगूं स्वातंत्र्या, तूं नसल्याचा हा केवळ परिणाम होय! आतां तूं आला आहेस ना! पहा देशांतील सारी भांडणें आणि अज्ञान धूस ठोकून कशी पळून जातील तें. एका वर्षाच्या आंत सारा देश बृहस्पतीच्या बुद्धीनें विचार करूं लागेल आणि वाचस्पतीच्या जिभेनें बोलूं लागेल. तुला हें आम्हीं सांगायला पाहिजे असें नाहीं. हे सारे चमत्कार इतर देशांत तूं करून दाखविलेले आहेस. यांत तुला नवीन असें कांहींच नाहीं!

ये, स्वातंत्र्या ये. रात्रीचे बारा आतांच वाजत आहेत. ते ऐकलेस ना टोले? मग आतां तूं बाहेर कां उभा? ये. अगदीं आंत ये. आमच्या घरांत ये. आमच्या हृदयांत ये. आमच्या अंतःकरणांत ये. लोकमान्य टिळक सहा वर्षाची शिक्षा भोगून जसे रात्रीं बारा वाजतां आपल्या वाड्यांत परत आले, तसा दीडशें वर्षांच्या हद्दपारीनंतर तूं रात्रींच्या बारा वाजतां आमच्या घरीं येतो आहेस. तथापि, या मध्यरात्रीच्या वेळीं सारा देश तुझ्यासाठीं जागत बसलेला आहे. पाळण्यांतील अर्भकें देखील यावेळीं झोपलेलीं नाहींत. तीं डोळे उघडून टकाटका बघत बसलीं आहेत. एवढीं काळीकुट्ट अंधारी ही रात्र. पण ती देखील दिवसाप्रमाणें नटून थटून तुझ्या स्वागतासाठीं अजून जागते आहे. अनेक जन्मांची आमची पुण्याई आज

फळाला आली आहे असें वाटतें. हा महान् भाग्याचा दिवस देशांत उगवावा म्हणून ज्या वीरांनीं आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या ते वीर हा दिवस पाहण्यास आमच्यामध्यें आज हयात नाहींत म्हणून आम्हांला अतिशय दुःख होतें आहे. तुरंगाच्या फरसबंदीवर ज्यांनीं आपलीं कपाळें आपटून आपटून रक्तबंबाळ केली, फांसाच्या दोरीमध्यें ज्यांनीं आपलीं मुंडकी बेधडकपणें अडकवलीं आणि बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलून ज्यांनीं आपल्या देहाच्या चिंधड्या उडवून घेतल्या, ते हजारो क्रांतिवीर हें स्वातंत्र्या, तुझें स्वागत करावयाला आज आमच्याबरोबर नाहींत ह्याचें आम्हांला वाईट वाटतें. म्हणून तुझें स्वागत करतां करतां त्यांची आठवण होऊन आमच्या डोळ्यामधून एकसारखें हें पाणी वहातें आहे. तूं आलास हा त्यांचा विजय आहे. त्यांच्या बलिदानाचें आणि तपःश्चर्येचें हें फळ आहे हें न ओळखण्याइतकें कां आम्हीं मूर्ख आहोंत ?

ये, स्वातंत्र्या ये. तुझ्या चरणावर मस्तक ठेवून आम्हीं तुला प्रेमानें वंदन करतों. आनंदानें नि हर्षानें आमचा ऊर आज भरून आला आहे. आम्हांला आतां जास्त बोलवत नाहीं. आणि बोलणार तरी काय आम्हीं ? इतक्या वर्षांनीं तूं आलेला आहेस. नव्वद वर्षांपूर्वी तूं येशील असें आम्हांला वाटले होतें. नानासाहेब पेशवे, झांशीची लक्ष्मीबाई आणि सेनापति तात्या टोपे ह्यांनीं तुझा हात धरून तुला घेऊन येण्याची त्यावेळीं प्रतिज्ञा केली होती. पण एकवीस दिवसांची चूक झाली. आणि तूं त्यांना गुंगारा देऊन पसार झालास. त्यानंतर सत्तावीस वर्षांपूर्वी एका वर्षाच्या आंत तुला घेऊन येतों अशी गांधीजींनीं प्रतिज्ञा केली होती. पण त्याहि वेळीं तूं आमच्या हातावर तुरी दिलीस. गेल्या वर्षापासून तूं येणार असल्याच्या गोड गोड बातम्या आमच्या कानांवर एकसारख्या येत होत्या. त्या बातम्यांवर आमचा विश्वास बसत नव्हता. तूं येशील अशी आमची आम्हांला खात्री वाटत नव्हती. पण तूं अखेर शेवटीं आज आलास. कोणी म्हणतात कीं, तूं ज्या पूर्ण स्वरूपांत यावयास पाहिजे होतास त्या स्वरूपांत आलेला नाहींस ! तें कसें कां असेना, पण तूं आलास हें काय कमी झालें ? आतां मात्र आम्हीं तुला या देशांतून बाहेर जाऊं देणार नाहीं. आतां जगाच्या अंतापर्यंत तुला याच देशांत मुक्काम करून रहावें लागेल. देशांतील कोट्यवधि गरीब जनता आज आपलें बळ एकवटून

तुला पकडून ठेवल्यावांचून रहाणार नाहीं. देशांतले श्रीमंत आणि भांडवलवाले लोक तुला पैशाची लालूच दाखवून विघडवून टाकण्याचा पुष्कळ संभव आहे. म्हणून स्वातंत्र्या, तुला ह्या बाबत फार सावधपणानें रहावें लागेल. तूं गरीबांचा संवगडी आहेस. तूं शेतकऱ्यांचा सोबती आहेस. तूं मजूरांचा मित्र आहेस. त्यांच्याच संगतींत ह्या देशामध्यें एकसारखें तुला रहावें लागेल. तुझ्या रक्षणासाठीं तें आपल्या छातीचे कोट करून तुझ्या भोंवतीं उभें रहातील हें ध्यानांत धर, म्हणून म्हणतों, ये स्वातंत्र्या ये. तुझ्या पवित्र नांवाचा मुक्तकंठानें जयजयकार करून आम्ही हर्षभरानें आज तुझें स्वागत करतों !

———

महाराष्ट्राच्या सम्राटाचें निर्याण ! : : ३

आपल्या सबंध हयातीमध्यें लोकांच्या मनाला तीव्र दुःख होईल असें तात्यासाहेबांनीं कांहीं केलें नाहीं. संयम आणि समतोल वृत्ति हें त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होते. अद्भुत किंवा चमत्कारिक कांहीं करून दाखविण्याकडे त्यांच्या मनांचा कल नसे. त्यांच्याबद्दल लोकांनीं ज्या ज्या म्हणून कांहीं अपेक्षा धरल्या त्या त्या त्यांनीं उत्तम प्रकारें पूर्ण केल्या. केळकरांच्या स्वाभाविक चांगुलपणावर लोकांचा विश्वास होता. त्यांच्या हातून सहसा गैर गोष्ट होणार नाहीं असा लोकांचा त्यांच्यावर भरंवसा होता. असें असतां त्यांच्या आयुष्यांत एकच गोष्ट वाईट घडली. एकच गोष्ट अनपेक्षित घडली. जनतेच्या मनाला तीव्र दुःखाचा धक्का देणारी एकच गोष्ट त्यांच्या आयुष्याच्या शेवटीं घडली. आणि ती म्हणजे त्यांचें मरण ! एवढ्या बाबतींत मात्र तात्यांनीं लोकांना चांगले चकविलें. अगदीं बनविलें म्हणानांत ! त्यांच्या मरणाची बातमी ऐकावयाची आपली तरी कांहीं तयारी नव्हती. कोणाचीहि तशीं कल्पना नव्हती. तात्यांची प्रकृति अतिशय निकोप होती. त्यांचें आरोग्यहि उत्तम होतें. उभा जन्म त्यांनीं श्रमांत आणि कामांत घालविला. तात्या कधीं आजारी आहेत, किंवा मोठ्या दुखण्यानं अंथरुणाला खिळून पडले आहेत, असें मी तर आजपर्यंत कधीं ऐकलें नाहीं. बहुतेक मोठमोठीं माणसें अधून मधून या ना त्या दुखण्यानें आजारी असल्याचें आपण ऐकतो. त्यांच्या प्रकृतिमानाच्या चढउताराची पत्रकेंहि वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होतात. तसें तात्यांच्या बाबतींत आजपर्यंत कधीं झालेलें नाहीं. केव्हांहि त्यांना पहावें. त्यांच्या तोंडावरचे तें नेहमींचें तेज आणि त्यांचें मिष्कील हंसूं आणि तो त्यांचा उत्साह आपला सदोदित कायम असे. आपलें आरोग्य उत्तम राखण्यासाठीं

त्यांनीं विशेष श्रम किंवा काळजी घेतल्याचें मला माहित नाहीं. बहुतेक सर्व विषयांची त्यांना आवड असे. पण कोणात्याहि व्यायामाबद्दल त्यांना प्रेम असल्याचें मला कांहीं माहित नाहीं. त्यांना कसलेंहि व्यसन नव्हतें. कच्च्या शेंगाचे दाणे खाण्याचा फक्त त्यांना नाद होता, हें सर्वांना माहित आहे. त्याखेरीज ते कशाच्या 'आहारीं' गेल्याचें ऐकिवांत नाहीं. नाहीं म्हणावयाला दुपारच्यें जेवण झाल्यावर लागलेंच आर्धापाऊण तास वामकुक्षी घेण्याचें मात्र त्यांना विलक्षण वेड होतें. या बाबतींत त्यांनीं कधीं अपवाद केला नाहीं. किंवा कधीं कोणाच्या भीडेला भीक घातली नाहीं. एकदां खडकीच्या 'वनस्पति बागेंत' आमच्या 'शारदा मंदिरा' चे शिशिर भोजन होतें. त्या भोजनाला तात्या आले होते. बारा वाजण्याच्या सुमाराला जेवण झाले रे झाले कीं तात्या हात धुवून सरळ आपल्या मोटारींत बसले आणि घरीं जायला निघाले. मी धांवत त्यांच्या मोटारीजवळ गेलों व म्हणालों, "तात्यासाहेब, आतां मंडळींच्या गप्पांना खरा रंग भरणार आहे. तुम्ही जर जाल तर आमचा फार विरस होईल!" तेव्हां तात्या जरा चिडक्या स्वरांतच म्हणाले, "मी तुम्हांला आधीं सांगितलें होतें, कीं जेवण झाल्यावर एक क्षणभर सुद्धां इथें थांवणार नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वरानें मला भीड घातली तरीं माझा परिपाठ मी मोडणार नाहीं." असें म्हणून तात्यांनीं सरळ आपली मोटार तेथून पिटाळली. दुसऱ्या एका प्रसंगी ते मला म्हणाले, "ही दुपारच्या अर्ध्या तासाची वामकुक्षी ही माझ्या उत्तम प्रकृतीची गुरुकिल्ली आहे." तात्यांचे शहात्तरावें वर्ष ऑगष्टच्या चोवीस तारखेस सुरूं झालें होतें. तीन-चार महिन्यापूर्वीच मी त्यांच्या घरीं गेलों होतों. त्यावेळीं वार्धक्यामुळें त्यांच्या डोक्याच्या आकारांत फरक होत चालल्याचें एकदम माझ्या लक्षांत आलें. तथापि, एका कानानें कमी ऐकूं येऊं लागण्यापलिकडे विशेष गौणपणा असा मला त्यांच्या प्रकृतीमध्यें आढळून आला नाहीं. त्यांचा उत्साह आणि धांदल अगदीं पहिल्यासारखीच होती. मी म्हणालों, "तात्यासाहेब, बडोद्याचें महाराज आतां इथें आले आहेत, त्यांनीं तुम्हांला तीन वाजतां आपल्या बंगल्यावर भेटायला बोलाविलें आहे." तात्या चटकन् उद्गारले, नेहमीपेक्षां जरा मोठ्यानेंच ते म्हणाले, "येतो. मी अडीच वाजतां येथें तयार आहे. तुम्ही गाडी घेऊन या." तात्यांचा तो उत्साह पाहून मी तर अगदीं

चकीत झालो. बरोबर अडीच वाजतां पोषाख करून तात्या माझी वाट पहात बसले होते. तात्यांच्या बरोबर दुसऱ्याहि पुण्यांतल्या एका वृद्ध कार्यकर्त्यांना मी महाराजांकडे बोलावलें होतें; पण ते गृहस्थ स्वतः तर आलेच नाहींत. उलट तात्यांच्यावर ते भडकून उठले. ते म्हणाले, "या तात्यांना आतां म्हातारचळ लागलेला आहे. कोणी वाटेल त्यांनीं त्यांना बोलाविलें तरी हा म्हातारा डोक्यावर पगडी घालून आणि खांद्यावर उपरणें घेऊन त्याला भेटायला आपल्या घरांतून तुरुतुरू धांवत जाईल!" मला ते उद्गार ऐकून हंसूं आलें नाहीं. उलट त्यामुळें तात्यांच्या स्वभावाचा एक निराळाच पैलू मला दृष्टीस पडल्यासारखें वाटलें. मूळचाच त्यांचा आनंदी आणि आशावादी स्वभाव. वयामुळें अधिक प्रेमळ आणि शीतळ झाल्याचें मला दिसून आलें. त्यांच्या बोलण्यामध्यें एक निराळाच आनंद त्यावेळीं माझ्या प्रत्ययाला आला. त्यांचा उत्साह अगदीं शीग भरून सांडत होता म्हणानात! ते महाराजांना म्हणाले, "महाराष्ट्राचा उठाव करण्याचें काम तुम्हीं आधीं हातीं घ्या. कोणाच्याहि हाताखालीं काम करण्याची माझी तयारी आहे." तात्यांची आणि आपली ही भेट शेवटची ठरणार आहे असें त्यावेळीं मला मुळींच वाटलें. नाहीं. गेल्या दोन तीन महिन्यामध्यें त्यांचें एक व्याख्यान आणि दोन लेख माझ्या वाचण्यांत आले. हें व्याख्यान त्यांनीं एक ऑगष्ट रोजीं पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र कार्यकर्त्यांच्या बैठकींमध्यें केलेलें होतें. एक लेख पंधरा ऑगष्टच्या 'फ्री प्रेस' च्या स्वातंत्र्यमहोत्सवाच्या खास अंकांत आणि दुसरा लेख साप्ताहिक 'लोकमता'च्या दोन ऑक्टोबरच्या गांधीजयंतीच्या अंकांत त्यांनीं लिहिलेला होता. या तीनहि ठिकाणीं प्रकट केलेले त्यांचे विचार मला अतिशय तेजस्वी वाटले. काँग्रेसच्या राजकारणावरील तात्यांचीं मतें मला पूर्वी कधींहि आवडत नसत. ह्या बाबतींत मी त्यांच्यावर अनेक वेळां टीका केली आहे. कित्येक वेळां वाजवीपेक्षां जास्तच कठोर टीका केली आहे असें मला वाटतें. तथापि, या तीन प्रसंगीं त्यांनीं जो अभिप्राय व्यक्त केला तो मात्र मला एकदम पटला. मी त्या वेळीं कोणाला तरी म्हणालों कीं, "तात्यांच्या बुद्धींत एक निराळेंच तेज निर्माण झाल्यासारखें मला अलिकडे दिसतें आहे." देशाला आज स्वातंत्र्य मिळालें आहे. तें काय वाटेल त

करून सांभाळायला पाहिजे. स्वातंत्र्याच्या रक्षणाचा आधीं विचार व्हायला पाहिजे. हा तात्यासाहेबांच्या अलिकडच्या विचारांचा मुख्य सूर होता. आणि तो अगदीं बरोबर होता. कॉंग्रेसनेत्यांच्या आजकालच्या वक्तव्यांत नेमका तेवढाच सूर आढळून येत नाहीं. बाकी सर्व असतें. मिळालेल्या स्वातंत्र्याचें रक्षण कसें करावयाचें याची देशाच्या पुढाऱ्यांना जणूं चिंताच नाहीं असें वाटतें. जनतेला सशस्त्र आणि सुसज्ज करण्याऐवजीं जनतेच्या जवळ असलेली मोडकीं तोडकीं हत्यारें गोळा करून गांधींच्या पायावर वहाण्याचें काम मात्र जोरांत सुरू आहे. म्हणून कॉंग्रेस नेत्यांच्या भूमिकेपेक्षां मला तात्यासाहेबांचीच भूमिका जास्त तर्कशुद्ध वाटली. तात्यांची बुद्धि इतक्या वयांतही अजून बिनचूक काम देते आहे हें बघून मला खरोखरच हर्ष झाला. म्हणूनच त्यांच्या आयुष्याची दोरी अशी अचानक तुटेल असा विचारही माझ्या मनाला कधीं शिवला नाहीं. गेल्या मंगळवारीं मी खंडाळ्याला होतों. अकरा वाजतां तात्या गेल्यांचा मला मुंबईहून फोन आला. माझा त्यांवर मुळीं विश्वासच बसेना. तसाच बाराच्या गाडीनें मी शिवाजीनगरला आलों. बंगल्याबाहेर लोकांची बरीच गर्दी जमली होती. कांहीं टांगे आणि मोटारी उभ्या होत्या. तात्यासाहेबांचें अंत्यदर्शन घेण्यासाठीं तरुण मुलांची आणि स्त्रियांची रीघ लागून राहिली होती. मुख्य दारासमोरच्या दालनांतच पलंगावर तात्यांचा देह ठेवण्यांत आला होता. आणि त्यांच्या सर्वांगावर शेवंतीच्या पिवळ्या फुलांच्या हारांची फारच मोठी रास पडलेली. एकाद्या तक्क्याला डोळे मिटून टेकून बसावेत ना, तसे तात्यासाहेब मला दिसले. त्यांचें शरीर निष्प्राण होऊन त्यावेळीं जवळ जवळ सात आठ तास तरी झाले होतें; पण मृत्यूचें एवढेंसेंसुद्धां चिन्ह त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत नव्हतें. त्यांचा तो सतेज गौरवर्ण, त्यांचें तें भव्य मोठें डोकें आणि त्यांचा तो रुबाबदार गंभीर चेहरा अगदीं होता तसा दिसत होता. ओठ तर अशा थाटांत मिटलेले मला दिसले कीं, जणूं कांहीं आतां डोळे उघडून ते बोलायला सुरवात करणार आहेत किंवा काय कोणास ठाऊक. मी नामदार गोखले यांचें शव पाहिलें होतें. मृत्यूनंतरहि त्यांचा चेहरा सतेज दिसत होता. तथापि, तात्यासाहेबांच्या इतका तो खचित सुंदर आणि आकर्षक दिसत नव्हता. खरोखर, तात्यांनीं मरणावरहि शेवटीं मात केली. जीवनामधल्या

निरनिराळ्या प्रसंगांना आणि संकटांना त्यांनीं जसें शांतपणें व हंसून तोंड दिलें तसेंच त्यांनीं मृत्यूचेंहि सस्मित मुखानें स्वागत केलें. काळपुरुष जेव्हां मंगळवारीं पहांटे त्यांना घेऊन जाण्यासाठीं चोरासारखा लपत छपत आला असेल, तेव्हां ते शांतपणें आपल्या अंथरुणावर घोरत पडलेले पाहून त्याची चांगलीच फजिती उडाली असेल. निराशेनें मटकन् तो एकदम खालींच वसला असेल. आपल्या दर्शनानें माणसांचे चेहेरे भयभीत आणि भेसूर झालेले पाहण्याची मृत्यूला नेहमीं संवय झालेली, पण आपण आलों तरी हा महापुरुष निर्विकारपणें झोपीं गेलेला पाहून मृत्यूला अगदीं मेल्याहून अधिक मेल्यासारखें झालें असेल. मरणाला मारलें, हा तात्यासाहेबांनीं आयुष्याच्या शेवटीं मिळवलेला फारच मोठा विजय होय, यांत मुळींच शंका नाहीं. मृत्यूच्या भेसूरपणाचा डंखच मुळीं तात्यासाहेबांनीं उखडून काढला. त्यामुळें एक अद्भुत गोष्ट मात्र साध्य झालीं. तीं हीं कीं, त्यांच्या मरणाच्या आकस्मिकतेमुळें लोकांना आश्चर्य वाटलें. दुःख झालें. पण त्यांच्या यातना मात्र जाणवल्या नाहींत. तात्यासाहेब आणखी जगलें असतें तर तें कोणाला नको होते ? पण आयुष्यांतलें प्रचंड जीवितकार्य पुरे झाल्यानंतर अत्यंत सुखाचें मरण त्यांना आलें, या समाधानाच्या भावनेमुळें त्यांच्या वियोगाचें दुःख लोकांना असह्य वाटलें नाहीं. त्यामुळेंच त्यांच्या प्रेतयात्रेमध्यें एकप्रकारचें पवित्र आणि शांतगंभीर वातावरण पसरलें होतें. त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं सारें पुणें शहर जमलें होतें. खरोखरच केळकर महाराष्ट्रसम्राट् होतें. आणि म्हणून एकाद्या सम्राटाप्रमाणेंच ते आपल्या राजधानींतून मिरवीत मिरवीत इहलोकांमधून निघून गेलें. प्रेमाचा आणि फुलांचा पुणें शहरानें त्यांच्यावर अक्षरशः पाऊस पाडला. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीं स्मशानांत नदीच्या दोन्ही कांठावर मिळून एक लाख लोक तरी जमलें होते. पुण्याच्या स्मशानांत मृताच्या गौरवार्थीं भाषणें ध्वनिक्षेपकावरून होण्याची ही पहिलीच वेळ होय.

स्मशानांत निश्चेष्ट पडलेली तीं केळकरांची शांत मूर्ति पाहून तीस पस्तीस वर्षांच्या त्यांच्या कित्येक आठवणींचा डोंगरच्या डोंगर माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. मी अकरा सालीं पुण्यांत रहावयास आलों. तेव्हांपासून आतांपर्यंत त्यांचें महान् जीवन मी एकसारखें पहातोंच आहे. त्यांचें कर्तृत्व एवढें विविध अन् विस्तीर्ण आहे आणि त्यांचें वाङ्मय इतकें विशाल आहे

कीं, त्यांचें नुसतें वर्णन करावयाचें म्हटलें तरीं महाभारताएवढा मोठा ग्रंथ होईल. मी माझ्या पिढींतल्या पुण्यामधल्या लोकांना नेहमींच भाग्यशाली समजतों. जें महाराष्ट्रांत इतर कोणाला़हि पहावयाला मिळालें नसेल तें त्या वेळच्या आम्हां पुण्यामधील लोकांना विनासायासानें बघावयाला आणि ऐकावयाला सांपडलें. राजकारणाच्या नकाशांत पुण्याला लोकमान्य टिळकांनीं अद्वितीय स्थान प्राप्त करून दिलें होतें. लोकमान्य जरी त्याकाळीं कारागृहांत होते तरी साऱ्या देशाचे डोळे पुण्याकडे लागून राहिले होते. 'पुणें बोले, आणि महाराष्ट्र डोले' अशीच केवळ त्या काळची स्थिति नसून 'पुणें बोले आणि हिंदुस्तान हाले' असें त्यावेळचें पुण्यामधलें वातावरण होतें. पुणें हें त्यावेळीं देशाच्या राजकारणाचें तीर्थक्षेत्र आणि मराठी वाङ्मयाचें विद्यापीठ होऊन बसलें होतें. टिळकांच्या नांवाच्या मोहिनीनें देशांतले मोठमोठे पुढारी आणि व्यक्ते पुण्याकडे आकर्षिले जात होते. महाराष्ट्रांतले मोठमोठे कार्यकर्ते वेळोवेळीं पुणें शहरामध्यें येऊन जात होते, त्यामुळें पुणें हें व्याख्यानाचें आणि राजकीय प्रचाराचें एक महान् क्षेत्रच होऊन बसलें होतें. त्या काळांत ज्ञानाच्या गंगेचें झोत पुण्याच्या रहिवाशांवर एकसारखें कोसळत होते. म्हणून त्यावेळीं पुणें शहरामध्यें नुसतें रहाणें देखील भाग्याचें झालें होतें. 'केसरी' तेव्हां महाराष्ट्राचा प्राण होता. आणि त्यामुळें गायकवाडवाड्यांत वावरणाऱ्या व्यक्तींना आणि घडणाऱ्या गोष्टींना एक अद्भुत महत्व प्राप्त झालें होतें. टिळकांच्या गैरहजेरींत त्यांच्या राजकारणाची ध्वजा वर फडकत ठेवण्याची जबाबदारी नरसिंह चिंतामण केळकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या टिळकांच्या दोन तरुण पट्टशिष्यांवर येऊन पडलेली होती. त्यावेळीं केळकर हे नुसतेच नरसोपंत होते, तात्यासाहेब नव्हते. आणि खाडिलकर हे साधे कृष्णाजीपंत होते, काकासाहेब झालेले नव्हते. दोघांचीहि वयें चाळीशीच्या आंत होतीं. दोघांच्याहि कर्तृत्वाबद्दल महाराष्ट्राला आशा वाटूं लागली होती. तथापि, दोघांची तुलनाच केल्यास केळकरांपेक्षां खाडिलकरांबद्दल लोकांस जास्त आदर वाटत होता. मात्र याचें कारण खाडिलकरांचें राजकारण नसून त्यांची लोकप्रिय झालेली नाटकेंच होत, हें सांगणें जरूर आहे. सरकारच्या रोषास पात्र झालेल्या 'कीचकवधा' मुळें खाडीलकरांचें नांव केळकरांपेक्षां जास्त माहित

झालें होतें. व्याख्यानाच्या विशिष्ट लकबीमुळें आणि डोक्यावरच्या लाल पगडीमुळें आम्हां पुण्यांतल्या पोरांना खाडीलकर हे केळकरांपेक्षां जास्त टिळकांसारखे दिसत. त्यामुळें टिळकांचे खरे वारस खाडीलकरच असावेत असें आपलें आम्हांला वाटे. खाडीलकरांचीं भाषणें फार गंभीर असत. बहुधा ती रुक्षच असत. आणि कर्कश. आवाजांत रेकून बोलण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें तर पुष्कळ वेळां त्यांचीं व्याख्यानें कंटाळवाणीं होत. तथापि, त्यांच्या भाषणांत अधूनमधून वीररसाचा परिपोष होई. आणि जोरानें टाळ्या वाजविण्याची आम्हांला संधि मिळे. केळकरांच्या व्याख्यानामध्यें तो अनुभव क्वचित् येई. त्यावेळीं त्यांच्या बोलण्यांत विनोदाचा आणि लालित्याचा भाग फारच थोडा असे, असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें त्यावेळीं केळकरांबद्दलं आम्हांस कधींच आकर्षण वाटूं शकलें नाहीं. सामान्य जनतेंतहि तशींच भावना असावी असें मला आठवतें. केळकर लिहितात चांगले, पण त्यांना बोलतां मात्र मुळींच येत नाहीं, अशीच त्यावेळीं लोकांची समजूत होती. माझे गुरु राम गणेश गडकरी यांचाहि अभिप्राय तसाच असे. केळकरांपेक्षां खाडिलकरांचा 'केसरी' त्यांना जास्त आवडे. एकदां केळकर संपादक असतां 'केसरी'चा एक नवा अंक घेऊन मी गडकऱ्यांकडे गेलों. छपाईच्या जास्त दाबामुळें अग्रलेखाशेजारच्या एका स्तंभाच्या रेघेच्या ठिकाणीं तो अंक उभा फाटलेला होता. तें पाहून गडकरी तोंड वेडेंवाकडे करून उद्गारले कीं, "अग्रलेख लिहितां लिहितां केळकरांची छाती चांगलीच फाटल्यासारखी दिसते आहे मला!" केळकरांचें नांव महाराष्ट्रामधल्या तरुण मंडळींपुढें प्रामुख्यानें त्यांच्या 'तोतयाच्या बंडा' मुळें आलें. नाटककार म्हणून त्या वेळीं खाडीलकरांचा जमाना जोरांत चालूं असतां नाट्यलेखनांत दुसऱ्या नाटककारानें कीर्ति मिळवणें ही गोष्ट अतिशय कठिण होती. पण तो दुर्घट गोष्ट रंगभूमिवर आलेल्या आपल्या पहिल्याच नाटकानें केळकरांनीं घडवून आणली. त्यानंतर त्यांची चारपांच नाटकें रंगभूमिवर आलीं. आणि ती पुष्कळ यशस्वीहि पण झाली. तथापि, 'तोतयाच्या बंडाचें' यश मात्र त्यांच्या कोणत्याहि नाटकाला मिळालें नाहीं. या नाटकाचें मी स्वतः वीस पंचवीस तरी प्रयोग पाहिले असतील. 'चित्ताकर्षक नाटक मंडळी'च्या सर्व नाटकांना मला फुकट प्रवेश

असल्यानेंच अर्थात हें घडूं शकलें हें सांगावयाला नकोच. केळकरांची नाटकें रंगभूमीवर आल्यानें एक गोष्ट मात्र विशेष प्रामुख्यानें लोकांच्या नजरेसमोर आली. ती ही कीं, खाडिलकरांपेक्षां त्यांचीं लेखनशैली जास्त मोहक, काव्यमय आणि विनोदी आहे. या नाटकापूर्वी आधीं कितीतरी वर्षे त्याचें 'सुभाषित आणि विनोद' हें पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. तथापि, त्या पुस्तकानें त्यांच्या विनोदी बुद्धीची जेवढी जाहिरात झाली नसेल, त्यापेक्षां कितीतरी अधिक पटींनीं त्यांच्या विनोदी प्रतिभेची प्रसिद्धि त्यांच्या नाटकामधील विनोदामुळें झाली. तत्पूर्वी मराठी रंगभूमीवर कोल्हटकरांचा विनोद कार्य तो यशस्वी झालेला होता. तथापि, कोल्हटकरांच्या विनोदांत जी कृत्रिमता आणि क्लिष्टता आढळून येई तिचा मागमूसहि केळकरांच्या नाट्यविनोदांत दिसून आला नाहीं. ते कोल्हटकरांचे समवयस्क आणि सहाध्यायी असल्यानें दोघांचाहि विनोद-स्फूर्तीचा उगम समाईक असावा असा अंदाज केल्यास तो चुकीचा ठरूं नये. कोटीबाजपणांतहि केळकर हे कोल्हटकरांना यत्किंचितहि हार जाणारे नव्हते. किंबहुना, कोल्हटकरांपेक्षां केळकरांचा विनोद अधिक घरगुती, मनमोकळा आणि प्रासादिक असे. कोल्हटकरांची विनोदपरंपरा पुढें चालवण्यासाठीं त्यांना जसे गडकरी मिळाले, तसा केळकरांचा विनोदाचा वारसा पुढें चालविण्यास त्यांना कुणी शिष्य मिळाला नाहीं हें जरी खरें असलें, तरी कोल्हटकरांप्रमाणेंच केळकरांचा विनोद स्वतंत्र बुद्धीचा असून त्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वाची छांप पडलेली होती. केळकरांच्या विनोदाची कीर्ति त्यांच्या नाटकामुळें महाराष्ट्रांत एकसारखी पसरत गेली. केळकरांच्या काव्यात्म वृत्तीचा आणि रसिकतेचा चहुंकडे लौकिक पसरूं लागला. आणि त्यामुळें त्यांच्या व्याख्यानांचे श्रोते त्यांच्याकडून विनोदाची आणि लालित्याची एकसारखी अपेक्षा करूं लागले. 'यशासारखें यशस्वी असें दुसरें कांहींच नाहीं' ही इंग्रजी म्हण केळकरांच्या बाबतींत खरी ठरली. जनता त्यांच्या विनोदाचें आणि रसिकतेचें कौतुक करूं लागल्यापासून त्यांच्या व्याख्यानांची रंगत हळूं हळूं वाढूं लागली. आणि आवाजाची व अस्खलितपणाची अनुकूलता नसतांनाहि त्यांची व्याख्यानें आकर्षक आणि परिणामकारक होऊं लागली. हळूं हळूं केळकरांचा दीर्घ व्यासंग, त्यांचा साहित्यशास्त्राचा मौलिक अभ्यास आणि त्यांच्या प्रतिभेची चतुरस्रता प्रकट होऊं लागली. आणि त्यामुळें विद्वानांचें लक्ष त्यांच्याकडे वळूं

लागलें. या काळांत गडकऱ्यांचा आणि त्यांचा अतिशय लोभ जडला. आपलें नवीन लिखाण घेऊन गडकरी अनेक वेळां केळकरांकडे जात आणि केळकरहि मुक्तकंठानें त्यांची स्तुति करून त्यांना परत पाठवीत. ज्या दिवशीं 'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा' हे महाराष्ट्रगीत गडकऱ्यांनीं लिहिलें त्या दिवशीं दुपारीं दीड वाजावयाच्या सुमारास गडकरी केळकरांकडे धांवत गेले. तें गीत केळकरांना अतिशय आवडलें. गडकऱ्यांची पाठ थोपटून ते म्हणाले, "हें सबंध गीत लवकर पुरें करून टाका. महाराष्ट्रामधल्या प्रत्येक तरुणाच्या तोंडीं हें गीत ऐकूं येईल अशी माझी खात्री आहे." तरुण कवींना आणि लेखकांना उत्साहपूर्वक उत्तेजन देण्याच्या केळकरांच्या ह्या प्रेमळ वृत्तीमुळेंच साहित्यप्रांतांत त्यांच्या लोकप्रियतेंत तें वर्तुळ दिवसेंदिवस वाढत गेलें. चौदा सालीं टिळक तुरुंगांतून सुटून परत आले. त्यानंतर साहजिकच लोकांचें लक्ष टिळकांच्या मूर्तीवर केंद्रित झालें, आणि केळकर-खाडीलकर ही जोडी थोडीशी बाजूलाच सरकल्यासारखी झालीं. पुढें टिळकांनीं आपली स्वराज्याची मोहिम सुरूं केली आणि त्यांच्या जयजयकाराच्या तुताऱ्या आणि चौघडे देशांत चोंहिकडे वाजूं लागले. ह्या कोलाहलांत दुसऱ्या कोणाच्याहि कर्तृत्वाला किंवा कीर्तीला वाव मिळणें शक्य नव्हतें. या काळांत केळकर हे टिळकांचे राजकीय मदतगार झाले आणि त्यामुळें राजकीय चळवळ कशी योजावयाची आणि चालवावयाची यांचें प्रात्यक्षिकच त्यांना टिळकांकडून मिळालें. या तीन चार वर्षांच्या काळांत केळकरांचें व्यक्तिमत्वच एकसारखें बदलत गेलें. त्यांच्या राजकीय प्रतिभेचा आणि कर्तृत्वाचा पिंड याच काळांत खरा घडत गेला. त्यांच्या विचारांमध्यें अधिक धैर्य, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव याच कालखंडांत प्रथम निर्माण झाली. या सुमारास केळकरांच्या संयमी स्वभावाची आणि सचोटीची कसोटी लागण्याचा एक प्रसंग अनपेक्षितपणें निर्माण झाला. टिळकांना एकसष्टीच्या प्रसंगी अर्पण करण्यांत येणाऱ्या थैलीपैकीं पसतीसशें रुपये हिशेबांत न दाखविल्याचा वहिम अच्युतराव कोल्हटकर यांचेंवर आला. अच्युतराव म्हणजे जबरदस्त लेखक, अतिशय लोकप्रिय आणि प्रभावी पत्रकार आणि टिळकांचें परम भक्त. पण त्यांच्या अव्यवहारी आणि गैरहिशेबी स्वभावामुळें ही पैशाची गफलत निर्माण झाली. तथापि, आपल्या हातून घडलेली ही गफलत झांकण्यासाठीं त्यांनीं सारें रान उठविलें आणि फंडाचे चिटणीस केळकर

अनुक्रम...64382... वि: ...निबंध...

...वी: वि: 263169

यांचेवर आपल्या लिखाणाचा तोफखाना डागला. केळकरांच्या जागीं दुसरा जर कोणी माणूस असता तर अच्युतरावांच्या भयानक हल्ल्यामुळें तो सपशेल गारदच होऊन गेला असता. पण केळकरांनीं अच्युतरावांना मुळींच दाद दिलीं नाहीं. कांहीं काळ केळकरांची बाजू लंगडी आहे असाहि लोकांत भ्रम निर्माण झाला. आणि केळकर थोडेसे अप्रियहि झाले. पण 'लोकमान्य बाळंत झाले' असा स्वतःच्या जिवावर उदार होऊन प्रत्यक्ष टिळकांवर जेव्हां अच्युतरावांनीं हल्ला चढविला, तेव्हां एका लहानशा पत्रानें टिळकांनीं अच्युतरावांना नेस्तनाबूद करून टाकलें, आणि केळकरांचीं टिळकभक्ति ही अच्युतरावांच्या टिळकप्रीतिपेक्षां अधिक शुद्ध आणि निर्मळ आहे, हें लोकांच्या निदर्शनाला आलें. अच्युतरावांच्या प्रत्येक आक्षेपाला उत्तर न देण्याइतकें कांहीं केळकर लेचेपेचे नव्हते. पण अच्युतरावांच्या तोंडी मुळींच लागावयाचें नाहीं असा त्यांनीं जो निश्चय केला तो शेवटपर्यंत पाळला. केळकरांचा हा आत्मसंयम अलौकिकच होता. तथापि ह्या वेळेपासून केळकरांच्या मनांत अच्युतरावांबद्दल जो एकदांचा डूख बसून राहिला तो अगदीं शेवटपर्यंत. अर्थात् त्याबद्दल केळकरांना दोष देतां येणार नाहीं. वीस सालीं टिळक वारल्यानंतर त्यांचे पट्टशिष्य आणि एकमेव राजकीय वारस म्हणून त्यांच्या राजकारणाची आणि कारभाराचीं सूत्रें ओघानेंच केळकरांकडे आलीं आणि वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी केळकर एकदम महाराष्ट्राचें पुढारी बनले. तेव्हांपासून लोकांची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. महाराष्ट्राला टिळकांचा फार मोठा आधार होता. फार वर्षांनीं महाराष्ट्रांत एक युगप्रवर्तक महापुरुष निर्माण झालेला होता. म्हणून त्याला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें महाराष्ट्राला होऊन गेलें होतें. टिळक महाराष्ट्राचें पूज्य दैवत होऊन बसले. अशा महान् विभूतीचें नांव आणि परंपरा पुढें चालविणें ही गोष्ट काय सामान्य होती ? केळकरांसारखा सव्यसाची, चतुरस्र आणि प्रसंगावधानी माणूस त्यांच्यामागें होता, म्हणूनच त्यांनीं ती जबाबदारी मोठ्या चातुर्यानें आणि युक्तिनें निभावून नेली. त्यावेळीं केळकरांच्या जागीं खाडिलकर असते तर काय झालें असतें हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. केळकर हे टिळकासारखे तेजस्वी आणि खंबीर नसतील; पण ते टिळकांपेक्षां खचित जास्त व्यवहारी होते. टिळक उग्र होते. लोकांना त्यांचें भय वाटे. ते खेळीमेळीनें

जनतेमध्यें मिसळूं शकत नसत. त्यांच्या उलट केळकरांचा स्वभाव होता. त्यांची आनंदी आणि खेळकर वृत्ति त्यांना या बाबतींत फार उपकारक झालीं. सूर्याचें बिंब म्हणजे तें जसें काळ्या कांचेमधून पहावें लागतें, तसें टिळकांचें स्वरूप समजावून घेण्यासाठीं लोकांना केळकरांच्या सौम्य भिंगामधून पहाणेंच सोयीचें पडूं लागलें. त्यामुळें टिळकांपेक्षांहि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य लोकांचा केळकरांशींच प्रत्यक्ष संबंध आला. टिळकांचीं सारीं धोरणें केळकरांना माहित होतीं. तें निरनिराळ्या प्रांतामधल्या पुढाऱ्यांची आणि टिळकांची काय सूत्रें होतीं तें फक्त केळकरांनाच अवगत होतें. टिळकांचा सारा पत्रव्यवहार आणि त्यांच्या चळवळीचा व पक्षाचा सारा कारभार पांचसहा वर्षें केळकरांच्याच हातून घडला होता. म्हणून टिळकांच्या गादीवर बसतांना केवळ त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाखेरीज केळकरांच्या जवळ तसें कांहींच कमी नव्हतें. टिळकांच्या मरणाचा क्षण हा हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक क्रांतिकारक असा क्षण होता. टिळक गेले आणि त्याच क्षणीं राजकारणाच्या रंगभूमिवर गांधीजींनीं प्रवेश केला. टिळकांच्या राजकारणाचा सर्वांना परिचय होता; पण गांधीजींनीं राजकारणाचें सारेंच तंत्र बदलून टाकलें. क्रांतीचें एक अद्भुत तत्त्वज्ञान त्यांनी स्वातंत्र्याच्या राजकारणांत आणलें. देश त्यामुळें एकदम भारून गेला. सारीं जनता एकदम थरारून उभी राहिली. गांधीजींच्या नांवाचा जयजयकार एकदम चहूंकडून उठला. लक्षावधि जनता त्यांच्या पाठीमागें येऊन उभी राहिली. एकाद्या जादूगारानें जादूची कांडी फिरवून इकडची दुनिया तिकडे करून टाकावी तसें गांधीजींनीं देशामध्यें करून टाकलें. अशा वेळीं त्यांना विरोध करणें म्हणजे स्वतःची रवानगी वेड्याच्या इस्पितळांत करून घेण्यासारखें होतें. केळकरांच्यावर ही फारच मोठीं जबाबदारी येऊन पडली. टिळकांचें नांव राखून पुन्हां गांधीजींच्या नव्या राजकारणांत त्यांना महाराष्ट्राच्या पराक्रमाचीं परंपरा कायम ठेवायची होती. ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. पण ह्या अवघड कसोटीमध्यें केळकर कांहीं कमी पडले नाहींत. गांधीजींच्या असहकारितेच्या राजकारणांत ते उसळीसारखे एकदम वर आले. आणि गायकवाडवाडाही महाराष्ट्रामधल्या काँग्रेसच्या लढाऊ सैनिकांची छावणी बनली.

केळकर हे त्यावेळीं गांधीजींच्या राजकारणामध्यें किती समरस होऊन गेले होते ह्याचें आज वर्णनहि करतां येणें शक्य नाहीं. त्या वेळची

पुण्यामुंबईमधील त्यांची तेजस्वी व्याख्यानें ज्यांनीं ऐकली असतील ती अजूनहि त्यांच्या स्मरणांमधून गेली नसतील. केळकरांच्या बुद्धिमत्तेला त्यावेळीं असें विलक्षण तेज चढलें होतें म्हणतां ! महाराष्ट्रामध्यें आणि इतर प्रांतांतही त्यांच्या लोकप्रियतेची खूपच लाट उसळली. मोठमोठे पुढारी केळकरांच्या घरीं येऊन उतरूं लागले. केळकरांशीं चर्चा करूं लागले. आणि केळकरांना काँग्रेसच्या अखिल भारतीय राजकारणांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. हजारों लोकांच्या सभेंत, भारतीय पुढाऱ्यांच्या समवेत किंवा अग्रभागीं जेव्हां केळकर प्रवेश करीत तेव्हां टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होई. केळकरांकडे पाहून साऱ्या महाराष्ट्राला त्यावेळीं अतिशय धन्यता वाटे. टिळकांच्या मागें महाराष्ट्राचें नांव राखणारा बुद्धिमान् आणि कर्तबगार पुढारी महाराष्ट्राला मिळाला असेंच ज्याच्या त्याच्या तोंडून उद्‌गार निघत. व्याख्यानाचें वेळीं तर आपल्या तेजस्वी कोटीक्रमानें आणि विनोदानें केळकर अशी बहार उडवून देत, कीं सांगतां सोय नाहीं. मला एकदां आठवते आहे. एकवीस सालीं असहकारितेच्या चळवळींत मुंबईच्या मारवाडी विद्यालयांत केळकरांचें असेंच एक जोरदार व्याख्यान चालूं होतें. लोकांची विलक्षण गर्दी जमली होती. कांहीं वेळानें गांधीजी तेथें आले. त्यांच्याबरोबर गर्दीचा लोंढा आला. तेव्हां असें ठरलें कीं, आंतल्या श्रोत्यांसमोर गांधीजींनीं बोलावयाचे आणि बाहेरच्या श्रोत्यांसमोर केळकरांनीं भाषण करावयाचें. तसे केळकर बाहेर आलें. आंत अर्धापाऊणतास भाषण केल्यावर त्यापेक्षां निराळें असें भाषण बाहेर येऊन केळकर तरी काय करणार ? विषय एकच होता. पण केळकरांनीं आपल्या पुनरुक्तीचें कोटीबाज समर्थन करून खूपच बहार उडवून दिली. ते म्हणाले, " ह्या वेळपर्यंत मी आंत जे बोलत होतो तेंच आतां बाहेर बोलणार आहे. नाहीं तर तुम्हीं म्हणाल, ह्यांचें आंत एक असतें आणि बाहेर दुसरेंच असतें, पण तसें नाहीं ! " श्रोत्यांची हंसतां हंसतां अगदी पुरेवाट झाली. केळकर गांधीजींशीं किती समरस झाले होते, ह्यांचें एकच उदाहरण म्हणजे त्यांनीं लिहिलेलें ' चरख्याचें गाणें ' या गाण्यांत--

चरखा नोहे चक्र सुदर्शन
आयुध दारिद्र्यासुर मर्दन
फिरूं लागल्या क्षण मग अर्ध न

लागे होण्या दुःख विमोचन
म्हणूनि तस्तुति करितचि राहूं।

असें म्हणण्यापर्यंत त्यांच्या कल्पनेनें मजल मारली होती. वीस एकवीस सालीं केळकरांचें महाराष्ट्रांतले पुढारीपण महाराष्ट्रानें बिनतक्रार मान्य केलें आणि 'दे. भ. तात्यासाहेब केळकर' या नांवानें महाराष्ट्र त्यांना मोठ्या प्रेमानें संबोधूं लागला. येथपासून तो बत्तीस सालापर्यंत म्हणजे त्यांच्या वयाला साठ वर्षे पुरी होऊन ते सेवानिवृत्त होईपर्यंत एक तपभर महाराष्ट्राच्या सर्वांगीण सार्वजनिक जीवनाच्या आघाडीवर ते अग्रभागीं तळपत राहीले. एकवीस सालीं ते बडोदे येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'चे अध्यक्ष झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं जें भाषण केलें तें गेल्या दोन तपांतील मराठीमधल्या वाङ्मयीन टीकेचा आधार होऊन बसलेलें आहे. या बारा वर्षांत केळकरांच्या सार्वजनिक जीवनाचा व्याप आणि विस्तार एकसारखा वाढतच नेला. महाराष्ट्रामध्यें प्रत्यकाला आणि प्रत्येक ठिकाणीं केळकर हवेसे वाटूं लागले. केळकर ज्या कामांत नाहींत किंवा ज्या संस्थेत नाहींत ते काम आणि ती संस्था यशस्वी होणें शक्य नाहीं, असेंच जणूं कांहीं समीकरण होऊन बसलें. कोणतीहि सार्वजनिक सभा वा चर्चा केळकरांवाचून रंगणें हें अशक्य होऊन बसलें. सभेच्या अध्यक्षस्थानीं केळकरच पाहिजेत हा नियम अगदीं ठरूनच गेल्यासारखा झाला. या काळामध्यें मी केळकरांच्या शेवडों सभा पाहिल्या आणि ऐकल्या. रंगभूमीवर गणपतराव जोशी किंवा बालगंधर्व यांचा प्रवेश होतांना प्रेक्षकांच्या अंगावर हर्षाचे रोमांच जसें तरारून उभे रहात, तशा सभेच्या व्यासपीठावर केळकरांनीं प्रवेश केल्यानंतर प्रेक्षकांच्या अंतःकरणामध्यें आनंदाच्या गुदगुल्या उठत असत. केळकरांनीं सभेंत पाऊल टाकलें म्हणजे सभागृहांतील सारें वातावरण एकदम प्रसन्न होऊन जाई आजच्या सभेंत ते कांहींतरी खूपच गमंत उडवून देणार अशी प्रत्येक सभेच्या वेळीं श्रोत्यांची अपेक्षा असे. आणि या अपेक्षेचा भंग केळकरांनीं कधीं एकाही सभेमध्यें केला नसेल. केळकरांना या आपल्या सामर्थ्यांच्या जाणीव होती. ते डुलत डुलत खोकत खोकत आणि हंसत हंसत लगबगीनें जेव्हां सभेच्या उच्चासनावर विराजमान होत, तेव्हां त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचें मनोहर तेज चमकत असे. त्यांचे मिष्कील

डोळे जणूं कांहीं श्रोत्यांना सांगत असत कीं, "थांबा, तुमच्या ज्या कांहीं माझ्या व्याख्यानाबद्दल अपेक्षा आहेत त्या चांगल्या दुपटीनें आणि तिपटीनें पुरवून तुम्हांला मी चकितच करून सोडतो." महाराष्ट्रांत केळकरांनीं जेवढ्या सभा गाजवल्या असतील आणि जेवढें समारंभ उजावले असतील तेवढे गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रामधल्या एकाहि वक्त्यानें किंवा नेत्यानें भूषविलें नसतील. महाराष्ट्रामध्यें अध्यक्षपदाचा त्यांनीं उच्चांकच मोडून टाकला, असें म्हणावयाला हरकत नाहीं. वृत्तपत्रीय आणि साहित्यविषयक प्रचंड लेखनाचा व्याप संभाळून सार्वजनिक कामांचा आणि सभांचा अवाढव्य डोगर ते आपल्या शिरावर कसें पेलूं शकले दा एक चमत्कारच समजला पाहिजे. पृथ्वीचा भार शेषानें आपल्या मस्तकावर संभाळण्याइतकेंच तें दुष्कर काम होतें. हौस हें केळकरांच्या जीवनामधलें सर्वांत मोठें भांडवल होतें. कोणत्याही गोष्टीला 'नाहीं' म्हणणें त्यांना माहितच नव्हतें. कंटाळा हा शब्दच मुळीं त्यांच्या जीविताच्या शब्दकोशांत नव्हता. श्रम घेण्याचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अंगी होतें. हातीं घेतलेलें प्रत्येक काम चातुर्यानें तडीस नेण्याची हातोटी त्यांच्याजवळ होती. त्यामुळें महाराष्ट्रांत कुठेंहि कसला वाद उत्पन्न झाला कीं, ती पंचाईत त्यांच्यापुढें येऊन पडे. मग तो वाद एखाद्या सार्वजनिक वा राजकीय संस्थेतला असो कीं खाजगी नाटक मंडळींतला असो. अशा वेळीं दोन्ही पक्षाचे समाधान करून सर्वांकडूच शाबासकी मिळवून दाखविण्याचें अवघड कसब त्यांना साधलेलें होतें. तेवीस सालच्या मध्यापासून गांधीजींच्या राजकारणाशीं केळकरांची फारकत झाली. त्या सुमारास कॉंग्रेसमध्यें चित्तरंजन दास आणि मोतीलाल नेहरू यांनीं जो 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला त्यामध्यें केळकर हिरीरीनें सामील झाले. येथून पुढें ते गांधीजींच्या राजकारणाशीं असलेले आपले मतभेद भाषणांतून आणि लेखनांतून निर्भयपणें प्रकट करूं लागलें गांधीजींच्या असहकारितेला टक्कर देण्यासाठीं टिळकांनीं गंगापूर येथें शोधून काढलेल्या प्रतिगामीं असहकारितेचें निशाण केळकरांनीं उभें केलें. तथापि, गांधीजींच्या एकसारख्या वाढत गेलेल्या लोकप्रियतेच्या भरतीपुढें केळकरांना प्रत्येक वेळीं हळूंहळूं मागेच हटावें लागलें. गांधींजींच्या आध्यात्मिक इंद्रजालानें जनतेची मनें एवढी मोहून गेली होती कीं शुद्ध तर्कशास्त्रावर आधारलेला केळकरांचा व्यवहारी बुद्धिवाद जनतेच्या डोक्यांत शिरणें अशक्य होतें. केळकर

हें नेमस्त प्रवृत्तीचें आणि भित्र्या वृत्तीचे आहेत, अशी सामान्यपणें लोकांची समजूत असे. पण स्वतःच्या लोकप्रियतेला खर्ची घालून गांधीजींना निकराचा विरोध करण्याचा जो त्यांनीं कडवा निर्धार दाखवला त्यावरून तरी तें भीरू वृत्तीचे होतें असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. गांधीवादी राजकारणाच्या वेदिकेवर केवळ तत्त्वनिष्ठेनें प्रेरित होऊन केळकरांनीं आपल्या राजकीय जीवनाची आहुति दिली असेंच म्हटले पाहिजे. अठ्ठावीस एकोणतीस सालापर्यंत केळकरांनीं कसा तरी तग धरला. एकोणीस सालच्या शेवटच्या दिवशीं लाहोर येथें हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें निशाण उभारण्यांत आलें, त्या नंतर एक काँग्रेसच्या कार्यकारी मंडळांत तरी रहा नाहींतर मध्यवर्ति कायदेमंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा तरी द्या असा राष्ट्रपति जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केळकरांना पेंच घातला. तेव्हां कॉंग्रेसच्या कार्यकारिणीचें त्यागपत्र देऊन केळकर काँग्रेसमधून बाहेर पडले. आणि बत्तीस साली तिसऱ्या गोलमेज परिषदेला जेव्हां व गेले तेव्हां त्यांनीं उघडपणेंच हिंदु महासभेचें नेतृत्व पत्करलें. तेथून ते परत आल्यावर त्यांच्या एकसष्टीचा समारंभ मोठ्या थाटानें महाराष्ट्रभर साजरा झाला. आणि त्यानंतर प्रत्यक्ष राजकारणामधून ते निवृत्त झाले तरीही गेली पंधरा वर्षे त्यांनीं साहित्यांत आणि राजकारणांत भाग घेतला नाहीं असें झालें नाहीं. सामाजिक कार्यांचा संन्यास घेणें त्यांना जवळ जवळ अशक्यच होतें. या काळांत महाराष्ट्रीय राजकारणाचें नेतृत्व सामान्य मगदूराच्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हातीं गेले होतें. तरी जनतेच्या मनावर काँग्रेसचें वर्चस्व अढळ असल्याकारणानें लोकशाही स्वराज्यपक्षाच्या किंवा हिंदुमहासभेच्या वतीने केळकरांनी प्रसंगोपात केलेला कॉंग्रेस विरोध निष्फळच ठरला. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून आणि वृत्तपत्रांमधून केळकरांच्यावर प्रखर टीका होऊं लागली. आणि कॉंग्रेसप्रेमी बहुजनसमाजांत केळकर हे एक विटंबनेचा विषय होऊन बसले. केळकर हे अत्यंत हळव्या मनाचे होते. अगदीं बारीक सारीक अप्रिय गोष्ट देखील त्यांच्या मनाला लागून राही. म्हणून गेल्या दहा पंधरा वर्षांत झालेली आपली अनन्वित अवहेलना त्यांनीं शांतपणें कशी सहन केली हें त्यांचें त्यांनाच ठाऊक. राजकारण हें मोठें निर्दय असतें. राजकारणांत शिखरावर बसलेलीं माणसें पायांखालीं तुडवलीं जातात. आणि खांदीकोपऱ्यांत पडलेलीं माणसें काळसावर एकदम चढवलीं

जातात. तीस सालापर्यंत महाराष्ट्राच्या अग्रभागीं सूर्याप्रमाणें तळपणारे केळकर गेल्या दहापंधरा वर्षांच्या राजकीय वातावरणांत एकाद्या काजव्यासारखे कोपऱ्यांत लुकलुकत पडावेत हें राजकारणाच्या अमानुष निर्दयपणाचें एक क्रूर उदाहरण आहे. जनतेच्या या उपेक्षेचा केळकरांच्या मनावर परिणाम झाला नाहीं असें मात्र नाहीं. त्यांचा स्वभाव थोडासा चिडखोर बनला आणि रागाच्या भरांत वागतांना त्यांच्या विचारांचा तोलहि सुटला. मतदार गाढव आहेत असें म्हणणारे आणि कस्तुरबा फंडाला जाहिरपणें विरोध करणारे केळकर हे आपल्या संयमी स्वभावाच्या उदात्त पातळीवरून खाली घसरलेले केळकर वाटतात. तथापि, देशामधल्या आजकालच्या अनेक राजकीय पुढाऱ्यांपेक्षां केळकरांच्या हातून अतिशय कमी चुका घडल्या असेंच निःपक्षपातीपणानें आतां म्हणावयाला हवें. केळकरांचा चौदा वर्षांचा राजकीय वनवास गेल्या वर्षापासून सुटावयाला सुरवात झाली. मीरतच्या अधिवेशनांत काँग्रेसनें प्रतियोगी सहकारितेचा स्वीकार केला हा केळकरांच्या आयुष्यांतला सर्वांत मोठा विजय होय. काँग्रेसचे अध्यक्ष होण्यापेक्षां तो जास्त मोलाचा जय होय. आणि त्यानंतर पंधरा ऑगष्ट रोजीं जेव्हां देशाची फाळणी झाली अन् गांधीवादी अहिंसेचें भेकड आणि राष्ट्रघातकी स्वरूप जेव्हां उघडें पडलें, तेव्हां गांधी नेहरूंपेक्षां केळकर हे अधिक प्रज्ञावंत आणि द्रष्टे मुत्सद्दी आहेत असें आपोआपच सिद्ध झालें. 'स्वराज्य पक्षां'च्या मोहिमेंतले केळकरांचे 'केसरी' तले लेख आजच्या राजकीय परिस्थितीच्या प्रकाशांत पुन्हां वाचले म्हणजे गांधीवादी राजकारण किती हास्यास्पद होतें आणि केळकरांचें शहाणपण आणि विवेचन किती अचूक होतें हें आपल्या लक्षांत येतें. जेव्हां देशाचा राजकीय इतिहास यापुढें कोणी लिहावयाला बसेल तेव्हां गेल्या पंचवीस वर्षांच्या राजकारणांत अग्रभागीं वावरलेल्या कित्येक नेत्यांची जुनीं मूल्यें तपासून, त्याला त्यांच्या वाजवी किंमतीच्या नव्या चिठ्ठ्या परत त्यांच्यावर डकवाव्या लागतील. त्यावेळीं केळकरांचें खरें मोल निश्चितपणें प्रकट होईल. व दीड तप त्यांच्या मुत्सद्दीगिरीची अवहेलना केल्याबद्दल जनतेला पश्चाताप करण्याची पाळी येईल.

मागील पंधरा वर्षांत केळकरांचें राजकारणामधलें महत्त्व जरी कमी होत गेलें, तरी साहित्यामधलें त्यांचें श्रेष्ठ स्थान होतें तसेंच अढळ राहिलें. अडतीस

सालीं त्यांनीं लिहिलेलें 'समग्र वाङ्मय' बारा खंडामध्यें आणि दहा बारा हजार पानांमध्यें प्रसिद्ध झालें. 'केळकर वाङ्मया'चा हा प्रचंड डोंगर पाहून महाराष्ट्रांतील जनता आश्चर्यानें थक्क झाली. कोणत्याहि साहित्यांत गुणानें आणि विस्तारानें इतके अवाढव्य लेखन केलेलें प्रतिभाशाली लेखक फारच थोडे निघतील. त्या दृष्टीनें विचार करतां केळकरांचा समग्र लेखनसंभार हा केवळ महाराष्ट्राचेंच नव्हे तर अखिल भारताचें भूषण ठरेल. केळकर वाङ्मयाचें हे बारा खंड आणि त्या व्यतिरिक्त अगदीं परवां परवांपर्यंत प्रसिद्ध झालेलें त्यांचें अनेक विविध ग्रंथ म्हणजे एक महान् केळकर विद्यापीठच होय. यापुढें महाराष्ट्रांत ज्याला राजकारण, समाजकारण आणि वाङ्मयकारण करावयाचें असेल त्याला या 'केळकर विद्यापीठां'त निदान एक तपभर तरी राहून अभ्यास केल्यावांचून गत्यंतर नाहीं. 'केळकर वाङ्मय' प्रसिद्ध झाल्यापासून 'साहित्याचार्य केळकर' हे एकदम महाराष्ट्राचे 'साहित्यसम्राट् केळकर' झाले. तें त्यांचे अद्वितीय स्थान त्यांच्या मृत्युनंतरहि त्यांच्यापासून हिरावून घेणारा लेखक जन्माला येण्यास अद्याप पुष्कळ अवकाश आहे. स्वतः केळकरांनींच महाराष्ट्रांत पुनर्जन्म घेतला तरच तो पराक्रम ते पुन्हां करूं शकतील असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांत मराठी भाषेवर आणि साहित्यावर केळकरांच्या लेखनाच्या जो अनेकविध परिणाम झालेला आहे, त्याचें समग्रपणें वर्णन करणें या ठिकाणीं शक्य नाहीं. त्यांनीं प्रथम उपयोगांत आणलेले अनेक नवीन शब्द, भाषासंकेत आणि भाषालंकार आज मराठी भाषेच्या भांडारामधें समाविष्ट झालेले आहेत. इतकी सुबोध, सोज्वळ आणि प्रासादिक मराठी भाषा लिहिणारा दुसरा लेखक मराठी साहित्यांत आढळून येणार नाहीं. पुण्यामध्यें एका संमेलनांत कोणाचें वाङ्मयच कशासारखें दिसतें हे केळकरांनीं आपल्या रसभरित भाषेमध्यें वर्णन करून सांगितलें होतें. तांबे कवींची कविता कडेवर मूल घेतलेल्या प्रौढ व प्रेमळ तरुणीप्रमाणें दिसते, केशवसुतांची कविता दामणकांठीं पंचा नेसलेल्या कोरीव मिशांच्या आणि सुदृढ शरीराच्या अस्सल चित्पावन ब्राह्मणाप्रमाणें दिसते, चंद्रशेखरांची कविता या कानापासून त्या कानापर्यंत आडवे गंध लावलेल्या शास्त्र्याप्रमाणें दिसते, गिरीशांची कविता ब्राह्मण

तरुणीनें मुद्दाम गुरविणीचा वेष घेतल्यासारखी दिसते. आणि अत्रे यांची कविता आपल्या शेजारीं उभें राहून आपल्याला गुदगुल्या करून हंसविणाऱ्या आणि क्वचित् प्रसंगीं आपल्या डोळ्यांतून पाणी काढणाऱ्या अस्वलाप्रमाणें दिसतें ! केळकरांचें हेंच रूपक त्यांच्या लेखनशैलीला लावून असें म्हणतां येईल कीं त्यांची भाषासुंदरी किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रंगभूमीवरील 'सौभद्र' नाटकांतील कै. भाऊराव कोल्हटकर यांच्या सुभद्रेच्या भूमिकेप्रमाणें मनमोहक, लडिवाळ आणि प्रौढ अशी वाटतें. वृत्तपत्रीय वाङ्मयाच्या रुक्ष वालुकामय प्रदेशामध्यें लालित्याच्या आणि विनोदाच्या फुलबागा प्रथम केळकरांनींच फुगविल्या. केळकर हे उत्कृष्ट साहित्यिक होते म्हणूनच तें श्रेष्ठ दर्जाचे पत्रपंडित होऊ शकले. त्यांचें राजकीय लेख अनेक अलंकारांनीं, दृष्टांतांनीं, सुभाषितांनीं आणि हास्यकथांनीं नटविले असत. त्यांचा उपरोध शिवरामपंत परांजप्याइतका हृदयभेदक नव्हता. किंवा त्यांचा विनोद अच्युतराव कोल्हटकरांइतका उत्तानहि नव्हता. हळूं हळूं गुदगुल्या करीत करीत आणि हलक्या हातानीं रेशमी चिमटे घेत घेत ते आपल्या विरोधकांची बंभेरी उडवीत. प्रतिस्पर्ध्यावर ते चिडले म्हणजे मग त्यांच्या ह्या कलाकुसरीच्या कामाचा नाजूकपणा शिल्लक रहात नसे. श्री. महादेव राजाराम बोडस, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर ह्यांचे 'मेनका' नाटक यांजवर टीका करतांना केळकरांना आपला नेहमीचा कलात्मक संयम सांभाळतां आला नाहीं, हें स्पष्टपणें दिसून येतें. आपल्या राजकीय विरोधाचे उट्टे वाङ्मयीन टीकेमधून काढण्याची केळकरांची ही प्रवृत्ति त्यांच्या साहित्यामधील थोर कीर्तीला शोभण्यासारखी नव्हती. वाङ्मयाच्या सर्व प्रांतांत केळकरांनीं संचार करून प्रत्येक वाङ्मयप्रकार आपल्याला साध्य झालेला आहे असें दाखविण्याचा कसोशीनें प्रयत्न केलेला आहे. नाट्य, निबंध, टीका, इतिहास, चरित्र इत्यादि प्रांतांत त्यांनीं अपूर्व यश मिळविलें. पण कादंबरी आणि काव्य ह्या वाङ्मयीन प्रकारांत त्यांना फारसें यश मिळालें नाहीं. त्यांच्या कांहीं कांहीं कविता उत्तम आहेत हें खरें. पण त्यांची काव्यरचना एकंदरींत ढोबळ आणि विस्कळितच होती. नाटकांतलीं पद्यें तर त्यांना मुळींच जमत नसत. 'कृष्णार्जुन युद्ध' नाटकामध्यें त्यांनीं केलेलीं पदें दुरुस्त करण्याचें काम तात्यासाहेब कोल्हटकरांकडे सोपविलें. कोल्हटकरांनीं त्यांचीं सारीं पदें रद्द करून समूळ नवीन पद्यें च रचलीं. त्यामुळें केळकर अतिशय चिडले.

शेवटीं कवींचीं नांवें न सांगतां कोणतीं पदें उत्कृष्ट आहेत तें निवडून काढण्याच काम केळकरांनीं एका गवयांच्या पंचायतीकडे सोपविलें. पंचांनीं केळकरांनीं केलेली एकूण एक पदें नापास केली आणि कोल्हटकरांची सारी पदें पास केली. केळकरांच्या हातून एवढें विविध कर्तृत्व आणि प्रचंड लेखन जें झालें त्यांचें कारण म्हणजे त्यांची विलक्षण निरलसता. गेल्या पन्नास वर्षांमध्यें आपल्या आयुष्यांतला एकहि क्षण केळकरांनीं कधीं वाया दवडला नसेल. या बाबतीत त्यांची एकाद्या इंग्रज लेखकाशींच तुलना करतां येईल. बहुतेक सार्वजनिक माणसांना आणि साहित्यिकांना गप्पा मारण्याचा अतिशय षोक असतो. त्यांचा गप्पाष्टकांचा घाणा एकदां सुरूं झाला म्हणजे तासन् तास त्याला कधीं खळ पडावयाची नाहीं. काळाचा असा विनाकारण अपव्यय करण्याचा केळकरांना मुळींच नाद नव्हता. केवढाहि मोठा माणूस त्यांच्याकडे आलेला असला तरी काम संपतांच एका क्षणाच्या आंत ते त्याला पिटाळून लावीत. कामावांचून ते कोणाहि माणसाला आपल्या भोवतीं घोटाळूं देत नसत. जेवढा वेळ म्हणून त्यांना मिळेल तेवढा ते वाचनांत, चिंतनांत आणि लेखनांत घालवीत असत. वक्तृत्वावर त्यांचें एवढें प्रभुत्व असूनहि कोणत्याहि बारीक बारीक व्याख्यानांची टिपणें काढून तयारी केल्याखेरीज ते कधींहि व्याख्यानाला जात नसत. प्रत्येक व्याख्यानांत कांहींतरी नवीन कोट्या, सुभाषितें आणि अवतरणें किंवा नव्या जुन्या पुस्तकांतील ठळक उतारे वांचून दाखविल्यावांचून तें कधींहि रहात नसत. आपल्या श्रोत्यांच्या ज्ञानांत भर पडावी आणि त्यांची बहुश्रुतता वाढावी याबद्दल ते दक्ष असत. आपलें व्याख्यान एक वेळ मनोरंजक झालें नाहीं तरी चालेल पण उथळ होतां कामा नये, याबद्दल ते अतिशय काळजी घेत. आपल्या एकसष्टीच्या उत्सवाच्या वेळीं निरनिराळ्या समारंभाच्या वेळीं उत्तरादाखल त्यांनीं जीं भाषणें केली त्यांतल्या त्यांत कांहीं भाषणांची पुनरावृत्ति दुसऱ्या भाषणांत न करण्याचा यशस्वी प्रयत्न करून त्यांनीं आपल्या श्रोत्यांना थक्क करून सोडलें.

गुणग्राहकता आणि निर्मत्सरीपणा हे केळकरांच्या स्वभावांतलें दोन अत्यंत उज्ज्वल गुण होते. केळकर म्हणजे होतकरू लेखकांना आणि गुणी लोकांना उत्तेजनाचे एक भलें मोठें भांडारच होतें. आज उदयास आलेले शेकडों लेखक केळकरांच्या या गुणांचा निर्वाळा देतील. कोणीहि नवीन लेखक त्यांच्याकडे आला

म्हणजे त्यांचें लिखाण ते काळजीपूर्वक वाचीत. आणि त्यांतील गुणदोषांचें सहृदयपणें विवेचन करीत. एकोणीस सालीं गडकऱ्यांच्या निधनावर एक शोकपर काव्य लिहून तें दाखविण्यासाठीं मी केळकरांकडे प्रथम गेलों. त्या वेळीं त्यांनीं माझ्या त्या काव्याचें जें कोडकौतुक केलें तें मी कधींहि विसरलों नाहीं. कोणीहि नवीन नाटककाराचें कसलेहि नाटक असलें, तरी ते आरंभापासून अखेरपर्यंत त्या नाटकाच्या प्रयोगाला बसत आणि त्यांतलें प्रत्येक अक्षरन् अक्षर ऐकत. लक्षपूर्वक उगीचच पंधरा मिनिटें बसल्या न बसल्यासारखें करून नाटककारावर आपण जणूं कांहीं उपकार करतों आहोंत असें दाखविण्याचा संभावितपणा इतर साहित्यिकांसारखा त्यांच्या अंगीं नव्हता. शाळेंतल्या विद्यार्थ्यांसाठीं मी लिहिलेल्या 'गुरुदक्षिणा' या स्त्री-पात्रविरहित नाटकाचा प्रयोग सत्ताविस सालीं किर्लोस्कर नाटकगृहांत त्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. मी त्यावेळीं इंग्लंडमध्यें होतों. त्या नाटकाबद्दल गुणवर्णनपर असें जें भाषण त्यांनीं त्यावेळीं केलें तें मी त्या नाटकाच्या प्रस्तावनेदाखल छापून ठेवलेलें आहे. चौदा वर्षांपूर्वी मी लिहिलेल्या 'साष्टांग नमस्कार' या माझ्या पहिल्या नाटकाचा आरंभींचा प्रयोगहि त्यांच्याच अध्यक्षतेखालीं झाला. त्या प्रसंगीं ते विनोदानें म्हणाले कीं, " या नाटकांतल्या विनोदामुळें प्रेक्षकांची एक सोय मात्र चांगली झालेली आहे, तो ही कीं प्रेक्षकांनीं नाटकामधून केव्हांहि उठून जावें आणि केव्हांहि बाहेरून आंत यावें. त्याचें अनुसंधान कांहीं चुकावयाचें नाहीं ! " केळकर असे म्हणाले खरें, पण स्वतः मात्र रात्रीं दहा वाजल्यापासून तो पहांटे चार वाजेपर्यंत आपल्या खुर्चीवरून एकदांहि न उठतां ते एकसारखे हंसत खिंकाळत बसले होते. मी लिहिलेलें प्रत्येक नाटक आणि चित्रपट बघून त्यांनीं दर वेळेला मला प्रेमानें उत्तेनजच दिलें आहे. माझें 'उद्याचा संसार' हें नाटक पहातांना त्यांच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वहात होत्या. नाटक संपल्यावर सद्गदित अंतःकरणानें ते म्हणाले, " अत्रे, आयुष्याचा अर्क तुम्ही उकळून काढला आहेत. असंच कांहींतरी लिहित जा. " मी म्हणालों, " असं पुन्हां पुन्हां कसं लिहिता येईल तात्यासाहेब ? " तेव्हां केळकर म्हणाले, " तुमच्या प्रतिभेला जोपर्यंत बहर येतो आहे तोंपर्यंत तिजवरचीं निघतील तेवढीं फळें काढून घ्या. थांबूं नका ! " पुढें राजकीय मतभेद निर्माण झाल्यानंतर कधीं कधीं तात्यासाहेबांवर मला कडक टीका करण्याची पाळी आली.

पण त्यामुळें त्यांचा मजवरील लोभ मात्र यत्किंचितहि कमी झाला नाहीं. त्यांच्या आजूबाजूला वावरणारीं कांहीं मतलबी माणसें माझ्याविषयीं त्यांचें मन कलुषित करण्याचा वेळोवेळीं प्रयत्न करीत. आणि त्यामुळें कधीं कधीं तात्यासाहेब अतिशय अस्वस्थहि होत असत. एकदां तर त्यांनीं मला पत्र लिहून मी केलेल्या टीकेचा खुलासा विचारला. पण माझें उत्तर जातांच त्यांचें मन मजविषयीं पूर्वीप्रमाणेंच निर्मळ झालें. तात्यासाहेबांच्या स्वभावांतल्या या उपजत चांगुलपणाची आठवण झाली कीं आतां डोळ्यांत अश्रू उभें रहातात. गांधीजींचा आणि केळकरांचा विरोध एवढा विकोपाला गेला असतांना सुद्धां कस्तुरबांच्या अंत्यसंस्काराच्या वेळीं ते आगाखान वाड्यांत जावयाला चुकले नाहींत. तेथें गेल्यानंतर गांधीजींची आणि त्यांची दृष्टादृष्ट होतांच एकदम त्यांच्या डोळ्यांतून आंसवांच्या धारा वाहूं लागल्या. गांधीजींचेंहि डोळे भरून आले. आणि सद्गदित स्वरानें ते म्हणाले, "काय विपरीत प्रसंगीं आपली गांठ पडते आहे!' एरव्हींच्या आयुष्यांत केळकर भावनाविवश झालेले क्वचितच दिसून येत असत. त्यांच्या आयुष्यांत भावनेला फार कमी स्थान होतें अशी साधारणपणें लोकांची समजूत होती. पण त्यांच्या विद्वत्तेच्या आणि वक्तृत्वाच्या गंभीर इमारतीच्या तळाशीं भावनेच्या खजिन्याची केवढी मोठी विहीर दडलेली होती हें प्रसंग आला म्हणजेच जवळच्या माणसांना कळून येई. केळकरांच्या अनेक बारीक सारीक अठवणी मी माझ्या मनाच्या कपाटांत आजपर्यंत जपून ठेवलेल्या आहेत. त्या सर्वच कांहीं येथें सांगतां येणार नाहींत. पण त्यांपैकी दोनच मौजेच्या आठवणीं या ठिकाणीं सांगतों. माधवराव पटवर्धनांच्या अंत्यविधीच्या वेळीं त्यांच्या शिष्यत्वाचीं बिरुदें मिरवणारा एक तरुण कवि स्मशानभूमीवर खूप ओक्साबोक्शीं रडत होता. माधवरावाच्या मरणानें दुःखित झालेल्या लोकाना आपलें दुःख क्षणभर विसरून या कवीच्या अनावर शोकांचें सांत्वन कसें करावें हाच एक प्रश्न पडला. इतक्यांत तात्यासाहेब त्या ठिकाणीं आलें. त्यांना पहातांच "तात्यासाहेब, आपले माधवराव गेले हो गेले!" असा मोठ्यानें हंबरडा फोडून सदर तरुण कवि तात्यासाहेबांनां मिठी मारायला जोरानें त्यांच्याकडे धावत गेला. त्याच्या त्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करतांना तात्यासाहेबांची जी विलक्षण अवघड परिस्थिति झालीं ती बघून त्या शोकाच्या वातावरणांतहि इतरांना

आपलें हंसूं आंतल्या आंत दावतां दावतां पुरेवाट झाली. स्वतः तात्यासाहेब तर त्यामुळें पुष्कळ वेळपर्यंत अस्वस्थ झाल्यासारखें दिसत होते. एकदां पुण्यामधील एका पत्रपंडिताचें लग्न होतें. त्या समारंभाला मी आणि तात्यासाहेब शेजारीं शेजारींच बसलों होतों. वधुवरांना आलेली अभिनंदनाचीं पत्रें वराचे एक 'विद्वान्' मित्र जेव्हां वाचून दाखवूं लागले तेव्हां त्यापैकीं एका पत्रांतील "I congratulate you on this auspicious occasion." हें वाक्य वाचतांना 'auspicious' ह्या शब्दाऐवजीं त्यांनीं 'suspicious' असा शब्द वाचला. त्याबरोबर तात्यासाहेबांना हास्याची इतकी मोठी उबळ आली कीं ती दाबण्यासाठीं त्यांना माझ्या डाव्या खांद्यावरच मान ठेवून कित्येक मिनिटें रहावें लागलें. गेल्या मंगळवारीं तात्यासाहेबांच्या शवाला हाच खांदा देतांना त्यांनीं जिवंतपणीं त्या खांद्यावर एकदां मान ठेवलेली होती या आठवणीनें माझ्या पोटांत अगदीं कालवल्यासारखें होऊन गेले. केळकरांच्या चांगुलपणाच्या आणि मोठेपणाच्या आतां जेवढ्या आठवणी कराव्यात तेवढ्या थोड्याच आहेत. त्यांच्या जीविताचा आणि कार्याचा जों जों अधिक विचार करावा तों तों त्यांच्या आयुष्यांत त्यांना जेवढी कीर्ति मिळाली त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक कीर्ति मरणानंतर आतां त्यांना मिळाल्यावांचून रहाणार नाहीं असा विश्वास वाटूं लागतो. लोकमान्य टिळक आणि 'केसरी' यांजवरील त्यांचे अनन्यसाधारण प्रेम हेच त्यांच्या मोठेपणाचे खरें रहस्य होते. 'केसरी' च्या प्रकाशनाने प्रसिद्ध झालेल्या मंगळवारींच त्यांना मरण यावें हे त्यांच्या केसरीवरील अपूर्व निष्ठेचेंच एक चिन्ह नव्हे काय? जें पुणें शहर गेलीं पंधरा वर्षे केळकरांच्याबाबत उदासीन होतें तें हजारोंच्या संख्येनें त्यांच्या कलेवरावर अश्रू आणि फुलें उधळीत त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठीं एकत्र लोटलेलें पाहून माझ्या तोंडून रे. टिळकांच्या दोन ओळी नकळत बाहेर पडल्या—

जिंकुनि मरणाला मरणाला
जीव कुडींतुन गेला !

मला पडलेलें विलक्षण स्वप्न ! : : ४

फेब्रुवारी महिन्याची वीस तारीख. गुरुवार होता त्या दिवशीं. रात्रींच्या वेळीं जेवण झाल्यानंतर मी 'नभोवाणी' ऐकत बसलों होतों माझ्या दिवाणखान्यांत. बसलों होतो असें म्हणण्यापेक्षां कोचावर अर्धवट डोळे मिटून कलंडलों होतों, असेंच म्हटलेलें जास्त बरें. जेवण नेहमींपेक्षां सढळ हातानें झाल्याकारणानें अंग जरा सुस्त झालें होतें आणि डोळे जडावले होते. 'नभोवाणी' वर कांहीं तरी सामान्य कार्यक्रम चाललेला होता. म्हणून त्या कार्यक्रमाकडे माझें फारसें लक्ष नव्हतें. मधून मधून मला डुलकीहि येत होती. आणि त्यामुळें कानावर जे निरनिराळे आवाज पडत होते त्याच्यांतलें सूत्र एकदम निसटल्यासारखें वाटत होते. अशा रीतीनें जागेपणींच्या आणि झोपेच्या सरहद्दीवर लंबकासारखे हेलकावे खात मी पडलों असतांना, दिल्लीच्या तळावरून पंतप्रधान ॲटली यांच्या घोषणेच्या बातमीचा पुकार खड्या आवाजामध्यें एकदम बाहेर पडला. त्या दिवशीं ॲटलीसाहेब कांहींतरी महत्त्वाची घोषणा करणार आहेत किंवा कसला तरी 'पांढरा कागद' वाचणार आहेत, हें मला माहित होते. तथापि, मला त्याविषयीं फारशी उत्सुकता वाटत नव्हती. सहा डिसेंबरच्या ब्रिटिश सरकारच्या निवेदनानंतर माझा ब्रिटिशांच्या शहाणपणावरचा विश्वास पार उडाला होता. 'लीग' ला हाताशीं धरून स्वातंत्र्याच्या राजकारणाचा हे असाच यापुढें खेळखंडोबा करीत रहाणार अशी माझी अगदीं समजूत झाली होती. म्हणून पंतप्रधान ॲटली आतां कांहीं तरी अद्भुत घोषणा करून मुरदाड बनलेल्या देशाच्या राजकारणांत नवीन कांहीं तरी जीव घालतील अशी अपेक्षां बाळगण्याचें मला कारण नव्हतें. मी मनांत म्हणालों कीं, हा

पूर्वीसारखाच कांहीं तरी शाब्दिक चावटपणा असणार दुसरें काय? असा विचार मनांत येतो आहे तोच 'एकोणीसशें अठ्ठेचाळीसच्या जून महिन्याच्या आंत जबाबदार हिंदी सरकारच्या हातांत सत्ता देऊन ब्रिटिशांनीं या देशांतून जाण्याचा ठाम निश्चय केला आहे.' असे उद्‌गार नभोवाणीमधून बाहेर पडले. त्या बरोबर एकादी इंगळी डसावी तसा मी 'अरेच्या!' म्हणून जोरानें किंचाळलों आणि ताडकन् उठून बसलों! माझ्या शरीरांतला कणन् कण एकदम कानामध्यें येऊन बसला. आणि नभोवाणींतून भराभर बाहेर पडणारा एकेक शब्दन् शब्द व्याकुळ उत्सुकतेनें ऐकूं लागलों. मी झोपेंत आहे कां स्वप्नांत आहे हें मला कळेना! छे, छे, हें कसें शक्य असेल? पुढल्या वर्षाच्या जूनच्या आंत हे पांढऱ्या पायाचे राजकर्ते या देशामधून चालते होणार? गेली शें दीडशें वर्षे ह्या देशाच्या मानगुटीवर बसलेले राजकीय गुलामगिरीचें हें राक्षसी जोखड पंधरा महिन्यानें नाहींसें होणार! काय ऐकतों आहोंत तरी काय हें आपण? माझ्या कानावर माझा मुळीं विश्वास बसेना! पुढल्या वर्षी ह्या देशामधून इंग्रज चालते होणार ह्या नुसत्या कल्पनेनेंच डोकें बेहोष झालें! कवटीच्या आंत मेंदू हर्षानें गडबडा लोळूं लागला! एकाएकी स्वर्ग खालीं उतरून पृथ्वीवर आला आहे कां पृथ्वी वर उडी मारून स्वर्गात शिरली आहे, हेंच लक्षांत येईना. मी मनाशीं म्हटलें कीं, कलियुग एकएकी संपून सत्ययुगाला तर आतां ही सुरवात झाली नसेल ना? नभोवाणीवरील बातमी संपत आली. लॉर्ड वेव्हेल यांना पुढल्या महिन्यांत परत बोलण्यांत येईल, आणि त्यांच्या जागीं लॉर्ड माऊंटबॅटन ह्यांची नेमणूक करण्यांत येईल, हा बातमीचा शेवटचा भाग ऐकून तर मी आनंदानें कोचावरून उडालोंच म्हणाना! छान झालें. त्या लुच्चा एकडोळेवाल्या साहेबाची हकालपट्टी करण्यांत आली! फार उत्तम गोष्ट झाली! मी हर्षानें स्वतःशीच उद्‌गारलों! बातम्या संपल्या. मी नभोवाणी बंद करून टाकली. आणि एकदम बाहेर गॅलरीमध्यें आलों. माझ्या प्रमाणेंच समुद्राचा हर्षहि अनावर झाला असल्याचें मला दिसून आलें. त्याच्या लाटा जोरजोरानें किनाऱ्याकडे धांवत होत्या. मी वर आकाशाकडे पाहिलें. लक्षावधी चांदण्यांनाहि आमच्याप्रमाणें आनंद झालेला होता. समोर अंधारांत उभीं असलेल्या नारळाची झाडेंहि समाधानानें माना डोलवित होतीं. पंतप्रधान ॲटलींची घोषणा आपल्यालाहि पसंत असल्याचें

ती जणूं कांहीं मला सांगत होती. मी आजुबाजूला पाहिलें. खालीं रस्त्याकडेहि नजर टाकली. अंधारांतून कोणीतरी माणूस मंद पावलांनीं हळूं चालला असल्याचें मला दिसलें. मी चिडून म्हणालों, "काय गाढव माणूस आहे हा! रस्त्यानें उड्या मारीत आणि ओरडत जाण्याचें सोडून हा माणूस असा मुडद्यासारखा काय चाललाय हळूं हळूं?" इतक्यांत माझ्या लक्ष्यांत आलें कीं नभोवाणीवरची ती आनंदाची बातमी त्यानें कदाचित् ऐकली नसेल! त्या बरोबर मनांत एकदम विचार आला कीं, गॅलरीमधून त्याला मोठ्यानें ओरडून सांगावें कीं, "लेका, पंधरा महिन्यांनीं इंग्रज या देशांतून चालते होणार आहेत! आनंदानें उड्या मारीत जा! हळूं काय चालला आहेस?": तथापि, हा विचार मी अंमलांत आणायच्या आधींच 'टार्झन' मागून आला आणि गॅलरीच्या कठड्यावर पंजे ठेवून मोठमोठ्यानें भुंकूं लागला. "भू, भू, भू, पुढल्यावर्षी इंग्रज या देशांतून चालते होणार! आमचा हिंदुस्थान आतां स्वतंत्र होणार! भू, भू, भू,!" अशीच घोषणा जणूं कांहीं आनंदानें तो भुंकत होता असें मला वाटलें. डाव्या बाजूला शिवाजी पार्कचें प्रचंड मैदान अंधारामध्यें जास्तच ओसाड दिसत होतें. त्या मैदानाच्या आसपास असणाऱ्या उंच इमारतीमधून दिव्यांचा प्रकाश होता. त्यावरून त्या इमारतीमधली माणसें अद्यापिहि जागीं असावींत असें मला वाटलें. एवढी आनंदाची बातमी ऐकल्यानंतरहि हे लोक घरांतल्या घरांत काय करीत बसले आहेत, ते तावडतोब घरांतून बाहेर पडून शिवाजी पार्कवर प्रचंड सभा कां भरवीत नाहींत, याचें मला आश्चर्य वाटलें. कोणत्याहि गोष्टीचा आमच्या लोकांना मुळीं उत्साहच नाहीं. दीडशें वर्षाच्या गुलामगिरीनें त्यांची मनें इतकीं मुर्दाड होऊन गेलीं आहेत कीं, त्यांना शिमगा कोणता, आणि दिवाळी कोणती या मधला फरकहि कळेनासा झाला आहे, असें कांहींतरी पुटपुटत मी चिडून परत दिवाणखान्यांत आलों आणि कोचावर कलंडलों. समोर भिंतीवर कॅलेंडर लोंबत होतें. तें दृष्टीस पडतांच आजपासून एकोणीसशें अठ्ठेचाळीस सालच्या पहिल्या जूनची भाग्यशाली तारीख उगवायला किती दिवसांचा अवकाश आहे, तें प्रत्यक्ष मोजूनच पहावें असें मला वाटलें. 'या महिन्यांचें बाकी राहिलेले आठ दिवस' अशी दिवसांची बेरीज मी मनांतल्या मनांत करूं लागलों. आंकडे मोजण्याच्या नादांत एकदम डुलकी केव्हां आली तें मला कळलेंच नाहीं.

मी तसाच कोचावर पडलेला होतों. समोरच्या भिंतीवर लोंबणाऱ्या कॅलेंडरमध्यें 'एक जून एकोणीसशें अठ्ठेचाळीस' एवढी एकच तारीख चकचकत होती. चकचकत होती ह्याचें कारण ती सोन्याच्या शाईंत छापलेली होती. त्या एका तारखेवांचून कॅलेंडरमध्यें दुसरी कसलीच माहिती दिलेली नव्हती. एकसारखा किती वेळ तरी मी त्या तारखेकडे नजर रोखून बघत होतों. मी वेड्यासारखा त्या तारखेकडे टक लावून कां बघत बसलों आहे, हें पुष्कळ वेळ झाला तरी माझ्या ध्यानांत येईना. इतक्यांत माझ्या उजव्या बाजूकडून हास्याचा आवाज माझ्या कानीं आला. मी वळून पाहिलें. तो त्या भिंतीवर टांगलेला हिंदुस्थानचा नकाशा खदखदां हंसतो आहे आणि हर्षानें मागेंपुढें भिंतीवर आदळतो आहे, असें मला दिसून आलें. त्याबरोबर समोरच्या कॅलेंडरामधून चकाकणाऱ्या 'एक जून एकोणिसशें अठ्ठेचाळीस' चा प्रकाश एकदम माझ्या डोक्यांत पडला. मी आनंदानें किंचाळलों, "म्हणजे पंधरा महिने इतक्यांत संपले? आणि अठ्ठेचाळीसच्या जूनची पहिली भाग्यशाली तारीख आज उजाडली? गुलामगिरीचा फाल्गुन महिना संपून स्वातंत्र्याच्या नव्या वर्षाला आज सुरवात झाली? बाहेर कोट्यवधि जनता आनंदाचा गुडीपाडवा साजरा करीत असतांना मी आळशासारखा घरांत काय पडून राहिलों आहे! तिकडे अगोलो बंदरावर निजधामाला जाणाऱ्या गोऱ्या राजकर्त्यांची शेवटची आगबोट पहावयाला केवढी प्रचंड गर्दी जमली असेल? तो सोहळा बघायला जाण्याचें सोडून मी खुशाल झोंपा घेत घरांत पडलों आहे, या विचारानें माझीच मला लाज वाटूं लागली. मी कोचावरून उठण्याचा प्रयत्न करूं लागलों. परंतु कोचावरून आपल्याला उठतां येत नाहीं आणि आपलें अंग भयंकर जड झालेलें आहे. असें मला आढळून आलें. मला आश्चर्य वाटलें. मी म्हणालों, "सणावाराच्या दिवशीं हे काय नवीन लफडें निर्माण झालें आहे?" गड्याला हांक मारावी म्हणून मी तोंड उघडलें तोंच दिवाणखान्याचें दार थाडकन् आंत लोटून बूटांचा खाड खाड आवाज करीत लष्करी पोषाखांतला एक साहेब आंत शिरला. त्या साहेबाचा चेहरा अर्धवट लॉर्ड वेव्हेलसारखा अन् अर्धवट चर्चिलसारखा दिसत होता. त्याच्या उजव्या हातांत एक भली मोठी कात्री होती. सर्व गोरे लोक देशामधून जाण्याचें दिवशीं हा लेकाचा एकच साहेब माझ्या घरामध्यें कां शिरावा, याचा मला अचंबा वाटला. मी माझ्या

जागेवरून उठलों नाहीं. किंवा 'गुड् मॉर्निंग' असेंहि त्याला म्हटलें नाहीं. विलायती रीतीभातींचें शाब्दिक ढोंग त्या दिवसापासून या देशामधलें संपलें हें मला माहीत होतें. मी पडल्या पडल्याच त्या साहेबाला विचारलें, "अजून तुम्ही माझ्या इथें कसें ? आणि ही कात्री घेऊन तुम्ही माझ्या घरामध्येंही कशाला शिरलांत ?" माझ्या डोळ्याला डोळा न भिडवितां भिंतीवरच्या हिंदुस्थानच्या नकाशाकडे कठोर नजरेनें पहात तो साहेब म्हणाला, "बंदरांत आमची बोट उभी आहे. पण जाण्यापूर्वी मला तुमचा हिंदुस्थानचा नकाशा कातरून त्याचे तुकडे तुकडे करायचे आहेत !" साहेबाचे ते शब्द ऐकून कात्रीनें माझे कुणी काळीजच कापतें आहे असें मला वाटलें. मी रागानें एकदम गरजलों, "गेलीं दीडशें वर्षे तुम्ही या देशाचीं लक्तरें केलींत तीं पुरीं नाहीं का झालीं ? जाण्याचें दिवशीं तरी लेकहो, असा हलकटपणा करूं नका." पण माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून साहेबानें भिंतीवरचा नकाशा खसकन् ओढला आणि खालीं जमिनीवर आपटून अंथरला आणि बकऱ्याला कापण्याकरितां खाटीक ओणवा होऊन जसा त्याच्या पोटावर आपला गुडघा ठेवतो, त्याप्रमाणें नेमका लंकेवर आपला गुडघा ठेवून साहेबानें आपल्या हातांतली कातरी पुढे सरसावली. माझें डोकें संतापानें फिरून गेलें. हिंदुस्थान सोडावं लागत असल्यामुळें आधींच लालभडक झालेला साहेबाचा चेहरा दोन सणसणीत श्रीमुखांत भडकावून आणखी लाल करावा, असा विचार माझ्या मनांत आला. पण कोचावरून मला उठतां येत नव्हतें. आणि शिवाय मी अहिंसावादी कॉंग्रेसजन होतों. पहिल्या झटक्यासरशीं साहेबानें सिंधचा तुकडा उडवला. तांबरोबर त्या नकाशामधून भळभळां रक्त वाहूं लागलें. आणि शेंकडो लोकांच्या आर्त किंकाळ्या बाहेर उठल्या. सिंध संपतांच साहेबांनें बंगालकडे आपली खात्री वळवली. माझ्या पोटांत एकदम धसका बसला. मी एकदम ओरडलों, "साहेब, कृपा करा, आमच्या बंगालला हात लावूं नका. आमच्या रवींद्रनाथ टागोरच्या बंगालची अशी विटंबना करूं नका. हो !" पण माझे शब्द पुरें होण्याच्या आधींच त्यानें बंगालचा लचका तोडून काढलेला होता ! रक्ताचीं शेंकडों कारंजीं बंगालच्या जखमी अंगांतून बाहेर उसळलीं. आणि नौखालीमधून स्त्रियांचे हंबरडे पुन्हां वेगानें बाहेर उसळले. मला तें रक्त पहावेना आणि तो शोक ऐकवेना. मी कानांत बोटें घातलीं आणि डोळें घट्ट मिटून घेतले. पुन्हा कांहीं वेळानें मी डोळे

उघडून पाहातों तो साहेबांनें साऱ्या हिंदुस्थानाचें तुकडे तुकडे करून जमिनीवर फिसकरलेले होते! कोणताहि प्रांत किंवा कोणतेंहि संस्थान कापण्यांचें त्यानें बाकी ठेवलें नाहीं! माझ्या दिवाणखान्यांत रक्ताचें थोराळें माजलें होतें. रक्ताच्या चिळकांड्यांनीं दिवाणखान्याची सारी भिंत लालभडक झाली होती. साहेबाचे हात, त्याच्या हाताखालीं ती मोठी थोरली कात्री आणि त्याचे सारे खाकी कपडे रक्तानें भरून गेलें होते. गॅलरीमध्यें कात्री भिरकावून देऊन साहेब उठून एकदम उभा राहिला, आणि त्यानें माझ्याकडे पाहून भेसूर हास्य केलें. त्यावेळीं साहेबाच्या चेहऱ्यामधून जनाब जिनांचाच चेहरा हंसतो आहे किंवा काय, असा क्षणभर मला भास झाला. पायापासून डोक्यापर्यंत माझ्या अंगावर भयाचा कांटा उभा राहिला. माझ्या काळजाचें अगदीं पाणी पाणी झालें! हिंदुस्थानचे रक्तबंबाळ तुकडे आपल्या बुटाच्या टांचेखालीं तुडवीत आणि खाड खाड आवाज करीत साहेब माझ्या डोळ्यासमोर चालता झाला. अरेरे, माझ्या प्रचंड आणि अखंड देशाची इथून जाण्यापूर्वी साहेबाने काय ही दुर्दशा करून टाकली! असें म्हणून मी लहान मुलाप्रमाणें ओक्साबोक्शी रडूं लागलों. अठ्ठेचाळीसच्या जूनची असली भयानक पहिली तारीख आम्हाला दाखवण्यापूर्वी तूं आमचे डोळे कां मिटले नाहींस, अशा परमेश्वराला मी शिव्या देऊं लागलों. तशा विव्हळ अवस्थेंत किती वेळ डोळे मिटून मी तेथें रडत बसलों होतो कुणास ठाऊक! त्या शोकाच्या अतिरेकानें माझ्या बुद्धीला एक प्रकारची ग्लानी किंवा मूर्च्छा आली होती. भयाण काळोखाच्या एकाद्या खोल समुद्राच्या तळाशीं आपण जाऊन पडलो आहोंत किंवा काय, असें मला वाटत होते. त्या ग्लानीमधून एका स्वर्गीय संगीतानें मला जागे केलें. बेशुद्ध पडलेल्या माणसाच्या अंगावर थंडगार पाणी शिंपडावें, म्हणजे तो जसा जागा होतो त्याप्रमाणे अमृतापेक्षांहि शीतळ आणि मधुर असे स्वर माझ्या कानांत कुणी ओतीत आहे किंवा काय असा मला भास झाला. आणि मी हळू हळू डोळे उघडून बघूं लागलों. होय माझी कल्पना बरोबर होती. तो कृष्णाच्या मुरलीपेक्षांहि अधिक मनोहर मुरली वाजवणारा हा महात्मा मोहन कोण आहे असा विचार मी करूं लागलो. तोंच महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार मला ऐकूं आला. हा आवाज समोर पडलेल्या रक्तबंबाळ बंगाल-बिहारमधून निघत होता. त्या बरोबर जनतेच्या जातीय

ऐक्याची मुरली वंग देशांत महात्मा गांधी अजूनही वाजवीत बसले आहेत असें माझ्या लक्षांत आलें. 'आम्ही एक आहोंत आणि आम्ही एक होणार' हें त्या मुरलीगीताचे पालुपद होतें. ह्या पालुपदानें मला मोहिनी घातली. माझें दुःख मी विसरून गेलों आणि मान डोलवीत मीहि त्या सुरांवर गाऊं लागलों. "आम्ही एक आहोंत आणि आम्ही एक होणार!" कांही वेळानें माझ्या सुराशीं सूर मिसळून तें पालुपद दुसरें कोणीतरी गात आहे, एक आवाज ते गात नसून अनेक आवाजांत ते गात आहेत, असें मला आळळून आलें. त्या वरोबर एकदम मी डोळे उघडले आणि समोर पहातों तो साहेबाने कापलेले ते निरनिराळे हिंदुस्थानचे तुकडे 'आम्ही एक आहोंत आणि आम्ही एक होणार' हें महात्माजींच्या मुरलीचें पालुपद गात गात एकमेकांकडे सरकत येत आहेत असें मला दिसलें. माझ्या डोळ्यांतलें दुःखाचे अश्रू कधींच नाहींसें झाले होते. आणि त्यांची जागा आनंदाच्या आसवांनीं घेतली होती. 'आम्ही एक आहोंत आम्ही एक होणार' हा आवाज हिंदुस्तानच्या प्रत्येक तुकड्या-तुकड्यामधून निघूं लागला. कलकत्त्यापासून कराचीपर्यंत आणि काश्मीरपासून तों कन्याकुमारीपर्यंत कोव्यावधि आवाजांचा एकच एक गजर उसळला आणि आभाळापर्यंत जाऊन पोहोंचला. नादब्रह्माच्या त्या तंद्रीत देहभान विसरून हिंदुस्थानचे असंख्य तुकडे कधीं एकत्र झाले तें माझ्या लक्षांतहि आलें नाहीं. पुन्हा माझ्या समोर माझा प्रचंड आणि अखंड हिंदुस्तान एकमुखानें आणि एक-दिलानें हंसत आहे, असें मला दिसून आले. हिंदुस्थानच्या त्या नकाशाभोंवतीं तेजाचे आणि सामर्थ्याचें एक नवीनच वलय झळकत असल्याचें मला आढळलें. बघतां बघतां त्या वलयाचें तेज वाढत चाललें. आणि त्यामधून एक अतिशय दिव्य आणि देदीप्यमान् पुरुष प्रकट झाला. त्या पुरुषाचाची कांति बघून माझे डोळे अक्षरशः दिपले. कोटी रवींचें तेज देखील त्या पुरुषाच्या क्रांतीपुढें फिकें पडलें असते! बघतां बघतां त्या पुरुषाची आकृति एकदम वाढूं लागली. माझ्या दिवाणखान्याचें छत त्याच्या तेजाने वितळून नाहींसें झालें. आणि मला आकाशाचा विस्तार वर दिसूं लागला. वाढतां वाढतां तो आकृति इतकी वाढली कीं तिचें मस्तक गगनाला जाऊन भिडलें. आणि तिचे बाहू क्षितिजावर जाऊन विसावले. त्या विराट् आकृतीची छाया साऱ्या भूगोलावर पसरली. आणि त्या

छायेंत इंग्लंड दिसेनासें झालें. अमेरिका नाहींशी झाली. आणि रशिया झांकून गेला. सर्व जग डोळे उंच करून आनंदानें आणि आदरानें त्या आकृतीच्या दिव्य मुद्रेकडे पाहूं लागलें. पौर्णिमेचा चंद्र आपल्या शुभ्र किरणांचा पाऊस ज्याप्रमाणें साऱ्या विश्वावर सांडीत असतो त्याप्रमाणें सुखाच्या आणि शांततेच्या गंगेचा ओजस्वी ओघ त्या महापुरुषाच्या मस्तकामधून बाहेर पडून साऱ्या जगाला न्हाऊं घालूं लागला. त्या महापुरुषाची ओळख एकदम मला पटली. मी म्हणालों, "सर्व मानवतेवर शांततेचें साम्राज्य स्थापणारा हाच तो उद्यांचा महान् भारतवर्ष!" मी त्या महापुरुषाच्या चरणावर माझें मस्तक नमवलें. आणि अंगांत होतें नव्हतें तेवढें सारें बळ एकत्र करून मी हर्षानें गर्जना केली, "जय हिंद! जय भारत!"



त्या माझ्या गर्जनेनेंच मला स्वप्नांमधून जागें केलें. अर्धवट डोळे उघडून मी समोर पहातों तों पुस्तकांच्या कपाटावर ठेवलेला महात्मा गांधींचा अर्धपुतळा माझ्याकडे पाहून शांतपणें हंसत होता.

आणखी चार दिवसांनीं लोकमान्य टिळकांना जाऊन सव्वीस वर्षें पूर्ण होतात. आम्ही ज्या काळांत जन्माला आलों त्या काळांत टिळकांपेक्षां मोठा पुरुष ह्या देशांत दुसरा कुणीच नव्हता. महाराष्ट्रांतल्या या महापुरुषाचें नांव त्यावेळीं साऱ्या हिंदुस्थानमध्यें दुमदुमत होतें. महाराष्ट्रांतल्या प्रत्येक माणसाला टिळकांच्या नांवाचा तेव्हां केवढा अभिमान वाटत होता म्हणतां! स्वातंत्र्यासाठीं आपल्या सर्वस्वाची आहुति करणाऱ्या शिवरायाच्या महाराष्ट्राची ती महान् परंपरा टिळकांनीं पुनः सुरू केली, आणि स्वातंत्र्याच्या लढ्याचें नेतृत्व महाराष्ट्राला मिळवून दिलें. मराठ्यांचें राज्य बुडाल्यानंतर हिंदुस्थानच्या इतिहासांत महाराष्ट्राला एवढें मानाचें स्थान पहिल्यानेंच मिळालें. क्रांतिकारक चैतन्याची प्रचंड लाट त्यावेळीं महाराष्ट्रांत उसळली आणि त्या लाटांचे कंप साऱ्या देशांमध्यें उमटले. दर मंगळवारीं पुण्यामध्यें टिळकांच्या 'केसरी'नें आरोळी ठोकली कीं, देशामधील साऱ्या स्वातंत्र्यप्रेमी तरुणांचीं काळजें हर्षानें नाचूं लागत, तर त्या गर्जनेमुळें तिकडे लंडनमध्यें ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या छातीमध्यें भीतीचा थरकांप उडत असे. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही भाषा बोलायला प्रथम टिळकांनीं देशाला शिकविलें आणि त्या हक्कासाठीं ब्रिटिश सरकारशीं छातीठोकपणें टक्कर देणाऱ्या निर्भय कार्यकर्त्यांची आघाडी काँग्रेसमध्यें प्रथम टिळकांनीं उत्पन्न केली. टिळकांच्या या लोकोत्तर कर्तृत्वामुळें देशाच्या राजकारणांत पुण्याला आणि महाराष्ट्राला त्यावेळीं केवढें वैभव प्राप्त झालेलें होतें! साऱ्या हिंदुस्थानचें-नव्हे साऱ्या जगाचें-लक्ष त्यावेळीं पुण्यामधल्या ह्या श्यामल वर्णाच्या चित्पावन ब्राह्मणाकडे लागून राहिलें होतें!

★

श्रीशिवछत्रपति आणि थोरले बाजीराव यांच्यानंतर दोनशें वर्षें महाराष्ट्रामध्यें महापुरुष असा निर्माणच झाला नव्हता. ह्या काळामध्यें महाराष्ट्र हा नांवानेंच नुसता 'महा' राहिला होता. आणि लघुप्रकृतीचीं माणसें त्याच्या मोठेपणाचें वाटोळें करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें करीत होती. तें काम अठराशें अठरा सालीं बाळाजीपंत नातूंनीं पूर्ण केलें. आणि महाराष्ट्राचें स्वातंत्र्य धुळीला मिळालें. इंग्रजी भाषेची आणि विचाराची राजवट महाराष्ट्रांत यथाकाल सुरू झाली. नंतर साहेबाच्या संस्कृतीच्या आणि ज्ञानाच्या नव्या नवलाईनें महाराष्ट्राच्या पहिल्या दोन पिढ्यांची बुद्धि अगदीं दिपून गेली–भांबावून गेली. त्यामुळें परावलंबीपणाचें एक जाड आणि अमंगळ शेवाळेंच जणूं काय महाराष्ट्राच्या बुद्धीवर जमा होऊन बसल्यासारखें झालें. ती बौद्धिक ग्लानी आणि मानसिक सुस्ती झुगारून देऊन तिसरी पिढी मात्र खडबडून जागी झाली. आणि आपलें डोळे किलेकिले करून देशाच्या दुःस्थितीचा विचार करूं लागली. या तिसऱ्या पिढींत महाराष्ट्रामध्यें महापुरुषांचें एक भलें मोठें पीकच उगवलें. रानडे, तेलंग, चिपळूणकर, आगरकर, टिळक, गोखले अशीं एकापेक्षांहि एक कर्तृत्वानें, बुद्धिमत्तेनें आणि विद्वत्तेनें जबरदस्त माणसें त्यावेळीं महाराष्ट्रांत जन्माला आलीं. हीं माणसें कसलीं ! हे एकेक राक्षस होते राक्षस. इकडचें जग तिकडे फेंकून देण्याची ताकद होती एकेकाच्या मनगटांत. अलौकिक बुद्धिमत्तेचा एवढा श्रीमंत हंगाम महाराष्ट्रांत पूर्वी पिकलेला नव्हता. तथापि, त्या काळांतल्या सर्व महापुरुषांपेक्षां टिळकांच्या बुद्धीचां पल्ला आणि पराक्रमाची झेप फारच मोठीं होती. म्हणून साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष महाराष्ट्राकडे एकटे टिळकच खेचूं शकले ! महाराष्ट्र हें महान् राष्ट्र आहे हे शिवप्रभूनंतर आणि थोरल्या बाजीरावानंतर टिळकांनीं पुन्हा सिद्ध करून दाखविले.

★

टिळकांच्या भाविक आख्यायिकांनीं आणि दैवी दंतकथांनीं दुमदुमलेल्या काळामध्यें आमची भाग्यशाली पिढी जन्माला आली. आम्हांला कळूं लागायच्या आधींच राम आणि कृष्णाप्रमाणें टिळक हे देशाच्या देवघरामध्यें जाऊन बसलेले होते. घरोघर लाल, बाल आणि पाल ह्या स्वातंत्र्याच्या नव्या दत्तात्रयाच्या तसबिरी लटकत होत्या. हिंदमातेच्या गळ्यांत लोंबणाऱ्या रत्नमाळेच्या तळवटी बा.

गं. टि.' हा कौस्तुभमणी होऊन विराजत होता. त्यावेळच्या सार्वजनिक गणेशोत्सवांत तर खुद्द गजाननापेक्षां टिळकांच्या नांवाचा जयजयकार जास्त होत होता. 'हिंदमाता' आणि 'बाळ' यावांचून त्यावेळच्या कवींना कविता रचायला दुसरा विषयच सुचत नव्हता. 'लोकमान्य टिळक महाराज की जय!' ही जागृत महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची एक आरोळी होऊन बसली होती. महाराष्ट्राला फार वर्षांनीं एवढा लोकोत्तर पुढारी लाभलेला होता. म्हणून त्याला कुठें ठेवूं आणि कुठें नको ठेवूं, त्याचे कोणकोणते गुण किती किती आणि कसे कसे आठवूं, असें महाराष्ट्राला होऊन गेलेलें होतें. टिळकांचें स्वरूप, टिळकांचें चारित्र्य, टिळकांचें कर्तृत्व, टिळकांची विद्वत्ता, टिळकांची निर्भयता आणि टिळकांचा पराक्रम यांयध्यें दोष काढावयाला एवढीशीसुद्धां जागा नव्हती. म्हणून त्यांच्या नांवाभोंवतीं आणि मूर्तीभोंवतीं अद्भुततेचें दैवी वर्तुळ चमकत असलेलें जनतेला दिसूं लागलें. टिळकांची सुपारी, टिळकांचा वाडा, टिळकांचा छापखाना, टिळकांची पगडी, टिळकांचा सोटा, टिळकांचा 'केसरी', एवढेंच काय पण टिळकांच्या बैठकींतलीं किंवा त्यांच्या आजूबाजूला वावरणारी सर्वच माणसें महाराष्ट्राला त्यावेळीं अद्भुतरम्य वाटूं लागलीं.



टिळकांच्या हयातींत जनतेमधल्या अडाणी शाहिरांनी त्यांच्यावर पोवाडे रचून ठेवले. पुण्याला शनिवारवाड्यासमोर जुन्या मंडईंत मी त्यांचा एक पोवाडा त्यावेळीं कितीतरी वेळां ऐकत होतों. इंग्लंडच्या बादशहाकडे सातासमुद्रापलिकडच्या एका राजाचा एक 'कागुद' आला. हा 'कागुद' जो वाचून दाखवील त्याला जगाचें राज्य म्हणे मिळायचें होतें. बादशहानें हा कागद आपल्या दरबारांतल्या मोठमोठ्या सरदारांना आणि शहाण्या माणसांना वाचून दाखवायला सांगितला; पण त्यांतलें एक अक्षरदेखील कोणाला वाचतां येईना! इंग्लंडचा बादशहा अगदीं हवालदील होऊन गेला. जगाचें राज्य आपल्या हातून जाणार असें त्याला भय वाटलें. इतक्यांत त्याला कोणी सांगितलें कीं, तो कागद वाचून दाखवणारा एकच मनुष्य जगामध्यें आहे आणि तो पुण्यांत राहत असतो. त्याबरोबर बादशहाला अतिशय आनंद झाला. त्यानें ताबडतोब टिळकांना आमंत्रण पाठविलें.—

"आवतान आलं
पुन्याच्या बामनाला;
बामन पगडी
घालूनशान उठला,
म्हनला जाऊन येतों
जरा इलायतेला;
गला पाच्छायच्या
दरबाराला;
पाच्छानें कागुद
हातीं तेच्या दिला!
म्हनला वाचून
दाव रे बामना याला!
टिळकानीं कागुद
हातामंदीं घेतला;
अन् मनांत धांवा
शिवबाचा केला!
शिवबा, आतां तूंच रे
आमच्या रक्षणाला!
मंग कागुद
समोर त्येनीं धरला
अन् असा घडा घडा घडा
वाचून दावला!
—जीरे जी—जीरे—जी—जीरं...."


अशी सूरभरणी सुरू करतांना डफावर कडाडून थाप मारून एक पायावर शाहिरि जेव्हां गिरकी घेत असे, तेव्हां भोंवतालचे भाविक आणि अडाणी श्रोते टाळ्यांचा कडकडाट करीत असत. त्यामध्यें एकादादुसरा पांढरपेशा सुशिक्षित श्रोता उभा असला, तर अडाणी लोकांची टिळकावरची आंधळी भक्ति वघून त्याच्या डोळ्यांमध्यें अश्रू उभे राहात आणि पायांपासून डोक्यापर्यंत हर्षाचा थरारून कांटा उभा राही! हा अनुभव तिथें उभा राहून अनेक वेळां मीं घेतलेला आहे!

★

टिळकांच्या लेखनामुळें, भाषणामुळें आणि निरनिराळ्या राजकीय चळवळींमुळें महाराष्ट्रामध्यें त्यावेळीं अद्‌भुतरम्यतेचें एक विलक्षण वातावरण पसरलेलें होतें. हरि नारायण आपट्यांच्या ऐतिहासिक शिवकालीन कादंबऱ्या त्यावेळीं अतिशयच लोकप्रिय होत्या. त्या कादंबऱ्यांनीं अप्रत्यक्षपणें या अद्‌भुतरम्यतेमध्यें आणखीनच भर घालून ठेविली. गोविंद कवीच्या काव्यांनीं, सावरकरांच्या पोवाड्यांनीं, सन्मित्रसमाज मेळ्याच्या गाण्यांनीं आणि खाडिलकरांच्या पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांनीं महाराष्ट्रांतल्या या अद्‌भुतरम्य भावनेमध्यें इतकीं गुर्मी आणि मस्ती निर्माण करून ठेवली कीं, त्यावेळीं महाराष्ट्रामध्यें प्रत्येक जाणत्या आणि नेणत्या माणसाला आपण एकाद्या कादंबरीच्या किंवा नाटकाच्या सृष्टीमधूनच वावरतो आहोंत किंवा काय असें वाटत असे. रोज कोणातरी गोऱ्या अधिकाऱ्याचा कोठें तरी खून होत असे, कोणीतरी फांसावर जात असे किंवा तुरुंगात जात असे. असें कांहीं घडलें कीं डोकीं भडकून जात असत आणि रक्त उसळया मारूं लागे. 'बाँब' हीं काय वस्तु आहे हे त्यावेळींच प्रथम लोकांना कळलें. अमुकजण आमक्या ठिकाणीं 'बाँब' तयार करीत आहे, तमुकजणानें तमक्या ठिकाणीं पिस्तूल लपवून ठेवले आहे, फलाण्याच्या मागे 'सी. आय. डी.' चीं माणसें फिरताहेत अशा गोष्टी एकसारख्या त्यावेळीं कानावर येत. कोण गुप्त पोलिसांत आहे आणि कोण नाहीं हें त्यावेळीं कळणें अशक्य असल्यानें महाराष्ट्रांतल्या प्रत्येक माणसाच्या मनामध्यें एक गोड अस्वस्थता निर्माण झालेली होती. घरोघर जो तो दारें बंद करून देशांतल्या राजकीय चळवळीबद्दल कानगोष्टी करीत होता. रँडसाहेबाचा खून, चाफेकर बंधूंचा पराक्रम, खुन्या मुरलीधराजवळ साडेनवाच्या तोफेच्या धडाक्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थळ
क्रमांक ०४३९२ दिः ...
वर्ग ... वीः दि: ...

केलेला फितूर द्रविडाचा खून, नाशिक येथें भर थिएटरांत जॅक्सन साहेबांना गोळी घालणारा कान्हेरे आणि हिंदी क्रांतीची लाट विलायतेपर्यंत पोहोंचविणारे सावरकर यांच्याखेरीज बोलायला महाराष्ट्राला त्यावेळीं दुसरा विषयच नव्हता. या साहसाचा किंवा अत्याचाराचा आणि टिळकांचा वस्तुतः कांहींच संबंध नव्हता. तथापि, राष्ट्रांत त्यावेळीं उठलेल्या क्रांतिकारक तरुणांचें स्फूर्ति दैवत टिळकच आहेत, असें जनता मानीत होती. खरोखर त्यावेळीं महाराष्ट्रांत जन्माला येणें हें एक भाग्य होतें !



★

१९०८ सालीं टिळकांना सहा वर्षांची जेव्हां शिक्षा झाली तेव्हां ज्याला दुःखाचा जबर धक्का बसला नाहीं असा त्यावेळीं महाराष्ट्रांत एकहि माणूस नव्हता. टिळकांच्या या शिक्षेचें सुतक ज्यानें पाळलें नाहीं असें एकहि घर त्यावेळीं महाराष्ट्रांत नसेल. हरताळ पाळणें किंवा संप पुकारणें हें शास्त्र त्यावेळीं कोणालाही माहित नव्हते. विद्यार्थ्यांमध्यें त्यावेळीं कसलीहि संघटना नव्हती. तथापि, ज्या दिवशीं तो शिक्षा झाली त्या दिवशीं मुलें शाळेंत गेलीं नाहींत. विद्यार्थी कॉलेजांत गेले नाहींत. तेवढ्यासाठीं दुसऱ्या दिवशीं त्यांनी मास्तरांच्या छड्या खाल्ल्या. कांहींनीं तर आपल्या शाळाकॉलेजांमधून आपली कायमची हकालपट्टी करून घेतली. टिळकांच्या सहा वर्षाच्या शिक्षेच्या मुदतीमध्यें कोणी साखर खायची सोडली, कोणी चहा सोडला. कोणी अनवाणी पायांनीं चालावयाचे ठरविलें आणि जमिनीवर नुसती घोंगडी अंथरून तिच्यावर झोंपण्याची प्रतिज्ञा केली. टिळकांवर महाराष्ट्राचे जेवढें प्रेम होतें तेवढें अलिकडच्या काळामध्यें दुसऱ्या कोणत्यहि पुढाऱ्यावर महाराष्ट्रानें प्रेम केलेलें नाही. राम वनवासामध्यें गेल्यानंतर भरत ज्याप्रमाणें चौदा वर्षे त्याच्या पादुका पूजित होता, त्याप्रमाणें टिळक सहा वर्षे मंडालेच्या तुरुंगांत असतांना महाराष्ट्रानें टिळक भक्तीच्या पादुका अत्यंत भक्तिभावानें उराशीं ठेविल्या आणि जतन केल्या !

★

१७ जून १९१४ रोजीं ऐन मध्यरात्रीं सरकारनें टिळकांना पुण्यांत त्यांच्या गायकवाड वाड्यामध्यें आणून सोडलें. एकाद्या कादंबरीमध्यें किंवा एकाद्या नाट-

कांत घडावी, तशीच गोष्ट घडली. खरेंच मोठ्या माणसांचीं चरित्रें हीं एकाद्या थोर नाटककारानें लिहिलेल्या उत्कृष्ट नाटकाप्रमाणेंच आपोआप व्यवस्थितपणें घडलीं जातात असें ऑस्कर वाईल्डनें 'येशू ख्रिस्तांच्या' चरित्राबद्दल जें म्हटलें आहे तें शिवाजी महाराजांच्या आणि टिळकांच्या चरित्रालाहि लागूं पडतें. टिळक ज्या दिवशीं सुटून घरीं आले, त्यावेळीं मी पुण्यांतच होतो. तोपर्यंत टिळकांना आम्हीं प्रत्यक्ष असें पाहिलें नव्हतें, तेव्हां टिळकांचें समोरासमोर दर्शन घेणें आणि त्यांना डोळे भरून पहाणे हें पुण्यांतील त्यावेळच्या आम्हां विद्यार्थ्यांना एक वेडच लागून राहिलें होतें. गायकवाडवाड्यामध्यें प्रवेश करण्याची आमची छातीच नव्हती. वाड्याबाहेर गुप्त पोलिसांचा पहारा असतो, आंत जो कोणी जाईल त्याचें नांव ते टिपून घेतात, अशाहि बातम्या त्यावेळीं पुष्कळ पसरल्या होत्या. गायकवाड वाड्यावरून इकडून तिकडे उगाच फेऱ्या मारतांना आणि कुठें एकाद्या उघड्या खिडकीमधून टिळकांचा चेहरा आपल्या नजरेस पडेल कीं काय, अशा भावनेनें वर पहातांना त्यावेळीं मनांत अशा कांहीं गोड उकळ्या फुटत असत, तें कांहीं सांगतां येत नाही. त्यानंतर पुढच्या चार पांच वर्षांमध्यें टिळकांना आम्ही अनेक वेळां पाहिलें. जवळून पाहिलें. लांबून पाहिलें. अगदीं त्यांच्या शेजारीं बसून पाहिलें. (एकदां तर त्यांच्या उपरण्याचें एक टोंक क्षणभर मी स्वतः हातांत धरून देखील पाहिलें !) त्यांची अनेक व्याख्यानें ऐकलीं. त्यांच्या मिरवणुकींत सामील झालों. किंबहुना राजकीय कीर्तीच्या अगदीं कळसाला ते पोहोंचलें असतांना त्यांचे सारे वैभव आणि थाटमाट आम्हांला मनसोक्त पहावयाला मिळाला. टिळकांचे वक्तृत्व म्हणजे खरोखरच गर्जना होती. टिळक बोलत नसत; ते गर्जत असत. ते गडगडत असत. आवेशाच्या भरांत त्यांचे उघडझांप करणारे ते रागीट डोळे, त्यांच्या ओठावरच्या हालणाऱ्या त्या मिशा आणि भावना अनावर झाल्यामुळे त्यांचा तो थरथरणारा जबरदस्त जबडा बघून मला नेहमीं 'केसरी' वरच्या सिंहाची आठवण होई. टिळकांच्या चेहेऱ्यामध्यें आणि सिंहाच्या चेहेऱ्यामध्यें कांहींतरी साम्य असल्याचा भास अजूनहि मला होतो. टिळकांचें एक एक वाक्य कानीं पडलें म्हणजे काळजावर कोणीतरी घणाचे घाव घालते आहे असें वाटे ! दण-दण दण-दण ! ऐकणारा बसल्या जागेवर अगदीं हबकून जाई ! इकडून तिकडे

हलण्याचीसुद्धां त्याची छाती नसे. छे, छे, छे, महाराष्ट्राच्या सार्वजनीक जीवनांत एवढा जबरदस्त माणूस पुन्हा पहावयाला मिळावयाचा नाहीं!

★

इंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांना निरोप द्यावयाला पुण्याच्या मंडईंत जी प्रचंड सभा भरली होती ती मी पाहिलेली आहे. इंग्लंडहून परत आल्यानंतर पुण्याच्या रस्त्यामधून त्यांची जी थाटामाटांत मिरवणूक निघाली ती मी बघितली आहे. गोखले वारले तेव्हां त्यांच्या स्मशानयात्रेसाठीं मुद्दाम सिंहगडावरून येऊन ओंकारेश्वराच्या स्मशानामध्यें त्यांनीं केलेलें हृदयस्पर्शी भाषण मीं ऐकलेलें आहे. गायकवाडवाड्यांत त्यांच्या सत्काराचे अनेक निरनिराळे लहानमोठे प्रसंग मी दाटीवाटींत बसून अवलोकिलेले आहेत. आणि–शेवटीं–मुंबई येथें वीस सालच्या एक ऑगस्ट रोजीं रात्रौं पाऊण वाजतां सरदारगृहांत जेव्हां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें त्यावेळीं समोर खालीं रस्त्यावरच्या अंधारांत पावसांत भिजत असलेला जो हजारों लोकांचा निःस्तब्ध समुदाय उभा होता. त्यामध्यें मीहि एक होतों. आणि त्या पहांटेपासून तों त्या दिवशीं संध्याकाळीं साडेसहाच्या सुमारास चौपाटीच्या वाळवंटावर त्यांच्या देहाला अग्निसंस्कार मिळेपर्यंत मी त्यांच्यापासून फारसा दूर नव्हतों. टिळकांच्या विराट् स्मशानयात्रेमध्यें सारी मुंबई सामील झाली होती. डोक्यावर धो धो मुसळधार पाऊस पडत असतांना लक्षावधी लोक दुःखानें माना खालीं घालून उघड्या डोळ्यांनीं त्यांच्यामागून चालले होते. टिळकांची स्मशानयात्रा ज्यानें पाहिलेली आहे तो तें दृश्य जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. त्यांच्या स्मशानत्रेमध्यें चालण्याचें पुण्य ज्याच्या गांठीं पडलेलें आहे. त्याला तें पुण्य दहावीस वर्षे तरी खास उपयोगी पडलें!

★

ज्या दिवशीं लोकमान्य टिळक वारले त्याच दिवशीं रात्रीं मुंबई येथें महात्मा गांधी यांनीं असहकारितेची घोषणा केली. हा योगायोगहि विलक्षण नाट्यपूर्णच म्हटला पाहिजे. देशाच्या रंगभूमीवरून एक महान् विभूति पडद्याआड जावी आणि दुसऱ्या महान् विभूतीनें त्याच क्षणीं त्या रंगभूमीवर प्रवेश करावा तसें तें झालें. लोकमान्य टिळकांचें कार्य जेथें संपलें, तेथें महात्मा गांधीचें कार्य सुरू झालें

असें अच्युतराव कोल्हटकर जें म्हणत असत तें अगदीं खरें आहे. लोकमान्य टिळक जर आज हयात असते तर (ते नव्वद वर्षाचे असते ही गोष्ट विसरू नहि) आजच्या राजकारणांत त्यांनीं कोणती भूमिका घेतली असती हा वाद निर्माण करणें निरर्थक आहे. सबंध रामायण ऐकूनहि सीता ही रामाची कोण हें विचारणें जितकें मूर्खपणाचे आहे तितकेंच टिळकांचें सबंध चरित्र बघून आणि कर्तृत्व ऐकून आज ते राजकारणामध्यें कुठें असते हें विचारणेंहि मूर्खपणाचें आहे. टिळक आणि गांधी यांचा स्वभावधर्म एकमेकांपासून अगदीं निराळा होता. टिळक हे बुद्धिप्रधान तर गांधी हे भावनाप्रधान. टिळक हे कर्कश आणि कठोर तर्कपंडीत, तर गांधी हे श्रद्धेचे कान 'आंतल्या आवाजा' कडे देऊन बसलेले. ब्रिटिशांच्या न्यायावर आणि कायद्यावर टिळकांचा पूर्ण विश्वास, तर गांधींचा त्यांच्यावर यत्किंचितही विश्वास नाहीं. इंग्रजांशीं भांडून आणि झगडून जनतेनें आपले हक्क त्यांच्याकडून हिसकावून घेतले पाहिजेत हें टिळकांचें राजकारण, तर त्या सैतानी सरकारशी जनतेनें असहकार करून त्याला शरण आणलें पाहिजे हें गांधींचें राजकारण. 'शठं प्रति शाठ्यम्' या मार्गाचा राजकारणांत अवलंब केला पाहिजे असें टिळक म्हणत, तर 'सत्य आणि अहिंसा' यांजवरच राजकारणाचें अधिष्ठान असलें पाहिजे असें गांधी म्हणत. पण याचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं कसल्याहि असत्याच्या आणि हिंसेच्या साधनानें आपलें साध्य हस्तगत करणें हीं गोष्ट टिळकांना पसंत होती. दहशतवादी हिंसेचा मार्ग टिळकांना मुळींच पसंत नव्हता. आणि गांधीप्रमाणेंच टिळकांच्या राजकारणाचें अधिष्ठानहि शंभर टक्के सत्यावरच होतें.

★

टिळक आणि गांधी ह्यांच्या विचार करण्याच्या पद्धतींत आणि जीवन-विषयक तत्त्वज्ञानांत कितीहि मौलिक फरक असला तरी त्या दोघांच्या राजकारणामध्यें विरोधस्थळांपेक्षां साम्यस्थळेंच अधिक होतीं. काँग्रेस ह्या संस्थेबद्दल दोघांचीहि निष्ठा अढळ होती. हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्यासाठीं मुसलमानांना वाटेल त्या सवलती दिल्या पाहिजेत असें गांधीप्रमाणेंच टिळकांचेंहि मत होते. टिळकांचें स्वदेशीचें वेड गांधींच्या खादीइतकेंच जबरदस्त होतें. आणि मद्यपानबंदीबद्दल दोघांनाहि मनामधून विलक्षण निकड वाटत

होती. भगवद्गीतेकडे बघण्याचे दोघांचे दृष्टिकोण जरी भिन्न असले तरी दोघांचेंहि जीवन गीतेच्या तत्वज्ञानावरच आधारलेलें होतें. कमीजास्त फरकानें दोघांमध्यें एवढें सामर्थ्य असूनहि, **संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत ब्रिटिशांशीं एकसारखे झगडत रहावयाचें, कोणत्याहि कारणानें त्यांच्या आहारीं जाऊन किंवा त्यांचा मिंधेपणा पत्करून त्यांच्याशीं तडजोड करावयाची नाहीं, यामध्यें टिळक आणि गांधी ह्यांच्यांत विलक्षण एकवाक्यता होती.** मिळेल तें खिशांत टाकायचें आणि पुढच्यासाठीं भांडायचें, ही टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेची व्याख्या होती. याचा असा अर्थ नाहीं कीं, टिळकांना असहकार मान्य नव्हता. टिळकांचा 'बहिष्कार' आणि गांधींचा 'असहकार' यांच्यांत मूलतः कांहींच फरक नाहीं. सरकारवर 'बहिष्कार' घातल्यावांचून किंवा सरकारशीं कांहीं बाबतींत 'असहकार' केल्यावांचून जनतेच्या पदरांत कांहींहि पडणार नाहीं, हें टिळक ओळखून होते. पंचवीस वर्षे असहकाराची आणि कायदेभंगाची सतत चळवळ करून ब्रिटिश सरकारच्या या देशांतील राज्यकारभाराची चौकट काँग्रेसनें खिळखिळी करून टाकल्यानंतर आतां टिळकांच्या 'प्रतियोगी सहकारिते'चे तत्त्व तिनें उघडपणें स्वीकारलेलें आहे, यावरून आज टिळक असते तर ते काँग्रेसमध्येंच असतें आणि अगदीं गांधीजींच्या बरोबरच असते, ही गोष्ट उघड आहे. म्हणून टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या राजकारणाचे खरे वारसदार महात्मा गांधी आणि काँग्रेसच ठरतात.



टिळकांच्या मागें त्यांच्या गादीवर श्री. तात्यासाहेब केळकर बसले असें समजण्यांत येतें. कारण 'केसरी-मराठा' या संस्थेचीं सारीं सूत्रें, स्वराज्य मिळविण्यासाठी टिळकांनीं जमवून ठेवलेले सारे फंड आणि गायकवाड वाड्यांतील एकंदर सर्व कारभार त्यांच्यानंतर केळकरांच्या ताब्यांत गेला. टिळकांची 'कायदेशीर' आणि नैतिक वारसदारी केळकरांनीं गेली पंचवीस-सव्वीस वर्षे महाराष्ट्रामध्यें कशी चालविली हा इतिहास सर्वांना माहितच आहे. पुन्हा तो अप्रिय कथाभाग उगाळीत बसण्याचें कारण नाहीं. 'साहित्यसम्राट् केळकरां'-बद्दल मला स्वतःला आदर वाटतो. मराठी साहित्याची केळकरांनीं केलेली सेवा

अमर आहे असे माझें मत आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेचा, प्रतिभेचा, प्रसादाचा आणि व्यासंगाचा साहित्यसेवक आणखी शंभर वर्षे तरी या महाराष्ट्रामध्यें पुन्हां निर्माण होणार नाहीं असें मी निश्चयानें सांगतो. त्यांच्या लेखनाच्या आणि भाषणाच्या अनेक मेजवान्या अनेकदां आम्ही चाखलेल्या आहेत आणि आमच्या प्रतिभेला त्यांजवर पोसलेलेंहि पण आहे. इतका नितांत आदर त्यांच्या साहित्याबद्दल मनांत बाळगून त्यांच्या राजकीय जीवनावर आणि कर्तृत्वावर कठोर शब्दामध्यें वारंवार टीका करतांना माझ्या मनाला नेहमींच यातना होत असतात, पण त्याला कांहीं इलाज नाहीं. टिळकांच्या राजकारणाचा जबाबदार वारसा पत्करून त्याला असें केविलवाणें स्वरूप केळकरांनीं जर दिलें नसतें तर त्यांच्यावर टीका करण्याचा हा अप्रिय प्रसंग आमच्यावर कधींहि आला नसता !

★

केळकर हे साहित्यांत सम्राट् आणि राजकारणांत विदूषक आहेत. टिळकांच्या अंगचें धैर्य आणि बेडरपणा केळकरांत नाहीं. संकटाला टक्कर देण्याची आणि हालअपेष्टांचें हालाहल पचविण्याची केळकरांची छाती नाहीं. केळकर हे स्वभावतःचे भित्रे आहेत. त्यांचा 'सुवर्णमध्य' वाद आणि 'समेटवाद' हा त्यांनीं आपल्या भित्रेपणाला बाहेरून दिलेला तात्विक मुलामा आहे, 'हेंहि खरें आणि तेंहि खरें' असें केळकरांच्या तत्त्वज्ञानाला जे हास्यास्पद स्वरूप आज महाराष्ट्रांत प्राप्त झालें आहे, त्याचे कारण केळकरांचा हा भित्रेपणा होय ! टिळकांच्या विचाराची बैठक नेहमीं अढळ आणि ठाम असे. हा टिळकांचा गुण केळकरांनीं औषधापुरतादेखील उचललेला नाहीं. केळकराच्या ह्या भिडस्त आणि पोकळ स्वभावामुळें त्यांनीं स्वातंत्र्याच्या राजकारणामध्यें आपली विलक्षण कुतरओढ करून घेतली. गांधीच्या असहकारितेच्या लोंढ्यांत ते आरंभी फरपटत गेले. आणि मागाहून असहकारितेच्या पोरकट कुरापती काढावयाला त्यांनीं सुरवात केली. 'फेरवाल्या' बरोबर त्यांनीं फेर धरून पाहिला; पण कॉंग्रेसमध्यें त्यांचा जीव रमेना; कोणाशीहि त्यांचें पटेना आणि कॉंग्रेसच्या बाहेर पाऊल टाकण्याची त्यांची छातीहि होईना. एकोणतीस सालीं लखनौ येथें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यानंतर, एक कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत तरी रहा,

नाहीं तर मध्यवर्ति कायदेमंडळांत तरी रहा, असें पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यांना बजावलें, तेव्हां वर्किंग कमिटीचाच केळकरांनीं राजीनामा देऊन टाकला. तथापि, तीस सालचा कायदेभंग सुरू झाल्यावर त्यांचा जीव आंतबाहेर घोटाळूं लागला. तुरुंगांत जाण्याचा निश्चय करून ते सिमल्याहून पेंणला पळत पळत गेले आणि तेथें त्यांनीं कसलातरी कायदेभंग केला ! पण सरकारनें त्यांना पकडलें नाहीं. पुनः पुण्याला येऊन त्यांनीं मीठ तयार केलें आणि आक्षिप्त वाङ्मयहि वाचून दाखविलें. तरी देखील सरकार त्यांच्या मानगुटीवर हात ठेवीना ! तेव्हां मग निराश होऊन तुरुंगांत जाण्याचा त्यांनीं नाद सोडला. पुढें त्यांचा हा वकूब ओळखून दुसऱ्या राऊंड टेबल परिषेदला त्यांना सरकारनेंच आमंत्रण दिलें; तेव्हां कॉंग्रेसच्या नांवानें आंघोळ करून आणि हिंदुसभेचें प्रतिनिधित्व राजरोसपणें पत्करून ते विलायेतेला गेले. तेव्हांपासून राजकारणामधून ते जवळ जवळ उठल्यासारखेच झाले ! सार्वजनिक आयुष्याचा संन्यास घेण्याचें केळकरांनी अनेक वेळां सोंग केलें. पण राजकारणांतल्या पराभवाची खवखव एकसारखी त्यांच्या मनाला आंतून डांचत असल्यामुळें ते अनेक वेळां आपलें सोंग झुगारून देऊन मूळ स्वरूपांत प्रकट होत असत.



भित्रेपणाच्या जोडीला केळकरांच्या अंगांत मत्सर आणि खुनशीपणा हे दोन अत्यंत वाईट दुर्गुण आहेत. टिळकांच्या मृत्यूनंतर गांधींच्या आणि केळकरांच्या राजकीय जीवनाला बरोबरच सुरवात झाली. पण पंचवीस वर्षांत गांधी हे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कळसावर चढून बसले आहेत, तर केळकर हे होते तेथेंच, म्हणजे गायकवाड्यांतच, अद्यापि घोटाळताहेत. केळकरांना महात्मा गांधींचें अत्यंत वैषम्य वाटतें. महात्माजींची निंदा करण्याची एकहि संधि केळकरांनीं आतांपर्यंत घालविली नाहीं. एवढेंच नव्हे तर राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी यांच्या स्मारकनिधीला महाराष्ट्रानें पैचीहि मदत करूं नये असें पत्रहि प्रसिद्ध करून केळकरांनीं आपल्या गांधीद्वेषाची आणि क्षुद्र स्वभावाची अगदीं पराकाष्ठा करून दाखविली. वैयक्तिक गांधीद्वेषाचा आणि कॉंग्रेस निंदेचा घाणेरडा वारसा हिंदुमहासभेला केळकरांनींच देऊन ठेवलेला आहे. सदतीस सालापासून सावरकरांना हातीं धरून व त्यांना पुढें करून त्यांच्या हातून गांधींना आणि कॉंग्रेसला ठेच-

ण्याचा खुनशी प्रयत्न केळकरांनीं पुनः एकदां जोरानें करून पाहिला. 'केसरी' पत्रानें सारे बळ वेठीला लावून हिंदुमहासभेचा एकखांबी सावरकरी तंबू पुन्हा महाराष्ट्रांत उभा करण्याची केळकरांनीं अगदीं कोशिस करून पाहिली. पण परवांच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीमध्यें हिंदुसभेचा हा पोकळ डोलारा सपशेल कोसळून पडला आणि कायमचा धुळीला मिळाला. देशाच्या राजकारणांत आज हिंदुमहासभेला मरावें लागलेलें हें शोचनीय मरण केळकरांना डोळ्यांनीं पहावयाला मिळालें, ही फार उत्तम गोष्ट झाली. केळकरांना ही त्यांच्या आयुष्यांत चांगलीच अद्दल घडली. हिंदुसभेला देशाच्या राजकारणांत जें वैधव्य प्राप्त झालें आहे आणि कायदेमंडळाच्या निवडणुकींत तिचें जें वपन झालेलें आहे त्याला केवळ केळकरांचा काँग्रेस द्वेषच जबाबदार आहे.

★

तपस्वी बाबासाहेब परांजपे विनोदानें म्हणत असत कीं, केळकर हे लोकमान्य टिळकांची विधवा होत! टिळकांची मालमत्ता आणि इस्टेट फक्त त्यांच्यामागें त्यांनीं संभाळली. दुसरें कांहीं केलें नाहीं! केळकरांचें हें वर्णन अगदीं यथायोग्य आहे. केळकरांनीं टिळकांचा छापखाना संभाळला असेल, त्यांचा वाडा संभाळला असेल, त्यांचे फंडहि कदाचित् संभाळले असतील, आणि 'केसरी' पत्राचा खपहि संभाळला असेल! पण ह्याच्या पलीकडे केळकरांनीं टिळकांचें कांहींएक संभाळलें नाही! 'केसरी' पत्राला हिंदुमहासभेचें मुखपत्र बनवून टिळकांच्या राजकारणाचा त्यांनीं 'गृह्यसंस्कार' लिहिला! देशाच्या स्वातंत्र्यासाठीं दर मंगळवारीं गर्जना करणाऱ्या टिळकांच्या बंडखोर 'केसरी'च्या जबड्याभोंवतीं हिंदुमहासभेचे जाळीदार मुकटे आणि कुबट धाबळ्या गुंडाळून त्यांनीं या टिळकांच्या सिंहाला सदाशिव पेठेंतल्या एकाद्या लुकड्या ग्रामसिंहाची कळा आणून दिली. महात्मा गांधींच्या आणि काँग्रेसच्या क्रांतिकारक राजकारणाला, तात्या सावरकर आणि तात्या करंदीकर यांना हातीं धरून, या तात्या केळकरांनीं विरोध केला. एवंच, लोकमान्यांच्या राजकारणाची या तीन तात्यांनीं करकचून ताटी आवळली. तथापि, त्या कामांत त्यांना यश आलें नाहीं! टिळकांचें राजकारण देशामध्यें महात्मा गांधींनीं आणि काँग्रेसनें जिवंत ठेवलें, स्वातंत्र्याच्या इतिहासांत लोकमान्यांचें कर्तृत्व अमर आहे. म्हणून एक ऑगस्ट एकोणिसशें शेहेचाळीस रोजीं सारा हिंदुस्थान देश लोकमान्य टिळकांच्या नांवाचा एकमुखानें जयजयकार करील! बोला, 'लोकमान्य टिळक महाराजकी जय!

'कमला' काव्याचा कलावंत गेला! : : ६

'बी' या अद्‌भुतरम्य नांवानें गेलीं तीस बत्तीस वर्षें मराठी कवितेच्या रसिकांना सुपरिचित असलेले महाराष्ट्राचे एक अत्यंत प्रतिभाशाली कवि श्री. नारायण मुरलीधर गुप्ते हे शुक्रवार दि. २९ ऑगस्ट रोजीं दिवंगत झाले, हें कळविण्यास आम्हांला अत्यंत दुःख होत आहे. रे. टिळक, तांबे, चंद्रशेखर, लेंभे, गोविंदाग्रज, रेंदाळकर, नागेश आणि बालकवि ठोमरे ह्यांच्या काळांतील 'बी' हे नामांकित कवि होते. आजच्या काळांतहि नव्या दमाचे आणि उज्जल प्रतिभेचें अनेक नवनवीन तरुण कवि उदयाला आलेले असले, तरी 'बी' कविच्या तोलाचा आणि दर्जाचा त्यामध्यें एकहि कवि आढळणार नाहीं हें सत्य आहे. 'बी', कवींच्या निधनानें मराठी कवितेचे फारच मोठें नुकसान झालेलें आहे यांत मुळींच शंका नाहीं. 'बी' कवींना ओळखणारी अशी माणसें महाराष्ट्रांत फारच थोडीं निघतील. सार्वजनिक जीवनामध्यें त्यांनीं कधींहि भाग घेतला नाहीं. स्वतःच्या काव्याला किंवा नांवाला चारचौघांत प्रसिद्धि मिळावी अशी त्यांनीं कधींहि हांव धरली नाहीं. त्यांचा सारा जन्म लहान सहान गांवांत सरकारी नोकरी करण्यांत गेला. कोणत्याहि कवींच्या मेळाव्यांत किंवा साहित्यसंमेलनांत त्यांनीं कधीं भाग घेतलेला नाहीं. आपल्या मधुर गुंजारवानें त्यांनीं महाराष्ट्राला जेव्हां वेडें केलें तेव्हां देखील आपल्या नांवनिशीचा किंवा ठावठिकाणाचा त्यांनीं कोणाला पत्ता लागूं दिला नाहीं. आजहि 'बी' कवींना जे ओळखतात त्यांना त्यांचें संपूर्ण नांव काय आहे हें देखील सांगतां येणार नाहीं. आपलें लौकिक अस्तित्व जगापासून इतक्या कटाक्षानें लपवून ठेवणारा 'बी' एवढा महान् कवि महाराष्ट्रामध्यें आजपर्यंत दुसरा कोणीहि होऊन गेला नाहीं. गोविंदाग्रजांना भेटण्यासाठीं एकदा ते आपण होऊन पुण्याला आले होते एवढीच त्यांच्या प्रकटीकरणाची एक गोष्ट

मला माहित आहे. मरणासमयीं त्यांचें वय शहात्तर वर्षांचें होतें. गेलीं सात आठ वर्षे ते मध्यप्रांतांत छिंदवाडा येथें आपल्या जांवयाच्या घरांत राहात असत. आयुष्याच्या अखेरी अखेरीस ते अतिशय थकलेले होते. त्यांना डोळ्यांनीं नीट दिसत नव्हतें. तथापि, अशा अवस्थेतहि त्यांची काव्यप्रतिभा त्यांना सोडून गेली नव्हती. दगडी पाटीवर मोठ्या मोठ्या अक्षरांमध्यें आपल्या लहान नातवांकडून ते आपल्या कविता लिहवून घेत. अगदीं गेल्या मे महिन्या-पर्यंत त्यांचें हें काव्यलेखन चालू होतें. त्यांनीं अलिकडे लिहिलेल्या कांहीं कविता 'युगकाणी' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या पुष्कळांनीं वाचल्याहि असतील.

★

मराठी काव्याच्या प्रांगणांत 'बी' कवीनीं 'वेडगाणें' ही कविता लिहून पदार्पण केलें. त्याची आठवण अजूनहि माझ्या मनांत जागी आहे. 'बी' हें इंग्रजी नांव धारण करून मराठी कविता लिहिणारा हा कवि कोण आहे याबद्दल रसिकांना जेवढें आश्चर्य आणि कौतुक वाटलें, त्यापेक्षांहि त्यांनीं लिहिलेली ही पहिलीच हृदयंगम कविता वाचून त्यांचीं अंतःकरणें अधिक हर्षित झालीं. क्षितिजावर उगवल्यावरोबरच एकाद्या तेजाळ ताऱ्यानें आपल्या किरणांनीं लोकांचीं मनें आकर्षून घ्यावींत, तसें 'बी' कवींनीं आपल्या पहिल्याच गुंजनानें लोकांचीं मनें आणि समकालिन कवींचें लक्ष आपल्याकडे एकदम वेधून घेतलें. रे. टिळकांसारखा कविश्रेष्ठ तर 'बी' कवींवर इतका खूष होऊन गेला कीं त्यानें 'बी' कवींना उद्देशून एक अतिशय सुंदर कविता लिहिली. 'बी' कवींच्या बहुतेक सर्व कविता त्यावेळच्या मासिक 'मनोरंजन' मध्यें प्रसिद्ध झाल्या. संख्येच्या मानानें आणि इतर कवींच्या तुलनेनें त्यांच्या कविता अतिशय थोड्या आहेत. ते फारच थोडें लिहित. पण जें लिहित त्यांतील अक्षरन्‌अक्षर शब्दन् शब्द बावनकशी सोनें असे. 'बी' कवि जेव्हां कविता प्रसिद्ध करूं लागले, तो मराठी कवितेच्या ऐन बहारीचा काळ होता. गोविंदाग्रज, ठोमरे, रेंदाळकर, तांबे आणि नागेश यांच्या एकाहिपेक्षां एक सुंदर कविता त्यावेळीं प्रसिद्ध होऊं लागल्या होत्या. गोविंदाग्रजांच्या आणि बालकवि ठोमऱ्यांच्या कवितांनीं तर रसिकांना वेडच लावलें होतें. अशा बिकट चढाओढीच्या कालामध्यें एकाद्या नव्या कवीनें प्रकट होऊन वाचकांच्या मनावर आपली स्वतंत्र छाप बसवणें हें

अतिशय कठिण होतें. पण तें अवघड काम 'बी' कवींनीं सहज लीलेनें करून दाखवलें. तसे 'बी' कवि आपल्या समकालिनांपेक्षां त्यावेळीं वयानें कांहीं लहान नव्हते. गडकऱ्यांपेक्षां तेराचौदा वर्षांनीं ते मोठे होते. त्यांचा व्यासंग आणि चिंतन दुसऱ्या कोणत्याहि कवीपेक्षां कमी नव्हतें. मराठी भाषेवर तर 'बी' कवींचें विलक्षण प्रभुत्व होतें. 'बी' कवीइतकी सोपी, सुंदर आणि सोज्वळ मराठी भाषा त्यांच्या पिढींतल्या तुल्यबळ समकालिनांना देखील साधली नाहीं. गडकऱ्यांच्या लिखाणांतला कृत्रिम नटवेपणा 'बी' कवींच्या काव्यांत आढळून येत नाहीं. चंद्रशेखर आणि लेंभे यांची संस्कृतप्रचुरता 'बी' मध्यें सांपडणार नाहीं. 'बी' कवींची कविता अस्सल मराठी ढंगाची आणि वळणाची होती. तांबे आणि बालकवी यांचें काव्य सोपें आणि सुबोध होतें हें खरें. पण 'बी' च्या कवितेचा अभिजात डौल त्यांच्या काव्यांत दिसून येत नाहीं. 'बी' कवींच्या शैलीला परंपरा आहे. जुन्या मराठी संत कवींच्या अभंगाद्याव्यायाचा आणि जातिवंत शाहीरांच्या लावण्यांचा व पोवाड्यांचा मार्मिक अभ्यास करून 'बी' कवींनीं आपली शब्दसंपदा कमावलेली होती. त्यांच्या कवितेमधली कोणतीहि एकादी ओळ जर घेतली तरी तिच्यांत असामान्य कलावंतांची सहजता आणि प्रभुत्व आढळून आल्यावांचून रहात नाहीं.



मराठी काव्यामधें 'बी' कवींचें स्थान अवघ्या दोनच कवितांनीं अढळ केलेलें आहे. या दोन कविता म्हणजे 'चांफा' आणि 'कमला'. 'चांफा बोलेना, चांफा हालेना, चांफा खंत करी, कांहीं केल्या फुलेना,' या अविस्मरणीय ओळींनीं सुरू झालेली 'बी' कवींची 'चांफा' ही कविता म्हणजे मराठी काव्याचें एक अमर भूषण आहे. 'बी' च्या 'कमलें' ला तर मराठी भाषेमध्यें दुसरी तोडच नाहीं. ज्यांना 'बी' कवीच्या प्रतिभेचें सामर्थ्य समजावून घ्यावयाचें असेल त्यांनीं त्यांची ही एकच कविता वाचावी आणि वाचून तोंडपाठ करावी. मी स्वतः गेलीं तीस वर्षे 'बी' कवींची ही 'कमला' कविता स्वतःशीं गुणगुणतों आहें. तरी देखील माझ्या मनावरची तिची मोहिनी अजून एवढीशी सुद्धां कमी झालेली नाहीं. 'कमला' काव्य हा कवींच्या प्रतिभेचा एक महान् चमत्कार आहे. अशा कविता प्रत्येक वाङ्मयामध्यें फारच थोड्या जन्माला येतात. जे कवि या

अद्भुत कविता लिहितात, त्यांना पुन्हा तशा कविता क्वचित्च लिहितां येतात. प्रतिभेच्या एका विशिष्ट समाधीच्या अवस्थेमध्यें अशा कवितांचा जन्म होतो. 'बी' कवि हे स्वभावतः चिंतनपर कवि होते. त्यांची बहुतेक कविता ही तात्विक आहे. काव्यामध्यें एकादी भावनापूर्ण गोष्ट सांगणें हा त्यांच्या प्रतिभेचा सहजस्वभाव नव्हे. असें असतां 'कमला' सारखी करुण रसानें ओथंबलेली कथात्मक कविता इतक्या उत्कृष्टपणें त्यांना कशी लिहितां आली ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें ! साखरेचा कणन् कण जसा गोड असतो किंवा अमृताचा थेंबन् थेंब जसा मधुर असतो तशी 'कमला' काव्यांतली ओळन् ओळ, शब्दन् शब्द आणि अक्षरन् अक्षर अवीट माधुर्यानें रसरसलेलें आहे. त्या काव्याची रचना इतकी घोंसदार आणि चिरेबंदी आहे कीं, त्यामध्यें एक अक्षर इकडचें तिकडे फिरवतां येणार नाहीं. थोरातांच्या 'पाक' कुळांत जन्माला आलेली 'कमला' संभाजीची 'राख' होण्यापेक्षां मृत्यूच्या गळ्यांत माळ घालणें कसें पत्करते, हें एका बाणेदार मराठा मुलीचें तेजस्वी चित्र 'बी' कवींनीं आपल्या ओजस्वी लेखणीनें या कवितेंत रंगविलेलें आहे. ही कविता ज्यावेळीं प्रसिद्ध झाली त्यावेळीं तिच्या तेजानें साऱ्या महाराष्ट्राचे डोळे अक्षरशः दिपले. आणि अद्यापहि ही कविता जो कोणी वाचील तो तिच्या प्रभावानें स्तिमित झाल्यावांचून रहाणार नाहीं ! एकेका मराठी कवीची एकेकच प्रतिनिधिक कविता निवडावयाचें ठरवल्यास गोविंदाग्रजांची 'राजहंस' किंवा बालकवींची 'फुलराणी' यांच्याबरोबर 'बी' कवींच्या 'कमले'चाहि अवश्य अंतर्भाव करावा लागेल.



'बी' कवींची सर्वच कविता सोज्वळ असली तरी ती सोपी नाहीं. त्यांचें काव्य रुक्ष किंवा क्लिष्ट असें कुठेंच नाहीं. तथापि तें कळावयास कुठें कुठें अवघड आहे ह्यांत मुळींच शंका नाहीं. याचें कारण 'बी' कवि हे तत्त्वज्ञानी कवि होते. त्यांचा योगविद्येचा आणि अध्यात्माचा अभ्यास मोठा होता. तसें त्यांचें सर्वच आयुष्य ईश्वरचिंतनांत आणि योगाभ्यासांत गेलें. साधुपुरुषांचा त्यांच्या घराण्यावर आशीर्वादच होता असें म्हटलें तरी चालेल. त्यांचे धाकटे बंधु जन्मापासून दोन्ही पायांनीं पूर्णपणें पांगळे असूनहि योगविद्येंत त्यांनीं अलौकिक सामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें. श्री गजानन महाराज म्हणून ते पुष्कळच प्रसिद्ध होते.

गेल्याच वर्षी नाशिक येथें ते ब्रह्मीभूत झाले. गजानन महाराजांना योगाभ्यासाची पुष्कळशी स्फूर्ति 'बी' कवींकडून मिळाली. यावरून या क्षेत्रांत 'बी' कवींनी केवढें सामर्थ्य प्राप्त करून ठेवले असावें याची थोडीशीं कल्पना येतें. यामुळेंच अध्यात्मविद्येतलीं पुष्कळशीं रूपकें आणि भाषासंकेत त्यांच्या कवितेमध्यें आढळून येतात. तथापि इतकें असूनहि 'बीं'च्या विचारांत कोठेंहि जुनाटपणा किंवा प्रतिगामित्व आढळून येत नाहीं. 'बी' हे वृत्तीनें उत्क्रांतिवादी होते. समाजविघातक रूढींचा आणि संस्थांचा नायनाट होऊन जनता सामर्थ्यवान् व्हावयाला पाहिजे असें त्यांना मनापासून वाटत होतें. या दृष्टीनें पहातां विचारांचें हें आधुनिकत्व रे. टिळक यांच्याखेरीज त्यावेळच्या इतर कोणत्याहि कवींत आढळून येत नाहीं. जुन्या पिढींत जन्माला आलेला मनुष्य विचारानें आणि वृत्तीनें इतका आधुनिक कसा, याचें आम्हाला पुष्कळ वेळां नवल वाटतें. इतकीं वर्षें झालीं तरी 'बी' कवींच्या काव्याचा उजाळा व लकाकी आहे तशींच अजून कायम आहे. 'बीं'च्या काव्याचें हें वैशिष्ट्य फारच थोड्या आधुनिक मराठी कवींमध्यें आढळून येईल. खरोखर मराठी काव्यसृष्टींत 'बी' कवींचें स्थान अगदीं अढळ आणि अमर आहे.

★

व्यक्तिशः माझा आणि 'बी' कवींचा आयुष्यांत संबंध येणें हा मी अद्भुत योगायोग समजतों. दहा वर्षांपूर्वी 'फुलांची ओंजळ' हा त्यांचा काव्यसंग्रह-प्रसिद्ध करण्याचें जेव्हां त्यांच्या मित्रांनीं ठरविलें तेव्हां त्या संग्रहाला प्रस्तावना देण्यासाठीं त्यांना माझें नांव कां सुचलें हें मला ठाऊक नाहीं. 'बी'सारख्या महान् कविश्रेष्ठाच्या कविता-संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याला आपल्याला अधिकार आहे असें मला चुकूनहि कधीं वाटलें नाहीं. मला त्यांच्या काव्याविषयीं किती आदर वाटत होता हें शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं. माझे गुरु जे गडकरी ते 'बी' कवींना जवळ जवळ गुरूप्रमाणें मानीत. या हिशेवानें 'बी' कवि मला परात्पर गुरूच्याच ठिकाणीं होते. त्यांच्या काव्याला प्रस्तावना लिहिणें म्हणजे मंदिराच्या पवित्र पायरीला पाय लावण्याइतकेंच पातक आहे अशी माझी प्रामाणिक समजूत होती. या भावनेनें एकसारखा सहा महिनेपर्यंत मी त्या प्रकाशकांना नकार देत होतों. पण माझ्या नकाराच्या हेक्यामुळें त्यांच्या आग्रहाचें दडपण

अधिकच वाढत गेले. ते म्हणाले, "तुमची प्रस्तावना मिळेपर्यंत आम्ही हें पुस्तक प्रसिद्ध करणार नाहीं." एवढें त्यांनीं म्हटल्यानंतर मग या पवित्र जबाबदारीचा पत्करू न घेणें हा शुद्ध उन्मत्तपणा होता. प्रस्तावना लिहिण्याचें काम तर मी स्वीकारलें, पण तें माझ्या हातून पुरें कसें होणार याची मात्र मला फार चिंता पडली. 'बीं' कवींची कविता मी वाचली होती. मला ती अतिशय आवडत होती. पण तिच्यांतली सर्वच स्थळें मला कळत होतीं असें मात्र मुळींच नव्हतें. 'बी' च्या काव्याचें हें एक वैशिष्ट्य आहें. तें कळत नसलें तरी आपल्याला वेड लावतें. सृष्टीमधल्या पुष्कळशा सौंदर्याचें रहस्य समजलें नाहीं तरी जसें मनाला मोहित करतें तसें 'बी' च्या काव्याचें आहे. 'चांफा' ही त्यांची एकच कविता घ्या. या कवितेचा सर्व अर्थ लक्षांत आला नसतांहि महाराष्ट्र तिजवर बेहद्द खूष झालेला होता. पण प्रस्तावनाकाराचें कार्य हें केवळ रसग्रहणाचें कार्य नव्हे. कोणत्या काव्यामध्यें काय गोडी आहे आणि ती कशी उत्पन्न झालीं याचें कलात्मक आणि रसपूर्ण विश्लेषण जर त्याला करतां आलें तरच तो खरा प्रस्तावनाकार ठरतो. या दृष्टीनें जवळ जवळ दोन महिने 'बी' कवींशी माझा पत्रव्यवहार चालूं होता. दर पत्रांत मी त्यांच्या काव्याबद्दल अनेक प्रश्न आणि शंका विचाराव्यात आणि त्याला पानेंच्या पानें विस्तृत उत्तरें 'बी' कवींनी मला द्यावींत. अशा रीतीनें 'बी' कवींकडूनच मी त्यांची सारी कविता समजावून घेतली. त्यांची कविता आपल्याला समजली असें मला ज्या क्षणीं वाटलें त्या क्षणापासून मी प्रस्तावना लिहिण्याचें काम सुरू केलें. एवढी मोठी प्रदीर्घ प्रस्तावना मी आयुष्यांत दुसऱ्या कुठल्याहि पुस्तकाला लिहिलेली नाहीं. ही माझी प्रस्तावना फारच चांगली वठली आहे असें लोक म्हणतात. हें जर खरें असेल तर त्यांचे श्रेय 'बी' कवींना आणि त्यांच्या महान् काव्यालाच द्यायला पाहिजे. स्फूर्तीचा विषय अलौकिक असला म्हणजे सामान्य माणसाच्या हातूनहि कधीं कधीं असामान्य गोष्टी घडतात !



यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे एकोणचाळीस सालीं मी जेव्हां नागपूर येथें गेलों तेव्हां 'बी' कवींची आणि माझी आयुष्यांत पहिल्यानें भेट झाली. माझे मित्र कविवर्य 'अनिल' यांना घेऊन मी त्यांच्या दर्शनास गेलों. त्यावेळीं ते

पुष्कळच वृद्ध दिसत होते. पण थकलेले नव्हते. जवळ जवळ तास दोन तास मी त्यांच्या संगतीत होतों. आम्हीं सर्वांनीं एका फोटोग्राफरकडे जाऊन एकत्र फोटोहि पण काढून घेतला. 'बी' कवि माझ्याशीं पुष्कळच बोलले. तथापि त्यांचा स्वभाव फारसा बोलका असावा असें मात्र मला वाटलें नाहीं. केवळ मुद्यापुरतेंच ते बोलत. मात्र ते जें बोलत तें अतिशय चिंतनीय असे. त्यानंतर 'बी' कवींचा आणि माझा त्यापुढें प्रत्यक्ष संबंध असा जरी आला नाहीं, तरी 'बी' कवींच्या काव्यसंग्रहाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेमुळेंच त्यांचे धाकटे बंधु श्री. गजानन महाराज यांचा आणि माझा विलक्षण ऋणानुबंध जडला. गजानन महाराज हे फारच थोर अधिकाराचे योगी पुरुष होते. पण केवळ त्यांच्या थोरल्या भावाच्या काव्याला मी प्रस्तावना लिहिली म्हणून ते खूष होऊन ते थोरल्या भावाप्रमाणेंच मला 'दादा' म्हणून हांक मारूं लागले. एकदां तर 'या दादासाहेब' असें म्हणून त्यांनीं जेव्हां माझ्या पायावर डोकें ठेवण्याचा प्रयत्न केला तेव्हां लाजेनें मला मेल्याहून मेल्यासारखें झालें. 'बी' कवि आणि गजानन महाराज या दोघां भावांचें पाठोपाठ अवसान व्हावे यामुळें व्यक्तिशः मला कितो दुःख होतें आहे हें शब्दांनीं सांगणें कठिण आहे. 'बी' कवींच्या एकापेक्षां एक सरस कविता मासिक 'मनोरंजनां' त जेव्हां प्रसिद्ध होत होत्या, तेव्हां त्याजवर ज्या हर्षानें आणि उन्मादानें आम्ही तरुण वाचक तुटून पडत होतों, तें स्मरण अद्यापि माझ्या हृदयांत ताजें आहे. त्या दिव्य आनंदाची पुन्हां आठवण करून महाराष्ट्राच्या ह्या प्रतिभाशाली, कलावंत आणि तत्त्वज्ञानी कवीला आम्ही शेवटचें वंदन करतों.

तिकडून स्वातंत्र्य आणायचं झालं ! : : ७

परवां मी पुण्याला गेलों होतों. तेथें मला एक मौजेची गोष्ट कळाली. पंधरा ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाचा उत्सव मोठ्या थाटामाटानें पार पाडल्यानंतर त्या दिवशीं रात्रीं काँग्रेस हाऊसमधले एक पदाधिकारी कृतकृत्य होऊन घरीं गेल्यावर आपल्या बायकोच्या पाठीवर थाप मारून मोठ्यानें हंसून म्हणाले, "काय ग, शेवटीं आणलें कीं नाहीं आम्ही स्वातंत्र्य ! शंभर वर्षांत जें कुणाला मिळालें नाहीं तें आम्हीं मिळविलं कीं नाहीं ! आणि हें सारें रक्ताचा थेंब सांडल्यावांचून बरें का ! कसा त्या माऊंटबॅटनला आम्ही चपराशी नेमला !" भोळी बिचारी बायको. तिला वाटलें कीं हें जें सारें झालें तें केवळ आपल्या नवऱ्यामुळेंच ! आणि पंधरा ऑगस्ट रोजीं गांवभर जो प्रचंड उत्सव झाला तो केवळ आपल्या नवऱ्याच्याच पराक्रमाचा. तिला आपल्या नवऱ्याला त्या रात्रीं कुठें ठेवूं अन् कुठें नको ठेवूं असें होऊन गेलें. माऊंटबॅटनला चपराशी नेमलें हें नवऱ्याच्या तोंडचे शब्द ऐकून तर तिला वाटलें कीं त्याला उद्यांपासून आपल्याच घरीं कामाला ठेवलेंय. त्या आनंदाच्या भरांत ती पाय तणावून त्या रात्रीं खुशाल झोपीं गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती लौकर कांहीं उठलीच नाहीं. नवऱ्याला चहाची तल्लफ आली. त्यानें तिला हलवून जागी केली. आणि तो तिच्यावर नेहमीप्रमाणें ओरडून म्हणाला, "ए, अग, चहा करतेस कीं नाहीं ?" तेव्हां बायको म्हणाली, "एवढी जिवापाड मेहेनत करून रक्ताचा थेंब न सांडतां इकडून काल स्वातंत्र्य मिळवायचं झालं अन् पुनः सकाळीं उठून चहा म्हणे मीच करायचा ! माझं अडलंय खेटर. तो तुमचा मांटूब्याटूं कोण चपराशी नेमलाय तुम्ही असं म्हणालांत ना काल ? त्यालाच सांगा इथें येऊन चहा करायला." देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचा लगेच दुसऱ्या दिवशीं आपल्या घरामध्यें असा

परिणाम होईल अशी या काँग्रेसवाल्या नवऱ्याला मुळींच कल्पना नव्हती. तो मुकाट्यानें आपला उठला आणि वेडेवांकडें तोंड करून स्टोव्ह पेटवूं लागला. दिवसभर ती बायको आपली अंथरुणावर पडून राहिली. तो पाणी भरीना, दळण दळीना, रेशनचें धान्य आणण्यासाठीं पिशवी घेऊन बाहेर जाईना, घरांत स्वयंपाक करीना, किंवा मुलांनाहि संभाळी ना. नवऱ्यानें तिला कांहीं करावयाला सांगितलें कीं, " तो तुमचा मांटूब्यांटू केव्हां येणार ? त्याला हें काम करायला सांगा ! मी नाहीं माझ्या जागेवरून हलणार ! " असें तो नाक उडवीत मोठ्या तोऱ्यानें त्याला सांगे. दुपारीं शेजारणी नेहमीप्रमाणें तिच्याशीं गप्पा मारायला आल्या, तर तीं फुरंगटून बसली. त्यांच्याशीं एक अक्षरही बोलेना. शेजारणींना तें अतिशय चमत्कारिक वाटलें. त्या शेवटीं कंटाळून म्हणाल्या, " असें हो काय करतां. गंगाबाई ! आज तुम्हांला असें मुलखावेगळें झालंय तरी काय ? "

तेव्हां शेवटीं गंगाबाई आपल्या नाकांत हजार रुपयांची नथ आहे अशा भावनेनें ते वर उडवीत चेहरा ओवाळून एकच वाक्य म्हणाल्या, " इकडून काल एवढें मोठें स्वातंत्र्य आणायचं झालं, अन् तुम्हांला माझ्याशीं इथें येऊन बरोबरीच्या नात्यानें बोलायला लाजा नाहीं वाटत ? चला मेल्यानों इथून ! "

स्वातंत्र्याच्या येण्याचा आणि गंगाबाईच्या यजमानांचा काय संबंध आहे हें कांहीं त्या बायांना कळेना. त्यांच्यामध्यें उमाबाई नांवाची एक बाई होती. तिचाहि नवरा काँग्रेस हाऊसमध्यें कारकून का फारकून होता. गंगाबाईचा नवरा एकटा स्वातंत्र्य घेऊन आला हे शब्द तिच्या अगदीं जिव्हारीं झोंबले. ती एकदम उसळून म्हणाली, " तर तर ! म्हणे तुमच्या नवऱ्यानें काल स्वातंत्र्य आणलं. बोलायला कांहीं वाटतंय का ? गेले आठ दिवस आमच्या इथें अगदीं डोळ्याला डोळा नाहीं. त्यांच्यामुळें मलाहि पण झोपा नाहींत. सारें काँग्रेस हाऊस आमच्या इकडनं रंगवून घेतलें. आहे ठाऊक ? आतां कसं दिसतंय तें झक ! पूर्वी तुमच्या ह्यांनीं त्याची नुसती मशीद करून टाकली होती, मशीद ! तुमचे यजमान त्यावेळीं खुर्चीवर बसले होते पाय ताणून हुकूम सोडीत. त्यांना काय बोलायला होतंय ! स्वातंत्र्याचीं सारीं कामें करावीं लागलीं आमच्या ह्यांना ! परवा दोन दिवस साऱ्या काँग्रेस हाऊसवर झेंडे लावायचे काम कोणी केलें ? आमच्या ह्यांनीं !

तुमच्या यजमानांनीं एक तरी झेंडा बांधला आहे का! आणि इतकेंहि करून म्हणे तुमच्याच यजमानांनीं स्वातंत्र्य आणलें! उचलली जीभ अन् लावली आपली टाळ्याला!"

आपल्या नवऱ्याच्या हाताखालीं काम करणाऱ्या एका यःकश्चित् कारकूनाच्या बायकोनें आपल्या यजमानाचें स्वातंत्र्य आणल्याचें श्रेय हिरावून घ्यावें हें बघून गंगाबाई भयंकरच संतापल्या.

त्या दांत ओठ खात म्हणाल्या, "हो, हो, स्वातंत्र्य आमच्या इकडनंच आणायचं झालं! तुमच्या नवऱ्यानें कॉंग्रेस हाऊसवर झेंडे बांधले असतील. पण ते झेंडे बांधायला त्यांना हुकूम कोणी दिला? आमच्या ह्यांनींच ना? इतकीं वर्षे स्वातंत्र्य कोणाला आणतां आलं नाहीं, तें आमच्या इकडून आणायचं झालं! अन् ते देखील रक्ताचा एक थेंब सांडल्यावांचून!"

हें ऐकून उमाबाई अधिकच उखडल्या. त्या डोळे गरागरा फिरवीत म्हणाल्या, "बघा, बघा! रक्ताचा थेंब सांडल्यावांचून म्हणे ह्यांच्या यजमानांनी स्वातंत्र्य मिळविलें! ह्यांच्या यजमानाचें रक्त नसेल सांडलें! पण परवां रात्रीं कॉंग्रेस-हाऊसच्या कौलारावर झेंडा लावायला आमचे 'हे' चढले होते, तर तेथून पाय घसरून ते खालीं पडले आणि त्यांचा घोळणा फुटून चांगलें तांब्याभर रक्त गेलें! इतकें ह्यांनीं आपलें रक्त सांडलें म्हणून तें मेलें स्वातंत्र्य काल एकदांचें आलें तरी." उमाबाईचें हें वाक्य पुरें होतें आहे नाहीं, तोंच गंगाबाईनीं लाल डोळे करून एकाद्या मांजरीप्रमाणें त्यांच्या गळ्यावर झडप घातली. उमाबाईहि कांहीं कमी नव्हत्या. त्यांनीं गंगाबाईचे दोन्ही हाडकुळे हात आपल्या लठ्ठ हातांत घट्ट पकडून ठेवले. तेव्हां मात्र गंगाबाईचा कांहीं इलाज चालेना. त्यांनीं मोठमोठ्यानीं रडायला आणि ओरडायला सुरवात केली कीं, "इकडून काल एवढं मोठं स्वातंत्र्य आणायचं झालं अन् ही मेली आमच्या कारकुंड्याची बायको म्हणते कीं हिच्याच नवऱ्यानें स्वातंत्र्य आणलें! हिच्या मेलीच्या तोंडांत किडे पडतील बरें किडे!"

त्याबरोबर तिच्यापेक्षां चढा स्वर लावून उमाबाईनीं हंबरडा फोडला कीं, "आमच्या ह्यांनीं चांगलें पातेलेंभर रक्त सांडलें तेव्हां काल स्वातंत्र्य आलें बरें! अन् ही बया म्हणते कीं हिच्याच नवऱ्यानें स्वातंत्र्य आणलें! खोटें बोलणाऱ्याच्या तोंडाला किडे पडून त्यांतून चांगलें घागरभर रक्त जाईल तेव्हां त्यांचे डोळे उघडतील!"

त्या दोघींची ती आरडाओरड आणि भांडण मिटवितां मिटवितां शेजारणींच्या नाकीं अगदीं नव आले.

त्यामधल्या राधाबाई नांवाच्या एक पोक्त बाई दोघींची समजूत घालीत म्हणाल्या, "नाहीं, मी म्हणते, कुणी कां आणलें असेना तें मेलें स्वातंत्र्य ! पण त्यासाठीं एवढें भांडायचें काय कारण आहे ? आणलें असेल तुमच्या नवऱ्यांनीं स्वातंत्र्य तर द्या तें कॉंग्रेस हाऊसमध्यें ठेवून. म्हणजे चार लोक येऊन पहातील तरी. तुम्ही कां उगाच इथें तंडताहांत ? " तेव्हां दुसऱ्या एक यश्वदाबाई म्हणून होत्या त्या म्हणाल्या, "अहो, कुठचें स्वातंत्र्य नि काय घेऊन बसलां आहांत ? अगदीं सकाळीं मी कॉंग्रेस हाऊसमधून जाऊन आलें. तिथें मला तर कांहीं स्वातंत्र्य दिसलें नाहीं. चार खादीवाले लोठे तंगड्या ताणून घोरत पडले होते. तेवढे मात्र मी पाहिलें ! "

शेवटीं कसावसा तो तंटा मिटवून शेजारणी निघून गेल्या. आणि कॉंग्रेस-हाऊसमधल्या कारकुनाच्या बायकोनें चारचौघांसमोर आपला अपमान केला या विचारानें दुःखित झालेल्या गंगाबाई तोंडावर चौघडी ओढून अंथरुणावर धुसफुसत पडल्या.

संध्याकाळीं कॉंग्रेसहाऊसमधून नवरा परत येतो आहे, तों घरांत काय ? चोहोंकडे अंधार आणि शुकशुकाट ! पोरें रडताहेत अन् बायको अंगावर पांघरूण घेऊन तश्शी खुशाल पडली आहे ! तें बघून मात्र नवऱ्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. बायकोच्या अंगावरचें पांघरूण खस्कन् ओढून तो ओरडला, "ए, आतां उठतेस कीं नाहीं ? कां घालूं पाठींत लाथ ? सकाळपासून पुष्कळ तुझं पाहिलें आणि पुष्कळ तुझं सहन केलें ! आतां बऱ्या बोलानें उठून स्वयंपाकाला लागतेस कीं फोडूं तुझें नरडें ? "

त्याबरोबर गंगाबाई ताडकन् उठून म्हणाल्या, "अहिंसेच्या गोष्टी जगाला सांगतां अन् घरांत बायकोचें नरडें फोडतां होय ? "

"अहिंसा गेली खड्ड्यांत ! " नवरा किंचाळून म्हणाला, "अन्, तूं आतां स्वयंपाकाला लागली नाहींस तर तूंही जाशील ओणखी तिच्याबरोबर त्या खड्ड्यांत ! "

तें ऐकून गंगाबाईनीं गळाच काढला !

"मग कशाला मला सकाळीं खोटंच सांगायचं झालं कीं इकडून काल स्वातंत्र्य घेऊन यायचं झालं म्हणून? हें तुमचं तें सत्य होय?" गंगाबाई रडत रडत म्हणाल्या, "मीच चहा करायचा, मीच पोरांना संभाळायचं, अन् मीच पुन्हां दोन्ही वेळ स्वयंपाक करून भांडीं घासायचीं अन् धुणीं धुवायचीं होय?" "होय, होय, हें सारें तूंच करायचें!" गंगाबाईचा नवरा ऐतिहासिक नाटकांतल्या एकाद्या पात्राप्रमाणें हातवारे करीत ओरडून म्हणाला, "देशाला स्वातंत्र्य मिळालं म्हणून तुला घरांत स्वातंत्र्य मिळणार नाहीं. लक्षांत ठेव, तुझा आयुष्यक्रम पंधरा ऑगस्टपर्यंत जसा इथें चाललेला होता, तसाच तो यापुढेंहि चालेल. घरांतील सगळीं कामें रोज तुला स्वतःलाच करावीं लागतील. मी त्यामध्यें तुला काडीचीहि मदत करणार नाहीं!"

त्याबरोबर गंगाबाईंच्या डोळ्यांतले अश्रू नाहींसे झाले. त्यांचा चेहरा एकदम बदलला. रागारागानें त्यांनीं काड्याची पेटी हातीं घेतली व त्यांतली एक काडी पेटीच्या कडेवर जोरानें आदळून त्या म्हणाल्या, "मग आग लागेना कां तुमच्या त्या स्वातंत्र्याला! मला काय त्याच्याशीं करायचें आहे?" असें म्हणून त्यांनीं दिवा लावला आणि त्या स्वयंपाकाला लागल्या!

दारू आणि अहिंसा ?

कोणतेंहि व्यसन हें वाईटच. मग तें दारूचें असो, किंवा अहिंसेचें असो. गोष्ट अति झाली म्हणजे तिचें व्यसन होतें. आणि व्यसन हें नेहमींच घातुक असतें. थोड्या प्रमाणांत दारू प्याली तर ती प्रकृतीला चांगली असते. थोड्या प्रमाणांत अहिंसा पाळली तर तिनें पराक्रमाला शोभा येते. कोणी आम्हांला विचारील कीं, तुम्ही दारूची आणि अहिंसेची काय तुलना करीत आहांत ? या दोन वस्तूंमध्यें काय सारखेपणा आहे ? म्हणून आम्हीं सांगतों कीं दारूंत आणि अहिंसेंत विलक्षण साम्य आहे. दोन्ही गोष्टींचा मोह अनावर आहे. दोन्ही गोष्टींची निशाहि अतिशय मादक आहे. या दोन व्यसनांच्या कचाट्यांत एकदां माणूस सांपडला म्हणजे त्याच्या कर्तृत्वाची आणि पौरुषाची अगदीं धूळधाण उडते. दारू थोडी घेऊन माणसाचें समाधान होत नाहीं. ती दर वेळेला पूर्वीपेक्षां जास्त घ्यावीशी वाटते. आणि दारू जास्त जास्त घेत गेलें म्हणजे दारू पिण्याची तहान अधिकच वाढत जाते. म्हणूनच एक म्हण पडलेली आहे कीं आधीं माणूस दारूला पितो, मग दारू दारूला. पिते आणि शेवटीं दारू माणसाला गट्ट करते. हुबेहूब तसेंच अहिंसेचें आहे. थोडीशी अहिंसा पाळून माणसाचें समाधान होत नाहीं. अहिंसेचें विष एकदां शरिरांत शिरलें कीं, तें हळू हळू साऱ्या शरिरामध्यें पसरूं लागते आणि पौरुषाला हलके हलके त्याची बाधा होऊं लागेत. दारूचा परिणाम जसा आधीं मेंदूवर होतो आणि कांहीं वेळानें हात, पाय, आणि जीभ लुळीं पडूं लागतात, त्याप्रमाणें अहिंसेचा परिणामहि प्रथम मनावर आणि मेंदूवर होतो. अहिंसेनें आपलें 'आत्मिक बळ' वाढत चाललेलें आहे असा कैफ माणसाला चढतो. तो जास्त मान वांकवून नमस्कार करूं लागतो. कारण नसतांना दांत विचकून कृत्रिमपणें तो हसूं लागतो. उजव्या

हातापेक्षां डाव्या हातांत जास्त वळ आहे, असा त्याला भ्रम वाटूं लागतो. दारूबाजाप्रमाणेंच त्याचें चालणें, बोलणें आणि हातवारे अधिकाधिक वेंगरूळ होऊं लागतात. दारूबाजाप्रमाणें सर्व जग आपल्या भावासारखें आहे असें तो मानूं लागतो. आणि दारूबाजाप्रमाणेंच कांहीं कारण नसतांना तो प्रत्येकाची माफी मागत सुटतो. मद्यपी माणसांच्या पोटांत ज्याप्रमाणें कांहींही रहात नाहीं त्याप्रमाणें अहिंसावाल्याजवळ देखील कोणतीही गोष्ट गुप्त राहूं शकत नाहीं. उलट आपण आपला सारा व्यवहार राजरोसपणें करीत आहोंत याचा त्याला अभिमानच वाटूं लागतो. दारू प्याल्यानंतर आपण ज्ञानी झालों आहोंत असें माणसाला वाटतें व तो साऱ्या जगाला उपदेश करूं लागतो. अहिंसा डोक्यांत गेली म्हणजे जगांतली सारीं शास्त्रें आपणाला येतात असें माणसाला वाटूं लागतें. अहिंसा 'पिऊन' माणूस राजकारण करूं लागला म्हणजे तर फारच गंमत होते. तो दारूबाजाप्रमाणें एकसारखें बडबडूं लागतो आणि मुलाखती देत सुटतो. तो आपल्या मुत्सद्देगिरीचे सारे डावपेंच आपल्या शत्रूंना तावातावानें उघडपणें सांगूं लागतो. त्यामुळें प्रतिपक्षाचा खूपच फायदा होतो. दारूचा 'एकच प्याला' घेणारा माणूस ज्याप्रमाणें शेवटीं अट्टल दारूबाज बनतो, त्याप्रमाणें 'अहिंसा' हा शब्द एकदांच तोंडानें मिटक्या मारीत उच्चारला म्हणजे तो माणूस हळूंहळूं अहिंसावादी बनतो, आणि थोड्याच वर्षांनी तो अट्टल अहिंसाबाज होतो. दारूबाजीच्या व्यसनामुळें ज्याप्रमाणें शरीराचा नाश होतो, समाजाची धूळधाण उडते, आणि राष्ट्राची राखरांगोळी बनते, त्याचप्रमाणें अहिंसाबाजीच्या घातकी व्यसनामुळें कोट्यवधि जनता निष्क्रिय आणि अगतिक बनते, सहस्रावधि प्राणांची हत्त्या होते, शेंकडों कुटुंबांच्या धर्मावर आणि अब्रूवर अत्याचार होऊन त्यांचें संसार उध्वस्त होतात, आणि ज्याची पाळेंमुळें वडाच्या झाडाप्रमाणें भूतकाळाच्या पोटांत शतकानुशतकें पसरलेलीं आहेत अशा प्रचंड आणि पुरातन राष्ट्राचे तुकडे तुकडे उडतात.

या देशांत इंग्रज आल्यानंतर ज्याप्रमाणें दारूचें व्यसन जास्त बोकाळलें, त्याप्रमाणें इंग्रज या देशांतून जाण्यापूर्वी अहिंसाबाजीचें हें व्यसन गेलीं पंचविस-तीस वर्षें राष्ट्राला जडून राहिलेलें आहे. एकदां दोन दारूबाज दारू पीत बसलेलें होते. त्यापैकीं एक म्हणाला, "मला आणखी एक प्याला दारू पिऊं दे

दे, म्हणजे मी इंग्लंडच्या बादशहाचा राजवाडा तुला गहाण लिहून देतों" तेव्हां दुसरा म्हणाला, "मला आणखी दोनच प्याले दारू पिऊं दे, मी सारा इंग्लंड देशच तुला खरेदी देऊन टाकतों." 'अहिंसेच्या प्रभावानें घाबरून इंग्रज लोक हा देश सोडून चाललेले आहेत' या अहिंसाबाजांच्या वलगना या गोष्टींतल्या दारूबाजांच्या बरळण्याप्रमाणेंच हास्यास्पद आहेत. दारूच्या जशा तीन अवस्था असतात, तशा अहिंसेच्याही पण तीन अवस्था असतात. देशांतील बहुतेक सारे वृत्तपत्रकार हे आज अहिंसेच्या पहिल्या अवस्थेंत आहेत, कॉंग्रेसच्या मागून जाणारी देशांतील कोटयावधि जनता ही अहिंसेच्या दुसऱ्या अवस्थेमध्यें आहे आणि कॉंग्रेसचे उजवे आणि डावे पुढारी हे अहिंसेच्या तिसऱ्या अवस्थेमध्यें गेलेले आहेत. गांधीजींची तर तिसरी अवस्था कधींच संपून गेली आहे. ते सध्यां भयंकर अवस्थेंत आहेत. पहिल्या अवस्थेंतलें अहिंसाबाज लौकर ताळ्यावर येऊं शकतील. आणि ते ताळ्यावर आले म्हणजे अहिंसेच्या दुसऱ्या अवस्थेंत गेलेल्या जनतेला ते ताळ्यावर आणूं शकतील. तिसऱ्या अवस्थेंत नुकत्याच शिरलेल्या कॉंग्रेसच्या डाव्या पुढाऱ्यांना दुरुस्त होण्याची थोडीतरी कांहीं आशा आहे. पण सुधाकराप्रमाणें अहिंसेच्या तिसऱ्या अवस्थेंत जाऊन पोहोंचलेलें उजवे कॉंग्रेस पुढारी शुद्धीवर येण्याची मात्र आतां मुळींच आशा उरलेली नाहीं. म्हणून त्यांचा नाद आपण अजिबात सोडून दिला पाहिजे. आणि संयमाच्या सर्व मर्यादा ओलांडून अतिरेकाच्या अत्यंत निकराच्या शेवटच्या टप्प्याला गांधीजी जाऊन बसलेले आहेत. 'गुंडांनी जर तुमच्या अब्रूवर हल्ला केला तर तुम्ही विष खाऊन जीव द्या' असें पूर्व बंगालच्या स्त्रियांना बजावणारे गांधीजी हे अहिंसाबाजीच्या शेवटच्या अवस्थेंत गेलेले नव्हेत काय? 'अहमदाबादचा जातीय दंगा मी कसा थांबवू?' असें विचारणाऱ्या मोरारजी भाईंना 'तुम्ही दंग्याच्या भागांत एकटे जाऊन मरा!' असे सांगणारे गांधीजी हे अहिंसाबाजींच्या अंतिम टोकाला जाऊन पोहोंचलेले नव्हते काय? 'रघुपति राघव राम रहीम। पतीत पावन कृष्ण करीम' हीं प्राणावर उदार झालेल्या अहिंसाबाजाची शेवटची केविलवाणी धडपड नव्हें तर काय आहे ? आपल्या भविष्यकाळाची परवा न करतां सुधाकर ज्याप्रमाणें प्याल्यामागून प्याले झोकून फस्त करूं लागतो आणि 'सिंधूसकट संसाराला, मुलासकट माणुसकीला आणि जगासकट जगदीश्वराला

निर्वाणींतल्या निराशेचा अखेरचा रामराम' ठोकूं लागतो त्याप्रमाणें भविष्यकाळीं हिंदुस्थानचें काय होईल याची परवा न करतां 'हिंदुस्थाननें आपल्या संरक्षणासाठीं लष्कर ठेवतां कामा नये आणि ठेवलें तर त्यानें मुसलमानांविरुद्ध हत्यार न उपसण्याची शपथ घेतली पाहिजे' असे आत्मघातकी अहिंसाबाजीचे प्याल्यावर प्याले झोकून 'कर्तृत्वासकट काँग्रेसला, हिंदुसकट हिंदुस्थानला, आणि अब्रूसकट अखंडत्वाला' मूठमांती देण्याची भाषा गांधीजी आतां बोलूं लागलेले आहेत. दारुबाज सुधाकरानें ज्याप्रमाणें रामलालचें ऐकलें नाहीं, त्याप्रमाणें आतां पृथ्वीवर प्रत्यक्ष राम आणि रहीम जरी उतरले तरी इरेला चढलेले आमचे गांधीजी आपला अहिंसेचा हट्ट सोडणार नाहींत. देशाची फाळणी झाली तरी हरकत नाहीं, लक्षावधि लोक प्राणाला मुकले तरी फिकीर नाहीं आणि उरलेला सारा हिंदुस्थान पाकिस्तानच्या घशांत गेली तरी पर्वा नाहीं. पण माझी अहिंसा खरी ठरली पाहिजे हा एकच ध्यास गांधीजींनी आतां घेतलेला आहे. 'मी स्वतः चुकलों आहे, तीस वर्षे काँग्रेस चुकलेली आहे, जनतेनें मोठमोठ्या चुका केल्या आहेत,' अशी दोषांचीं खापरें साऱ्या जगाच्या डोक्यावर गांधीजी फोडत बसतील, पण आपली अहिंसा चुकीची आहे असे शब्द मात्र प्राण गेला तरी त्यांच्या तोंडून कधींहि निघणार नाहींत. परवां दिवशींच्या प्रार्थनेंत गांधीजी म्हणाले कीं, 'जगांत शांतता नांदावयास हवी असेल तर त्यासाठीं अहिंसा हा एकच एक मार्ग आहे.' इतके पाहून, बघून आणि होऊनसुद्धां शेवटीं ही भाषा ! अहिंसाबाजीचा हा आत्यंतिक अतिरेक आहे. साठ वर्षे अहिंसेचें पालन करून खुद्द गांधीजींच्या मनांत जेथें शांतता प्रस्थापित झाली नाहीं, तेथें अहिंसेनें जगांत शांतता प्रस्थापित करण्याच्या गोष्टी कशाला पाहिजेत ?

दारूबाजींत आणि अहिंसाबाजींत एवढें साम्य असूनही या दोन्ही व्यसनांत एक मोठा फरक आहे. दारू पिणारा मनुष्य हा खोटें कधींही बोलत नाहीं. जगांत दारूबाजाएवढा सत्याचा पुरस्कर्ता कोणीहि नसेल. पण अहिंसा-बाज माणूस हा सत्य कधींहि बोलत नाहीं. कारण डोक्यांत आणि डोळ्यांत अहिंसेचा कैफ चढल्यानंतर त्याला सत्य दिसूंच शकत नाहीं. त्यामुळें अहिंसाबाज माणूस नेहमीं असत्य बोलतो. पण आपण जें बोलतों तें सत्य असतें असें मात्र तो दिमाखानें जगाला सांगत सुटतो. मुस्लिम लीगच्या दाराशीं मी फिरून कधींहि जाणार नाहीं असें अहिंसाबाज माणूस छातीवर हात मारून बोलतो.

आणि दुसऱ्याच क्षणीं तो जनांच्या घराचा जिना चढूं लागतो. सोळा मेची योजना ही अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची योजना आहे असें अहिंसाबाज माणूस आधीं आग्रहानें बोलतो आणि मागाहून तीच योजना पाकिस्तानची योजना होती असें तो आपणास बजावून सांगतो. देशाचे तुकडे होण्या आधीं माझ्या देहाचे तुकडे होतील अशी वीरगर्जना करणारा अहिंसाबाज माणूस शेवटीं देशाच्या फाळणीला मान्यता देवून मोकळा होतो. उभ्या हयातींत तलवार कशी असते हें डोळ्यानें देखील ज्यानें पाहिले नाहीं असा अहिंसाबाज 'तलवारीला तलवार भिडेल' अशा वीरश्रीच्या आरोळ्या बेदिक्कत ठोकूं लागतो. मुसलमानांच्या अत्याचाराला भिऊन फाळणीला संमति देणारा भेकड अहिंसाबाज 'काँग्रेसचा महान् विजय झाला आणि जीनांचा भयंकर पराभव झाला' असें जाहीरपणें सांगावयाला मागेंपुढे पहात नाहीं. पंधरा ऑगस्टनंतर आम्हीं अलौकिक पराक्रम दाखविणार आहोंत असें मिशीला पीळ भरून सांगणारा अहिंसाबाज शेवटीं गोऱ्या साहेबालाच हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल नेमण्याची शिफारस करतो. छे, छे, छे, अहिंसाबाज माणूस सत्याची जेवढी हिंसा करतो, तेवढी हिंसावादी माणसाच्या हातूनही कधीं हिंसा घडत नसेल, म्हणून अहिंसाबाजावर जो विश्वास ठेवील त्याचा सर्वनाश झाल्यावांचून रहाणार नाहीं. वेश्या आणि जुगार हे दारूबाजाचे जसे दोन दोस्त असतात, त्याप्रमाणें असत्य आणि भ्याडपणा हें अहिंसाबाजाचे दोन जानी दोस्त असतात. अहिंसेनेंच अखेर मानवतेचें कल्याण होणार असें अहिंसाबाज सांगतात हें खरें. पण त्याचा प्रत्यक्ष पुरावा अद्याप तरी ह्या पृथ्वीतलावर कांहीं पहावयाला सांपडलेला नाहीं. अहिंसाबाजीपासून जो जो समाज आणि जें जें राष्ट्र दूर राहिलें आहे त्याचें नेहमीं कल्याणच झालेलें आहे. अहिंसेचा नांद जनाब जीनांना लागला असता तर अवघ्या सात वर्षांत कसलाहि पराक्रम न करतां स्वतंत्र पाकिस्तान फुकट त्यांच्या पदरांत पडलें असतें होय ? म्हणून अहिंसाबाजीच्या तिसऱ्या अवस्थेंत शिरलेल्या काँग्रेस पुढाऱ्यांचा नाद सोडून अहिंसेच्या मोहापासून धैर्यानें आणि निश्चयानें जनता जर परावृत्त झाली तरच तिची आतां धडगत आहे. मग सांगा, देशांत दारूबंदी होण्याच्या आधी कायद्यानें अहिंसाबाजीची बंदी व्हावयाला पाहिजे असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?

———

कालिदासांच्या 'शाकुंतल'मधील विनोद : : ९

जुन्या संस्कृत वाटकामध्यें उत्तम विनोद फारसा आढळून येत नाहीं. कारण विनोद निर्माण करण्यासाठीं विदूषक हें पात्र मुद्दाम नाटकांत घालावयाचें अशी पूर्वीची पद्धत असे. 'विदूषक' या नांवावरूनच तो काय दर्जाचा विनोद सिद्ध करीत असेल याची कोणालाहि कल्पना येण्यासारखी आहे. विदूषक हा जातीनें 'भटजी' असे आणि तो आपल्या जातीप्रमाणें खादाड, भित्रा, बावळट आणि मठ्ठ डोक्याचा असे. एवढी भरपूर सामुग्री विदूषकाच्या स्वभावांत ठेवून दिल्यानंतर मग नाटककाराला विनोद निर्माण करण्यासाठीं आणखी काय हवें आहे? माणसांतील कोणतेहि दोष किंवा व्यंगें अनंत असल्यानें विनोदाच्या विविधतेलाहि कांहीं अंत उरलेला नाहीं! ही विविधता जी सध्यांच्या जगांतील विनोदी वाङ्मयांत भरपूर आढळून येते, ती ग्रीक किंवा संस्कृत वाङ्मयांत आढळून येत नाहीं. त्या वेळचा विनोद हा ठोकळ मानानें अगदींच ठराविक आणि ढोबळ असे. त्यांत कोमलता चपलता, आणि खेळकरपणा हें गुण मुळींच आढळून येत नाहींत. असे गुण जर कधीं कशांत आढळून आलेंच तर ते संस्कृत नाटकांपेक्षां संस्कृत काव्यांत-विशेषतः सुभाषितासारख्या कवितांमध्यें अधिक प्रमाणांत आढळून येतात. किंवहुना असेंहि म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं कीं, संस्कृत कवितेमध्यें पुष्कळ वेळां उत्तम प्रकारचा कोटीबाज आणि चपल विनोद आढळून येतो.

महाकवि कालिदासाचें 'शाकुंतल' नाटक हें तर बोलून चालून अमर काव्यच आहे! कालिदासाची कीर्ती तर केवळ त्याच्या काव्यामुळेंच आहे. आणि 'शाकुंतल' हा त्याच्या कल्पनासौंदर्याची आणि प्रतिभाविलासाची परिसीमा आहे! तेव्हां

अशा 'शाकुंतलां'त विनोदाला कितीसा अवकाश असणार? आणि तेंहि खरेंच आहे. 'शाकुंतलां'तील विनोद तसें पाहिलें तर फारच थोडा आहे. पण मौजेची गोष्ट अशी कीं, हा विनोद थोडासा असूनहि तेजस्वी आहे. त्यांत जुन्या संस्कृत विनोदाचा ठराविक ढोबळपणा आणि मठ्ठपणा मुळींच आढळून येत नाहीं. उत्तम कवि हा उत्तम विनोदपंडित व्हावयाला कांहींच अडचण नसते. कारण काव्य आणि विनोद यांत कोणत्याहि तऱ्हेचा विरोध नाहीं. त्यांच्या सिद्धीची पद्धत तेवढी निराळी आहे. एकाचा विषय आनंद आहे तर दुसऱ्याचा विषय दुःख आहे. तथापि, दोहोंचे हेतू एकच आहेत. काव्य आनंदाचा गुणाकार करते, तर विनोद दुःखाचा भागाकार करून त्यांतून आनंद तेवढाच 'बाकी' ठेवतें. दोन वस्तूमधील साधर्म्य बघणें ही काव्याची दृष्टी असली, तर दोन वस्तुमधील वैधर्म्य किंवा विसंगति पहाणें ही विनोदाची दृष्टी आहे. 'चंद्र हा आकाशाच्या जलाशयांतील उमललेल्या कमळासारखा आहे' असें म्हटलें म्हणजे काव्य निर्माण होतें, आणि 'चंद्र हा आकाशाच्या ताटामध्यें ठेवलेल्या बत्ताशासारखा पांढरा आणि वाटोळा आहे' असें म्हटलें म्हणजे विनोद होतो.

एकूण उत्तम कवीला उत्तम विनोदाच्या बाबतींत मुळींच अडचण पडूं नये. अर्थात् सृष्टीमधील काव्यात्मक आणि कलात्मक साधर्म्य शोधण्यांत तो इतका रंगून आणि गुंगून गेलेला असतो कीं मानवी जीवनांतील आणि स्वभावांतील विलक्षण वैधर्म्य आणि विसंगतीकडे थट्टेच्या खेळकर दृष्टीनें पहाण्याच्या तो सहसा मनःस्थितींत असूं शकत नाहीं! 'काव्य हें ढगांत असतें, विनोद हा जगांत असतो' असें मार्क ट्वेननें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. अलिकडे कवि जगाकडे पहावयाला लागलें असलें तरी ते ढगांतूनच जगाकडे पहातात. किंबहुना ढगामधून जगाकडे पहाणें यांतच मुळीं काव्य आहे. विनोदी लेखक दुःखी कष्टी माणसामध्यें रहात असतो. लहान मूल धडपडलें म्हणजे 'तो बघ उंदीर पळाला!' असें म्हणून आपण त्याचें लक्ष दुसरीकडे वेधतो आणि त्याला हंसावयाला लावतो. त्याप्रमाणेंच दुःखी जगाचें लक्ष ढगाकडे लावून त्याला आपल्या यातनेचा विसर क्षणभर पाडणें हें विनोदी लेखकाचें कार्य असतें. काव्य आणि विनोद हें केवळ दृष्टीमधलें अंतर आहे. तथापि एक मात्र गोष्ट खरी कीं, उत्तम विनोदी लेखकाच्या भावनेंत काव्य असल्यावांचून त्याला विनोद निर्माण करतां यावयाचा नाहीं.

कालिदासानें मनांत आणलें असतें तर तो उत्कृष्ट विनोद निर्माण करूं शकला असता. तशा तऱ्हेचें तेजस्वी पुरावे त्यानें 'शाकुंतल' नाटकामध्यें देऊन ठेवलेले आहेत यांत मात्र शंका नाहीं. 'शाकुंतल' नाटकांत विनोद निर्मिति करण्यासाठीं कालिदासानें विदूषक माढव्य हें पात्र घातलेले आहे. 'माढव्य' या नांवापासून विनोदाला सुरवात होतें. तथापि 'शाकुंतल' नाटकामधील उत्कृष्ट विनोद म्हणून जो मला वाटतो तो विनोद माढव्याच्या आधारानें निर्माण झालेला नव्हें. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं माढव्याचा विनोद कमी प्रतीचा आहे. किंबहुना इतर संस्कृत नाटककारांच्या विदूषकापेक्षां किंवा कालिदासाच्या दुसऱ्या विदूषकापेक्षां मला त्याचा माढव्यच अधिक आवडतो. तो नेहमीच्या विदूषकांसारखा निव्वळ ढोबळ ठोंब्या नव्हे. त्याच्यांतहि कांहीं बुद्धिचें हळुवार चापल्य असल्याचें आढळून येते.

'शाकुंतल' नाटकामध्यें पहिल्या तीन अंकांतील प्रधानरस शृंगार आहे. चवथा अंक करुणरसानें ओथंबलेला आहे. पांचव्या, सहाव्या आणि सातव्या अंकांत विशेषेकरून निर्भेळ असा एक रस नाहीं. कारुण्य, शृंगार, अभ्दुत, इत्यादि रसांचे त्यामध्यें पुष्कळसें मिश्रण आहे. नाटकांतील बहुतेक सर्व शृंगारामधून विनोदाची नाजुक गुंफण केलेली आढळून येतें. शकुंतला दुष्यंताच्या दृष्टीस पडतें. तिचें सौंदर्य बघून तो एकदम तिच्यावर मोहित होतो. या प्रसंगीं आपल्या विनोदाचा तेजस्वी विलास प्रेक्षकांना दाखवून त्यांचीं अंतःकरणें झटक्यासरशी कालिदासानें जिंकून टाकलेली आहेत. हा विनोद शृंगारिक आणि थोडासा वात्रट असला तरी त्यामुळें रसिकांच्या काळजांत क्षणभर हर्षाच्या गोड गुदगुल्या उठल्याविना रहात नाहींत. शकुंतलेचे वल्कल प्रियंवदेनें गच्च आवळून बांधलेलें आहे; 'तें वल्कल अंमळ सैल कर' असें ती अनुसयेला सांगते. प्रियंवदा बोलून चालून वात्रटच! आपला दोष शकुंतलेनें काढला हें तिला कसें बरें खपणार? तिनें शकुंतलेला एकदम टोमणा लगावला कीं, 'तुझ्या वक्षस्थळाचा विकास करणाऱ्या तारुण्याला बोल लाव—मला कां दोष देतेस!' या उद्‌गारांतील विनोद शृंगारावर आधारलेला असल्याकारणानें त्याची गोडी मोठी मोहक आणि मादक झालेली आहे यांत शंका नाहीं.

त्यानंतर आम्रवृक्षांशीं निगडित झालेल्या वनज्योत्स्नेकडे शकुंतला जेव्हां टक लावून पहाते तेव्हां प्रियंवदा तिची थट्टा करते, तीहि मोठी गोड आहे. प्रियंवदा

अनुसयेला म्हणते, "अनुसये, शकुंतला वनज्योत्स्नेकडे इतकी टक लावून कां पहाते आहे हें आहे कां माहित?" अनुसया म्हणते, "नाहीं बाई लक्षांत येत. सांग बघूं!" तेव्हां प्रियंवदा म्हणते, "जशी वनज्योत्स्नेची योग्य पतीशीं गांठ पडली आहे तशी आपलीहि अनुरूप पतीशीं पडेल काय, असें शकुंतलेला वाटते आहे बरें कां!" शकुंतलेच्या बारीक सारीक हालचालींतून थट्टेखोर प्रियंवदा जो मजेदार अर्थ बाहेर काढते आहे, त्यामुळें मोठा खुमासदार विनोद निर्माण झालेला आहे. शकुंतलेच्या पाठीमागें भुंगा लागतो, आणि भित्री शकुंतला त्याला भिऊन इकडे तिकडे धांवूं लागते. तिच्या मैत्रिणी भुंग्यापासून तिचें 'संरक्षण' करीत नाहींत; म्हणून शेवटीं राजा दुष्यंताला प्रकट होऊन तिची सुटका करावी लागते. या सर्व प्रसंगामध्यें काव्यापेक्षां विनोदच अधिक आहे! शृंगारिक विनोदाचा इतका काव्यमय आणि कलात्मक विलास माझ्या तरी पहाण्यांत दुसरीकडे कुठें आलेला नाहीं. राजाला बघून शकुंतला आणि तिच्या सख्या तर गोंधळून जातातच. बोलून चालून त्या तरुण मुलीच, आणि त्यांतून आश्रमांतल्या. दुष्यंतासारखा परपुरुष अद्यापि त्यांनीं कधीं पाहिलेला नाहीं! आणि तशांत तो प्रकटहि झाला जो त्यांच्यासमोर तो अचानक आणि विलक्षण तऱ्हेनें! पण मौजेचीं आणि गंमतीची गोष्ट अशी कीं, त्या मुली जितक्या गोंधळल्या नसतील तितका आमचा राजा गोंधळून गेला. कालिदासाच्या विनोदाची खरी लज्जत या ठिकाणीं चाखायला मिळतें. मुलींनीं पुरुष बघून गोंधळावें हें ठीकच आहे. पण पुरुषासारख्या पुरुषानें आणि त्यांतून दुष्यंत राजासारख्या पुरुषानें मुलींना बघून गोंधळून जाणें यांतच विनोदाची खरी बहार आहे.

शकुंतलेला पाहून राजाची कशी तिरपीट उडाली ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे तिच्याशीं त्याला काय बोलावें हें सुचत नाहीं. तो बावळटासारखा तिला विचारतो, "काय, तुमचें तपबीप सारें ठीक चाललें आहे ना?" शकुंतलेसारख्या नाजूक लावण्यलतिकेला झांडांना कळशीनें पाणी घालावे लागत आहे हें बघून ज्या राजाच्या मनांत सुरवातीला असा विचार आला कीं, "हिला आश्रमांतलीं असलीं कामें सांगणाऱ्या काश्यप महर्षींना कांहींच तारतम्य नाहीं असेंच म्हटलें पाहिजे!" त्या राजाला तप करण्याइतकीं शक्ति शकुंतलेमध्यें आहे असें वाटणें शक्य नाहीं! शकुंतलेसारख्या

तरुण मुलीला पाहून 'तुमचें तपबीप कसें चाललें आहे ?' असा रुक्ष प्रश्न विचारण्याइतका राजा अरसिक खास नव्हता. कॉलेजांत जाणाऱ्या एकाद्या तरुण मुलीला वघून आपक झालेल्या तरुणानें 'काय, गौतावीता नियमितपणें वाचतां कीं नाहीं ?' असें विचारणें हें जितकें हास्यपूर्ण आहे, तसाच राजाचा तपाबद्दलचा प्रश्न आहे. हा प्रश्न अधिक विनोदी वाटण्याचें कारण असें आहे कीं, शकुंतलेला वघून राजाच्या मनाची जी चलबिचल झाली ती त्याला शकुंतला आणि तिच्या सख्या यांच्यापासून लपवायची असते. जणूं काय आपण 'तसलें' नाहींत, किंवहुना त्या गांवचेंहि नाहींत असे त्यांना वाटावें. तपाविषयीं प्रश्न विचारला कीं, त्या मुलींना आपल्या हेतूचा संशयहि येणार नाहीं ! त्यांना वाटेल कीं, हा कोणीतरी धार्मिक प्रवृत्तीचा मोठा सत्शील आणि निरुपद्रवी प्राणी दिसतो आहे. आणि पुढें 'तुम्ही कोण, कुठलें?' असा जेव्हां मुली त्याला प्रश्न विचारतात, तेव्हां त्याला तें सोंग पुढें चालविणें भाग पडतें. तो उत्तर देतो, "पौरव राजानें मला धर्म-खात्यावर अधिकारी नेमले आहे, म्हणून धर्मक्रिया निर्विघ्नपणें चालल्या आहेत कीं नाहींत, हें पहाण्यासाठीं मी या तपोवनांत आलेलों आहे !"

राजाचें हें उत्तर ऐकून प्रेक्षक पोट धरधरून हंसल्यावांचून रहाणार नाहींत. राजानें आपल्या अंगावरची राजचिन्हें किंवा राजवस्त्रें दूर केली होती तरी त्याच्या मोहक आणि राजबिंड्या मुद्रेवरून आणि अंगकांतीवरून हा 'धर्मखात्यांतला' एक अधिकारी आहे असें समजण्याइतक्या कण्वबाबांच्या आश्रमांतल्या पोरी बावळट नव्हत्या ! निदान शकुंतला नव्हती आणि प्रियंवदा तर नव्हतीच नव्हती! अनुसया मात्र अगदींच भोळी आणि बावळट ! ती त्यावर म्हणते, "धर्मानें वागणाऱ्या माणसाला आतां पाठीराखाच मिळाला म्हणायचा !" अनुसयेचें हें वाक्य म्हणजे राजाच्या बोलण्यानें निर्माण केलेल्या विनोदावर कडीच आहे ! अनुसयेचें हे उद्गार ऐकून राजाच्या मुद्रेवर जो कांहीं फेरफार घडून आला असेल तो कालिदासानें प्रत्यक्ष वर्णन केला नसला तरी तो कालिदासाला बिलकूल अभि-प्रेत नसेल असें कसें म्हणतां येईल ! मुंबईच्या मलबार हिलवरील एकाद्या बंगल्याच्या बागेंत कुणा श्रीमंतांच्या तरुण मुली खेळत असतां एकाद्या गुलहौशी तरुणानें तेथें एकदम 'दत्त' म्हणून प्रकट व्हावें आणि मुलींनीं विचारलें कीं, 'तुम्ही कोण ?' तर 'हिंदूधर्माचें पालन ह्या भागांतील तरुण मंडळी कशी काय

करतात हें पहाण्यासाठीं शंकराचार्यांनीं 'मला पाठवलें आहे' असें त्यानें उत्तर द्यावें अन् त्या मुलीमधील एकाद्या बावळट मुलीनें, 'अगबाई, आतां मात्र हिंदू धर्माला खरा आधार मिळाला!' असें त्याला बघून म्हणावें म्हणजे जसा बहारीचा विनोद निर्माण होईल, तशाच तऱ्हेचा लज्जतदार विनोद वरील प्रसंगीं कालिदासानें साधलेला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

शकुंतलेचें चरित्र ऐकण्यासाठीं राजा उतावीळ होतो. कारण त्याला माहिती पाहिजे असते कीं, ही सुंदर मुलगी क्षत्रियाची आहे कीं ब्राह्मणाची आहे, आणि लग्न करण्याचा तिचा खरोखरच विचार आहे किंवा नाहीं. नाहींतर आपण हिच्याबद्दल कांहीं अपेक्षा करावयाच्या आणि शेवटीं भलतेंच कांहींतरी कुलंगडें निघून परत आपल्याला हिरमुसल्या तोंडानें आश्रमामधून परत जायची पाळी यावयाची. पण शकुंतलेला आणि तिच्या सख्यांना असलें प्रश्न करावयाचे कसें? शकुंतलेच्या वैयक्तिक जीवनाबद्दल स्वतःच्या हेतूबद्दल संशय न येईल अशा बेतानें कसें कौतुहल दाखवायचें? तो राजा असला आणि अनेक राण्याशीं लग्नें लावण्याइतका तो रंगेल असला तरी त्यालाहि कांहीं सभ्यतेच्या मर्यादा होत्याच! राजाच्या मनाची ही स्थिति धूर्त प्रियंवदेनें तत्काळ ओळखली! तिनें हंसत हंसत राजाला सरळ विचारलें कीं, "काय हो, आणखीहि कांहीं विचारावयाचें दिसतें आपल्या मनांत!" प्रियंवदेनें नेमकें राजाच्या वर्मावरच बोट ठेवलें! आतां तिला कसें उत्तर द्यावयाचें! मोठी पंचाईतीची परिस्थिति निर्माण झाली. पण राजानें प्रसंगावधान दाखवून जें उत्तर दिलें त्यामुळें फारच उत्तम तऱ्हेचा विनोद निर्माण होतो. राजा तिला म्हणाला, "बरोबर ओळखलेत! चांगल्या माणसांचें चरित्र ऐकण्याची आवड असल्यानें आणखीहि कांहीं विचारावयाचें आहे खरें." राजाच्या या उत्तरावर प्रियंवदेनें हि मोठें गंमतीदार उत्तर दिलें आहे. ती म्हणाली, "मग अगदीं अनमान करायला नको! तपस्वी लोकांना काय हवे ते खुशाल विचारावें!" राजाला संकोच न वाटतां हवी ती माहिती मिळवून देण्यासाठीं प्रियंवदेनें जी ही मोकळी वाट करून दिली तीं बघून तिच्या खुबीदार चाणाक्षपणाचें हास्ययुक्त कौतुक केल्यावांचून प्रेक्षक रहात नाहींत!

पहिल्या अंकाच्या शेवटीं शकुंतला राजाला सोडून आपल्या पर्णकुटींत जेव्हां जाऊं लागते तेव्हां सख्यांना सोडून मागें रेंगाळण्यासाठीं शकुंतलेनें 'कोवळ्या

दर्भाचें टोंक पायांत शिरल्याची आणि कोन्हांटीच्या फांदीला वल्कल अडकल्याची' जी काव्यमय सबब शोधून काढलेली आहे त्यांतील वहारदार विनोद बघून कोणत्याहि सहृदय प्रेक्षकाच्या काळजांत गोड गुदगुल्या खदखदल्याखेरीज रहाणार नाहींत ! कांटा नव्हे बरें कां ? कांटा पायाला रुतल्याच्या थापा आधुनिक गद्य तरुणांनी द्याव्यात ! कालिदासाची शकुंतला पराकाष्ठेची कोमल आणि काव्यात्मक होती. कण्वऋषीच्या आश्रमांत कांटे अगदींच नसतील अशांतला भाग नाहीं. तथापि, कांटा बोचल्याची तक्रार करण्याइतकीं शकुंतला अरसिक नव्हती. तिच्या पायाला काय टोचलें आहे तर तें दर्भाचें टोंक ! कसल्या दर्भाचें तर तें कोवळ्या ! म्हणजे शकुंतलेचे पाय किती लुसलुशीत आणि मुलायम असावेत कीं, त्याच्यांत कोवळ्या दर्भाचें टोंक देखील शिरूं शकतें, अन् तेवढी 'कोमल' टोचणी सहन करण्याची सोशिकता देखील शकुंतलेंत नाहीं म्हणजे ती किती नाजुक असली पाहिजे ! आकाशांतून जाणाऱ्या नारदाच्या गळ्यांतील माळ तुटून अंगावर पडल्यानें मरण पावलेल्या 'रघुवंशां'तील इंदुमतीचीच ही बहिण नव्हे कां ?

तथापि, गंमत ही कीं, शकुंतलेचा कोमलपणा किंवा नाजुकपणा प्रत्यक्षपणें कालिदासाला इथें सुचवावयाचा नाहीं ! मागें राहून राजाच्या तोंडाकडे बघायला मिळावें म्हणून बतावणी करणारी प्रेमविव्हल शकुंतला किती 'नाजुक थापा' मारते आहे हें कवीला दाखवून विनोद निर्माण करावयाचा आहे ! पण तो विनोद निर्माण करतां करतां त्यानें शकुंतलेच्या कोमलतेचें काव्यहि हळूंच गुणगुणून टाकलें. काव्य आणि विनोद याचा इतका हृदयंगम संगम साहित्यांत क्वचित्च पहावयास मिळेल.

दुसऱ्या अंकामध्यें विदूषकाच्या विनोदाला भरपूर वाव मिळालेला आहे. शिकारीचा शोक असलेल्या दुष्यंत राजाच्या संगतींत सुखास लालचावलेल्या आपल्या शरीराची आणि जीभेची किती परवड झालेली आहे याचें मोठें गंमतीदार वर्णन विदूषक प्रेक्षकांना सांगतो. तथापि, तें वर्णन अगदींच ठराविक सांच्याचें असल्यामुळें त्यांतील विनोद अगदींच सामान्य विदूषकी थाटाचा आहे. राजा जेव्हां विदूषकाला आपली शकुंतलेविषयींचीं भावना सांगतो, तेव्हां विदूषकाचा खरा विनोद प्रकट होतो. अनेक स्त्रियांशीं आधीं

लग्नं झालीं असतांहि राजे महाशयांनीं हा जो नवीन 'षोक' आरंभला आहे तो पाहून विदूषक राजाची अशा कांहीं इरसाल शब्दांत संभावना करतो कीं, विचारूं नका. तो म्हणतो, "खजूर खाऊन विटलेल्या माणसाची जशी चिंचेवर वासना जावी तशी उत्कृष्ट स्त्रियांचा उपभोग घेतल्यानंतरची तुझी ही इच्छा आहे!" राजा शकुंतलेच्या दैवी लावण्याचें जेव्हां यथार्थ वर्णन करतो तेव्हां "असें असेल तर जगांतील सर्व सुंदर स्त्रियां आतां मागें पडल्या बरें कां!" असें विदूषक बावळट चेहरा करून म्हणतो, तेव्हां प्रेक्षकांच्या पोटांत हास्याच्या उकळ्या फुटल्यावांचून रहात नाहींत! शकुंतलेसारखें 'न हुंगिलेलें पुष्प' आणि 'अविंधलें मौक्तिक' कोणाच्या नशिबीं वसविण्याचें ब्रह्मदेवाच्या डोक्यांत आहे कोणास ठाऊक. अशा काळजीनें जेव्हां राजा चिंतातुर होतो तेव्हां 'मग लवकर तिला सोडीव रे बाबा! नाहीं तर इंगुदीच्या तेलानें मेणचट झालेल्या एकाद्या रुक्ष तपस्वी बुवाच्या ती हातांत लागायची' असें म्हणून विदूषक जी भीति व्यक्त करतो, तीं मोठी हास्यकारक आहे. राजा आपल्या आणि शकुंतलेच्या भेटीचें आणि प्रथम दर्शनीं दोघांमध्यें घडलेल्या संवादाचें नि उत्पन्न झालेल्या भावनेचें जेव्हां रसदार वर्णन करतो तेव्हां विदूषक मिटक्या मारीत राजाला शाबासकी देतों कीं, "तूं तर या तपोवनाचें उपवन करून टाकले आहेस रे बुवा!" तपोवनाचें उपवन करून टाकलें ही कल्पना खरोखरच अतिशय हृदयंगम आणि विनोदी आहे. निदान सामान्य विदूषकांच्या तोंडून तरी कांहीं ऐकावयाला मिळावयाची नाहीं.

शकुंतलेच्या भेटीसाठीं राजा अतिशय उतावीळ झालेला असतो; पण त्याला स्वतःचें शिबीर सोडून आश्रमांत जाण्यासाठीं काय निमित्त शोधून काढावें हें सुचत नाहीं. अशा वेळीं आश्रमामध्यें यज्ञकार्याला सुरवात होणें आणि त्या कार्यांत राक्षसांनीं कांहीं विघ्न निर्माण करूं नये म्हणून राजानें आश्रमांत येऊन रहावें आणि आश्रमाचें रक्षण करावें अशी विनंति करण्यास कांहीं ऋषी राजाकडे येतात. राजा त्यांची विनंति एकदम मान्य करतो. हो घटनाहि विनोदी आहे असें म्हणतां येईल. विदूषक राजाच्या कानांत हळूंच पुटपुटतो देखील कीं, "ही विनंति ह्यावेळीं तुझ्या चांगलीच पथ्यावर पडली आहे!" आश्रमांतील धर्मक्रिया निर्विघ्नपणें चालल्या आहेत कीं नाहीं हें पहाण्यासाठीं राजानें आपली नेमणूक केली आहे अशी थाप शकुंतलेला आणि तिच्या सख्यांना आरंभी जी दुष्यंतानें दिलेली

आहे तो शेवटी खरीच ठरून मोठी मौज निर्माण होते. पण याच सुमारांस राजधानीकडे तांतडीनें परत निघून येण्याविषयीं राजमातेचा राजाला निरोप येतो. येथें दुसरी विनोदी घटना निर्माण होते! आतां आश्रमांत जायचे कीं राजधानीकडे जायचे? एकीकडे शकुंतलेचा चटका तर दुसरीकडे आईच्या रागाचा फटका! राजाला काय करावें तेंच कळेना! विदूषक त्याला म्हणाला, 'बैस, आतां त्रिशंकूसारखा मध्येंच लोंबत!' पण राजा थोडाच त्रिशंकूसारखा लोंबत बसणार? त्यानें विदूषकालाच बनविलें आणि स्वतःची सोयीस्कर सोडवणूक करून घेतली! आजपर्यंत विनोदी पात्रें इतर गंभीर पात्रांना 'बनवून' त्यांची थट्टा करीत असत. पण विनोदी पात्राला बनवून त्याला हास्यविषय केला असल्याचें हें एक अपूर्व उदाहरण आहे.

राजा आपले सारे सैन्य विदूषकाच्या ताब्यांत देऊन त्याला मोठ्या थाटामाटानें राजधानीला पाठवून देतो. विदूषकाला वाटतें कीं आपण जणूं काय युवराजच झालों! तथापि, राजधानीला पोहोंचल्यानंतर जनानखान्यांत जाऊन हा मठ्ठ माणूस कांहींतरी गोंधळ घालील म्हणून राजानें विदूषकाला आणखी 'बनविण्याचा' प्रयत्न केला. तो म्हणाला, "मघाशी मी तुला शकुंतलेबद्दल जें सांगितलें ती सर्व थट्टा बरें काय! नाहीं तर तूं तें खरेंच समजशील आणि सारा घोटाळा होईल! आम्ही कुठें, तो कुठें, कसचें प्रेम अन् कसचें काय घेऊन बसला आहेस! थट्टेंत माणूस जे बोलतों तें अगदीं अक्षरशः खरें मानावयाचें नसतें बरें कां!" भोळा बिचारा विदूषक! थट्टा अक्षरशः खरीं मानावयाची नाहीं हे राजाचें म्हणणें त्यानें ऐकले आणि राजाच्या गंभीर बोलण्यावर शब्दशः विश्वास ठेवून शेवटीं राजाची थट्टा त्याच्यावर अशी कांहीं त्यानें उलटवून दिली कीं, राजाला त्याबद्दल चांगलीच जन्माची अद्दल घडली! थट्टेची मस्करी कशी होते आणि त्या मस्करीची शेवटीं कुस्करी कशी होते यांचें हें चांगलें उदाहरण आहें. पांचव्या अंकांत जेव्हां माहेराहून शकुंतला आपल्या पतिगृहीं येते आणि 'मी तुझी लग्नाची बायको आहे' असें राजाला सांगते तेव्हां दुर्वासाच्या शापानें स्मृतिभ्रंश झाल्यामुळें राजा शकुंतलेला मुळींच ओळखूं शकत नाहीं! राजाचा त्यांत कांहींच दोष नसतो. विदूषक तेथें शेजारीं उभा असतो. कण्वाश्रमांत राजा मृगया करावयाला गेला असतां त्याचें

शकुंतलेवर प्रेम बसलें होतें ही गोष्ट राजानें त्याला सांगितलेली होती. तेव्हां शकुंतला सांगते तेवढ्या सर्व भानगडी करण्याइतकें आपले राजेसाहेब रंगेल आणि 'लफडेबाज' आहेत हें न ओळखण्याइतका विदूषक कांहीं गाढव नव्हता. तथापि, तो मुकाट्यानें तोंड मिटून सर्व गोष्टी पहात होता. कारण राजानें त्याला सांगून ठेवले होते कीं, आपण शकुंतलेबद्दल जे कांहीं बोललों तीं नुसती थट्टा होती. आणि थट्टेतलें बोलणें खरें मानावयाचें नसतें ! राजाची आज्ञा विदूषकानें शब्दशः पाळली म्हणूनच त्याला आणि शकुंतलेला अनेक वर्षेपर्यंत हाल अपेष्टांच्या दिव्यांतून जावें लागलें. किंवहुना, नाटकांतील शेवटच्या तीन अंकामधील दुःखकारक घटनेला केवळ विदूषकच जबाबदार आहे, असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. मूर्ख माणसाची थट्टा केली म्हणजे परिणाम किती भयंकर होतो हें शाकुंतल नाटकांत कालिदासानें स्पष्टपणें दाखविलेलें आहे. विदूषकानें पांचव्या अंकांत तोंड उघडलें असतें तर दुष्यंत शकुंतलेचें मीलन होऊन मोठ्या आनंदीआनंदांत नाटक संपलें असतें. पण विदूषकाच्या अकलेमुळें जो हा सारा गोंधळ माजला तो कितीहि यातनाकारक असला तरी सर्व गोष्टी समाधानकारक तऱ्हेनें मिटल्यानंतर मागाहून विदूषकाच्या मूर्खपणाची आठवण होऊन प्रेक्षकांना हंसूं कोसल्यावांचून कांहीं रहात नाहीं. या दृष्टीनें ह्या साऱ्या कथाभागांत कालिदासाची विनोद-प्रतिभाच विहार करीत आहे असें सूक्ष्म दृष्टीनें पहाणारास आढळून येईल.

तिसऱ्या अंकांत शकुंतलेला मदनबाधा झालेली असते अशा गोष्टींचा आश्रमांत रहाणाऱ्या प्रियंवदा आणि अनुसयेला कोठून अनुभव असणार ? शकुंतलेला झालेले विकार हा दुष्यंताच्या दर्शनामुळें उद्भवलेली एक विकृति असावी असें सुचवतांना अनुसया शकुंतलेला जें बोलतें तें ऐकून कोणत्या जाणत्या माणसाला हंसूं येणार नाहीं ? ती म्हणतें, "गडे शकुंतले, प्रेमविषयक गोष्टींत आम्हां दोघांनाहि खरें म्हटलें तर कांहीं कळत नाहीं. पण गोष्टींच्या पुस्तकामधून जी प्रेमी जनाची स्थिति वर्णन करण्यांत येते तशी तुझी अवस्था झालेली मला दिसत आहे !" राजा शकुंतलेचें जेव्हां चुंबन घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हां वृद्ध गौतमीबाई मध्येंच येऊन 'लडमडतात' आणि राजाची चांगलीच फजिती उडते, हा देखील एक गंमतीचा विनोदी प्रसंग आहे, असेंच म्हणावें लागेल. प्रणयप्रसंग ऐन रंगांत आला असतांना वडील माणसें तेथें उपस्थित होऊन त्या रंगाचा बेरंग करतात हा

अनुभव कोणत्या गुलहौशी तरुणांना नाहीं ? शकुंतलेला झालेली मदनबाधा ही भूतपिशाच्च बाधा आहे असें समजून गौतमी आत्याबाई तिच्यावर तीर्थ शिंपडतात. तें दृश्य बघून कोणाला हंसूं लोटणार नाहीं ? आश्रमाच्या तपोगंभीर वातावरणांत शकुंतलेसारख्या तरुणीनें प्रेमपाशांत सांपडणें ही गोष्ट त्या वातावरणाशीं विसंगत असल्यानें त्या विसंगतीचा विनोदासाठीं उपयोग करून घेण्याची मार्मिक दृष्टि कालिदासानें दाखविलेली आहे. प्रेम विषयावरचें प्रियंवदा आणि अनुसया यांचें 'ऐकिव' ज्ञान आणि मंत्रतंत्रानें 'मदनबाधा' दूर करण्याचा गौतमी आत्याबाईंचा वेडगळ प्रयत्न हे या विसंगतीवर आधारलेल्या विनोदाचे नमुने आहेत.

यानंतर सहाव्या अंकांत राजाचे शिपाई कोळ्याला त्याच्या मुसक्या बांधून राजापुढें घेऊन येतात हाहि प्रसंग विनोदी आहे. राजाची आंगठी चोरल्याबद्दल चोराला शिरच्छेदाची शिक्षा कधीं होते आहे तें पहावयाला हे शिपाई अगदीं उत्सुक झालेले असतात. पण कोळ्याला निर्दोषी म्हणून सोडून देण्याची जेव्हां राजाकडून आज्ञा होते, उलट त्याला आंगठीच्या किंमती एवढें बक्षिस देण्यासाठीं जेव्हां राजा सांगतो तेव्हां कोळ्याकडे पहाण्याची त्या शिपायांची दृष्टि एकदम बदलून जाते ! कोळ्याच्या हातांत पैसे पडलेले दिसतांच कोतवालसाहेब तर त्याचे एकदम परम स्नेही बनतात आणि त्याला घेऊन मजा करावयाला दारूच्या गुत्त्यावर जातात. राजाच्या शिपायाच्या स्वभावाचें कालिदासानें केलेलें मार्मिक विश्लेषण आजच्या काळांतील कांहीं पोलिस शिपायांना जसेंच्या तसे लागूं पडतें ! शिपायांच्या स्वभाववैशिष्ट्यावर कालिदासानें आधारलेला हा विनोद कोणालाहि सहज पटणारा आहे.

येथपर्यंत 'शाकुंतल' नाटकांतील बहुतेक सर्व शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ आणि स्वभावनिष्ठ विनोदाचें मी समालोचन केलेलें आहे. त्यावरून कालिदासाची प्रतिभा ही केवळ कवीची प्रतिभा नसून श्रेष्ठ विनोद-पंडिताला आवश्यक असणारें सामर्थ्यहि त्याच्या बुद्धीमध्यें होतें याचा कोणालाहि पडताळा पटल्यावांचून रहाणार नाहीं. हास्यविनोदाबद्दल स्वतः कालिदासाला काय वाटत होतें हेंहि त्यानें 'शाकुंतल' नाटकाच्या दुसऱ्या अंकाच्या शेवटीं सांगून ठेवलेलें आहे. हें वचन दुष्यंत राजानें विदूषकाला जरी 'बनविण्या'साठीं म्हणून वापरलें

असलें तरी ह्या वचनांतील सत्यता अबाधित आहे आणि ती कालिदासाला अभिप्रेत होती, असें समजावयाला कांहीं हरकत नाहीं. तें वचन म्हणजे—

" परिहासविजल्पितं सखे
परमार्थेन नु गृह्यमतां वचः ! "

विनोदानें बोललेल्या गोष्टींचा अर्थ शब्दशः घ्यावयाचा नसतो हा कालिदासाचा विनोदाबद्दल संदेश आहे. हा संदेश जर खरोखर लोकांच्या ध्यानांत येईल तर एरव्ही थट्टामस्करीमुळें निर्माण झालेली कितीतरी भांडणें वांचतील आणि विनोदामुळें देवघेवीचें आणि खेळाडूपणाचें वातावरण समाजांत पसरावयाला पाहिजे हा खऱ्या विनोदाचा जो मुख्य हेतु आहे तो साध्य झाल्यावांचून रहावयाचा नाहीं !

भारताचा महान् मूर्तिभंजक : १ १०

अस्पृश्य वर्गाचे महान् पराक्रमी आणि क्रांतिकारक पुढारी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या वयाला आज पंचावन्न वर्षे पुरीं होत आहेत. उद्यांपासून यांच्या वयाला छप्पन्नावें वर्ष लागणार आहे. उद्यांची ही त्यांची पंचावन्नावी जयंती हिंदुस्थानांतील सहा कोटी अस्पृश्य जनता मोठ्या भक्तिभावानें आणि हर्षानें साजरी करील. आनंदाच्या ह्या त्यांच्या उत्सवांत भागीदार होण्याची आम्हालाहि इच्छा आहे. म्हणून 'नवयुग'च्या सहस्रावधि वाचकांच्या वतीनें आंबेडकरांच्या पंचावन्नाव्या वाढदिवशीं अत्यंत आदरानें आम्ही त्यांना अभिवादन करतो, आणि उत्तम आरोग्य अन् दीर्घायुष्य त्यांना लाभो असें अंतःकरणापासून आम्ही इच्छितो. डॉक्टर आंबेडकर यांच्या अगाध बुद्धिमत्तेबद्दल, विशाल विद्वत्तेबद्दल आणि प्रचण्ड कर्तृत्वाबद्दल आमच्या मनांत पहिल्यापासूनच नितांत आदर आहे. हा आदर आम्ही अनेक वेळां व्यक्त केलेला आहे. तथापि, राजकीय मतभेदामुळें गेलीं कित्येक वर्षे त्यांच्यावर आणि त्यांच्या पक्षावर आम्हांला टीका करावी लागली. अत्यंत कठोर शब्दामध्यें त्यांच्या धोरणावर आम्हाला प्रहार करावें लागले. महात्मा गांधींच्या आणि काँग्रेसच्या राजकारणावर आंबेडकरांनीं आजपर्यंत जे निकराचे हल्ले चढविले तेंहि कांहीं कमी क्रूर आणि प्राणघातक नव्हतें. आंबेडकरांनीं काँग्रेसचे जेवढें वाभाडे काढलें, तेवढे काँग्रेसभक्तांनींहि त्यांच्या पक्षाचें काढले. कोणी कोणाची गय केली नाहीं किंवा कोणी कोणावर दया दाखविलेली नाहीं. गेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूकीमध्यें दोघां पक्षामधला हा विरोध फारच विकोपाला गेला. निवडणूकीं जिंकण्यासाठीं दोघांनाहि आकाश पाताळ एक करावें लागले. कारण अपयश म्हणजे आत्मनाश हें दोन्हहीं पक्ष ओळखून होतें. दोघांनाहि आपल्या सामर्थ्याचा सारखाच गर्व होता.

म्हणून 'माझा ह्या निवडणूकींत पराभव झाला तर डोक्यावर मी गांधी टोपी चढवीन !' असें आंबेडकरांनीं कॉंग्रेसला छातीठोक आव्हान दिलें ! कॉंग्रेसनें त्या आव्हानाचा स्वीकार केला. आणि आंबेडकरांच्या एकूण एक उमेदवारांचा पराभव करून 'आतां कधीं घालतां डोक्यावर गांधी टोपी !' असा त्यांनाच उलटा सवाल केला.

★

मध्यवर्ति आणि प्रांतिक निवडणूकींत कॉंग्रेसला प्रचंड यश मिळालें. साऱ्या देशांत कॉंग्रेसचा जयजयकार झाला. त्या जयजयकाराला "पुणें करार रद्द करा !" अशा हजारों आरोळ्यांचा जबाब मिळाला. प्रांताप्रांतामधाल्या कॉंग्रेस सरकारविरुद्ध आंबेडकरांनीं सत्याग्रहाची मोहीम सुरूं केली. या मोहिमेमुळें स्पृश्य आणि अस्पृश्य समाजांतील तेढ जास्तच वाढली आणि पक्षविरोधाला जातीय कलहाचें हिंस्र स्वरूप मिळालें. धर्मांतराच्या चळवळीपासून सामान्य हिंदुसमाज आंबेडकरांवर आधींपासूनच उखडला होता, त्यानें त्या रागाचा या जातीय दंगलींत चांगलाच वचपा काढून घेतला. त्यामुळें अस्पृश्य वर्गाचा संताप अधिकच अनावर झाला. आणि मुस्लिम लीगला जाऊन मिळण्याची भाषा तो उघडपणें बोलूं लागला. स्पृश्य आणि अस्पृश्य समाज एकमेकांपासून कायमचे दुरावले जाणार एवढेंच नव्हें तर, जगाच्या अंतापर्यंत ते परस्परांचे कट्टर दुष्मन् रहाणार अशी भयाण चिन्हें जेव्हां दिसूं लागलीं, तेव्हां आमच्यासारख्या कांहीं पुरोगामी कॉंग्रेस भक्तांच्या काळजाचा ठावच सुटला. नऊ कोट मुसलमानांना खूष करण्यासाठीं कॉंग्रेस आपल्या जीवाचा जेवढा आटापीटा करते, त्याच्या निम्म्यानें सुद्धां सहा कोटी अस्पृश्यांचें समाधान करण्याचा ती प्रयत्न करीत नाहीं, हा उघड उघड अन्याय आहे असे उद्गार अनेक प्रामाणिक कॉंग्रेस-जनांच्या तोंडून निघूं लागले. अशा परिस्थितींत सतरा डिसेंबर रोजीं घटना समितीमध्यें डॉ. आंबेडकर यांनीं अखंड हिंदुस्तानची आणि जातीय ऐक्याची प्रचंड गर्जना केली ! ती ऐकून कॉंग्रेसमधलें त्यांचे सारे विरोधक अक्षरशः कोल-मडून पडले. आणि त्यांच्यावर दगड मारण्यासाठीं उगारलेले हिंदु समाजांतील लक्षावधि हात त्यांच्यावर पुष्पवृष्टि करण्यासाठीं एकदम वर झाले. जगांतील कोणतीहि संस्था या देशांतील ऐक्याच्या आड येऊं शकणार नाहीं. आणि अखंड

हिंदुस्तानांतच आपलें कल्याण आहे असें आज ना उद्यां मुसलमानांनाहि कळून येईल, ही आंबेडकरांच्या मुखांतून बाहेर पडलेली दोन अमर सत्यें होत. तीं ऐकून आम्ही स्वतः आंबेडकरांवर येवढें खूष झालों कीं यापुढें त्यांच्याविरुद्ध एक अक्षरेहि आपण आतां लिहावयाचें नाहीं अशी गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र दिवशीं आम्ही शपथ घेतली, ती 'नवयुग' च्या वाचकांना माहितच आहे. देशाच्या स्वातंत्र्यप्रयत्नांत आंबेडकर आणि त्यांचे कोट्यावधि अनुयायी सामील व्हावेत म्हणून ते जें मागतिल तें काँग्रेसनें त्यांना देण्यास आतां कबूल व्हावें असें त्या दिवसापासून आमचें मत झालें. वीस फेब्रुवारीला ब्रिटिश पंतप्रधान ह्यांनीं 'छोडेंगे हिंद' ची घोषणा केल्यानंतर तर हें मत अधिक दृढ झालें. कारण देशाच्या राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्नच आतां मिटला. आतां जातीय ऐक्याचा प्रश्नच काय तो बाकी उरला आहे. अठ्ठेचाळीसच्या जूनच्या आंत काय वाटेल तें करून हा प्रश्न आपल्याला मिटवलाच पाहिजे. म्हणून आंबेडकर आणि त्यांचा अस्पृश्य पक्ष अन् काँग्रेस आणि स्पृश्य हिंदुसमाज ह्यांची तडजोड कशी घडवून आणतां येईल याचा आम्हीं उत्कटतेनें विचार करूं लागलों. आंबेडकरांबद्दलचा पूर्वीचा विरोध आम्ही विसरलों आणि मनांतलें पूर्वग्रह आम्ही काढून टाकले. प्रेमानें आणि आपलेपणानें आम्ही त्यांच्याकडे पाहूं लागलों. त्यावरोबर त्याच्या व्यक्तिमत्वाचें आणि कर्तृत्वाचें जें आम्हांला ओजस्वी दर्शन झालें त्यानें आमचे डोळे आणि अंतःकरण अक्षरशः दिपून गेलें. आणि आमची मान आदरानें एकदम खालीं नमली. म्हणूनच त्यांच्या पंचावन्नाव्या वाढ दिवशीं अत्यंत प्रेमानें आणि सद्भावानें आम्ही त्यांना हें अभिवादन करीत आहोंत !

गेल्या पन्नास वर्षांमध्यें तरी माणसाचें मूल्यमापन राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनें करण्याची हिंदुस्तानच्या जनतेला संवय जडलेली आहे. त्यामुळें राष्ट्रीय राजकारणाचा जो पुरस्कार करतो त्याला लोक पायांखालीं तुडावितात. मनुष्य कितीहि विद्वान् असो, कर्तृत्ववान् असो किंवा चारित्र्यसंपन्न असो, त्याची राजकीय मतें जर राष्ट्रीय चळवळीच्या विरुद्ध असतील तर लोक त्याच्या विद्वत्तेकडे, कर्तृत्वाकडे किंवा चारित्र्याकडे ढुंकूनहि पहावयाला तयार होत नाहींत. किंबहुना असा माणूस हा विद्वान्, कर्तृत्ववान् किंवा नीतिमान् मुळीं असूंच शकत नाहीं असेंच लोक

धरून चालतात. हें लिहित असतांना नामदार गोखले यांचें उदाहरण डोळ्यांसमोर उभें रहातें. लोकमान्य टिळकांच्या प्रभावी राजकारणावर आषक झालेली जनता, त्यांना त्यावेळीं विरोध करणाऱ्या नामदार गोखल्यांना काय शिव्या देत होती हें लहानपणीं आमच्या कानांनीं आम्ही ऐकलेलें आहे. त्या शिवीगाळींत कधीं कधीं आम्ही देखील सामील झालेलों होतों. टिळकप्रेमानें आंधळ्या झालेल्या महाराष्ट्रानें त्यावेळीं गोखल्यांचा जो अनन्वित छळ केला त्याची आठवण झाली कीं खरोखर अंगावर शहारा येतो. गोखल्यांच्या विरुद्ध कांहींहि लिहावयाचें किंवा बोलावयाचें लोकांनीं बाकी ठेवलें नाहीं. पण अलिकडच्या काँग्रेसच्या जमान्यांत गोखल्यापेक्षांहि आंबेडकरांचा जास्त छळ झाला. कारण गोखले ब्राह्मण होते. स्पृश्य हिंदु होते; पण आंबेडकर पडेल अस्पृश्य महार. शिवाय गोखल्यापेक्षां त्यांची वृत्ति पडली जास्त लढाऊ आणि बंडखोर ! त्यामुळें त्यांच्या छळाला कांहीं सीमाच राहिली नाहीं. त्यांच्याबद्दल जेवढें म्हणून गैरसमज करून घेतां येतील आणि त्यांच्या कार्याचा जेवढा म्हणून कांहीं विपर्यास करून घेतां येईल तेवढा बहुसंख्य समाजानें आजपर्यंत करून घेतला. त्यामुळें आंबेडकरांच्या जीवनाबद्दल त्यांच्या आचाराबद्दल, त्यांच्या विचाराबद्दल, त्यांच्या मताबद्दल, त्यांच्या आकांक्षाबद्दल बहुसंख्य समाजाला कांहींएक माहिती नाहीं. आंबेडकर हे हिंदूं धर्माला, काँग्रेसला आणि गांधींना शिव्या देतात, वेद, पुराणें आणि मनुस्मृति जाळून टाका असें म्हणतात, आणि हिंदु धर्म सोडून आपण दुसऱ्या धर्मांत जाणार असें अधून मधून सांगतात, एवढेंच काय ते त्यांच्याबद्दल सामान्य माणसांना ठाऊक आहे. म्हणून राजकीय पूर्वग्रहाचा काळा चष्मा डोळ्यावरून काढून टाकल्यावांचून आंबेडकरांच्या जीवनाचें आणि व्यक्तिमत्वाचें देदिप्यमान स्वरूप जनतेला कळून द्यावयाचें नाहीं. आणि आंबेडकरांचें हें तेजस्वी दर्शन झाल्याखेरीज त्यांच्याबद्दल आदर आणि प्रेम स्पृश्य समाजाच्या अंतःकरणांत निर्माणहि होणार नाहीं.



डॉ. आंबेडकरांएवढा प्रचंड बुद्धीचा, विद्वत्तेचा आणि कर्तृत्वाचा दुसरा एकहि महाराष्ट्रीय माणूस आज आम्हाला तरी दिसत नाहीं ! भांडारकर, टिळक, रानडे, तेलंग, केतकर आणि राजवाडे त्यांचीं निर्भेळ ज्ञानोपासनेची परंपरा तितक्याच तपश्चर्येनें आणि अधिकारानें पुढे चालवणारा महर्षी महाराष्ट्रांत आज कोण आहे हें

आम्ही विचारतो ! वाचन, चिंतन आणि लेखन ह्याखेरीज आंबेडकरांना दुसरें जीवनच राहिलेलें नाहीं ! ज्या ज्या विद्वानांना आपल्या व्यवसायाचा आणि व्यासंगाचा अभिमान वाटत असेल, त्यांनीं ज्ञानाचें अग्निहोत्र आपल्या प्रचंड ग्रंथालयांत अहर्निश पेटवून बसलेल्या ह्या ज्ञानयोग्याचें एकवार दर्शन घ्यावे म्हणजे त्याचा तो वृथा अभिमान तेथल्या तेथें जिरून जाईल ! महार जातींत जन्माला आलेला हा माणूस वृत्तीनें, व्यासंगानें आणि अधिकारानें ब्राह्मणापेक्षांहि अधिक श्रेष्ठ आणि पवित्र असा ब्राह्मण आहे ! एवढेंच नव्हे तर 'ब्रह्मर्षि' ह्या श्रेष्ठ पदवीपर्यंत जाऊन तो पोहोचलेला आहे. ज्या कोणा सनातनी ब्राह्मणाला आपल्या जन्मजात ब्राह्मण्याची घमेंड असेल त्यांनीं ह्या कर्मजात 'ब्राह्मणा'च्या घरांत जाऊन त्याचे शुचिर्भूत, सोज्वळ आणि ज्ञानमय जीवन पहावें, म्हणजे श्रीमुखांत बसल्यासारखा चेहरा करून नाहीं तो बाहेर पडला तर तुम्ही सांगाल तें आम्ही मान्य करूं ! आतांपर्यंत आंबेडकरांनीं लिहिलेले ग्रंथ पाहिले आणि पुढें ते लिहिणार असलेले ग्रंथ विचारांत घेतले, म्हणजे त्यांची विशाल विद्वत्ता बघून कोणीहि थक्क झाल्यावांचून रहाणार नाहीं ! धर्मशास्त्रापासून घटनाशास्त्रापर्यंत असा कोणताहि एक कठीण विषय नाहीं कीं ज्यामध्यें त्यांची प्रतिभा लीलेनें विहार करूं शकत नाहीं. गहन विषयाचें संशोधन करण्याचा त्यांचा हव्यास तर कोशकार केतकर आणि इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या जातीचा आहे. आंबेडकरांच्या विद्वत्तेचें आणि व्यासंगाचें प्रतिबिंब त्यांच्या धार्मिक आणि राजकीय विचारसरणीमध्यें पूर्णपणें पडलेलें आहे. त्यामुळें त्यांच्या उच्चाराला आणि विचाराला एकप्रकारचा भारदास्त वजनदारपणा प्राप्त झाला आहे. मूळच्या त्यांच्या बंडखोर स्वभावांत सतत अभ्यासानें प्राप्त झालेल्या खंबीर आत्मविश्वासाची भर पडल्यानें, त्यांच्या भाषणांत आणि लेखनांत एकप्रकारची बेदरकार निर्भयता निर्माण झालेली आहे. म्हणून आपण जें बोलतों आहोंत किंवा सांगतों आहोंत तें खोटें आहे असें दाखविण्याची प्रत्यक्ष परमेश्वराची देखील प्राज्ञा नाहीं असा आवेश आणि उद्दामपणा त्यांच्या भाषणांत किंवा लेखनांत धगधगत असल्याचा आपल्याला भास होतो. त्यांतून, पहिल्या दर्जाचे ते कायदेपंडित असल्यानें तर्कशुद्ध वादविवाद करण्याचें कामी ते कोणालाहि सहजासहजीं हार जाणारे नाहींत.

आपल्या बिनतोड कोटिक्रमानें ते आपल्या प्रतिस्पर्ध्यांची बंभेरी उडवून टाकतात. त्यांचे विरोधक त्यांच्याविरुद्ध मनांतून खूप चरफडतात. पण त्यांच्या भेदक कोटिक्रमाला प्रत्युत्तर देण्याचें त्यांना धैर्य होत नसल्यामुळें त्यांची उपेक्षा किंवा उपहास करणें एवढाच आत्मसंरक्षणाचा मार्ग त्यांना मोकळा रहातो. आंबेडकरांच्या बौद्धिक तपश्चर्येचें सामर्थ्य ज्यांना माहित आहे ते त्यांना अतिशय वचकून तरी असतात नाहींतर ते त्यांच्या कधीं वाटेलाहि जात नाहींत !



भारतीय जीवनांत जें जें म्हणून कांहीं उज्ज्वल आणि उदात्त आहे, त्याबद्दल डॉक्टरांच्या अंतःकरणांत अभिमानाचें ज्वलंत भांडार भरलेलें आहे. किंबहुना, डॉक्टर म्हणजे स्वाभिमानाचा एक जळता ज्वालामुखीच होत. अखंड हिंदुस्थानबद्दल त्यांना प्रचंड अभिमान आहे. कोणत्याहि प्रश्नाकडे प्रांताच्या किंवा भाषेच्या कोणत्या.दृष्टीनें पहावयाला ते मुळीं तयारच नाहींत. या देशामध्यें प्रत्येक प्रांताची किंवा जातीची निरनिराळी संस्कृति असूं शकते आणि त्या भिन्न भिन्न संस्कृतिचे विशेष जपणूकीनें रक्षण केलें पाहिजे असा कांगावा करणाऱ्यांना कच्चे खाऊन टाकावें असें त्यांना वाटतें. "संस्कृति म्हणजे काय आहे ?" असे ते नेहमीं रागानें ओरडून विचारतात, "डाव्या बाजूनें पदर घ्यायंचा कीं उजव्या बाजूनें ? मिरची कमी खायची कां जास्ती ? हीच ना तुमची संस्कृति ?" एक देश, एक भाषा, आणि एक संस्कृति हा राष्ट्रीय उद्धाराचा महामंत्र ते एकसारखे जपत असतात. सबंध हिंदुस्तानची एक भाषा असावी याची डॉक्टरांना विलक्षण तळमळ लागून राहिली आहे. "प्रांतिक भाषांची मला मुळींच पर्वा नाहीं. त्याची मागाहून व्यवस्था करतां येईल ! साऱ्या देशाला आधीं एका भाषेंत बोलायला शिकवा, म्हणजे बघा काय चमत्कार होतो आहे तो !" असे ते नेहमीं म्हणत असतात. एक राष्ट्राचा हा कट्टर पुरस्कर्ता महाराष्ट्राच्या पराक्रमी परंपरेचा, भाषेचा आणि प्राचीन साहित्याचा तितकाच कडवा अभिमानी आहे. डॉक्टरांच्या सारखी सोपी, सुंदर आणि प्रभावी मराठी भाषा लिहिणारे आणि बोलणारे विद्वान् महाराष्ट्रांत कितीसे आहेत ? मराठी संत वाङ्मय तर अहर्निश त्यांच्या मनीमुखी घोळतें आहे. संस्कृत भाषेवरील त्यांच्या प्रेमाला तर मर्यादाच नाहीं ! त्या भाषेंत ज्ञानाचा आणि सौंदर्याचा महासागर हेलावतो आहे असें ते म्हणत असतात. आणि

आपल्या अस्पृश्यतेमुळें आपल्याला संस्कृत भाषेऐवजीं दरिद्री पर्शियन भाषा शिकावी लागली या विचारानें तर त्यांच्या सर्वांगाचा संताप होतो.

★

आंबेडकर हे हिंदुधर्मावर प्रखर टीका करतात. आणि 'मनुस्मृति जाळा' असें म्हणतात. यावरून ते चार्वाकापेक्षांहि भयंकर नास्तिक आणि गझनीच्या महंमदापेक्षांहि क्रूर हिंदुद्वेष्टे असले पाहिजेत अशी पुष्कळांनीं आपली समजून करून घेतलेली आहे, पण ही समजूत फार खोटी आहे. एका भाविक आणि श्रद्धाळू पित्याच्या पोटीं त्यांचा जन्म झाला आहे. आणि शुचिर्भूत धार्मिक वातावरणांत त्यांचे सारें लहानपण गेलेलें आहे. हिंदु, बुद्ध, ख्रिस्ती आणि इस्लाम या ह्या जगांतील प्रमुख धर्माचा अभ्यास करण्यांत त्यांचा तर सारा जन्म गेलेला आहे. ह्यांत त्यांच्या चिंतनशील स्वभावाची भर पडली असल्यामुळें त्यांची वृत्तीच मुळीं अध्यात्म बनलेली आहे. मनुष्याच्या शरीरापेक्षां त्याचा आत्मा अधिक महत्वाचा आहे आणि धर्मावांचून आत्म्याचा विकास होणें अशक्य आहे असें त्यांचें निश्चित मत आहे. मनुष्याच्या शरीराचा, बुद्धीचा आणि आत्म्याचा कोणत्या धर्मांमध्यें जास्तींत जास्त विकास होईल ह्यांची त्यांना चिंता लागून राहिलेली आहे. किंबहुना, तें त्यांच्या जीवनामधलें एक महान् प्रश्नचिन्हच होऊन बसलेलें आहे! हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्याच्या चौकटीनें त्या धर्माचा आणि ह्या देशाचा नाश झाला ह्याबद्दल त्यांची खात्री झालेली आहे. चातुर्वर्ण्याच्या दडपशाहीमुळें हिंदुधर्मांत मनुष्याची बौद्धिक आणि आध्यात्मिक उंची वाढूं शकत नाहीं. म्हणूनच केवळ त्यांना धर्मांतराची आवश्यकता वाटते. त्यांना हिंदुधर्म पाहिजे आहे, पण चातुर्वर्ण्य नको आहे. हिंदुधर्मांतील कांहीं दोष काढून टाकले तर तो धर्म किती महान् होईल ह्या त्यांच्या पुष्कळ ठिकाणच्या उद्गारांवरून त्यांच्या अंःतकरणाच्या तळाशीं हिंदुधर्माविषयीं गाढ प्रेम असावें असें निश्चित वाटतें. त्यांचा धर्मांतराची चळवळ ही हिंदुधर्माच्या विध्वंसाची नसून तीं हिंदुधर्माच्या सुधारणेची चळवळ होती. चातुर्वर्ण्याची हुकुमशाही नष्ट करून हिंदुधर्माची रचना समतेच्या आणि लोकशाहीच्या पायावर करा, असें टाहो फोडून ते सांगत आहेत. ह्यावरून ते काय हिंदुसमाजाचे आणि हिंदुधर्माचे कट्टर दुष्मन् ठरतात होय? धर्मांतराविषयीं बोलतांना ते एकदां म्हणाले, "मी आणि माझें अनुयायी मुसलमान झालों असतों तर कोट्यावधि रूपये आमच्या

समाजाच्या पायावर ओतले गेले असते हें तुम्हीं निश्चयानें समजा! माझ्या मनांत तसा सूड आणि द्वेष असता तर पांच वर्षाच्या आंत मी ह्या देशाचें वाटोळें करूं शकलों असतों. पण ह्या देशाच्या इतिहासांत विध्वंसक म्हणून स्वतःच्या नांवाची नोंद करून घेण्याची मला मुळींच इच्छा नाहीं!"



स्पृश्य-समाज आंबेडकरांवर सर्वांत जास्त कशामुळें जळत असेल तर तो महात्मा गांधी आणि कॉंग्रेस यांवरील त्यांच्या प्रखर आणि दाहक टीकेमुळें! त्यामुळें ते हिंदी राष्ट्राचे आणि स्वातंत्र्याचे दुष्मन् आहेत, असा त्यांच्याविरूद्ध कॉंग्रेसनिष्ठ जनतेमध्यें वारंवार प्रचार केला जात असे. जनाब जीनांच्या पावलावर पाऊल टाकून ते आपल्या जमातीसाठीं स्वतंत्र मतदार संघ मागत आहेत, अस्पृश्य जनतेसाठीं गांवोगाव 'अस्पृश्यस्थानें' त्यांना हवीं आहेत आणि देशांतील प्रतिगामी गटांशीं संगनमत करून ते हिंदी स्वातंत्र्याच्या प्रगतीचा मार्ग रोखून धरीत आहेत, असें विपर्यस्त स्वरूप सामान्य माणसाच्या दृष्टीनें त्यांच्या राजकारणाला प्राप्त झालें. किंबहुना अस्पृश्य वर्गांतील लोकांना भारी पगाराच्या आणि मोठमोठ्या नोकऱ्या मिळवून देण्यापलिकडे त्यांच्या राजकीय आकांक्षांना अधिक उदात्त आणि व्यापक स्वरूप नसलें पाहिजे, अशीच पुष्कळांनीं आपली कल्पना करून घेतली. म्हणून आंबेडकरांच्या राजकारणाविषयीं लोकांच्या झालेल्या ह्या सर्व समजुती चुकीच्या कशा आहेत हें आपण आधीं समजून घेतलें पाहिजे. ब्रिटिश सत्ता हा हिंदी स्वातंत्र्याच्या मार्गांतला एक मोठा अडथळा आहे ह्या एकाच कल्पनेवर गेलीं पंचवीस वर्षे कॉंग्रेसनें आपलें राजकारण चालविलेलें आहे. त्यामुळें ब्रिटिश लोक ह्या देशांतून गेले कीं देशाला स्वातंत्र्य मिळालें अशी कॉंग्रेसनें आपली समजूत करून घेतली होती. ही समजूत किती चुकीची आहे याचा सध्यां आपणांला जितका पडताळा येत आहे, तितका पूर्वी कधींच आलेला नाहीं. आंबेडकर हे लोकशाहीचे आणि समाजवादाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. जातिभेदाप्रमाणें पैशाचेहि सारे भेद त्यांना तोडून टाकावयाचे आहेत! स्वतंत्र हिंदुस्थानांत लोकशाही आणि समाजवाद प्रस्थापित करण्याच्या मार्गांत हिंदूसमाजांतले उच्च-नीच जातिभेद आणि अस्पृश्यता, हे एकाहून एक असे प्रचंड अडथळे आहेत अशी त्यांची समजूत आहे. देशांत चातुर्वर्ण्यप्रधान समाजरचना जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत समाजवाद या देशांत मूळ धरणें अशक्य आहे, असें त्यांना निश्चयानें वाटतें.

भांडवलशाहीची तर त्यांना अतिशयच चीड आहे. सत्ताधारी आणि धनिक वर्गानें श्रमजीवि अस्पृश्यांची धार्मिक छळावरोबर किती राक्षसी आर्थिक पिळवणूक केली ह्याची कल्पना त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाला असणार बरें? राष्ट्रवादाच्या सोज्वळ नांवाखालीं शेतकरी आणि कामकरी वर्गाला गिळणाऱ्या भेसूर भांडवलशाहीचे प्रतिनिधी काँग्रेसच्या छावणीमध्यें उजळ माथ्यानें वावरत असलेले आंबेडकरांच्या भेदक दृष्टीला दिसले नसतील, असें कसें म्हणावें?

★

अशाही परिस्थितींत साम्राज्यशाहीविरोधाच्या पातळीवर आंबेडकर आणि काँग्रेसचीं एकजूट होऊं शकली असती. पण, अस्पृश्यतानिवारणाबाबत काँग्रेसनें जी एक भूमिका घेतली तिच्यामुळें काँग्रेसशीं सहकार्य करणें आंबेडकरांना अगदीं अशक्य होऊन बसले. अस्पृश्यतानिवारण हा महात्मा गांधींच्या जीवनांतला एक महान् निदिध्यास आहे. त्यांच्याच प्रयत्नामुळें हा प्रश्न काँग्रेसच्या कार्यक्रमामध्यें समाविष्ट झाला, हें खरें. पण अस्पृश्यतानिवारणाकडे बघण्याचा गांधींचा दृष्टिकोण हा सर्वस्वी भूतदयावादी आणि भावनाप्रधान आहे. अस्पृश्यतानिवारणाकडे आंबेडकर हे शुद्ध न्यायाच्या नि समतेच्या दृष्टीनें पहातात. कायद्याच्या मदतीनें स्पृश्य समाजाइतकी सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठा अस्पृश्य-वर्गाला प्राप्त करून देणें, हा अस्पृश्यतानिवारणाचा एकच मार्ग आहे, असें त्यांना वाटतें. महाराला 'हरिजन' म्हणून त्याला 'सोंवळा आणि पवित्र' बनविणें म्हणजे त्याच्या आत्मोद्धाराच्या बुंध्याशीं कुऱ्हाड घालण्यासारखें आहे, असें ते म्हणतात. 'महाराला महार' आणि 'भंग्याला भंगी' म्हटलें तरच तो अस्पृश्यतेविरुद्ध चवताळून उठतो आणि बंड करावयाला तयार होतो असें त्यांचें मत आहे. महात्मा गांधींनीं आणि काँग्रेसनें अस्पृश्यतानिवारणाचें कांहींहि कार्य केलेलें नाहीं, हीं आंबेडकरांची भूमिका आम्हांला मान्य नसली तरी, ब्रिटिश साम्राज्यशाही देशांतून उखडून टाकण्यासाठीं महात्माजींनीं जसें निकराचें युद्ध केलें, तसें समाजांतील अस्पृश्यतेचें निर्दाळण करण्यासाठीं स्पृश्य समाजाविरुद्ध त्यांनीं बंड कां पुकारलें नाहीं, हा आंबेडकरांचा आक्षेप मात्र आम्हाला रास्त वाटतो. स्पृश्य समाजाच्या भावना न दुखविण्याच्या बाबतींत महात्माजी जो एवढा हळवेपणा दाखवितात, तो आम्हांला पटत नाहीं!

★

अस्पृश्यता हें स्पृश्य जनतेच्या हातून शतकानुशतकें घडलेलें एक पाप आहें; तें त्यांनींच पश्चातापपूर्वक धुवून काढलें पाहिजे, ही महात्माजींची भूमिका आहे. तर स्पृश्य समाजाला झालेल्या पश्चातापाबद्दल आणि अस्पृश्यतानिवारण करण्याच्या त्यांच्या पात्रतेबद्दल आंबेडकर हें पूर्णपणें उदासीन आहेत. अस्पृश्यांचा उद्धार अस्पृश्यच करूं शकतील आणि अस्पृश्यांनींच तो केला पाहिजे, हें त्यांचें सांगणें आहे. कॉंग्रेसनें आरंभापासून ही अस्पृश्यतानिवारणाची जोरदार भूमिका घेतली असती आणि आंबेडकरांशीं सहकार्य करून तो कार्यक्रम सर्वस्वी त्यांच्याकडेच सोंपवून दिला असता, तर आज सहा कोटी अस्पृश्य जनता कॉंग्रेसच्या बरोबर असल्याचें दृश्य जगाला दिसलें असतें ! 'हिंदुस्तानांतील अस्पृश्य वर्गाचा मीच केवळ एक नेता आहे,' हा गर्व महात्माजींनीं बाळगून आंबेडकरांच्या स्वाभिमानाला डंख केला नसता, तर सर्व अस्पृश्यांचा आपल्या नेतृत्वाखालीं एक कॉंग्रेसविरोधी गट बनविण्याची इच्छा त्यांना कधींहि झाली नसती. 'शेडयूल्ड कास्टस् फेडरेशन' हें महात्मा गांधींच्या अहंकाराला आंबेडकरांनीं दिलेलें प्रखर उत्तर आहे. ह्या पक्षांतील लोकांची आंबेडकरांबद्दलची जाज्वल्य निष्ठा बघून डोळ्यांत पाणीं येतें. आंबेडकर हें त्यांचें एकमेव दैवत होऊन बसलेलें आहेत. आंबेडकर सांगतील त्याकरितां प्राण देण्याची आणि सर्वस्वाचा होम करण्याची ह्या लोकांची तयारी आहे. इतकी लढाऊ संघटना देशांतील कोणत्याहि राजकीय पक्षाची नसेल ! महात्मा गांधींच्याबद्दल मनांत विरोधाची एवढी भावना असतांनाहि केवळ त्यांच्या इच्छेला मान देऊन आणि त्यांचे प्राण वांचविण्यासाठीं आंबेडकरांनीं 'पुणें करारा'वर सही केली, आणि अस्पृश्यांसाठीं स्वतंत्र मतदारसंघाची मागणी त्यांनीं मागें घेतली. 'पुणें करारा' नें अस्पृश्य-वर्गाचा फायदा झाला नाहीं, असें नाहीं. स्पृश्य हिंदूंच्या न्याय्य हक्काचा चांगलाच लचका तोडून महात्माजींनीं तो अस्पृश्यांच्या पदरांत टाकला. तथापि, ज्या भावनेनें आणि खेळाडू वृत्तीनें आंबेडकरांनीं 'पुणें करारा'वर सही केली, तें सहकार्य आणि तो खेळाडूपणा कॉंग्रेसनें मात्र पुढें आंबेडकरांशीं दाखविला नाहीं, हें अगदीं सत्य ! 'स्पृश्य हिंदू'च्या बहुमताच्या आधारावर माझें आणि माझ्या पक्षाचें राजकीय जीवन नेस्तनाबूत करण्याचा गांधींजीं आणि कॉंग्रेसनें प्रयत्न केलेला आहे' ह्या आंबेडकरांच्या आरोपाला उत्तर देण्याला निदान आमच्याजवळ तरी मुळींच तोंड नाहीं !

★

गांधीजी आणि आंबेडकर ह्यांच्या मनोभूमिकेंत आणि स्वभावांत एवढा मूलभूत विरोध असूनहि दोघांच्यामध्यें कांहीं कांहीं बाबतींत विलक्षण साम्य आहे, असें जर आम्हीं म्हणालों तर ऐकणाराला आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. सत्याबद्दल दोघांनाहि विलक्षण प्रेम आहे. सत्याच्या आग्रहासाठीं साऱ्या जगाशीं झुंज खेळण्याची दोघांचीहि तयारी आहे. दोघांच्याहि जीवनावर बुद्धधर्माचे विलक्षण संस्कार झालेले आहेत. आंबेडकर हे गांधीजींइतके अतिरिक्त अहिंसावादी नसले तरी हिंसेचा आंबेडकरांना मनापासून तिटकारा आहे. त्यांचा पिंड सनदशीर घटनावाद्याचा आहे. आणि म्हणूनच हिंसेपासून किंवा यादवीपासून कांहींहि निष्पन्न होणार नाहीं, असें ते आग्रहानें सांगतात. आत्म्याच्या उन्नतीसाठीं धर्माची आवश्यकता आहे, हें दोघांनांहि मान्य आहे. अध्यात्ममार्गावरून जाण्याची दोघांचीहि मनःप्रवृत्ति सारखीच आहे. अस्पृश्यतेबद्दल दोघांच्या मनांत अतोनात चीड आहे. आंबेडकर हे जातीनें 'महार' असले, तर महात्माजींनी 'भंगी' जातीचा स्वीकार केलेला आहे. त्यावरून अस्पृश्यतानिवारणाचें कार्य केवळ अस्पृश्य जातींमधले लोकच करूं शकतील, हें आंबेडकरांचें म्हणणें महात्माजींनाहि मान्य असल्याचें दिसतें. हिंदुमुसलमान ऐक्याची दोघांनाहि तळमळ आहे; पण मुसलमानांना खूष करण्यासाठीं त्यांना 'पाकिस्तान' देऊन टाकावें असे गांधीजी म्हणतात, तर मुसलमानांना आपला मूर्खपणा कळून यावा म्हणून त्यांना पाकिस्तान द्यावें असें आंबेडकर म्हणतात. अखंड हिंदुस्तानाबद्दल आणि हिंदुस्थानी राष्ट्रभाषेबद्दल दोघांनाहि सारखीच आस्था आहे. दोघांचेहि नैतिक चारित्र्य सारखेंच शुद्ध आणि उज्वल आहे. ब्रह्मचर्याचें पालन दोघेंहि आज तितक्याच निष्ठेनें करीत आहेत. दोघेहि सारखेंच हट्टी आणि बंडखोर आहेत. 'शरणागती' हा शब्दच मुळीं दोघांच्या शब्दकोशांत नाहीं. 'मोडूं, मार खाऊं, मरूं; पण वांकणार नाहीं' अशीच दोघांचीहि जबरदस्त जिद्द आहे! ह्या दोन विभूतिमध्यें इतकें साम्य असूनहि दोघांच्या स्वभावांत एक महत्वाचा फरक आहे. महात्माजींबद्दल आमच्या मनांत नितांत आदर असूनहि आम्हीं असें म्हणतों कीं, दुसऱ्याच्या विचारस्वातंत्र्याला अवसर देण्याची उदारता महात्माजीमध्यें नाहीं. महात्माजींचें म्हणणें ज्यांना मान्य नाहीं त्यांना त्यांच्याजवळ स्थान नाहीं. त्यांनीं त्याचें म्हणणें मुकाट्यानें एक मान्य तरी करावें, नाहींतर त्यांना सोडून दूर तरी निघून

जावे. याखेरीज त्यांच्याशी वागण्याचा दुसरा मार्गच नाहीं. महात्माजींच्या चुका दुसऱ्यांनीं दाखविल्या तर ते मान्य करीत नाहींत. आपल्या चुका जाहीरपणें कबूल करण्याचा हक्क जणूं कांहीं त्यांनीं स्वतःकडेच राखून ठेवलेला आहे. बहुतेक गांधीवादी लोक जे निर्जीव, नेभळे आणि गांधीजींच्या विडंबनासारखें हास्यास्पद भासतात ह्याचें कारण गांधीजींच्या स्वभावांतला हा प्रेमळ निष्ठुरपणा होय! गांधीजींचा हा स्वभावदोष थोड्याफार प्रमाणांत कॉंग्रेससंघटनेमध्येंहि उतरलेला दिसत आहे. ह्यामुळें कॉंग्रेसमध्यें ढोंग आणि बुवाबाजी यांचा फार सुळसुळाट झालेला आहे. महात्माजींना खूष करण्यासाठीं 'टिळा टोपी'चे वरकरणी सोंग केलें आणि कॉंग्रेसमध्यें सांगतील तेव्हां मान डोलावलीं किंवा हात वर केलें म्हणजे कॉंग्रेसमध्यें त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते, अशी आजची स्थिति आहे. आंबेडकरांसारखा स्वतंत्र प्रज्ञेचा आणि पराक्रमाचा महापुरुष गांधीजींच्या आणि कॉंग्रेसच्या अशा पोलादी चौकटींत आणि शिस्तींत समाविष्ट होणें हें अशक्यच गोष्ट होती. निरर्थक परंपरेचें, शिस्तींचें आणि नियमांचें अवडंबर आंबेडकरांनीं कधींहि मान्य केलें नव्हतें! आंबेडकर हे सर्वांत कशाचे अधिक कट्टर शत्रू असतील तर ते ढोंगाचे! त्यांना जें वाटतें तें बोलायला ते कधींहि कोणाला भिणार नाहींत! अंगाला शेंदूर फासून जे दगड आज समाजांत देव बनून राहिलेले आहेत. त्यांच्या तोंडावर 'तुम्ही देव नसून दगड आहांत!' असें सांगावयाला आंबेडकर कधींहि मागें पुढें पहाणार नाहींत. ज्या मोठ्या मूर्ति आज समाज डोक्यावर घेऊन नाचतो आहे, त्या मूर्तिचें खरें स्वरूप जगाला दाखविण्यासाठीं त्या मूर्तिच्या डोक्यावर हातोड्यांचे घांव घालावयाला हा 'भीम' कधींहि कमी करणार नाहीं! अशा मूर्ती फोडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला म्हणूनच समाजाच्या द्वेषाला आणि निंदेला आजपर्यंत त्यांना बळी पडावें लागलें. खरोखर एवढा निर्भय मूर्तिभंजक भारतवर्षांत आज तरी दुसरा कोणी नाहीं!

★

उद्यांच्या स्वतंत्र हिंदुस्थानांत आंबेडकरांसारख्या अद्वितीय नेत्याला आपलें कर्तृत्व करून दाखविण्याला फार मोठा वाव मिळणार आहे. राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न आतां सुटलेला आहे. तथापि, देशाला मिळालेलें हें स्वातंत्र्य

मधल्यामध्यें भांडवलशाही गिळंकृत करण्याचा फार संभव आहे. म्हणून समतेच्या आणि लोकशाहीच्या तत्त्वावर देशांतील आम जनतेची एक बलशाली आघाडी उभारण्याचें काम देशामध्यें लौकरच सुरूं करावयाला हवें. अशी आघाडी बनविण्याचें कामीं आंबेडकरांचें नेतृत्व अतिशय प्रभावी ठरल्याशिवाय रहाणार नाहीं, 'संयुक्त हिंदुस्तान' ची भावी राज्यघटना कशी असावी याबद्दलची एक सुंदर योजना त्यांनीं नुकतीच प्रसिद्ध केलेली आहे. त्यामध्यें देशांतील सर्व मूलभूत आणि प्रधान उद्योगधंदे आणि शेती ही राष्ट्रीय सरकारच्या मालकीची असावी असें त्यांनीं म्हटलेलें आहे. सामुदायिक शेतीचा त्यांनीं पुरस्कार केलेला आहे. कोणीही कोणत्या जमिनीचा मालक नाहीं, कोणीही कोणाचें कूळ नाहीं, आणि ज्याला जमीन नाहीं असा कोणीहि मजूर नाहीं, अशा तऱ्हेनें शुद्ध समाजवादी पायावर शेतकीची पुर्नघटना त्यांनीं सुचविलेली आहे. कम्युनिस्टांचा हुकूमशाही समाजवाद आंबेडकरांना मुळींच मान्य नाहीं. रशियाचा सध्यांचा समाजवाद म्हणजे 'शुद्ध ढोंग' (Fraud) आहे असें ते म्हणतात. लोकशाहीशीं ज्या समाजवादाचा समन्वय बसूं शकेल, तोच समाजवाद त्यांना मान्य आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्तानांतील 'समाजवादी पक्षा'शी आंबेडकरांच्या पक्षाचें यापुढें अधिक सूत जमूं शकेल. देशाचा राज्यकारभार चालविण्याचें काम हें दिवसेंदिवस अधिक अवघड होत जाणार आहे. त्या कामासाठीं देशाला अद्वितीय बुद्धीच्या प्रतिभाशाली तज्ज्ञांची आतां जास्त जरूरी पडणार आहे. पंडित जवाहरलाल, राजेंद्रबाबू किंवा मौलाना आझाद ह्यां थोड्याशा अधिकारी व्यक्ति वजा केल्या तर काँग्रेसमध्यें अशा तज्ज्ञांची फार वाण आहे. सामान्य बुद्धीच्या नुसत्या निष्ठावंत काँग्रेसजनांच्या सहाय्यानें राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न केला तर तो किती निष्फळ आणि हास्यास्पद होतो, याचें प्रत्यंतर निरनिराळ्या प्रांतांच्या कारभारावरून आतां आलेलें आहे. अमेरिका आणि रशिया यांच्याशीं स्पर्धा करण्याइतकें सामर्थ्य या देशाच्या अंगीं यावें असें आपल्याला जर वाटत असेल, तर आपण ह्या देशाच्या भवितव्याचीं सूत्रें जवाहरलाल नेहरूंसारख्या आणि आंबेडकरांसारख्या अद्वितीय बुद्धिमतेच्या मुत्सद्यांच्या हातांतच सोंपविलीं पाहिजेत! आंबेडकरांची विद्वत्ता आणि कर्तृत्व राष्ट्राच्या कामीं लावून घेणें किंवा न घेणें हें सर्वस्वीं आपल्या हातांत आहे. "उद्यां देशाच्या घटनेंत तुम्हीं म्हणतां तसें अस्पृश्य वर्गाला योग्य तें संरक्षण

मिळालें म्हणजे मग पुढें तुम्हीं काय करणार ?" असें मी त्यांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, "मग मी रहातों आहे कशाला या जंजाळांत ! अध्यात्मिक चिंतनाचे आणि लेखनाचें केवढें तरी क्षेत्र मला मोकळें आहे !" त्यावेळीं मला लोकमान्य टिळकांची आठवण झाली. टिळक म्हणत, "मला गणिताचा प्रोफेसर होण्याची खरी आवड, पण सुशिक्षित लोक आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कांहींएक करीत नाहींत, म्हणून मला माझा धंदा सोडून ह्या राजकारणाच्या उचापती कराव्या लागत आहेत !" अशाच तऱ्हेनें राजकारणाचें क्षेत्र सोडून कदाचित् हा विरक्त ब्रह्मर्षि ज्ञानाच्या कोठल्या तरी अत्युच्च शिखरावर जाऊन त्या ठिकाणीं आमरण तपश्चर्या करीत बसण्याचाहि फार संभव आहे, हें मी याच ठिकाणीं बजावून सांगतों !

मराठा ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्थापना.
क्रमांक ८५३२२ दिः ...
दिनांक ... २०६९ वॉ दिः ४३१६१



दुष्ट लोकांनीं काकांना मारलें हो ! : : ११

पंचेचाळीस सालच्या डिसेंबर महिन्याची चार तारीख. त्या रात्रीं पुण्याच्या मंडईमध्यें मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकींत यशस्वी झालेल्या हिरेगाडगीळ ह्या काँग्रेसच्या उमेदवारांचा जाहीर सत्कार माझ्या अध्यक्षतेखालीं होण्याचें ठरलें होतें. मी मुंबईहून 'डेक्कन क्वीन'नें रात्रीं साडेआठचें सुमारांस पुण्याला आलों. स्टेशनबाहेर माझी वाट पहात काकासाहेब लिमये उभे होते. नेहमींप्रमाणें हंसून त्यांनीं माझ्या हातावर टाळी मारली नाहीं. त्यांचा चेहरा चिंताक्रांत दिसत होता. मी जरा चपापलोंच. मी विचारलें, "काय हो काकासाहेब, कांहीं विशेष?" काकासाहेब म्हणाले, "चला, गाडींत तर बसा. म्हणजे सांगतों." मोटारींत बसून आम्हीं मंडईच्या रोखानें निघालों. कांहीं वेळानें काकासाहेब म्हणाले, "आज तुमचे काका गाडगीळ कांहीं खुषींत दिसत नाहींत. कांहीं तरी बिनसलेलें दिसतें आहे त्यांचें." मी विचारलें, "कां? आज तर त्यांचा जाहीर सत्कार आहे. बिनसायला काय झालें त्यांचें?" काकासाहेब म्हणाले, "तुम्ही अध्यक्ष आहांत ना त्या सभेचें!" मी म्हणालों, "पण त्यांना विचारूनच हा सभेचा कार्यक्रम ठरवला आहे. मी ह्या सभेंत बोलणार आहें हें त्यांना ठाऊक आहें. त्याला त्यांनीं मान्यता दिलेली आहे; पण आतां त्याबद्दल त्यांच्या पोटांत दुखायचें काय कारण आहे?" काकासाहेब म्हणाले, "तें मला कांहीं ठाऊक नाहीं. मला काय वाटलें तें मी आपल्याला सांगितलें." मंडईत सभेच्या जागीं जाऊन पाहिलें तर हजारो लोक आधीपासूनच जागा धरून बसलें होते. तें पाहून मला समाधान वाटलें. मी काकासाहेबांना म्हटलें, "काका, तुमचें भय विनाकारण आहे. काका गाडगीळांना कांहींहि वाटत असलें तरी आजची सभा खूप गाजणार! चला, सभेला तासभर अवकाश आहे. तोंपर्यंत आपण जेवून तर येऊं!"

स्टेशनसमोरच्या 'नॅशनल हॉटेल' मध्यें आम्ही परत आलों. तेथें आम्ही जेवलों. इंग्लिश पद्धतीच्या हॉटेलांत काकासाहेब मजबरोबर आले म्हणजे ते टोमॅटो सूप आणि पावलोणी खात. बरोबर दहा वाजतां आम्ही सभेच्या जागीं गेलों. ह्या सुमारांस श्रोत्यांची संख्या सत्तर ते ऐंशीहजारापर्यंत जाऊन पोहोंचली होती. व्यासपीठावर माझ्यामागें काकासाहेब येऊन बसले. अर्धातासपर्यंत मी हिरेगाडगीळांची वाट पहात तसाच बसलों होतों. इतक्यांत 'काकासाहेब गाडगीळांनीं तुम्हांला बाहेर बोलावलें आहे' असा कोणीतरी वर येऊन मला निरोप सांगितला. त्यांच्यामागून मी गर्दीमधून वाट काढीत व्यासपीठाच्या मागल्या बाजूला गेलों. काकासाहेब लिमयांना त्याच क्षणीं संशय आली कीं इथें कांहींतरी भानगड आहे. ते एकदम उठले आणि घाईघाईनें माझ्यामागून आले. मला तें माहितच नव्हतें. काका गाडगीळांचा आणि माझा संवाद अंधारांत माझ्यामागें उभा राहून त्यांनीं ऐकला. "मीं या सभेंत बोलूं नये अशी तुमची जर इच्छा असेल तर ठीक आहे. मी जातों इथून. तुम्ही आपला सत्कार खुशाल करून घ्या !" असें रागानें काका गाडगीळांना सांगून मी मागें वळलों, तों काकासाहेब लिमयांनीं माझा हात पकडला ! "अरे, तुम्ही आलांच कां ?" मी त्यांना बघून ओठांतल्या ओठांत पुटपुटलों. काकासाहेब म्हणाले, "चला, आमच्या घरींच जाऊं !" पलिकडें एक टांगा उभा होता. त्यांत चटकन् आम्ही दोघें जाऊन बसलों. मी टांगेवाल्याला जोरानें म्हणालों, "आंबराई कँप, चल, पिटाळ टांगा !"

अंधारांत आमचा टांगा जोरानें लकडी पुलाकडे चालला होता. बराच वेळ कोणी कोणाशीं बोललें नाहीं. कांहीं वेळानें मीं म्हणालों, "काकासाहेब, तुमचा तर्क अगदीं बरोबर होता. काका गाडगीळांच्या मनांत माझ्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला आहे यांत आतां तरी मुळींच शंका नाहीं." काकासाहेब म्हणाले, "सभेंत न बोलण्याचा तुम्हीं निर्णय घेतलांत हें फार उत्तम केलेंत. या तुमच्या निर्णयानें तुम्ही आजची सभा जिंकलींत म्हणून समजा. आतां ही सभा होत नाहीं. आपण घरीं पोहोंचेपर्यंत सभा उधळल्याची बातमी येते कीं नाहीं पहा." काकासाहेबांचा तोहि तर्क अगदीं तंतोतंत खरा ठरला. मी सभेंत बोलणार नाहीं असें काका गाडगीळांनीं सभेंत जाहीर करतांच हजारों श्रोते

एकदम उठून चालते झाले. आणि एका मिनिटांत सभेचें काम खतम झालें. काका गाडगीळांवर संतापलेले मंडईतले कार्यकर्ते आमच्या पाठोपाठच आंबराई कँपमध्ये काकासाहेब लिमयांच्या घरीं धापा टाकीत आले. त्यांच्या डोळ्यांमधून अक्षरशः अश्रूंच्या धारा वहात होत्या. मी आणि काकासाहेबांनीं त्यांची समजूत घालण्याचा खूपच प्रयत्न केला. पंधरावीस मंडळी होतो आम्ही सगळीं. सर्वांना काकासाहेबांनीं फक्कडशीं कॉफी करून पाजली. चांगले बारा साडेबारा वाजेपर्यंत आम्ही बोलत बसलों होतों. कोणाकोणासंबंधीं आणि किती किती विषयावद्दल तरी आम्हीं बोललों असूं. मनांतला विषाद, दुःख आणि संताप कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला. आणि थोड्या वेळांतच त्या रात्रीं जणू विशेष असें कांहींच घडलें नाहीं, अशा भावनेनें आम्ही एकमेकांच्या हातावर टाळ्या मारून मनमोकळेपणानें हंसावयाला आणि खिदळावयाला सुरवात केली. एक जसा वाजला तसा मी उठलों अन् म्हणालों, "काकासाहेब, आतां मी दीडच्या गाडीनें परत मुंबईला जातों" काकासाहेब नेहमीप्रमाणें मला अंगणाच्या फाटकापर्यंत पोहोंचवायला आलों. काकासाहेबांचा निरोप घेतांना हांसत्या, बोलत्या, लिहित्या आणि चालत्या काकासाहेबांच्या त्या आनंदी मूर्तीचें तें शेवटचें दर्शन मी घेतों आहे अशी चुकूनदेखील माझ्या मनांत कल्पना आली नाहीं. सोळा वर्षांच्या स्नेहमधुर जीवनांतली एकमेकांच्या सहवासांत घालवलेली ती शेवटची सुखाची रात्र होती. अंधारांतच आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. त्यावेळीं काळोखामध्यें तोंड लपवून असलेल्या काळपुरुषानें मनांतल्या मनांत भेसुर हास्य केलें असेल! निरामय जीवनांतल्या काकासाहेबांची या जगांतली ती माझी शेवटची भेट ठरली!

त्यानंतर अवघ्या आठ दिवसांनीं काकासाहेबांवर पक्षघातानें झडप घातली. आणि त्यांच्या जिभेंतली वाणी आणि हातांतली लेखणी हिरावून घेतली. दुसऱ्या दिवशींच पुण्याहून माझ्या एका मित्रानें ही वार्ता मला पत्र लिहून कळवली. मला मुळीं ती खरीच वाटेना. लगेच मी सकाळच्या गाडीनें मी पुण्यास गेलों. त्यांच्या पत्नीची आणि माझी दृष्टादृष्ट होतांच मला भडभडून आलें. मी मटकन् खुर्चीवरच बसलों आणि तोंड झांकून रडूं लागलों. मला माझें अश्रू आवरेनांत. दहा पंधरा मिनिटांनीं मी भानावर आलों. आणि हळूंच काकासाहेबांच्या खोलींत गेलों. त्यांच्या मुद्रेंत आणि आकृतींत एकदम केवढातरी फरक झाला होता.

चेहऱ्यांत मूर्तिमंत व्याकुळता प्रतिबिंबित झाली होती. नेत्रांत नुसतें कारुण्य सांचून राहिलें होतें. त्यांनीं आपला निर्जीव हात माझ्यापुढें करण्याचा निष्फळ प्रयत्न केला. मला तें दृश्य पहावेना. त्यांच्या असहाय्य आणि व्यथित दृष्टीला दृष्टी भिडवून त्यांना बरें वाटावें म्हणून तोंडावर ओढून ताणून हास्य आणतांना माझ्या हृदयाला किती यातना झाल्या असतील त्या माझ्या मलाच ठाऊक ! ज्या काकासाहेबांनीं अनेक आपत्तींत हंसून मला धीर दिला आणि माझ्या पाठीवरून हात फिरविला, त्यांच्याच आयुष्यांतील एका अत्यंत भीषण आपत्तींत त्यांच्या अंगावरून हात फिरवून त्यांना धीर देण्याची शेवटीं मला पाळी आली, या विचारानें मी मनांतल्या मनांत अगदीं हतवुद्ध होऊन गेलों. "कांहीं काळजी करूं नका, तुम्ही लवकरच बरें व्हाल, आपल्याला कांहीं कमी नाहीं, आपण इलाजांची पराकाष्ठा करूं" असें त्यांना पुन्हां पुन्हां आश्वासून दहा मिनिटांच्या आंतच मी त्यांचा निरोप घेतला.

त्यानंतर गेले अठ्ठावीस महिने सतत त्या दुर्धर रोगानें काकासाहेबांचा अन्वित छळ करून त्यांना आपलें जीवन अगदीं नको नकोसें करून टाकलें. पहिल्या वर्षांत त्यांची स्थिति थोडीशी कांहींतरी बरी होती. अधून मधून ते हिंडायला घराबाहेर पडूं शकत. मित्रमंडळी त्यांना भेटत. तेहि पूर्वीच्या उत्साहानें हंसून त्यांचें स्वागत करीत आणि खुणांनीं किंवा एकाद्या दुसऱ्या शब्दांनीं आपलें मनोगत त्यांना कळवीत. या वर्षांत मी त्यांना दोन तीन वेळां तरी भेटलों असेन. दिवाळीच्या दिवशींच मी त्यांच्याकडे गेलों होतों. त्यांनीं फराळाचे जिन्नस आपल्या पत्नीकडून आग्रह करकरून मला खावयाला घातलें. त्या दिवशींचा त्यांचा तो उत्साह आणि तेजदारपणा बघून मला त्यांची प्रकृति सुधारेल अशी आशा वाटूं लागली. पण कसचें काय अन् कसचें काय. एका महिन्याच्या आंतच त्यांना पुन्हां जबरदस्त झटका आला आणि त्यानें त्यांना पूर्वीपेक्षांहि लुळेपांगळें करून टाकलें. गेलें सबंध वर्ष तर एकाद्या अर्भकाप्रमाणें ते अंथरुणावर पडून होते. त्यांचें दुःख आणि यातना वर्णन करावयाला मजजवळ मुळीं शब्दच नाहींत. या काळांत त्यांना नुसतें भेटणेंहि अशक्य होते. ओळखीचा चेहरा दिसला कीं त्यांना रडूं येई. भावना अनावर होई. या वर्षांत एकदांहि त्यांना भेटण्याचें मला धैर्य झालें नाहीं. कधीं पुण्याला आलों आणि काकासाहेबांना न भेटतां परस्पर बाहेरून आंबराईच्या.

रस्त्यानें जाऊं लागलों कीं काळजांत कुणीतरी कट्यार खुपसतें आहे असें वाटे. क्षणभर तें दुःख असह्य होई. 'जयहिंद'चा पहिला अंक मी त्यांना अर्पण केला होंता. त्यांतला त्यांच्याबद्दलचा मजकूर ते पुन्हां पुन्हां कोणाकडून तरी वाचून घेत. आणि अश्रुपूर्ण नेत्रांनीं ते तो ऐकत पडत. त्याची आठवण झाली कीं काळीज गलबलल्यासारखें वाटे. काकासाहेबांवर प्रेम करणारी एवढीं आम्ही मंडळी त्यांच्या भोंवतीं असूनहि त्यांना बरें करण्याचें एवढेंसुद्धां सामर्थ्य आमच्या हातीं असूं नये याचें सर्वांत मला जास्त दुःख होई. काकासाहेबांपेक्षां आपणच जास्त असहाय झालेले आहोत, असेंच मला वाटे.

खरोखर काकासाहेब हे अत्यंत दुर्दैवी प्राणी होते असेंच म्हणावयाला पाहिजे. कांहीं कारण नसतांना सहा सात वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाशचें' संपादकत्व त्यांच्या हातून हिरावून घेऊन दुर्दैवानें त्यांचा छळवाद करावयाला सुरवात केली. आणि गेली सव्वा दोन वर्षे अनन्वित हालअपेष्टांचे हालाहल त्यांना पाजून शेवटीं दुर्दैवानें अत्यंत क्रूरपणानें आयुष्याच्या ऐन मध्यकाळीं त्यांची हत्या करून टाकली. रोग जगामध्यें कोणाला कां होत नाहींत? आणि त्यामधून बचावून सुरक्षितपणें कुणी कां बाहेर पडत नाहींत? पण काकासाहेबांच्या वांट्याला आलेल्या व्याधीची तऱ्हाच कांहीं न्यारी. असें कां व्हावें? ज्यानें स्वप्नांत देखील कधीं कोणाचें अहित चिंतलें नाहीं, त्याच्या कपाळीं दुःखाचा एवढा डोंगर येऊन कां कोसळावा? कोणत्याहि गोष्टीला कांहीं कारण असावयाला पाहिजे कीं नाहीं? मग, इतक्या चांगल्या माणसाला एवढी दुर्धर व्याधी होण्याचें काय कारण? ही आपत्ति अंगावर ओढवून घेण्यासारखें त्यांच्या हांतून कांहीं तरी घडलें होतें कां? लोकसेवेच्या पवित्र कार्यांत एवढ्या निष्ठेनें आणि निस्वार्थपणानें एक सज्जन माणूस चांगला गुंतलेला असतां एकाद्या दरोडेखोराप्रमाणें दुर्दैवानें अचानकपणें यावें आणि त्याला आपल्या कामावरून फरफटत बाहेर ओढून काढावें अन् त्याचे हातपाय बांधून शेवटीं त्याच्या डोक्यांत आकसानें भला मोठा धोंडा घालावा तसें हें सर्व झालें. या जगांत न्याय आणि नियम म्हणून कांहीं आहे असें म्हणतात तें खरें आहे कां? जीवनांत वाटेल तो गोष्ट वाटेल तिथें आणि वाटेल तेव्हां घडूं लागली तर त्या जीवनाला कांहीं अर्थ आहे काय? एका सुंदर जीवनाचा इतका शोचनीय शेवट होऊं शकतो हें काकासाहे-

वांच्या उदाहरणावरून पाहिलें म्हणजे आयुष्यावरचा माणसाचा विश्वास उडून जातो आणि भविष्याबद्दल औदासिन्य वाटूं लागतें.

शांत मनानें विचार केला म्हणजे मग काकासाहेबांच्या दुर्दैवाचें कारण लक्षांत येतें. काकासाहेब अतिशय चांगले होते म्हणूनच ते अतिशय दुर्दैवी झाले. चांगुलपणाची शालेय पुस्तकांत, साहित्यांत आणि समारंभांत स्तुती होते खरी. पण फार चांगुलपणा आणि फार चांगली माणसें लोकांना मनांतून आवडत नाहींत, हेंच खरें. चांगल्या माणसांचा लोक मनांतून द्वेष करूं लागतात. मत्सर करूं लागतात. चांगल्या माणसांना वाईट दिवस यावेत. त्यांचा छळ व्हावा. त्यांची विटंबना व्हावी. त्यांची परवड व्हावी. दीनवाण्या स्थितिमध्यें रस्त्यांतून आणि आयुष्यांमधून तीं भटकतांना दिसावींत. असेंच समाजाला मनामधून वाटतें. मनुष्यप्राणी हा बुद्धीनें थोर असेल, पण मनानें तो अजून हलकाच राहिलेला आहे. बुद्धीबरोबर मनुष्याच्या मनाची उत्क्रांति जशी व्हावी तशी ती झालेली नाहीं. नाहींतर ज्ञानाचे एवढें हिमालय माणसाच्या बुद्धीनें जगामध्यें रचून ठेवलें असतांना त्यानें आपल्या अमानुष क्रूरपणाचें मोठमोठें भीषण नरक या पृथ्वीतलावर त्याचवेळीं निर्माण करून कां ठेवलें असतें ? साधुपुरुषांचा आणि सज्जन माणसांचा प्रत्येक देशांत आणि प्रत्येक समाजांत नेहमीं छळच होत गेलेला आहे. अगदीं सुशिक्षित देश आणि सुसंस्कृत समाजहि या दुष्ट नियमाला अपवाद ठरलेले नाहींत ! विद्येचें आणि संस्कृतिचें माहेरघर म्हणून ज्या शहराचा देशामध्यें लौकिक पसरलेला आहे, त्या पुण्यासारख्या शहरामध्यें काकासाहेबांसारख्या एका साधुपुरुषाचा दुष्ट माणसांनीं अत्यंत निर्दयपणें तेजोभंग कला. अपमानाचा खंजीर बुद्धिपुरस्सरपणें काळजांत खुपसून त्यांचें कोमल अंतःकरण त्यांनीं रक्तबंबाळ केलें. आणि त्यांच्या थोर गुणांना मातीमोल ठरवून तुच्छतेनें अन् उपेक्षेनें त्यांच्या मानधन मनोवृत्तीची अक्षम्य विटंबना केली. क्षुद्र आणि मत्सरी माणसांच्या छळाला आणि कारस्थानाला बळी पडल्यामुळें काकासाहेबांच्या महान् जीवनाचा असा हृदयद्रावक रीतीनेंच अंत झाला. पुण्यामध्यें पक्षघातानें आणि संग्रहणीनें रोज पुष्कळशीं पेन्शनरें मरत असतात. तसलें मामुली कांहीं काकासाहेबांचें मरण नाहीं. काकासाहेबांचें मरण हें एक अमर बलिदान आहे. तें सात वर्षांच्या अमानुष छळाचें भीषण पर्यवसान आहे. तें हुतात्म्याचेंच

मरण आहे. अघोरी छळाच्या ह्या अग्निदिव्यामधून काकासाहेबांना कां जावें लागलें बरें ? असा काय भयंकर अपराध त्यांच्या हातून घडला होता ? हो, आमच्या माहितीप्रमाणें एकच गुन्हा त्यांच्या हातून घडला होता. आणि तो गुन्हा एकसारखा त्यांच्या हातून जन्मभर घडत होता. तो हाच की, त्यांनीं कधीं कुणाचें वाईट केलें नाहीं. त्यांनीं सर्वांचें चांगलें केलें. दुष्ट लोकांना चांगुलपणा दाखविण्याचा फार मोठा अपराध त्यांच्या हातून घडला. त्याचीच त्यांना ही अद्दल घडली !

गेलीं सात वर्षे जी गोष्ट रात्रंदिवस माझ्या मनांत जळत होती, ती आज हृदय मोकळें करून नाईलाजानें मला आज महाराष्ट्राला सांगावीं लागत आहे. काकासाहेबांच्या हयातींत मला ती सांगतां आली नाहीं. अनेकवार ती माझ्या ओंठापर्यंत येई. अगदीं लेखणीच्या टोंकापर्यंत येऊन बसे; पण काकासाहेबांच्या इच्छेला आणि भावनेला मान देऊन मला तो मोह मोठ्या कष्टानें आवरावा लागला. मी जर त्या वेळीं कांहीं कमीजास्त बोललों असतों किंवा लिहिलें असतें, तर त्यामुळें सर्वांत काकासाहेबांना जास्त दुःख झालें असतें. त्यांच्या दुःखी मनाला अधिक दुःख देण्याची माझी इच्छा नव्हती. आपल्या दावेदारांचा दुष्टपणा आणि निंदकाचा नीचपणा जगाला दिसूं नये, म्हणून त्यांजवर काकासाहेबांनीं आपल्या चांगुलपणाचें शेवटपर्यंत पांघरूण घातलें. स्वतः ते उघडे पडले. पण त्यांनीं दुसऱ्याची अब्रू उघडी पडूं दिली नाहीं. जिव्हारीं झालेल्या जखमांमधून आंत रक्त ठिबकत असतांना बाहेरचें ओठावरलें आपलें मधुर हास्य त्यांनीं कधीं मावळूं दिलें नाहीं. सतत सात वर्षे ते अपमानाचें हालाहल मुकाट्यानें प्राशन करीत होतें; पण त्यांनीं आपलें तें दुःख अगदीं निकटच्या मित्रांना देखील सांगितलें नाहीं. कधीं कोणाकडे त्यांनीं तक्रार केली नाहीं. तोंडावरचें दैन्य त्यांनीं कधीं दाखविलें नाहीं आणि स्वभावाची शांति अन् समतोलपणा एवढासुद्धां कधीं ढळूं दिला नाहीं. आपला सूळ (cross) खांद्यावर घेऊन ते धैर्यानें आणि धीमेपणानें आपली जीवनयात्रा कंठित होते. त्यांचे हाल बघून माणसांना कांहीं दया आली नाहीं, पण मृत्यूला मात्र आली. त्यानेंच त्यांची शेवटीं सुटका केली. आतां ते या जगामधून गेल्यानंतर त्यांच्या बलिदानाची कहाणी जगाला कळाली पाहिजे. त्यांच्या मरणाचें दुःख जगाला समजलेंच पाहिजे. नाहींतर जग असेंच समजेल कीं जशी चार माणसें

मरतात तसेंच हें पांचवें मेले. जग त्यांना विसरून जाईल. ज्यांनीं त्यांना जिवंतपणीं छळलें त्यांना तेंच पाहिजे आहे. तसें होतां कामा नये. काकासाहेबांना तो सदांत मोठा अन्याय होईल. त्यांच्या जीवनाप्रमाणेंच त्यांच्या मरणापासून जगाला फार मोठा शहाणपणा शिकतां येण्यासारखा आहे.

सात वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाश' च्या संपादकीय स्थानावरून काकासाहेब निवृत्त झाले. त्यामुळें संबंध महाराष्ट्रानें त्यांचा गौरव केला. त्यांच्या गळ्यांत फुलांचे हार घातले. स्तुतीचीं सुमनें त्यांच्यावर उधळलीं. त्यांच्या कामगिरीची प्रशंसा सगळ्या पत्रामध्यें छापून आली. महिना दोन महिने त्यांच्या नांवाचा चांगला गलगा झाला. आणि पुढें सगळें शांत झालें. विस्मृतीच्या डोहांत काकासाहेब एकदम बुडून गेले. तें परवां त्यांच्या मृत्यूची बातमी जेव्हां वर्तमानपत्रांत छापून आली तेव्हां लोकांना त्यांची आठवण झाली आणि ते म्हणाले कीं, "अरे, काकासाहेब लिमये नांवाचे एक संपादक होते ज्ञानप्रकाशचे ते वारले बरें कां !" हजारो मुड्यांना काकासाहेबांनीं जिवंत करून चालतें केलें; पण त्यांच्या स्मशानयात्रेला चारपांचशें माणसें कांहीं जमलीं नाहींत. जगाचें असेंच असतें. त्यानें एकाद्याचा उदोउदो करायचा ठरविलें कीं तें त्याच्याच मागें लागतें. आणि त्यानें एकाद्याला विसरावयाचें ठरविलें कीं, मग तो माणूस होता कीं नव्हता इतकी देखील त्याला आठवण रहात नाहीं. 'ज्ञानप्रकाश'चें संपादक काकासाहेब लिमये हे कां निवृत्त झाले हें जर जगाला त्याचवेळीं नीटपणें कळालें असतें तर आज लोक त्यांना इतके विसरून गेले नसतें. लोकांना तेव्हां आपलें असेंच वाटलें कीं सार्वजनिक संस्थेतले कार्यकर्ते कांहीं वर्षांनंतर जसें निवृत्त होतात, त्याच नियमानें काकासाहेब सेवानिवृत्त झाले असले पाहिजेत. त्यांत विशेष निराळें असें कांहीं घडलें नाहीं. कोणी एकानेंहि त्यावेळीं विचार केला नाहीं कीं सतत पंधरा वर्षे एका पत्राचें उत्कृष्ट संपादन करून त्याला महाराष्ट्राच्या जीवनांत अद्वितीय स्थान मिळवून देणारा हा बुद्धिमान् आणि कर्तबगार संपादक वयाला पन्नास वर्षे पुरीं होण्याच्या आंत एका भल्या सकाळीं सेवानिवृत्त कां होतो ? एवढा म्हातारा हा माणूस झाला कीं काय ? काम करून करून हा इतका थकून गेला काय ? एकाएकीं हा आपली लेखणी खालीं ठेवून एकदम घरीं जाऊन कां बसला ?

काकासाहेबांनीं 'ज्ञानप्रकाश'चें संपादकत्व आपण होऊन सोडलें नाहीं. त्या स्थानावरून ते स्वखुषीनें निवृत्त झाले नाहींत. भारत-सेवक-समाजानें त्यांना

त्या जागेवरून काढलें. त्यांना त्या त्यांच्या स्थानावरून खालीं ओढलें. त्यांच्या हातांतून लेखणी हिसकावून घेऊन समाजानें त्यांना जबरदस्तीनें घरीं बसावयाला लावलें. काकासाहेब सेवानिवृत्त झाले नाहींत. काकासाहेब बडतर्फ झाले. काकासाहेब डिसमिस झाले ! 'ज्ञानप्रकाश' च्या कार्यालयांतून समाजानें त्यांना धक्के मारून हांकलून दिलें. हें उघडें नागडें सत्य आहे. आणि तें त्याच शब्दांत बोलून दाखविलें पाहिजे. भारत-सेवक-समाजानें काकासाहेबांना आपल्या कामावरून कां बरें बडतर्फ केलें ? त्याचें कारण असें कीं, ते एक अद्वितीय संपादक होते. ते एक नामांकित संपादक होते. त्यांनीं 'ज्ञानप्रकाश' पत्राला अपूर्व यश, कीर्ति आणि लोकप्रियता प्राप्त करून दिली. जें पत्र एकेकाळीं पुण्यामधलें कुत्रें देखील हुंगावयाला तयार नव्हतें, तें पत्र रोज सकाळीं शेंकडों पुणेकर हातांत धरून मोठ्या आवडीनें वाचूं लागलें. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामधून त्या पत्राला मागण्या येऊं लागल्या. मवाळ पक्षाच्या ह्या मुखपत्राला जहालपक्षाच्या जळजळींत वृत्तपत्रापेक्षां देखील जास्त लोकप्रियता मिळाली. भारत-सेवक-समाजाचें नांव महाराष्ट्रांत घरोघर जाऊन पोहोंचलें. ज्या 'ज्ञानप्रकाश' कचेरींत एकादा दुसरा पेन्शनर किंवा रावबहादूर मान डगडगा हलवीत प्रवेश करायचा, तेथें महाराष्ट्रांतल्या मोठमोठ्या कार्यकर्त्यांची रीघ लागून राहिली. 'ज्ञानप्रकाश' कार्यालय हें राजकीय कार्यकर्त्यांचें एक अनौपचारिक केंद्रच होऊन बसलें. भारत-सेवक-समाजाला ही परिस्थिति असह्य झाली. मवाळ पक्षाच्या मनोवृत्तीला एवढी प्रसिद्धी सोसण्यासारखी नव्हती. पावलोंपावलीं लोकांशीं संबंध ठेवणारा एवढा लोकप्रिय माणूस त्यांना पचण्यासारखा नव्हता. जनतेमध्यें मवाळ पक्षाला हाताच्या बोटावर मोजण्याइतकें देखील अनुयायी नव्हतें. आणि त्याच्या मराठी मुखपत्रावर आज हजारों ग्राहकांच्या उड्या पडत होत्या. राजकारणांतून पेन्शनींत निघालेल्या पक्षाला आपल्या घरांत जनतेची एवढी वर्दळ सहन होण्यासारखी नव्हती. आजारी माणसाला जवळपास झालेला जसा कोणताहि आवाज सहन होत नाहीं तसा आसन्नमरण झालेल्या प्रागतिक पक्षाला आपल्या 'ज्ञानप्रकाश'चा आवाज महाराष्ट्रांत वाढत चाललेला सहन झाला नाहीं. त्यानें एक दिवस ठरविलें कीं, लोकप्रियतेच्या शिखरावर 'ज्ञानप्रकाश'ला नेऊन बसविणाऱ्या या उपद्व्यापि काकासाहेबाला त्याच्या खुर्चीवरून खालीं ओढलें पाहिजे ! आपल्या पक्षाकडे

लोकांच लक्ष वेधून हा माणूस निष्कारण आपल्या पक्षावरची जबाबदारी वाढवतो आणि नामदार गोखल्यांच्या नांवावर आरामशीरपणें जगणाऱ्या पक्षांतल्या सभासदांना संकटांत टाकतो. असला माणूस काय कामाचा ? काढून टाका त्याला. असा विचार करून भारत-सेवक-समाजानें काकासाहेबांना एक दिवशीं 'ज्ञानप्रकाश' चें संपादकत्व सोडावयाला लाबलें.

सार्वजनिक संस्था मूर्खपणाचें निर्णय पुष्कळदां घेतात; पण काकासाहेब लिमयांना 'ज्ञानप्रकाश' च्या संपादकीय स्थानावरून काढून टाकण्याइतका बेवकूफपणाचा निर्णय कोणत्याहि जबाबदार संस्थेनें कधीं केला नसेल. कां म्हणून त्यांना आपल्या जागेवरून खालीं उतरायला सांगितलें ? कां, त्यांच्या हातून कांहीं गुन्हा घडला ? कां, त्यांनीं आपल्या कामांत चुकारपणा केला ? कां, हिशोबामध्यें त्यांनीं कांहीं घोटाळा ठेवला ? कां, भारत-सेवक-समाजाच्या नियमांविरूद्ध त्यांनीं कांहीं वर्तन केलें ! काय, त्यांनीं केलें तरी काय असें, कीं ज्याबद्दल समाजानें त्यांना ही देहांत प्रायश्चितांची शिक्षा दिली. समाजाच्या प्रत्येक सभासदानें आळीपाळीनें पांच-पांच दहा-दहा वर्षें 'ज्ञानप्रकाश'ची संपादकी करावी असाही कांहीं नियम नव्हता. किंवा 'ज्ञानप्रकाश'चा संपादक होण्यांस काकासाहेबांपेक्षां अनेक पटीनें हुशार आणि लायक असा कोणी दुसरा माणूस भारत सेवक समाजाच्या संग्रहीं होता असेंहि कांहीं नव्हतें. काकासाहेबांना आपल्या स्थानावरून दूर करण्याचें समाजाला कांहींहि आणि कसलेंहि कारण नव्हतें. केवळ त्यांना त्या जागेवरून काढावयाचें असें बुद्धिपुरस्कर ठरवून समाजानें त्यांना काढलें. त्यांच्या जाण्यानें 'ज्ञानप्रकाश'चें वाटोळें होईल. हें उघडपणें दिसत असतांना सुद्धां त्यांच्याकडे समाजानें जाणून बुजून डोळेझांक केली. इंग्रजी म्हणीप्रमाणें कुत्र्याला फांशी देण्यापूर्वी त्याला शिवी देतात. तसा कसला तरी ठपकासुद्धां काकासाहेबांवर समाजानें ठेवला नाहीं. 'बस, तुम्हांला तुमच्या जागेवरून कमी करावयाचें आहे, याहून आम्हांला जास्ती कांहीं माहित नाहीं.' एवढेंच समाजानें त्यांना सांगितलें.

पुण्यांत पुष्कळ मोठमोठ्या सार्वजनिक संस्था आहेत. त्यांची कीर्ति ऐकून त्यांच्यांत काम करण्याची आपल्याला संधि मिळावी अशा हेतूनें बुद्धिमान् आणि कर्तबगार माणसें ल्या ल्या संस्थांमध्यें येऊन मिळतात, पण त्या सर्वांची स्थिति

शेवटीं काकासाहेबांसारखी होते. त्या संस्थांचें आद्य संस्थापक आणि कार्यकर्ते खरोखरच फार मोठे होऊन गेले यांत शंका नाहीं; पण मूळच्या मोठ्या नांवाखेरीज आतां ह्या संस्थांचें कांहींहि उरलें नाहीं. कालांतरानें ऐतखाऊ आणि सामान्य वकूबाची माणसें या सर्व संस्थांमध्यें गर्दी करून बसली, आणि त्यांनीं त्या काबीज करून घेतल्या. स्वतःची गुजराण करण्यासाठीं संस्थेच्या मोठ्या नांवाचा उपयोग करणें एवढाच ह्या लोकांचा उद्योग होऊन बसला आहे. चुकून कोणी चांगलीं माणसें या संस्थेंत आलीं आणि स्वतःचें तेज प्रकट करून संस्थेच्या कीर्तींत भर घालूं लागलीं तर लागलेच त्यांची हाकालपट्टी होते. तो जर वऱ्या बोलानें संस्था सोडून गेला नाहीं आणि तसाच संस्थेंत तग धरून राहिला, तर हातपाय बांधून त्याची गठडी बांधण्यांत येते. आणि तशा स्थितींतहि जर तो कांहीं हालचाल करूं लागला तर काकासाहेबांप्रमाणें त्याचा अनन्वित छळ करण्यांत येतो, आणि त्याला ठेंचून ठेंचून ठार मारण्यांत येतें. याच त्रासाला आणि छळाला कंटाळून मोठींमोठीं माणसें पुण्याहून परागंदा झालेली आहेत. आणि त्यामुळें महाराष्ट्राचें अतोनात नुकसान झालेलें आहे. स्वतंत्र बुद्धींचीं आणि अलौकिक पराक्रमाचीं माणसें महाराष्ट्राच्या सार्वजनिक संस्थामध्यें टिकूंच शकत नाहींत. कारण त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वामुळें त्या संस्थामध्यें गर्दी करून राहिलेली इतर सामान्य माणसें तोकडीं पडतात. आणि त्यांचा क्षुद्रपणा जगाच्या दृष्टीसमोर उघडा पडतो. संस्थेमधले सर्व कार्यकर्ते बुद्धीनें आणि कर्तृत्वानें सामान्य असले म्हणजे त्यांच्यांत समता प्रस्थापित होते. बंधुभाव निर्माण होतो. हा लहान, तो मोठा असा भेदभाव वाटत नाहीं. सारख्या आकाराचे सगळेंच मणी एका माळेंत ओवतां येतात. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत दिवसेंदिवस असलाच 'समतावाद' प्रस्थापित होणार आहे किंवा काय कोणास ठाऊक?

नामदार गोखले यांच्या थोर नांवामुळें काकासाहेब लिमेय भारत-सेवक-समाजाकडे आकर्षित झाले. हिंदी राजकारणामध्यें गोखल्यांचें स्थान अद्वितीय आहे, यांत शंका नाहीं. महात्मा गांधींवर देखील ज्यांनीं मोहिनी घातली त्यांचें सामर्थ्य आणखी काय वर्णन करावयाचें? पण लोकसंग्रह करण्याच्या बाबतींत लोकमान्य टिळकांची जी स्थिति झाली तीच नामदार गोखल्यांचीहि झाली. कांहीं थोडे अपवाद वजा केलें तर उत्तम माणसें जमविण्याच्या बाबतींत

दोघेहि अयशस्वीच ठरले. दोघांच्याहि आजूबाजूला संधिसाधू आणि स्वार्थसाधू माणसेंच जमलीं. त्यांनीं दोघांच्याहि संस्थांमध्यें आपली मिरासदारी स्थापन केली. त्यामुळें चांगलीं माणसें त्यांच्या कार्याला मिळाली नाहींत. आणि म्हणून त्यांच्या परंपरांचें थोड्या वर्षांच्या आंत वाटोळें झालें. भारत-सेवक-समाजाचे सभासद होण्यासाठीं खिशांत अर्ज घालून महात्मा गांधी स्वतः पुण्याला आले होते. पण समाजांतल्या कांहीं नतद्रष्ट लोकांनीं त्यांना समाजांत घेण्याचें नाकारलें. तेव्हां विन्मुख होऊन गांधीजींना परत जावें लागलें. आपण होऊन त्यांच्या दारांशीं कामधेनू आली; पण समाजांतल्या दळभद्री लोकांनीं तिला मागल्यामागें पिटाळून लावली. समाजाच्या असल्या अधू आणि आकुंचित धोरणामुळें बुद्धिमान् कार्यकर्त्यांचें सहकार्य त्याला फारसें मिळालें नाहीं. आणि त्यामुळें पंचवीस वर्षांत समाजाच्या कार्याची यत्किंचित्हि वाढ होऊं शकली नाहीं. नामदार गोखल्यांचें कोणतें कार्य भारत-सेवक-समाज आज चालवीत आहे, हें परमेश्वरालाच माहित! ज्यांना बाहेर आपली उपजीविका करणें कठीण पडलें असतें, अशी कित्येक मंडळी गोखल्यांच्या नांवावर त्या ठिकाणीं स्वस्थपणें दोन वेळां भोजन करून झोपा काढीत आहेत, त्यामुळें एकाद्या अन्नछत्राचें स्वरूप या संस्थेला आज प्राप्त झालें आहे, असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होऊं नये. या संस्थेच्या गेल्या पंचवीस वर्षांतल्या महाराष्ट्रीय सभासदांमध्यें काकासाहेब लिमये हे एकटे एकच तेजस्वी अपवाद होऊन गेले. त्यांनीं वृत्तपत्रीय क्षेत्रांत समाजाला अलौकिक यश मिळवून दिलें; पण समाजानें त्यांना सुखानें जगून सुद्धां दिलें नाहीं!

'ज्ञानप्रकाश'चें संपादन काकासाहेबांच्या हातून घेण्याच्यापूर्वी बऱ्याच वर्षांपासून त्यांना बदनाम करण्याचें एक गुप्त कारस्थान त्यांच्याभोंवतीं शिजत होतें. काकासाहेबांकडे रोज अनेक माणसें यावयाचीं. कांहीं 'ज्ञानप्रकाश'च्या कामासाठीं यावयाचीं, तर कांहीं निव्वळ काकासाहेबांना भेटावयाला यावयाचीं. त्यांच्या चहापाण्याप्रीत्यर्थ वर्षाचा सातआठशें रुपये तरी खर्च व्हावयाचाच. 'ज्ञानप्रकाश'ला काकासाहेबांनीं जें महत्व मिळवून दिलें होतें त्या मानानें एवढा खर्च 'ज्ञानप्रकाश' संस्थेला कांहीं जास्त नव्हता. 'ज्ञानप्रकाश'चें उत्पन्न कितीतरी पटीनें काकासाहेबांनीं वाढवून दिलें होतें. असें असूनहि काकासाहेबांचे आजूबाजूचे हितशत्रू उगाच कुजबुजायचे, कीं काका-

साहेब फार खर्च करतात, ते उधळे आहेत, गैरहिशेबी आहेत, संस्थेचें त्यांच्यामुळें नुकसान होतें! अर्थात्, उघडपणें त्यांना असें कोणी बोलणें शक्यच नव्हतें. 'ज्ञानप्रकाश' मध्यें नाटक आणि चित्रपट या विषयांना भरपूर वाव द्यावयाचे काकासाहेबांनीं ठरविलें होतें. त्यामुळें नाटक मंडळ्यांतील आणि चित्रपट कंपन्यांमधील मालकांची, मॅनेजरांची आणि नटनटींची काकासाहेबांच्या दाराशीं नेहमीं रीघ लागलेली असे. नवीन नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला किंवा नवीन चित्रपटाच्या उद्घाटनाला काकासाहेब हजर नाहींत असें कधींच व्हावयाचें नाहीं. त्यांच्या कुटुंबांतल्या मंडळींनाहि त्यांच्याबरोबर आमंत्रण असे. अनेक नटनटी काकासाहेबांना आपल्या मोटारीमधून फिरावयाला नेत, किंवा आपल्या घरीं त्यांना जेवायला मुद्दाम बोलावीत. अशा तऱ्हेनें नाट्यसृष्टींत किंवा चित्रपट क्षेत्रांत काकासाहेबांना जी लोकप्रियता लाभली होती तीं त्यांच्या विरोधकांना पहावत नसे. फुकट नाटक-सिनेमा पहावयाला सांपडतो आणि नटनटींबरोबर मोटारीमधून हिंडावयाला मिळते म्हणून काकासाहेब आपल्या पत्रामधून त्यांची तोंड फाटेपर्यंत स्तुति करतात अशी त्यांनीं काकासाहेबांची कित्येक दिवस टवाळी करून पाहिली. काकासाहेबांच्या विरोधकांना गांवांतल्या कांहीं संस्थांमधल्या कित्येक स्वयंमन्य शिष्टांचेहि सहाय्य होतें. त्यापैकीं एकाद्यानें उठावयाचे आणि काकासाहेबांच्या सहकाऱ्याकडे जाऊन मोठ्या संभावितपणें विचारावयाचे कीं, "कायहो, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीनें 'ज्ञानप्रकाश' हें पत्र सिनेमाचे किंवा नाटकाचें पत्र करावयाचें ठरविलें आहे काय?" माझ्या व्याख्यानांची सविस्तर वर्णनें पुष्कळ वेळां 'ज्ञानप्रकाश'मध्यें काकासाहेब छापीत असत. त्यामुळें काकासाहेबांचा कांहीं कमी छळ झाला नाहीं. त्यांचे निंदक म्हणावयाचे, "आतां ह्या 'ज्ञानप्रकाश'चें नांव बदलून त्याला 'अत्रे प्रकाश' तरी नांव द्या!" एकदां मी काकासाहेबांच्या शेजारी बसलों असतांना असेंच एक शिष्ट प्रोफेसर तेथें आले आणि त्यांनीं खवचटपणें काकासाहेबांना विचारलें, "काय हो, कांहीं कांहीं लोकांना प्रसिद्धि देण्याचें 'ज्ञानप्रकाश'नें ठरवून ठेवलें आहे काय?" काकासाहेब शांतपणें म्हणाले, "अहो, जो माणसें सार्वजनिक आयुष्यांत जास्त भाग घेतात, त्यांचीं नांवें दैनिक वृत्तपत्रांत जास्त वेळां येणारच. त्याबद्दल

तुम्हांला वाईट वाटण्याचें काय कारण आहे ? त्यांचीं नांवें छापायची नाहींत तर काय तुमचें नांव छापायचें ? " तेव्हां श्रीमुखांत बसल्याप्रमाणें प्रोफेसर मजकुरांनीं चेहरा करून बोलण्याचा विषय बदलला. अशा एक ना दोन अनेक संस्थांमधील हितशत्रूंनीं काकासाहेबांना छळण्याचा आणि सतावण्याचा पुष्कळ वर्षें प्रयत्न केला, पण काकासाहेबांनीं त्यांना दाद दिली नाहीं. उलट त्यांची लोकप्रियता एकसारखी वाढतच गेली. म्हणून चिडून जाऊन शेवटीं त्यांना बडतर्फ करण्याचें शस्त्र त्यांच्या विरोधकांना अखेर उगारावें लागलें.

सतत पंधरा वर्षें रात्रंदिवस 'ज्ञानप्रकाश' खेरीज काकासाहेबांच्या डोक्यांत दुसरा विषय नव्हता. दुखणाईत अर्भकाला 'डोळियाचा दिवा आणि तळहाताचा पाळणा' करून आई जशी सांभाळते आणि दुखण्यांतून निभावून नेते अन् रात्रंदिवस त्याची काळजी वाहून नि त्याचें पालनपोषण करून त्याला जसे बाळसेदार बनविते, तसे 'ज्ञानप्रकाश' सारख्या रुग्णाईत पत्राचे पंधरा वर्षें आपल्या पुत्राप्रमाणें संवर्धन करून प्रत्येकाला तें कडेवर घेण्याचा मोह उत्पन्न करण्याइतकें काकासाहेबांनीं त्याला गुटगुटीत बनविलें होतें. 'ज्ञानप्रकाश'साठीं 'काकासाहेबांनीं रात्रीचे दिवस करून आपल्या घामाचे पाणी केलें. ह्या पंधरा वर्षांत एक रात्रहि काकासाहेब बारा वाजायच्या आंत कधीं झोपी गेले नसतील. चोवीस तास 'ज्ञानप्रकाश'खेरीज काकासाहेबांच्या डोक्यांत दुसरा विषय नसे. 'ज्ञानप्रकाश' हें काकासाहेबांचें व्यसन होतें. 'ज्ञानप्रकाश' हें काकासाहेबांचे वेड होतें. काकासाहेबांना बडतर्फ करून पंधरा वर्षांचें त्यांचें एक मनोहर स्वप्न त्यांच्या विघ्नसंतोषी विरोधकांनीं घसमुसळेपणानं भंगून टाकलें. ज्या सिंहासनावर बसून सतत पंधरा वर्षें काकासाहेबांनीं आपल्या लहानशा जगांत राज्य केलें, ते त्यांचें सिंहासन मत्सरी माथेफिरूंनीं दुष्टपणानें त्यांच्यापासून हिरावून घेऊन त्यांना निराधार केलें. वास्तविक तें सिंहासन कांहीं सोन्याचें नव्हतें. लाकडाचें होतें. त्यागाचे आणि श्रमाचे अनेक कांटे पसरले होते त्यावर. पण ध्येयवादी वृत्तीच्या काकासाहेबांनीं त्या कांटयांची बोचणी हंसतमुखानें सहन केली. आणि त्या आसनाला सोन्याचे वैभव मिळवून दिलें. खरोखरच 'ज्ञानप्रकाश'च्या लहानशा कार्यालयामध्यें काकासाहेबांचा दरबार भरला म्हणजे राजानेंदेखील हेवा करावा, असा त्यांचा तो थाट होता. अशी सोन्यासारखीं माणसें काकासाहेबांनीं आपल्याजवळ जमवून

ठेवली होतीं म्हणतां. देवाप्रमाणें तो काकासाहेबांना मानीत. आणि आपल्या पाठच्या भावाप्रमाणें काकासाहेब त्यांच्यावर प्रेम करीत. कधीं कोणाची खळखळ नाहीं कीं कुरकुर नाहीं. एवढ्या आपुलकीने आणि प्रेमानें काकासाहेबांनीं थाटलेल्या त्या सुखी संसारांतून त्यांच्या हितशत्रूंनीं त्यांना निर्दयपणें ओढून बाहेर काढलें. आयुष्याच्या ऐन मेजवानींतून अगदीं भरल्या ताटावरून काकासाहेबांना त्यांनीं मध्येंच उठविलें. दुसरा कोणी त्यांच्या जागीं असता तर त्या अपमानामुळें खचित त्याला वेडच लागलें असतें !

एकसारखीं पंधरा वर्षें एका कामांत गुंतलेल्या माणसाला त्याची मानखंडना न करतां जरी एकदम स्वस्थ घरीं बसायला सांगितलें तरी त्याला वेड लागल्यावांचून रहावय चें नाहीं. मग सेवेच्या आणि सन्मानाच्या थोर आसनावरून कारण नसतांना बडतर्फ झाल्यावर काकासाहेबांसारख्या स्वाभिमानी माणसाची मनःस्थिति काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरीं ! रणांगणावर तळपणारी तलवार एकदम खुंटीवर टांगून ठेवल्यानंतर तिची काय स्थिति होईल ? बरें, 'ज्ञानप्रकाश'चें संपादन त्यांच्याकडून काढून घेऊन भारत-सेवक-समाजानें त्यांच्याकडे दुसरें कांहीं महत्वाचें काम सोंपविलें म्हणतां कीं काय ? छे, तेहि नाहीं. समाजानें त्यांना अक्षरशः बेकार बनविलें. पगार त्यांना वेळच्यावेळीं मिळत होता. पण पगाराची काय किंमत ? काम न करतां फुकटचा पगार खाऊन घरीं झोपा काढणें ही मुळीं काकासाहेबांची वृत्तीच नव्हती. त्यांना काम पाहिजे होतें. दिवसाचा प्रत्येक क्षण न् क्षण कामांत घालविण्याची त्यांना कित्येक वर्षांची संवय जडून राहिली होती. काकासाहेब हे कट्टर कर्मयोगी होतें. लेखन हें त्यांचें योगसाधन होतें. अशा माणसाचें जीवितकार्य जबरीनें त्यांच्याकडून हिरावून घेणें म्हणजे त्यांचें प्राण त्यांच्यापासून हिरावून घेण्यासारखें होतें. मोठीं मोठीं माणसें अशा परिस्थितींत मोडून आणि पिचून गेली असतीं. काकासाहेबांचेंहि तसेंच झालें. पण बाहेरून त्यांनीं तसें दाखविलें नाहीं. त्यांना तसें दाखवितां येत नव्हतें. कारण, आपली सेवानिवृत्ति ही बडतर्फी नसून तो एक क्रमप्राप्त गोष्ट आहे असें जगाला भासवून समाजानें केलेल्या घोर अन्यायाबर पांघरून घालण्याचीहि जबाबदारी जणूं कांहीं समाजानें त्यांच्यावरच टाकली होती. अरेरे, काय विलक्षण यातना काकासाहेबांना मनांतल्या मनांत सहन कराव्या लागल्या असतील. पोटामध्यें

वडवाग्नी जळत असतांहि समुद्र बाहेरून शांत दिसावा, तसा सारा अपमान, सारी मानखंडना, साऱ्या अवहेलना, सारी कुचेष्टा आणि सारीं दुःखें मनांतल्या मनांत सहन करून काकासाहेबांनीं आपल्या मुद्रेवरची शांति कधीं ढळूं दिली नाहीं.

जबरदस्तीनें काकासाहेबांवर लादली गेलेली ही निवृत्ति म्हणजे त्यांच्या आयुष्यांतली सर्वांत मोठी आपत्ति होती. या काळामध्यें त्यांची स्थिति एकाद्या निर्वासितासारखी झाली होती. त्यांना काम नव्हतें. धाम म्हणजे कार्यालय नव्हतें. आणि नामहि पण नव्हतें. झोंपेंत माणून हिंडावा ना तसें काकासाहेब निर्जीवपणें जीवनामधून वावरत होते. त्यांच्या मानखंडनेंत थोडासा कमीपणा उरला होता म्हणूनच कीं काय, 'ज्ञानप्रकाश' मध्यें त्यांना अधून मधून लेखन करण्याचीहि आज्ञा होत असें. पण तो ते कधींहि अमान्य करीत नसत. जियें फुलें वेंचलीं तियें गवऱ्या वेचण्याचेंहि काम त्यांनीं मोठ्या आनंदानें केलें. त्यामध्यें कसल्याहि प्रकारचा कंटाळा किंवा तिरस्कार दाखविला नाहीं. निरनिराळ्या व्यवसायामधील आपल्या मित्रमंडाळीबरोवर काकासाहेव पूर्वीप्रमाणें मोकळेपणानें फिरत. हंसत. बोलत. गप्पा मारीत. पण तें केवळ स्वतःचें दुःख विसरण्यासाठीं. त्यांत त्यांचें मन नव्हतें. आंतून ते अहोरात्र धुमसत होतें. कुढत होते. जळत होते. त्यांच्या मनाला एक क्षणांचीहि शांति नव्हती. जिव्हारीच्या ह्या जळत्या ज्वालामुखीवर हास्याचें किंवा मौनाचें आवरण घालण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालूं असे. त्यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्वांत दिवसेंदिवस एक प्रकारचें कारुण्य निर्माण होऊं लागलें. भविष्य काळाविषयीं त्यांना निराशा वाटूं लागलीं. पुष्कळदां मी त्यांना म्हणे, " काकासाहेब, तुम्ही संस्थेमधून राजीनामा देऊन बाहेर कां पडत नाहीं ? तुम्हीं मुंबईला या. आपण एक फक्कडसें दैनिक काढूं. तुमच्यासारखा माणूस असतांना आपण काय करूं शकणार नाहीं ?" पण असल्या माझ्या बोलण्याला काकासाहेब कधींहि उत्तेजन देत नसत. तें निराश मुद्रेनें मला म्हणत, " बाबूराव, आमचें आतां झालें, आम्हीं संपलों. अगदीं खलास झालों म्हणानांत. यापुढें आमच्या हातून कांहीं होणार नाहीं. आमच्यापासून तुम्हीं कसलीहि अपेक्षा करूं नका. आमच्या अंगांत कांहीं लायकी आहे असें तुम्हांला वाटतें; पण तसें कांहीं नाहीं. तो निव्वळ भ्रम आहे. " काकासाहेबांचे हे उद्गार ऐकलें म्हणजे मला अतिशय दुःख होई. एकदां त्यांच्यावर थोडासा रागावूनच मी

म्हणालों, "काय हो काकासाहेब, आम्ही नेहमीं नेहमीं तुम्हाला विचारतो आणि तुम्हीं आम्हांला तसेंच धुडकावून लावतां ह्याचा अर्थ काय? तुमच्या उत्तरानें आम्हांला कितो यातना होतात याची तुम्हाला कल्पना आहे काय?" तेव्हां काकासाहेब एकदम शांत झाले. अन् रुद्ध स्वरांत म्हणाके, "खरं सांगू? इतकीं वर्षं 'ज्ञानप्रकाश'चे संपादन केल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पत्राचे संपादक होण्वाचो मला इच्छा राहिली नाहीं. कसें विचारतां तुम्हो मला?" माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. काकासाहेबांचें अंतःकरण मला दिसलें. पुन्हा ह्या विषयावर मी त्यांच्याशीं कधींच बोललों नाहीं.

एके दिवशीं माझ्याकडे एक म्हैसूरचा ज्योतिषी आणि सामुद्रिक आला होता. काकासाहेबांचा मुक्कामहि त्या दिवशीं मजकडेच होता. मी म्हणालों, "काकासाहेब, तुमचा हात दाखवा पाहूं ह्या ज्योतिषाला" काकासाहेब हंसून म्हणाले, "आतां माझें काय भविष्य पहावयाचें राहिलें आहे?" मी म्हणालों, "असें काय करतां? दाखवा कीं हात, तेवढीच गंमत." काकासाहेबांनो ज्योतिषापुढें हात केला. ज्योतिषी फार हुशार होता. त्यानं हातावरच्या रेषा पाहून चटकन् कागदार कुंडली मांडली. आणि काकासाहेबांच्या एकेक गोष्टी सांगायला सुरवात केली. तो म्हणाला, "तुमचा जन्म क्षेत्राच्या ठिकाणीं आणि नदीच्या कांठीं झाला आहे." काकासाहेब म्हणाले, "बरोबर आहे. माझा जन्म पंढरपूरचा. नदीच्या कांठींच आमच घर आहे." ज्योतिषी म्हणाला, "तुम्हाला दोन मुलगे आणि दोन मुली असल्या पाहिजेत." तेंहि बरोबर होतें. पुढें तो म्हणाला, "तुम्हाला साडेसाती आहे. तुमची मातोश्री कांहीं दिवसांपूर्वी वारली आहे. आणि तुम्ही स्थानभ्रष्ट झालेले आहांत." तें ऐकून आम्ही चकितच झालों. कारण त्यानें सांगितलेलें अक्षर अन् अक्षर बरोबर होतें. तेव्हां मी त्याला म्हणालों, "तें मागलें राहूं द्या हो. पुन्हा हे स्थानारूढ केव्हां होतील तें आम्हांला सांगा!" ज्योतिषी थोडा विचार करून म्हणाला, "या वर्षाअखेर तसा योग आहे. अगदीं नक्की. आणि त्यानंतर तर त्यांच्या आयुष्याचा काळ अत्यंत भाग्याचा आणि भरभराटीचा आहे." काकासाहेब विषण्णपणें हंसून म्हणाले, "त्यानें मागल्या गोष्टी बरोबर सांगितल्या. पण पुढलें जें भविष्य सांगितलें तें सपशेल खोटें आहे. माझें भविष्य काय आहे हें मी ह्याच्यापेक्षां फार उत्तम जाणतों. हा काय मला सांगतोय्?"

काकासाहेबांचे ते निराशेचे उद्‌गार मी त्यावेळीं ईसण्यावारी नेले. पण त्यांना आपल्या भविष्याचें आकलन पुष्कळ दिवसांपासून झालेलें होतें हें जें त्यांचें म्हणणें होतें तें दुर्दैवानें खरें ठरलें. माणसाच्या सहनशीलतेला तरी कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? आंत एकसारखी धुमसत असलेली आग ती किती वेळ कोंडून ठेवणार. त्यांचें मन आणि शरीर आंतमधून प्रतिदिनीं पोखरले जात होतें. पांच वर्षे कसा तरी त्यांनीं दम काढला. पुढें त्यांना तें अशक्य झालें. एक दिवस तो ज्वालामुखी आंतमधून त्वेषानें उफाळून वर आला अन् त्यानें त्यांच्या शरीराच्या नि जीविनाच्या ठिक-या ठिक-या करून त्यांना सर्वस्वी लुळेपांगळें करून टाकलें. त्यांतच सव्वादोन वर्षांनीं पुढें त्यांचा अंत झाला. काकासाहेबांच्या पक्षपाताचा आणि मरणाचा हा असा हृदयद्रावक इतिहास आहे. अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर पांच सहा महिन्यांनीं मी त्यांना भेटायला गेलों. ते अंथरुणावर शांतपणें पडले होते. मी त्यांना म्हणालो, "काकासाहेब, खरें सांगू ! 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकीय सेवानिवृत्तीचा तुमच्या मनाला उपसर्ग झाला नाहीं हें इतकीं वर्षे दाखविण्याचा जो तुम्हीं प्रयत्न केलांत आणि मनांतली आग जगापासून लपवून ठेवण्याची जी पराकाष्ठा केलींत त्याचा हा सारा परिणाम आहे." त्याबरोबर काकासाहेबांनीं आपला डावा हात ओठावर ठेवून आणि नकारार्थी तो जोरानें हालवून मला खुणेनें सांगितलें कीं, "नका, नका. हें बोलूं नका !"

फत्तरालादेखील पाझर फोडील असा करुणरसानें ओथंबलेला हा काकासाहेबांचा जीवनसमाप्तीचा इतिहास मी तरी कां सांगतों आहे ? ज्या फत्तरांनीं काकासाहेबांना जिवंतपणीं ठेचण्याची पराकाष्ठा केली त्यांना ही कहाणी वाचून पाझर फुटेल काय ? कोणास ठाऊक ? आणि आतां त्यांना पाझर फुटून काय उपयोग ? आमचे काकासाहेब तर गेले. आमचे गाईपेक्षां गरीब काकासाहेब, आमचे चांदण्यापेक्षां शीतल काकासाहेब, आमचे नवनीतापेक्षां कोमल हृदयाचे काकासाहेब, जाईच्या मांडवापेक्षां सुवासिक सावली देणारे आमचे प्रेमळ काकासाहेब तर आतां गेले. 'ज्ञानप्रकाश'च्या खुर्चीवरून ज्यांनीं त्यांना खालीं ओढलें त्यांनींच त्यांना या जगामधून धक्के मारून बाहेर काढलें. आतां कितीही आक्रोश केला म्हणून ते थोडेच परत येणार आहेत ? मग असें जर आहे, तर काकासाहेबांच्या मरणाची ही हृदयद्रावक कथा आम्ही हृदय फाडून इतक्या विस्तारानें कां सांगितली !

एवढ्याचसाठीं कीं, दुष्ट आणि मत्सरी लोकांनीं एका बुद्धिमान् आणि सज्जन संपादकाचा बळी घेऊन महाराष्ट्राचें केवढें मोठें नुकसान केलें हें जनतेला एकदां कळावें. काकासाहेबांच्या प्रतिभेची पौर्णिमा अजून उगवायचीच होती. त्यांच्या पत्रपांडित्याचें कितीतरी नवनवोन्मेष महाराष्ट्राला अद्यापि पहावयाला मिळावयाचें होते. पण तसें होण्याआधींच राहूकेतूनीं त्यांना ग्रासून गिळून देखील टाकलें. काकासाहेबांच्या साऱ्या मनीषा आणि आकांक्षा तशाच अर्ध्या नि अपुऱ्या राहिल्या. त्यांच्या आत्म्याला शांति मिळो अशी कितीहि उत्कंठतेनें आपण इच्छा केली तरी ती कशी पूर्ण होणार? छे, छे, काकासाहेबांच्या आत्म्याला शांति मिळणें कठिण आहे. त्यांचा आत्मा 'ज्ञानप्रकाश' कार्यालयाभोंवतीं पुष्कळ काळ घुटमळत राहील. मरण्यापूर्वी कित्येक दिवस आधीं त्यांची स्मृति नष्ट झाली होती. फक्त 'ज्ञानप्रकाश' हा एकच शब्द त्यांना आठवत होता. 'ज्ञानप्रकाश' हाच त्यांच्या आयुष्यांतला शेवटचा विचार होता. 'ज्ञानप्रकाश'चें कसें चालेल, एवढा एकच ध्यास अखेर त्यांना लागून राहिला होता. 'ज्ञानप्रकाश'चे संपादक म्हणून जर यांना मरण लाभलें असतें तर त्यांना केवढें समाधान वाटलें असतें! पण दुष्ट हितशत्रूंनीं त्यांना तेवढेंदेखील समाधान लाभूं दिलें नाहीं. 'ज्ञानप्रकाश'चे माजी संपादक म्हणून एकाद्या निपुत्रिकाप्रमाणें त्यांना आपल्या पत्राच्या नांवानें हाय खाऊन मरावें लागलें. छे, छे, महाराष्ट्रांत फार मोठा अन्याय झाला. महाराष्ट्राचें फार मोठें नुकसान् झालें. महान् संपादक! थोर सत्पुरुष!

———

महात्मा गांधी अमर हो गये ! : : १२

गांधीजी गेले. महात्माजी गेले. स्वातंत्र्याचे जनक गेले, तेरा दिवस झाले जाऊन त्यांना. तीस जानेवारीला सायंकाळीं भारताच्या राजधानींत प्रार्थनेच्या पवित्र भूमीवर हुतात्म्याचें वीरमरण आलें त्यांना. देशांत पेटलेल्या द्वेषाच्या कुंडांत अखेर त्यांच्याच प्राणाची आहुति पडली. मानवतेच्या प्रेमाखेरीज ज्या हृदयांत दुसरा कधीं विचारच स्फुरला नाहीं, तें कोमल हृदय शेवटीं माणसाच्याच हातून छिन्नविच्छिन्न झालें. जगाच्या कल्याणासाठीं परमेश्वरानें घडविलेली एक महान् कलाकृति एका उन्मत्त पशूनें फोडून टाकली. प्रेमाचा आणि शांतीचा प्रकाश विश्वासावर ढाळणारा एक विराट दीपस्तंभ एका क्षणांत कोसळून खालीं पडला. दुसऱ्या दिवशीं यमुनेच्या तीरावर मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून लाख लोकांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं गांधीजींच्या पार्थिव देहाला निरोप दिला. आणि 'महात्मा गांधी अमर आहेत' असे स्वर्गांतील तेतीस कोटी देवांना तेथून बजावून सांगितलें. चंदनाच्या सुवासिक ज्वाळांवर आरूढ होऊन त्यांच्या देहातला तेजस्वी कण न् कण पंचमहाभूतामध्यें जाऊन मिसळला. उद्यां त्यांच्या अस्थि प्रयाग क्षेत्रांत त्रिवेणी संगमांत आणि त्यांचें चिताभस्म भारतामधील पवित्र सरिततीर्थांत अन् सागरातीर्थांत विसर्जन होत असतां या देशांतील कोटयवधि जनता त्यांना अश्रुंची श्रद्धांजली अर्पण करील. झाला. या युगामधला एक महान् अवतार समाप्त झाला. कसल्या भयानक कालखंडामधून चाललों आहोंत आपण ! पांच महिन्यापूर्वीच या महान् भारताचे तुकडे झाले आणि आतां त्या भारताचा भाग्यविधाता निघून गेला !

गेले तेरा दिवस सारें जग गांधीजींसाठीं अश्रू ढाळीत आहे. पृथ्वीतलावर असा एकहि देश नसेल, असें एकहि राष्ट्र नसेल किंवा असा एकहि समाज

नसेल की, गांधीजींच्या मरणामुळें ज्याच्या हृदयामध्यें दुःखाची कळ उठली नसेल. गांधाजींच्या क्रूर हत्येची वार्ता ऐकून जगामधल्या मोठमोठ्या राज्यांचे अधिपति, मोठमोठ्या राष्ट्रांचें अग्रणी, मोठमोठ्या धर्मपीठांचे आणि तत्त्वज्ञानाचे आचार्य शोकानें व्याकुळ होऊन गेले. आणि गांधीजींवर प्राणापलिकडे प्रेम करणारा त्यांचा भारतवर्ष तर त्यांच्यासाठीं गेले बारा दिवस एकसारखा धाय मोकलून रडतो आहे. लक्षावधि घरांतून, झोपड्यांमधून आणि शेतांमधून हृदयभेदक आक्रोश आणि हुंदके ह्यांच्यावांचून दुसरें कांही ऐकूंच येत नाहीं. दुःखानें लोकांना वेड लागायची पाळी आली आहे. जनतेच्या जीवनाचा ओघ गोठून अगतिक झाल्यासारखा दिसत आहे. गिरण्यांतल्या आणि कारखान्यांतल्या यंत्रांचीं चक्रें जागच्या जागीं स्थिर होऊन बसलीं आहेत. आगगाड्यांचीं धडधडतीं एंजिनें आणि गजबजलेले डबे शून्य मुद्रेनें रूळावरून रेंगाळत आहेत. शहरांमधले रहदारीचे रस्ते आणि बाजारपेठा भकास चेहेरे करून जेथल्या तेथें स्वस्थ बसलेल्या दिसत आहेत. नांगरावर हात ठेवून शेतकरी शेतांमध्यें निश्चल उभे राहिलेले आहेत. कामगारांच्या उचलेल्या हातांतले हातोडे तसेच वरचेवर अधांतरीं अडून बसले आहेत. मुलें आपले खेळ विसरून गेलीं आहेत. माणसांचें कामांत लक्ष्य उरलें नाहीं. कोणाला कशाचेंहि भान राहिलें नाहीं. गेले तेरा दिवस साऱ्या देशावर शोकाचें एक जाड शेवाळें थिजून बसल्यासारखें दिसत आहे.

जगानें आजपर्यंत अनेक महापुरुषांचीं मरणें पाहिलीं असतील. सम्राटांची पाहिलीं असतील. साधूंचीं पाहिलीं असतील. महापराक्रमी वीरांचीं पाहिलीं असतील. पण ज्याच्या मरणानें साऱ्या मानवतेला दुःख झालें, ज्यांच्या मरणासाठीं अब्जावधि डोळ्यांनीं अश्रू गाळले असें जगानें पाहिलेलें हें पहिलेंच मरण आहे. अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या राजराजेश्वराच्या मृत्यूसाठींहि जग कधीं एवढें रडलें नसेल. ज्यांच्या नांवाचा उच्चार होतांच चारी खंडांतल्या कोट्यवधि लोकांच्या माना आज भक्तिभावानें वांकल्या जात आहेत, त्या परमेश्वरी प्रेषितांनाहि अवतारसमाप्तीच्या समयीं अश्रूंच्या मौक्तिकांचा एवढा अवाढव्य नजराणा मिळाला नसेल. जें अलौकिक जीवन इतिहासानेंहि पूर्वी कधीं पाहिलें नाहीं आणि जें अद्वितीय जीवन भविष्यकाळाला अनेक शतकें नंतरहि पहावयाला मिळेल किंवा काय याचा संशय आहे, तें भाग्यशाली जीवन आरंभापासून अखेरपर्यंत जगाला साक्षी ठेवून या

वर्तमानानें भारतवर्षाला दाखविलेलें आहे. सर्व जगाला प्रकाश देणारा सूर्य रोज संध्याकाळीं मावळतांना जगाला पहावयाला मिळतो. पण सर्व मानवतेला उष्णता आणि उजेड देणारा महापुरुष प्रकाशतांना आणि मावळतांना डोळ्यांनीं पाहण्याचें भाग्य युगायुगामधुन एकादें वेळींच जगाला लाभतें. हा साक्षात्कार जगाला झाला म्हणूनच तें गांधीजींच्या वियोगानें आज इतकें विव्हल झालें आहे !

लेनिन, रूझवेल्ट, हिटलर, मुसोलिनी असे अद्वितीय पराक्रमाचे पुरुषोत्तम तर कालपरवां आपल्या डोळ्यांसमोर अस्तंगत झाले. त्याला कांहीं फार काळ लोटला नाहीं. लक्षावधि लोक त्यांच्यासाठीं रडले. नाहीं असें कसें म्हणावें ? पण साऱ्या जगानें कांहीं त्यांच्यासाठीं हुंदके दिले नाहींत. उलट त्यांच्या मरणानें पुष्कळांना समाधानच वाटलें. आपापल्या राष्ट्राच्या उद्धारासाठीं त्यांनी अचाट पराक्रम केलें. आणि ते पराक्रम करीत असतांना त्यांना आपल्या प्राणांचें बलिदानहि करावें लागलें. पण त्यांच्या कार्यांत आणि तत्त्वज्ञानांत आपलें कल्याण आहे असें एकमतानें जगाला मात्र कधींच वाटलें नाहीं. गांधीजींनीं आपल्या मृत्यूनें जन्माच्या दावेदारांनाहि रडावयला लावले. मानवतेला तर आपला एक महान् मित्र गेल्यासारखें वाटतें आहे. जगांतील दलितांना, गरीबांना आणि अनाथांना आपला एक पाठीराखा हरविल्यासारखें वाटत आहे. भारताला गांधीजींनीं स्वातंत्र्य दिलें म्हणून त्याला त्यांच्या मरणामुळें एवढें दुःख झालें आहे असें कोणी म्हणेल. पण बाकीच्या जगानें गांधीजींसाठीं कां बरें स्फुंदावें ? जगाला गांधीजींनीं काय दिलें ? शाश्वत सुखाचा आणि शांतीचा प्रकाश जगाला गांधीजींनीं देऊन ठेवला आहे. म्हणून कृतज्ञतेच्या भावनेनें जगाचे डोळे आज ओले झाले आहेत. आणि हा प्रकाश गांधीजींच्या अवताराबरोबर अस्तंगत होण्याइतका दुर्बळ नाहीं. त्या प्रकाशाचा अमर स्रोत त्यांच्यानंतर हजारों वर्षेपर्यंत मानवतेचा मार्ग उजळीत रहाणार आहे. गांधीजी हे राष्ट्रपुरुष नसून ते विश्वपुरुष होते. हें जगाला आज पूर्णपणें पटलेलें आहे.

जगाला अवताराची कल्पना मान्य नसेल. पण हिंदु जनतेचा अवतारावर विश्वास आहे. प्रत्येक युगामध्यें मानवतेच्या कांहीं गुणांचा विकास होत असतो. आणि कांहीं गुणांचा ऱ्हास होत असतो. ऱ्हासाचा अतिरेक झाला म्हणजे

मानवतेच्या प्रगतीचें चक्र गर्तेंत रुतून बसतें. म्हणून तिच्या उद्धारासाठीं परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो. तें अवतारकार्य हा त्या युगाचा धर्म ठरतो. गेल्या शतकांत मानवतेच्या बुद्धीचा विकास झाला हें खरें. पण त्याचबरोबर तिच्या हृदयाचा अधःपात होण्यास प्रारंभ झाला. हिंसेच्या राक्षसानें तिच्या अंतःकरणांत प्रवेश करून तिच्या जीवनाचा ताबा घेतला आणि तिची बुद्धिसंपदा मातीमोल करून टाकण्यास सुरुवात केली. चालू शतकांत मानवतेची ही हिंसावृत्ति इतक्या पराकोटीला जाऊन पोंहोंचली कीं तिच्यामधून जगाला ग्रासणारीं मोठमोठीं जुलमी साम्राज्यें निर्माण झालीं. आणि त्यांतून हिटरल-मुसोलिनीसारखे एकाहिपेक्षां एक भयंकर असे अकाळ-विकाळ हुकुमशहा प्रकट होऊन महायुद्धाचे प्रचंड वणवे जगभर पेटवण्याला त्यांनीं सुरुवात केली. पृथ्वीगोलाला आग लावून सारी मानवजात भस्मसात् होते आहे किंवा काय असें भय निर्माण झालें. हिंसेच्या या अग्निप्रलयामधून मानवतेचा उद्धार करण्यासाठीं तिला अहिंसेचा संजीवनी मंत्र देणारा महात्मा म्हणूनच परमेश्वराला या युगामध्यें निर्माण करणें भाग पडलें. गांधीजी हें या युगांतले अवतारी पुरुष होत आणि अहिंसा हा आजचा युगधर्म होय यांत मुळींच संशय नाहीं !

अहिंसेच्या या महर्षीला हिंसेच्या स्थंडिलावर मरण आलें हा कांहीं हिंसेचा विजय नाहीं. गांधीजींच्या देहाला ज्या क्षणीं हिंसेनें हात लावला त्याच क्षणीं ती मरून पडली. गांधीजी मेले नाहींत. हिंसा मेली. गांधीजी आणि त्यांची अहिंसा अमर झाली. जगाच्या अंतापर्यंत अमर झाली. दोन महायुद्धें झालीं. रक्ताच्या नद्या वाहिल्या. भारताची फाळणी झाली. लक्षावधि लोकांची हत्त्या झाली. पण एवढा प्राणनाश होऊनहि जगांत हिंसेची एवढी कधीं बदनामी झाली नाहीं, जेवढी गांधीजींच्या मृत्यूनें आतां झाली. हिंसेनें जगांचें काळीजच जेव्हां हिरावून नेलें तेव्हां हिंसेचें अघोरी स्वरूप जगाला कळून आलें. आतां मान वर करून उजळ माथ्यानें आणि फुशारकीनें हिंसेला माणसाच्या समाजांत कधींहि फिरतां येणार नाहीं. हिंसेच्या पराक्रमाचीं आणि सामर्थ्याचीं स्तोत्रें मोठमोठ्या गर्जना करून कोणालाहि या जगांत आतां म्हणतां यावयाचीं नाहींत. गांधीजींच्या आयुष्यांत जी अहिंसा पुष्कळांना दुबळी वाटली आणि ज्या अहिंसेचें कित्येकदां हसूं आलें, त्या अहिंसेचें देदीप्यमान अ णि प्रखर स्वरूप अखेर गांधी-

जींच्या मरणांत प्रकट झालें. अहिंसेमध्यें केवढें सामर्थ्य आहे हें बंदुकीच्या गोळ्या आपल्या उघड्या छातीवर निर्भयपणें झेलून गांधीजींनीं जगाला दाखविलेलें आहे. कोणत्या शूरांची, कोणत्या वीरांची, कोणत्या सैनिकांची आणि कोणत्या सैनापतीची अशा मरणाला तोंड देण्याची छाती आहे ! अहिंसा भ्याड आहे, अहिंसा दुर्बल आहे, असें म्हणण्याची कोणाला आतां हिंमत आहे ? हजारों लोकांना मारून स्वतःचे प्राण शाबूत ठेवण्याला जी शिकवतें ती हिंसा शूर म्हणावयाची का हजारों लोक वांचावेत म्हणून जी स्वतःच्या प्राणाचें बलिदान करावयाला सांगते ती अहिंसा शूर म्हणावयाची ? छे, छे, अहिंसेचा एवढा मोठा विजय आजपर्यंत जगांत कधीं झालेला नसेल. गांधीजींच्या पवित्र रक्तानें भरलेलीं तीं काषाय वस्त्रें अहिंसेची पताका कल्पांतापर्यंत या विश्वावर फडफडत ठेवतील यांत मुळींच संशय नाहीं !

चिलखतानें, शिरस्त्राणानें, तरवारीनें, पिस्तूलानें किंवा बंदूकींनें माणसांच्या प्राणाचें का रक्षण होतें ? अलोट शरीरबळ कमावून ठेवलें म्हणजे का माणूस मृत्यूपासून निर्भय होतो ? उभ्या अठ्ठ्याहत्तर वर्षांत गांधीजी मृत्यूला कधींच भ्याले नाहींत. कोणाकडूनही त्यांनीं आपल्या प्राणाचें रक्षण कधीं करून घेतलें नाहीं. आठ सालीं दक्षिण आफ्रिकेंत मीर आलम पठाणानें त्यांच्या डोक्यावर लाठीचे प्रहार करून त्यांना मृत्यूच्या उंबरठ्यापर्यंत ओढीत नेले. तरी देखील ते मृत्यूला भ्याले नाहींत. शुद्धीवर येतांच ' मीर आलमला मुक्त करा ! ' हीच देववाणी पहिल्यांनदा त्यांच्या तोंडून बाहेर पडली. ते शब्द ऐकतांच मीर आलम त्यांच्या पायांवर कोसळून पडला आणि एकाद्या मुलाप्रमाणें रडूं लागला. एवढी मोठी ब्रिटिश साम्राज्यसत्ता. कायसर आणि हिटलर देखील जिनें धुळीला मिळवले. पण सत्तावीस वर्षांच्या झगड्यांत या बलाढ्य साम्राज्यशाहीचें एकदां देखील गांधीजींना कधीं भय वाटलें नाहीं. तिच्या तोफांचीं, तिच्या बंदुकींची, तिच्या तुरुंगाची आणि तिच्या लाठ्यांचीं क्षणभरहि त्यांनीं कधीं परवा केली नाहीं. मग मृत्यूची त्यांना काय कदर वाटणार ? उलट, प्राणांतिक उपोषणें करून आपण होऊनच त्यांनीं मृत्युला भेटण्याचा कित्येक वेळां प्रयत्न केला. त्रेचाळीस सालच्या उपोषणाचें वेळीं तर आगाखान वाड्यांत ब्रिटिश सरकारनें त्यांच्या चंदनाची चिता देखील रचून तयार ठेविली होती. पण मृत्यूच बिचारा घाबरून मागें पळाला. आणि

त्यानें आपल्या भूतमहालाचे दरवाजे बंद करून घेतले. तेव्हां गांधीजींना नाइलाजानें परत फिरावें लागले. मृत्यूच्या छातींत धसका उत्पन्न करणारी या पृथ्वीतळावरची अहिंसा ही एकच अभ्दुत शक्ति आहे हें गांधीजींनी आतां जगाला सिद्ध करून दाखविलेलें आहे.

स्वतंत्र भारताच्या राजधानींत शेंकडों लोकांच्या समक्ष स्वातंत्र्याच्या जनकाचा खून दिवसाढवळ्या कसा होऊं शकतो याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. त्याचें रक्षण करण्यासाठीं शेंकडों गुप्त पोलिस त्यांच्याभोंवती कां उभे केले नाहींत, असा सवाल पुष्कळ विचारतात. पण असा प्रश्न विचारणाऱ्यांना गांधीजींच्या महान् जीवनाचें रहस्यच मुळीं कळालें नाहीं असें म्हणावयाला हवें! ज्यांनीं आतांपर्यंत भारताच्या प्राणाचें रक्षण केलें त्यांच्या प्राणाचें कोण रक्षण करूं शकणार? तें माणसांचें काम नाहीं. ते परमेश्वराचें काम आहे. मृत्यूचें भय तुम्हां आम्हांला. भ्याडांना. नामर्दांना मृत्यूचें भय. ज्यांचें नांव उच्चारतांच मृत्यू देखील थरथरां कांपतो, त्यांना मृत्यूचें भय कसें वाटणार? गेल्या वर्षांपासून जातीय द्वेषाच्या काळ्याकुट्ट रेड्यावर बसून मृत्यु या देशामधून उघडपणें वावरूं लागला होता. आणि देशाची फाळणी झाल्यापासून तर एकाद्या दारू पिऊन झिंगलेल्या खुनी मवाल्याप्रमाणें तो खांद्यावर कुऱ्हाड धरून लांब लांब टांगा टाकीत टाकीत देशामधून राजरोसपणें फिरूं लागला होता. आज पश्चिम पंजाबांत, परवा सिंधमध्यें तर तेरवां पूर्व बंगाल्यांत, असा देशभर त्यानें जणु कत्तलखानाच उघडलेला होता. इतकें रक्त पिऊन बेहोष झाल्यामुळेंच त्याला वीस जानेवारी रोजीं गांधीजींच्या प्रार्थनेच्या समेंत येण्याची पहिल्यांदा छाती झाली. पण गांधीजींच्या जवळ येण्याचें धैर्य कांहीं त्याला झालें नाहीं. त्यांच्यापासून चाळीस यार्ड अंतरावर तो अदबीनें एका भिंतीला टेकून उभा राहिला. गांधीजींच्या प्रार्थनेचे शब्द त्याच्या कानीं पडले मात्र. त्याची खुनी धुंदी एकदम उतरली आणि हातांतला बाँब जागच्या जागीं फेंकून देऊन तो एकदम पळून गेला. तथापि, आपल्या भ्याडपणाची त्याला लाज वाटली म्हणूनच कीं काय भावलपूर संस्थानांत आणि गुजरात स्टेशनवर जाऊन पुन्हां तो रक्ताचे हौदचे हौदें पिऊन आणि बेफाम होऊन तीस तारखेला दिल्लीला परत आला. आणि गांधीजींच्या प्रार्थनेच्या वाटेवर दबा धरून बसला. गांधीजींची प्रार्थना पुन्हा ऐकण्याची त्याची छातीच नव्हती. तथापि, मनाच्या

तशा हिंस्र स्थितींतहि गांधीजींच्या पवित्र पायांना प्रथम त्यांनें हात लावला. आणि मगच त्यांच्या अंगावर त्यानें आपला खुनी हात उचलला. मृत्यूला देखील गांधीजींना वंदन करावें लागलें हा गांधीजींनीं चमत्कार करून मृत्यूवर विजय मिळविला. गांधीजी हे जिवंतपणीं महात्मा होते. पण आतां ते मृत्युंजय झाले! गांधीजींना मारण्यासाठीं एखाद्या दरोडेखोराप्रमाणें मृत्यूला लपत छपत यावें लागले हाच मृत्यूचा खरा पराभव आहे. गांधीजींना मारणें हें अतिशय सोपें काम होतें. पंतप्रधान खेर म्हणाले, त्याप्रमाणें 'बागेंत शिरून सहज एखादें फूल तोडावें तितकें तें सोपे होतें.' पण त्यासाठीं मृत्यूनें एवढी कारस्थानें कशाला केलीं ? मृत्यु गांधीजींना भ्याला हेंच खरें.

गांधीजींचें जीवन जसें अद्‌भुत होतें तसें त्यांचें मरणहि पण विलक्षणच म्हटलें पाहिजे. असें मरण त्यांना येईल असें कोणालाहि वाटलें. नव्हतें ! हिंदु माणूस जास्तींत जास्त शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरतो. पण गांधीजींना सव्वाशें वर्षे जगण्याची आकांक्षा होती. आणि तेरा जानेवारीला सुरूं केलेलें आपलें शेवटचें उपोषण पूर्ण केल्यानंतर तर त्यांनीं एकशेतेहतीस वर्षे जगण्याचा निर्धार केला होता. दीर्घ जीवनाचा इतका विश्वासपूर्ण निश्चय देवांनादेखील करतां आला असता किंवा काय याची शंका आहे. पण तो निश्चय प्रकट झाल्यानंतर अवघ्या बारा दिवसांनींच गांधीजी आपली जीवनयात्रा संपवून या जगांतून चालत झाले. गांधीजींनी आपल्या हयातींत हिमालयाएवढें पराक्रम आणि चुका करून आपल्या उपासकांची जशी तिरपीट उडवून सोडली, त्याचप्रमाणें आकस्मिक मरणाच्या आघातानें त्यांनीं आपल्या असंख्य भक्तांची अतिशय दाणादाण उडवून सोडली आहे. हिमालय कितीहि उंच असला तरी त्याला शिखर आहे. महासागर कितीहि खोल असला तरी त्याला तळ आहे. समुद्राला कितीहि भरती आली तरी त्याच्या किनाऱ्याची सीमा ठरलेली आहे. पण युगप्रवर्तक महापुरुषाच्या निधनानें जगाला जें दुःख वाटतें त्याला तळ नाहीं. खोली नाहीं. आणि सीमा नाहीं. कुटुंबांतील आप्त माणूस किंवा समाजांतील कर्ता पुरुष मरण पावला म्हणजे त्याप्रसंगीं दुःख कसें व्यक्त करावयाचें हें सर्वांना माहीत आहे, पण युगायुगामध्यें जो माणूस एकादे वेळींच जन्माला येतो त्याच्या

निधनाबद्दल जगानें शोक तरी कसा करावयाचा, आक्रोश तरी किती करावयाचा आणि अश्रूंचे घबघबे तरी किती सांडायचे ?

महापुरुषाच्या मरणाबद्दल दुःख कसें प्रकट करावें ह्याचें शास्त्र कांहीं कुणी लिहून ठेवलेलें नाहीं. ती कांहीं वारंवार घडून येणारी गोष्ट नाहीं. तथापि, अवतारी पुरुषांच्या अवसानांच्या वेळीं सामान्य पद्धतीचा रडारड आणि आरडाओरड करणें हें त्या प्रसंगाच्या गांभीर्याची आणि पावित्र्याची शुद्ध विटंबना करण्यासारखें आहे. हा त्या महात्म्यांचा अपमान आहे. गांधीजींना ज्या तऱ्हेनें मरण आलें, तो हृदयभेदक घटना तर खरीच. पण महान् जीवनाचा तो कांहीं शोचनीय शेवट नव्हे. करुणरस निर्माण करणाऱ्या दुःखान्त नाटकाचा तो कांहीं अखेरचा प्रवेश नव्हे. लढतां लढतां धारातीर्थी पतन पावणाऱ्या वीरांचें मरण हा काय रडण्याचा विषय आहे ? ज्या मरणानें गांधीजींना अमर पदावर नेऊन बसविलें आणि चिरंजीव केलें, त्या मरणाबद्दल शोक करीत बसणें वेडेपणाचें आहे. प्राणांतिक उपोषणांत गांधीजींना अंथरुणावर पडल्या पडल्या हळुहळू मरण आले असतें तर तें मात्र त्यांच्या आयुष्याचें शोचनीय पर्यवसान झालें असतें. पण अठ्ठ्याहत्तर वर्षांचा हा वृद्ध भीष्माचार्य पिस्तूलाच्या गोळ्या फुलाप्रमाणें आपल्या छातीवर झेलून आपल्या शत्रूवर विजय मिळवतो हा तुम्ही आम्ही रडण्याचा विषय नसून एकाथा व्यासानें आणि वाल्मिकीनें महाकाव्य रचण्याच्या योग्यतेचा तो पराक्रम आहे. शेक्सपीयरला किंवा कालिदासालाही आपल्या नाटकांतील अलौकिक नायकाच्या आयुष्याचा शेवट इतका नाट्यपूर्ण रीतीनें करतां आला नसता. गांधीजींचें मरण हा विषाद मानीत बसण्याचा प्रसंग नाहीं. दृष्टि अंतर्मुख करून त्यांच्या जीवनप्रवाहाच्या अवाढव्य विस्ताराचें शांतपणें अवलोकन करण्याची ही घटिका आहे. गांधीजींच्या मृतदेहा शेजारीं सबंध रात्रभर एकसारखी जमिनीकडे दृष्टि लावून सरदार वल्लभभाई पटेल पुतळ्यासारखे निश्चेष्ट बसलेले होते. त्यांच्या डोक्यामधून गांधीजींच्या जीवनाचे केवढे मोठे देखावे आणि चित्रपट सरकत असले पाहिजेत त्यावेळीं ! महापुरुषाच्या मरणाबद्दल सूज्ञ माणसांनीं असें दुःख करावयाला हवें. ती कांहीं वैयक्तिक आपत्ति नाहीं. राष्ट्राच्या आयुष्यांतली ती एक रौद्र ऐतिहासिक घटना आहे !

गांधीजींच्या जीवनाची कशाशीं तुलनाच करावयाची झाली तर तो केवळ गंगानदीच्या प्रवाहाशींच करता येईल. हिमालयामध्यें उगम पावल्यापासून तो बंगालच्या सागरामध्यें विलीन होईपर्यंत गंगेच्या वेगांत, विस्तारांत आणि वैभवांत केवढी विविधता निर्माण झालेली दिसून येते. मानससरोवरांतून बाहेर पडणाऱ्या लहानशा स्फटिक प्रवाहाला सागरासमीप येईपर्यंत केवढें भव्य धवल आणि विशाल स्वरूप प्राप्त झालेलें आहे. हजारों मैलांच्या गंगेच्या प्रवासांत किती जलप्रवाह आणि किती सरिता तिच्या जीवनांत येऊन एकरूप झालेल्या आहेत. पर्वताच्या कड्यावरून आणि खडकावरून वेगानें उड्या घेत उतरणारें तिचें पाणी सपाट भूप्रदेशावर संथ आणि स्थिर झाल्यानंतर किती असंख्य लोकांच्या जीवनांत तिनें सुख, शांति आणि समृद्धि निर्माण केलेली आहे ! पुढें पुढें तिचें पात्र जसें प्रगल्भ आणि विशाल होत गेलें, तसें तसें तिचें पावित्र्य आणि वात्सल्य एकसारखें वाढतच गेलेलें आहे. आणि त्यामुळें लक्षावधि लेकरांना अंगाखांद्यांवर खेळवणाऱ्या महन्मंगल मातेची महती तिला शेवटीं प्राप्त झालेली आहे. गंगेचा हा भूगोल आणि इतिहास लक्षांत आणला म्हणजे अठ्ठ्याहत्तर वर्षांपूर्वी पोरबंदर येथें करमचंद गांधींच्या पोटीं जन्माला आलेला एक चिमुकला बालक आणि पंचावन्न वर्षांपूर्वी पोट भरण्यासाठीं दक्षिण आफ्रिकेंत भटकत गेलेला एक बेकार बॅरिस्टर हा गेल्या तीस वर्षांच्या अवधींत कोट्यवधि जीवन्मृतांना जागृत करून त्यांना स्वातंत्र्याची संजीवनी पाजणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी कसा झाला हें कळून येण्यासारखें आहे. या तीस वर्षांत भारतवर्षाचें जीवन गांधीजींच्या जीवनाशीं इतक्या सूक्ष्म आणि विविध तऱ्हेनें समरस झालेलें आहे कीं, गांधीजींच्या चरित्राला एकाद्या महासागराचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. गांधीजींनींच एके ठिकाणीं म्हटलेलें आहे कीं, "गंगेचा प्रवाह जसजसा वहात जातो, तसतसे त्याला निरनिराळे ओघ येऊन मिळतात. आणि मुखापाशीं गंगेचें पात्र इतकें विस्तीर्ण होतें कीं, त्यांतून नदीचा शेवट कोठें आहे आणि समुद्राचा आरंभ कोठें आहे हें कळेनासें होतें." काळाच्या सागरांत गांधीजींचें जीवन आज विसर्जन होत असतांना भारतवर्षाचें जीवन कोणतें आणि गांधीजींचें जीवन कोणतें, हें एकमेकापासून अलग करून पहाणें आतां अगदीं अशक्य आहे. भारताचें जीवन तेंच गांधीजींचें जीवन आणि गांधीजींचें जीवन तेंच भारताचें जीवन असें अद्‌भुत अद्वैत आज दोघांमध्यें निर्माण झालेलें दिसून येतें.

—९—

हा कोट्यवधि शेतकऱ्यांचा आणि खेडवळांचा देश, तेहतीस कोटी देवांची पूजा करणारा देवभोळा देश. पण गेल्या तीस वर्षांत तो आपल्या देवांना-देखील विसरून गेला. आणि गांधीजींचें भजन करावयाला लागला. जागोजाग गांधीजींचीं देवळें त्यानें बांधलीं नाहीं इतकेंच, पण देशांतलें प्रत्येक घर आणि झोंपडी गांधीजींचें देऊळ झालें. प्रत्येकाचें हृदय हें गांधीजींचें राऊळ बनलें. देवळामधला देवांचा जयजयकार थांबला. आणि मैदानांवर गांधीजींच्या नांवाचा जयजयकार सुरू झाला. स्वर्गांतल्या देवांना देखील वैषम्य वाटलें असेल. ते खालीं पृथ्वीतलाकडे टक लावून एकसारखें पहात बसले असतील. आणि विचारीत असतील कीं, या देशांतल्या माणसांना आमच्या नांवाचा देखील विसर पाडणारा हा कोण अद्‌भुत माणूसदेव किंवा देवमाणूस या देशांत एकदम निर्माण झालेला आहे? शेषशायी विष्णूच्या पायाशीं बसलेली लक्ष्मी पाय दाबण्याचें आपलें काम थांबवून उद्गारली असेल कीं, "देवाधिदेवा, या भारतांतल्या लोकांना वेड लागलें आहे कीं काय? आजपर्यंत आपणां लक्ष्मीनारायणाची पूजा करणारें हें लोक एकाएकीं डोकें फिरल्याप्रमाणें या दरिद्री नारायणाच्या भजनीं काय लागले आहेत?" अंगाला राख फांसून स्मशानांत एकाद्या झाडाखालीं आपल्या गणांच्या घोळक्यांत सदैव बसणाऱ्या भोळ्या शंकराच्या पायांवर डोकें ठेवून पार्वती ओशाळा चेहरा करून म्हणाली कीं, "भगवान्, आपला हा उघडावाघडा अवतार बघून आजपर्यंत मी तुम्हांला हिणवित होते. भारतवर्षांत तुम्हांला मिळालेल्या ह्या जोडीदाराच्या पायावर तेथील जनता भक्तिभावानें लोटांगणें घालत असलेली बघून मी माझें बोलणें सपशेल मागें घेतें. मला क्षमा करा!" देवादिकांना देखील कोडें पडलें असेल. ब्रिटिश राज्यकर्त्यांनाहि गांधीजींचें कोडेंच पडलें. ते म्हणत, "अर्ध्या जगावर राज्य करणारे आम्ही आमच्या साम्राज्यावर जो सूर्य कधीं मावळत नाहीं, त्या सूर्याला गिळूं पहाणारा अस्थिपंजर हनुमान् या हिंदुस्थानांत निर्माण झालेला आहे!" गोऱ्या जगालाहि गांधीजींचें कोडेंच पडलें. पण त्यानें त्याच्यावर विचारच मुळीं करावयाचें सोडून दिलें. उपेक्षेनें मान उडवीत ते म्हणाले, "ठाऊक आहे. हिंदुस्थान हा बोलून चालून जादुगाराचा आणि मंत्रिकांचा देश आहे. त्यापैकींच कोणी तरी किमया, नजरबंदी करणारा हा एक वस्ताद नंगा फकीर प्रकट झाला असावा. दुसरें काय?" जगांत सर्वांना गांधी-

जींचें कोडें वाटून राहिलें. पण भारतांतल्या जनतेला मात्र गांधीजींचें कोडें कधींच वाटलें नाहीं. उलट गांधीजींकडे बघतांना दौडशें वर्षे अडून पडलेलें स्वातंत्र्याचें कोडें आपोआप एकदम सुटल्यासारखें जनतेला वाटलें.

आणि तसें गूढ आणि कूट असें गांधीजींच्या जवळ कांहींच नव्हतें. गंगाजळाप्रमाणें गांधीजींचें जीवन शुभ्र आणि निर्मळ होतें. स्फटिकाप्रमाणें त्यांची बुद्धि स्वच्छ आणि तेजस्वी होती. बिलोरी भिंगाप्रमाणें त्यांचें अंतःकरण लकलकीत आणि पारदर्शक होतें. लोकांपासून लपवून ठेवण्यासारखें गांधीजींजवळ कांहींच नव्हतें. सूर्यप्रकाशासारखें गांधीजींचें बोलणें आणि वागणें लख्ख आणि मोकळें होतें. गांधीजींच्या बिऱ्हाडाला भिंती नव्हत्या आणि दारेंहि नव्हतीं. उघड्या चव्हाट्यावर त्यांनीं आपला संसार मांडून ठेवलेला होता. डोंगर दूर असतात म्हणून ते साजरे दिसतात. तारे उंच असतात म्हणून ते तेजस्वी दिसतात. असा दूरपणा किंवा दुजाभाव गांधीजींबद्दल लोकांना कधींच वाटला नाहीं. आपल्या अंगणामधलाच हा हिमालय आहे. आपल्या आड्यावर बसून चमकणाराच हा एक चंद्र आहे असें प्रत्येकाला वाटे. जवळपणामुळें किंवा परिचयामुळें वस्तूंचा मोठेपणा कमी होतो असा समज आहे. हा समज गांधीजींनीं खोटा ठरविला. आपल्या कुटुंबांतल्या माणसापेक्षां लोकांना ते अधिक जवळचे वाटत. अतिपरिचय हाच मुळीं त्यांच्या मोठपणाचा पाया आहे. आजपर्यंत या देशांत होऊन गेलेल्या कोणत्याहि महान् विभूतीबद्दल जनतेला एवढा आपलेपणा कधीं वाटला नसेल. कांहीं साधु आणि संत उणे केले तर या देशांतले कोणतेहि पूर्वीचे पराक्रमी वीर, बुद्धिमान, तत्त्वज्ञानी आणि लोकप्रिय समाजसेवक जनतेच्या जीवनाशीं गांधीजीं एवढें एकरूप झालेलें आढळणार नाहींत ! जनताजनार्दनाच्या निःसीम उपासनेमधून आणि उत्कट भक्तिभावनेमधूनच गांधीजींच्या सन्यासी जीवनाची आणि व्यक्तिमत्वाची उत्क्रांति झाली. राज्यकर्त्यांची विलायती विद्या, संस्कृति आणि वेषभूषा ही स्वदेशांतील जनतेशीं समरस होण्याच्या मार्गामध्यें जशी जशी आड येऊं लागली, तसा तसा त्या त्या गोष्टींचा गांधीजी धैर्यानें त्यागच करीत गेले. त्यांनीं बूट फेकला. कोट फेकला. विजार फेकून दिली. आंगरखा काढून टाकला. काठेवाडी फेटा झुगारून दिला. एका फेट्यांत दहा टोप्या होतात, म्हणून टोपी घालायला सुरवात केली. पुढें तो

टोपीहि काढून टाकली. सदरा सोडला. आणि कमरेला हातभर पंचा गुंडाळून ते राष्ट्रासमोर-नव्हे जगासमोर उघडी छाती करून उभे राहिले. तेव्हां सात लक्ष खेडेगांवांमध्यें राहणाऱ्या कोटयवधी जनतेची खात्री झाली कीं, आपल्याप्रमाणें झोपडींत राहाणारा, चरख्यावर सूत कांतणारा, शेळीचें दूध पिणारा, कमरेला पंचा लावून आणि डोक्यावर वीतभर फडकें टाकून आपल्या-प्रमाणेंच उन्हातान्हांतून उघड्यानें हिंडणारा हाच आपला आणि आपल्या देशाचा तारणहार आहे. आणि त्याबरोबर 'महात्मा गांधी की जय!' अशा हर्षाच्या आरोळ्या कोटि कोटि मुखांतून एकदम देशामध्यें उमटल्या!

गरीबाबद्दल, दलितांबद्दल आणि दुःखितांबद्दल अथांग प्रेमाचा आणि सहानुभूतीचा सागर हेलावत होता. गांधीजींच्या हृदयांत, त्या माणुसकीच्या उत्कट भावनेमधूनच त्यांच्या जीवनांतलें सारें सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान निर्माण झालें. गरीबांच्या हालअपेष्टा त्यांना बघवत नसत. दलितांची छळणूक त्यांना पाहवत नसे. दुःखितांचें सुसकारें आणि हुंदके त्यांना ऐकवत नसत. धर्माच्या, वर्णाच्या आणि पैशाच्या तत्त्वावर कोणत्याहि समाजाची विषम विभागणी व्हावी आणि वरिष्ठ वर्गानें कनिष्ठावर राजरोसपणें जुलूम करण्याची मिरासदारी मिळवावी किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन तेथील जनतेवर वर्षानुवर्षे जनावराचें जीवन जिणें लादावें हें गांधीजींच्या भूतदयेला कधींहि सहन होण्यासारखें नव्हतें. सत्तेच्या, संपत्तीच्या आणि साम्राज्याच्या अनावर हव्यासामुळें पृथ्वीतलावर माणसाचा नरक निर्माण होतो, हा भेसूर देखावा त्यांनीं वयाच्या तेविसाव्या वर्षी दक्षिण आफ्रिकेंत जेव्हां स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिला, तेव्हां त्यांचा हृदयस्थ पुरुषोत्तम एकदम जागा झाला. आणि त्यानें त्यांच्या अंगावरचा पोटभरू बॅरिस्टरीचा झगा एकदम भिरकावून दिला, आणि त्यांच्या हातांत मानवतेचें वकीलपत्र देऊन त्यांना सांगितलें कीं, "यापुढें जगांतील गरिबांच्या आणि गुलामांच्या उद्धारासाठीं झगडणें हाच तुझ्या उपजीविकेचा व्यवसाय अन् दलितांच्या, दुःखितांच्या डोळ्यां-मधले अश्रू पुसणें हाच तुझ्या जीवनाचा धर्म!" त्याबरोबर त्याच क्षणीं बॅरिस्टर गांधींची आकृति विरघळून अंतर्धान पावली आणि तिच्यामधून महात्मा गांधींचा

तेजस्वी अवतार प्रकट झाला. मोहनदास करमचंद गांधी हें जरी हिंदुस्थानांत जन्माला आले असले तरी महात्मा गांधींचा जन्म मात्र दक्षिण आफ्रिकेंत झाला, असेंच इतिहासाला नमूद करावें लागेल. ज्या गंगोदकाच्या अमृतधाराखालीं सतत तीस वर्षें न्हाऊन हा भारतवर्ष धन्य आणि मुक्त झाला, तिच्या गंगोत्रीच्या दर्शनासाठीं आपल्याला दक्षिण आफ्रिकेंतल्या नाताळाचीच यात्रा करून यावें लागेल.

भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धांत ब्रिटिश साम्राज्यशाही नष्ट करण्यासाठीं तिच्या अंगावर गांधीजींनी 'सत्याग्रह' नांवाचें जें पाशुपतास्त्र पुन्हां पुन्हां सोडलें त्याची प्राप्ति त्यांना प्रथम दक्षिण आफ्रिकेंतच झाली. हें शस्त्र प्राप्त करण्यासाठीं त्यांना त्या ठिकाणीं जी घोर तपःश्चर्या करावी लागली आणि ज्या प्रखर अग्निदिव्यांतून त्यांना जावें लागलें, त्याची आठवण झाली कीं अंगावर शहारे उभें राहातात. डोक्यावर हिंदू पगडी घालून डरबानच्या कोर्टांत पहिल्या दिवशीं त्यांनीं पाऊल ठेवलें नाहीं तोंच मॅजिस्ट्रेटनें त्यांचा अपमान करून त्यांना कोर्टातून हांकून दिलें. डरबानहून प्रिटोरियाला जातांना आगगाडीच्या पहिल्या वर्गांत बसून ते चालले असतां वाटेंत एका स्टेशनावर गोऱ्या शिपायांनीं त्यांना धक्के मारून डब्याबाहेर ढकलून दिलें. घोड्याच्या शिप्राममधल्या गोऱ्या उतारूंनीं त्यांना लाथा-बुक्क्यांनीं झोडपून चालत्या गाडींतून बाहेर ढकलण्याचा प्रयत्न केला. पण 'मनगट तुटलें तरी दांडा सोडायचा नाहीं' अशा निर्धारानें ते गाडीच्या पितळी दांड्याला धरून मार खात तसेंच लोंबकळत राहिले. डरबानच्या बंदरावर बोटींतून एकदां खालीं उतरतांच गोऱ्या गुंडांच्या जमावानें त्यांच्यावर अंड्यांचा आणि धोंडयांचा जबर मारा केला. त्या प्राणघातक हल्ल्यामधून मोठ्या शिकस्तीनेंच त्यांचें प्राण बचावले. जोहान्सबर्गच्या नोंदणी कचेरीसमोर मीर आलम पठाणानें त्यांच्या डोक्यावर सोट्याचा प्रहार करून त्यांचा जवळ जवळ कपाळमोक्षच केला होता. आत्मक्लेशाची एवढी खडतर तपःश्चर्या त्यांनीं केली, तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत सत्याग्रहाचा दैवी साक्षात्कार झाला आणि त्यांच्या मुखांतून सत्याग्रहाची अमर गीता प्रकट झाली. " प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत सद्भावाचा स्फुल्लिंग असतोच. त्यावरील राख झाडण्याचें, तो फुलविण्याचें कार्य सत्याग्रह करतो. प्रतिपक्षांच्या अंतःकरणांतील सद्भावनेवर सत्याग्रहीचा

अढळ विश्वास असतो. अनेकदां त्यानें फसविलें तरी त्याजवरचा सत्याग्रहीचा विश्वास ढळत नाहीं. तो आपल्या त्यागानें, हालानें, बलिदानानें शत्रूच्या हृदयांतील न्यायबुद्धि जागृत करतो. पाषाणहृदयीं माणूस देखील सत्याग्रहानें द्रवतो. सत्याची उपासना करतां करतांच मृत्यु येणें यापरती आनंदाची दुसरी गोष्ट नाहीं. सत्याग्रहाच्या युद्धांत द्वेषाला थारा नाहीं. स्वार्थाला स्थान नाहीं. त्यांत कोणी नेता नाहीं. कोणी अनुयायी नाहीं. त्यामुळें कोणा एकाला मृत्यु आला, तर लढा मंदावत नाहीं. उलट तो बळावतोच. शस्त्रबळानें शत्रूला जिंकण्याचा प्रयोग हजारों वर्षें पृथ्वीवर चालूं आहे. द्वेषांतून द्वेष आणि हिंसेतून हिंसा निर्माण होते. त्यामुळें मानवजातीचा भयंकर संहार होतो आहे. सत्याग्रहाचें युद्ध सदैव प्रगतिशील आणि विजयशाली असतें. कमींत कमी अशी न्याय्य मागणी करून जास्तींत जास्त आत्मबळ सत्याग्रही उपयोगांत आणतो. ईश्वरावर श्रद्धा ठेवून स्वावलंबनानें व स्वार्थत्यागानें सत्याग्रही जें कार्य करतो त्याला अंतीं यश मिळालेंच पाहिजे ! "

दक्षिण आफ्रिकेच्या यमपुरींत सडत पडलेल्या हिंदी मजूरांच्या हातीं आत्मोद्धाराचें प्रभावी शस्त्र देऊन आणि साम्राज्यशाहीच्या धुंदीनें उन्मत्त झालेल्या तेथल्या वर्णद्वेष्ट्या गोऱ्या सरकारला ताळ्यावर आणून आपल्या कोठ्यवधि हिंदी बांधवांना सत्याग्रहाच्या मंत्राची दीक्षा देण्यासाठीं गांधीजींनीं नऊ जानेवारी एकोणीसशें पंधरा रोजीं आपल्या मातृभूमीवर पाऊल टाकलें. पहिल्या महायुद्धाचा भयानक वणवा त्यावेळीं युरोपांत भडकला होता. आणि जगाचा चेहेरा भयानें आणि चिंतेनें काळवंडून काळा ठिक्कर पडला होता. अशा परिस्थितींत मुंबई बंदरांत डोक्याला बावळट पागोटें आणि अंगांत अंगरखा घालून अन् हातांत पडशी घेऊन उतरलेल्या एका लहानशा माणसाकडे हिंदी जनतेचें कसें लक्ष जाणार ! नामदार गोखले हे गांधीजींचे गुरू. मुंबईंत उतरल्यावर त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठीं गांधीजी सरळ पुण्याला गेले. गुरूनीं त्यांना उपदेश दिला कीं, आधीं देशभर प्रवास करून ये. मातृभूमिचे डोळे भरून दर्शन घे व मग कामाला लाग. तोंपर्यंत एक अक्षर बोलूं नकोस. एका हातांत गुरूनीं दिलेला फराळाचा डबा आणि काखोटींत लहानशी वळकटी मारून

हा चिमुकला माणूस आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत दाटीवाटीमध्यें बसून मायदेशाची यात्रा करावयाला निघाला. गांवोगांव धर्मशाळेंत उतरावयाचें. मोठमोठ्या शहरांमध्यें अन्नछत्रांत जाऊन जेवावयाचें. मैलचे मैल पायीं चालावयाचें. गाडीभाड्यासाठीं अवघे एकतीस रुपये खर्च करून त्यांनीं साऱ्या भारताची प्रदक्षिणा एका वर्षामध्यें पुरी केली. त्याच सुमारास बनारस हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना होत होती. पंडित मदनमोहन मालवीयांनीं कोनशिला समारंभाला या मातृभूमीच्या यात्रेकरूला बोलावलें आणि समारंभांत भाषण करावयाची विनंति केली. समोर हिऱ्यामोत्यांच्या कंठ्या गळ्यांत घालून आणि मूल्यवान् भरजरी कपडे अंगांत पेहेरून मोठमोठे राजेरजवाडे बसले होते. त्यांना पहातांच देशांतले अठरा विश्वें दारिद्र्य डोळ्यांनीं बघून आल्यामुळें अत्यंत व्यथित झालेल्या गांधींचा सात्विक संताप एकदम भडकून उठला. आणि ते म्हणाले, "संस्थानिकांनों, देशांत कोट्यवधि जनता कंगाल आणि भुकेकंगाल असतांना हीं हिरेमाणकें अंगावर घालून या समारंभांत मिरवायला तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं ? उतरा हें अंगावरचें सारें जडजवाहीर. तें तुमचें नाहीं. तें शेतकऱ्यांच्या मालकीचें आहे. तें त्यांच्या उद्धारासाठीं खर्च करा. इंग्रज लोक हिंदुस्थान सोडून गेल्यावांचून या देशाचा कधीं उद्धार व्हावयाचा नाहीं, अशी जर माझी खात्री झाली तर 'तुम्ही या देशांतून चालते व्हा !' असें उघडपणें त्यांना सांगावयाला मी मागेंपुढें पहाणार नाहीं !" त्याबरोबर सभेंत एकच हलकल्लोळ उडाला. राजे लोक संतापून सभेंतून निघून गेले. व्यासपीठावर बसलेले सन्मान्य पाहुणे मागल्यामागें पसार झाले. सभा मोडली. आणि आपलें भाषण तसेंच अपुरें सोडून हा लहानसा 'भयंकर' माणूस गर्दीमध्यें कुठेंतरी नाहींसा झाला. भारताच्या राजकीय क्षितीजावर उगवणाऱ्या सूर्याचा हा पहिला प्रकाशझोत जनतेला त्यावेळीं पहावयाला मिळाला.

"सत्याग्रहाची मौज ही आहे कीं, तो आपोआप आपल्याकडे चालत येतो. त्याला शोधण्यासाठीं आपल्याला जावें लागत नाहीं !" या गांधीजींच्या श्रद्धेची कसोटी सोळा सालच्या अखेरीस आकस्मिक रीतीनें लागली. चंपारण्यांतल्या गोऱ्या मळेवाल्यांच्या जुलमानें संत्रस्त झालेल्या हजारों मजुरांनीं गांधीजींना

हांक मारली. त्यांचा तो आर्त हंबरडा ऐकून मगरीच्या मुखांत सांपडलेल्या गजेंद्राला सोडविण्यासाठीं सुदर्शन चक्र घेऊन देवानें जशी धांव घेतली, तसें आपलें सत्याग्रहाचें अस्त्र घेऊन तांतडीनें धांवत गांधीजी चंपारण्यांत गेले! पंचारत्या ओवाळून जनतेनें त्यांचें स्वागत केलें. त्यांच्या गाडीचे घोडे सोडून देऊन लोकांनीं त्यांची गाडी ओढली. हत्तीवर बसून मजूरांची गाऱ्हाणीं ऐकत ऐकत ते चंपारण्यांतून हिंडूं लागले. हजारों शेतकरी आपल्या अमानुष छळाच्या कहाण्या सांगावयाला त्यांच्याभोंवती जमा झाले. गोऱ्या मळेवाल्यांची भयानें आणि संतापानें गाळण उडून गेली. सरकारनें तांतडीचा हुकूम काढून गांधीजींना चंपारण्यांतून निघून जा असें सांगितलें. गांधीजींनीं सरकारी हुकुम चुरगाळून फेंकून दिला. सरकारनें त्यांच्यावर खटला भरला. सरकारला वाटलें, गांधीजी आपला गुन्हा नाकबूल करतील. पण गांधीजी मान वर करून म्हणाले, " होय, तुम्ही म्हणतां तो गुन्हा मी केला. जनतेची सेवा करण्यासाठीं मी चंपारण्यांत आलों. मी कायदा पाळणारा माणूस आहे. पण कायदा पाळून जनतेची सेवा करणें अशक्य आहे. तुमच्या कायद्याचा अनादर करण्याचा माझा हेतु नाहीं. पण त्याहूनहि थोर असा कायदा माझ्या अंतरात्म्याचा आवाज मला सांगतो आहे. तो मला पाळला पाहिजे!" सत्याग्रही गांधीजींचा भारताच्या राजकीय रंगभूमीवरचा तो पहिला तेजस्वी प्रवेश होता. आत्मिक बळाचें त्यांच्या मुद्रेवरचें तें अद्भुत तेज बघून सरकारचे डोळे दिपले. सरकारनें त्यांना सोडून दिलें. आणि शेतकऱ्यांच्या वरचे सर्व अन्यायी आणि जुलमी कर रद्द करण्याचे मान्य केलें. गांधीजींच्या जयजयकारानें सारें चंपारण्य दुमदुमून गेलें. कृतज्ञतेच्या अश्रूंच्या फुलांचा शेतकऱ्यांनीं त्यांच्यावर वर्षाव केला. साठ वर्षे चाललेला शेतकऱ्यांचा छळ गांधीजींनीं सहा महिन्यांत नाहींसा करून टाकला. काश्मीरपासून तो कन्याकुमारीपर्यंत गांधीजींच्या विजयाच्या नौबदी वाजूं लागल्या. आपलीं संकटें नाहींशीं करणारा आणि आपल्याला नवीन जीवन देणारा आपला पालनहार आतां आपल्या भूमींत अवतीर्ण झाला आहे, असेंच कोट्यवधि किसानांना आणि कामगारांना वाटलें. अहमदाबादच्या मजुरांनीं गांधीजींना मदतीसाठीं हांक मारली. खेडा जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांनीं सहाय्यासाठीं त्यांना आरोळी दिली.

देशांतला सारा किसान–कामगारवर्ग खडबडून जागा झाला. एका नवीन सामर्थ्याचा आपल्यामध्यें संचार होत असल्याचा जनतेला प्रत्यय आला. हीच स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ. राजेंद्रबाबू म्हणाले, "स्वराज्याचें बीजारोपण गांधीजींनीं प्रथम चंपारण्यांत केलें !"

एकोणीस सालच्या नोव्हेंबर महिन्यांत पहिलें महायुद्ध संपलें. महायुद्धाच्या काळांत भारतानें सरकारशीं सहकार्य करावें अशी गांधीजींची भूमिका होती. शत्रू अडचणींत असतां आपण त्याचा फायदा घेऊं नये. अडचण संपली म्हणजे त्याची न्यायबुद्धि जागृत होऊं द्यावी. 'आम्हीं सहाय्य देतों, तुम्हीं स्वराज्य द्या' असा सौदा करणें गांधीजींना पसंत नव्हतें. महायुद्धांत हिंदुस्थाननें केलेल्या मदतीबद्दल ब्रिटिशांनीं मॉंटफोर्ड सुधारणांचा नजराणा हिंदुस्थानच्या हातीं दिला आणि त्याच वेळीं त्या मातीमोल करून टाकणारीं दडपशाहीचीं काळीं रौलट बिलें हिंदुस्थानच्या गळ्यांत अडकवलीं. ब्रिटिशांच्या कृतज्ञताबुद्धीचा तो विलक्षण मासला बघून गांधीजींना अतिशय दुःख झालें. 'ब्रिटिशांच्या रक्षणासाठीं आम्ही आपलें रक्त सांडलें त्याचें हें फळ काय ? नाहीं, आमच्या नागरिक हक्कावर आणि स्वातंत्र्यावर गदा घालणारीं हीं अन्याय्य बिलें आम्हीं कालत्रयींहि सहन करणार नाहीं !' ब्रिटिशांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं गांधीजींनीं सत्याग्रहाचें एकदम निशाण उभारलें आणि हरताळाची रौद्र तुतारी फुंकली. त्या तुतारीचे पडसाद देशभर निनादले. कोट्यवधि जनता गांधीजींच्या आदेशाला साद देण्यासाठीं सिद्ध झाली. जनताजनार्दनाचें तें विराट रूप पाहून ब्रिटिश नोकरशाहीच्या छातींत धडकी भरली. या देशांतलें आपलें राज्य आतां संपुष्टांत आलें आहे असें तिला भय वाटलें. संतापानें आणि सूडानें तिचें माथें भडकून गेलें. दडपशाहीचा राक्षसी वरवंटा हातांत घेऊन तो जनतेला बेफामपणें ठेंचीत सुटली. क्रौर्याला सीमा राहिली नाहीं. कायदा संपला. न्याय बुडाला. माणुसकी नष्ट झाली. पंजाबांत तर कहर उडाला आणि अमृतसर येथें जालियनवाला बागेंत निरपराध स्त्रीपुरुषांची आणि अर्भकांची अमानुष कत्तल करून ब्रिटिशांनीं नादिरशहा आणि तैमुरलंग यानांहि खालीं पहावयास लावलें. या कत्तलीनें भारतवर्षाच्या काळजाला जखम झाली. आणि ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरचा त्यांचा

विश्वास एकदम ढासळून पडला. सतत पंचवीस वर्षे ब्रिटिश सरकारशीं गांधीजींनीं जें सहकार्य केलें आणि त्यांच्या अन्यायी राजवटीबद्दल जी सहिष्णुता वृत्ति दाखविली तिचा जालियनवाला बागेमध्यें चक्काचूर झाला. 'यापुढें या जुलमी ब्रिटिश राजसत्तेशीं सहकार्य करणें अशक्य आहे!' अशी गांधीजींची खात्री पटली. त्याबरोबर त्यांच्या हृदयांतला परमेश्वर रौद्र स्वरूप धारण करून एकदम प्रकट झाला आणि आपलें सारें सात्विक सामर्थ्य एकवटून त्यानें एक ऑगस्ट एकोणीसशें वीस रोजीं असहकारितेचा शंख फुंकला. त्याच दिवशीं भारताला स्वराज्याचा महामंत्र शिकवणारे लोकमान्य टिळक आपला अवतार संपवून निज-धामाला गेले. 'भारताचा उद्धार करणारे गांधीजी हेच उद्यांचे महापुरुष आहेत, त्यांच्या मागून जा!' असा लोकमान्यांनीं देशाला शेवटचा संदेश दिला. लोकमान्यांचा अस्त आणि गांधीजींचा उदय ही हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासांतील मानवी मनाला थक्क करून सोडणारी अशी ईश्वरी घटना होय!

वीस सालच्या सप्टेंबरमध्यें कलकत्त्याला राष्ट्रीय सभा भरली. तिच्या व्यासपीठावर असहकारितेचें देदीप्यमान अस्त्र हातांत घेऊन गांधीजी पुराणांतल्या एकाद्या महर्षीप्रमाणें उभे राहिले आणि त्यांनीं आपल्या तेजस्वी वाणीनें साऱ्या देशाला आज्ञा केली, "सरकारी पदव्या आणि नोकऱ्या सोडून द्या. सरकारी विद्यालयांत, न्यायमंदिरांत आणि कायदेमंडळांत पाय टाकूं नका. परदेशी कापडा-वर बहिष्कार टाका आणि हातांत चरखा घ्या! एका वर्षाच्या आंत मी तुम्हांला स्वराज्य मिळवून देतों!" असहकारितेच्या त्या चतुःसूत्री महामंत्राच्या गर्जनेनें सारा भारतवर्ष खडबडून जागा झाला. असहकारिता ही भारताच्या आध्यात्मिक सामर्थ्याची अत्युच्च भरारी होती. पांच हजार वर्षांच्या इतिहासांत जें जें म्हणून कांहीं उज्ज्वल, उदात्त आणि दिव्य होतें, तें तें जिवंत होऊन आणि आकार घेऊन गांधीजींच्या असहकारितेंत पुन्हां प्रकट झालेलें होतें. दोडशें वर्षं पार-तंत्र्याच्या काळोखांत निराशेनें चांचपडत असलेल्या भारताला 'एका वर्षांत स्वराज्य देतों,' या गांधीजींच्या आश्वासनानें प्रचंड धीर मिळाला! आंधळ्याला एकदम डोळे मिळावेत तसें त्याला वाटलें. जनतेच्या अंतःकरणांतलें नैराश्य आणि औदासीन्य एकदम नाहींसें झालें. आशेची आणि उत्साहाची नवीन

पालवी अन् टवटवी साऱ्या देशाच्या मुद्रेवर झळकूं लागली. जनतेच्या नसानसांतून नवीन चैतन्य वाहूं लागलें. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत क्रांतीची एक प्रचंड लाट उठली. त्या क्रांतीच्या महापूरामध्यें सारा देश बुडून गेला. हजारों लोकांनीं सरकारी नोकरीच्या शृंखला तडातड तोडून टाकल्या. सरकारीं शाळांना आणि न्यायमंदिरांना कुलुपें लागलीं. कायदेमंडळें ओस पडलीं. परदेशी कापडाच्या देशभर होळ्या पेटल्या आणि त्याच्या धुरानें देशांतलें सारें वातावरण धूसर झालें. लक्षावधि चरखे देशांत फिरूं लागले, आणि 'चरखा चला चलाके, लेंगे स्वराज्य लेंगे' हा स्वराज्याचा महामंत्र एक स्वरानें गात गात सारा भारतवर्ष महात्मा गांधींच्या मागून स्वराज्याच्या दिशेकडे चालूं लागला. पंधरा सालच्या जानेवारी महिन्यांत गांधीजी दक्षिण आफ्रिकेमधून हिंदुस्थानांत परत आले. आणि एकवीस सालच्या जानेवारी महिन्यांत हिंदुस्थानांतील चाळीस कोटी जनतेनें एकमतानें त्यांचें नेतृत्व मान्य केलें. अवघ्या सहा वर्षांच्या आंत गांधीजींनीं हा जो विराट चमत्कार करून दाखविला त्याला जगाच्या इतिहासांत कुठेंहि तोड सांपडणार नाहीं.

एकवीस सालापासून मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत संपूर्ण सव्वीस वर्षें हिंदी जनतेच्या हृदयसिंहासनावर एकाद्या चक्रवर्ति सम्राटाप्रमाणें आरूढ होऊन गांधीजी भारतावर राज्य करीत होते. भारताच्या इतिहासांत हा पाव शतकाचा कालखंड गांधीजींनी अमर करून ठेवला आहे. या काळांत ब्रिटिश साम्राज्यशाहीला एका क्षणाचीहि उसंत न देतां स्वातंत्र्याचा लढा त्यांनीं लढवीत ठेवला आणि जनतेच्या अंतःकरणांत पेटलेला क्रांतीचा अंगार एकसारखा भडकवीत नेला. पुराणकाळांत देवाचें दानवांशीं युद्ध झालें. त्या वेळीं लढतांना देवांनीहि जितका मनाचा संयम राखला नसेल तेवढा संयम, मनःशांति आणि साधनांचें पावित्र्य राखून गांधीजींनीं या पंचवीस वर्षांत ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं लढा दिला. एका बाजूला बंदूका, तोफा, रणगाडे, लढाऊ जहाजें, विषारी धूर आणि वेगवान् विमानें घेऊन सज्ज असलेली बलाढ्य ब्रिटिश लष्करी सत्ता आणि दुसऱ्या बाजूला कपाळीं कुंकुमतिलक लावून आणि आधारासाठीं हातांत सोटा घेऊन दंतहीन मुखानें शांतपणें हंसत असलेला एक सत्तर-पंचाहत्तर वर्षाचा लहानसा पंचाधारी म्हातारा अन् त्याच्यामागें उभी

असलेली उघडीनागडी दीन, दुःखित, दरिद्री आणि भुकेकंगाल जनता! एका महान् राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी झालेला असला अद्भुत आणि विलक्षण लढा जगाच्या पाठीवर कधीं कुणी पाहिला आहे काय? जगांत आजपर्यंत मोठमोठे वीर, योद्धे आणि सेनापति होऊन गेले असतील. पण शत्रूच्या हातून मरण पत्करून त्याला शरण आणण्याचें असलें चमत्कारिक युद्धशास्त्र एका तरी लष्करी तज्ञाच्या डोक्यामधून कधीं निर्माण झालें आहे काय? गेल्या शतकांत जगामध्यें मोठमोठें वैज्ञानिक शोध लागले आणि शास्त्रज्ञांनीं युद्धाकरितां नवनवीन अस्त्रें अन् शस्त्रें शोधून काढलीं. पण बलाढ्य साम्राज्यशाहीला दातीं तृण धरून शरण आणायला लावणाऱ्या पाशुपतास्त्राचा शोध एकट्या गांधीजींखेरीज दुसऱ्या कोणी लावला आहे? विसाव्या शतकाचा वैज्ञानिक शोध अणुगोल नसून अहिंसा आहे याची जगाला आतां खात्री पटली आहे.

अहिंसा ही एक महान् दैवी शक्ति आहे. या शक्तीच्या सामर्थ्यावर गेल्या पंचवीस वर्षांत गांधीजींनी जे एकाहीपेक्षां एक अद्भुत चमत्कार करून जगाला दाखविलेले आहेत, तसे चमत्कार पुराणकाळांत मोठमोठ्या ऋषींना आणि योग्यांना देखील करतां आले नाहींत. ओंजळभर मंतरलेलें पाणी अंगावर मारून ऋषी जसे राक्षसांना पळवून लावीत, त्याप्रमाणें अहिंसेचा मंत्र म्हणून तयार केलेल्या समुद्रपाण्याच्या पुडीभर मिठानें किंवा जंगलांतून उपटलेल्या गवतानें ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या छातींत भयाची धडकी उठलेली आहे. पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धांत गांधीजींच्या नेतृत्वाखालीं जनतेनें जो त्याग, जे पराक्रम, आणि जें बलिदान केलें, तसें अघटित पराक्रम भारतीय युद्धामध्यें देखील झालें नाहींत. देशांतलें तुरुंग तुडुंब भरून वाहूं लागले. घरादाराच्या आणि संसाराच्या होळ्या पेटल्या. लाठ्यांच्या आघातांनीं शेकडों मस्तकें फुटलीं. बंदूकीच्या गोळ्यांनीं हजारों छाया छिन्नविच्छिन्न झाल्या. फांसाच्या दोरीला अनेक धडें लोंबकळूं लागलीं. एवढें होऊनहि जेव्हां ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अंतःकरणांत शहाणपणाचा आणि न्यायाचा प्रकाश पडेना, तेव्हां बेचाळीस सालच्या ऑगस्ट महिन्यांत आपलें तपःसामर्थ्य एकवटून, 'छोडो हिंद'ची प्रचंड रौद्रगर्जना गांधीजींनी केली. त्या गर्जनेचे कोट्यवधि पडसाद साऱ्या देशांत निनादले. श्रीकृष्णाच्या

उघडलेल्या मुखांत अर्जुनाला जसें विश्वस्वरूप दिसलें, त्याप्रमाणें 'छोडो हिंद'च्या आंदोलनांत ब्रिटिश सरकारला चवताळलेल्या हिंदी जनतेचें अक्राळविक्राळ नारसिंह स्वरूप दिसलें. तें पहातांच ब्रिटिशांच्या अंतःकरणाचा सपशेल ठाव सुटला. यापुढें या देशावर एक क्षणभरहि राज्य करणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली. दोडशें वर्षें आपल्या हातीं असलेलीं राज्यसूत्रें मुकाट्यानें जनतेच्या हवालीं करून ब्रिटिश राजसत्ता एकोणीसशें सत्तेचाळीसच्या पंधरा ऑगस्टला या देशांतून मान खालीं घालून चालती झाली. हर्षानें जवळ जवळ वेड्या झालेल्या हिंदी जनतेनें त्या दिवशीं स्वातंत्र्याचा एवढा जयजयकार केला कीं, त्यामुळें आभाळ खालीं कोसळून पडतें आहे असें वाटलें. हिंदी स्वातंत्र्याचा जयजकार हा महात्मा गांधींचा जयजयकार होता ! अहिंसेच्या सामर्थ्यानें चाळीस कोटी जनतेच्या हातापायांतल्या पारतंत्र्याच्या बेड्या तुटून देश स्वतंत्र झाला, हा गांधीजींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा विजय होता ! देवाधिदेवालाहि हेवा वाटावा असाच तो विजय नव्हता काय ?

गांधीजींच्या भगीरथ प्रयत्नांनीं स्वातंत्र्याची गंगा आकाशांतून धो धो करीत भारताच्या मस्तकावर उतरली, पण त्याबरोबर फाळणीची वीजहि देशाच्या डोक्यावर कोसळली. आणि अखंड भारताचीं शकलें झालीं. एकाच प्याल्यांत अमृत आणि विष घालून हंसत हंसत आणि रडत रडत तो देशाला प्यावा लागला. स्वर्गांतून पृथ्वीवर पडणारी गंगा मस्तकावर झेलण्याचें काम ज्या शंकराला करावें लागलें, त्यालाच समुद्रमंथनांतून निर्माण झालेलें हालाहल विष गिळून नीलकंठ बनावें लागलें. ज्यांनीं देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलें, त्याच स्वातंत्र्यजनकाला देशाच्या फाळणीचें हालाहाल गिळावें लागलें आणि आपल्या प्राणाचें बलिदानहि पण करावें लागलें. देशाचे तुकडे झाले तर माझ्या देहाचे तुकडे होतील, हीं महात्माजींची भविष्यवाणी दुर्दैवानें शेवटीं खरी ठरविली. तीस वर्षांपूर्वी चंपारण्यांत आपल्या हातानें लावलेल्या स्वराज्याच्या वृक्षाला स्वातंत्र्याचें शेंडेफळ आलेलें पहाण्याचें थोर भाग्य गांधीजींना लाभलें खरें, पण त्याबरोबर साम्राज्यशाहीनें या देशांत पेरून ठेवलेल्या जातीय दुहीच्या विषवल्लींना अत्याचारांची हिंस्र फळें उगवलेली बघून त्यांचें अंतःकरण किती रक्तबंबाळ झालें असेल बरें ? दुःखितांच्या डोळ्यां-

तून वाहाणारा प्रत्येक अश्रू अश्रू पुसण्यासाठींच मुळीं ज्यानें अवतार घेतला होता, त्याला सभोंवार चहुंकडे अत्याचाराचा वणवा पेटलेला बघून, जिकडे तिकडे रक्ताचे पाट वहात असलेलें पाहून, आणि गुंडांच्या हातांत सांपडलेल्या अर्भकांच्या आणि अबलांच्या करुण किंकाळ्या ऐकून काय वाटले बरें? कुठें कुठें जाऊं, कोणाकोणाचे अश्रू पुसूं, कोणाकोणाच्या जखमा बांधूं, कोणाकोणाचें सांत्वन करूं, कोणाकोणाला धीर देऊं, या विचारानें त्या महात्म्याचें धैर्य गळून गेलें असेल आणि त्याच्या चित्ताला भोंवळ आली असेल. पण तशाहि व्याकुळ मनःस्थितींत आपलें सर्व दुःख गिळून तो महात्मा निर्वाणीच्या निर्धारानें उठून उभा राहिला आणि बाहेर चालूं लागला. अमावास्येपेक्षांहि गडद आणि भीषण काळोख भोंवती पडला आहे. रक्ताला चटावलेले हिंस्र पशू भेसूर आरोळ्या ठोकींत सभोंवार हिंडत आहेत. प्रकाशाचा एक किरण-देखील डोळ्यांना दिसत नाहीं. काळोखांतून हुंदके, सुस्कारे, कण्हणें आणि आक्रोश यावांचून दुसरें कांहींहि ऐकूं येत नाहीं. तरीहि तशा अंधारांतून कांठी टेंकीत टेंकीत आणि हळूहळू मार्ग काढीत अठ्याहत्तर वर्षांचा हा म्हातारा, "रघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम। ईश्वर अल्ला तेरे नाम। सबको सन्मति दे भगवान।" हा जातीय ऐक्याचा महामंत्र म्हणत म्हणत एकटाच चाललेला होता. रामनामाच्या मंत्रानें जातीयवादाच्या रावणाचें निर्दालन करीन आणि पुन्हां देशाचीं दोन्हीं शकलें जोडून तो सारखा अखंड आणि प्रचंड बनवीन असा आत्मविश्वास त्या महात्म्याच्या अंतःकरणांत निर्माण झाला. तो नौखालींत गेला. कलकत्त्याला आला. सारा बंगाल रामनामाच्या गजरानें दुमदुमूं लागला. देशाला पुन्हां धीर वाटूं लागला. इतक्यांत दिल्लीची हाक आली म्हणून घाईघाईनें महात्मा दिल्लीला आला. महात्म्याच्या दर्शनानें दिल्लीची व्यथा निवली. दिल्लीचा अंतरात्मा शांत झाला. रामनामाच्या गजरानें सारी दिल्ली गर्जूं लागली. महात्म्याची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली. आणि–आणि–एके दिवशीं संध्याकाळीं अचानकपणें तो गजर एकदम शांत झाला. त्या मंत्राचा महान् उद्गाता चिरनिद्रेच्या आधीन झाला होता.

गांधीजींच्या निधनानें भारताचें पंचावीस वर्षांचें एक स्वर्गीय स्वप्न समाप्त झालें! हें स्वप्न डोळ्यांनीं पहाण्याचें भाग्य ज्यांना लाभलें त्यांच्यासारखें

भाग्यशाली कोणी नाहींत ! असें महान् स्वप्न जगांत पुन्हां कधीं कोणाला पहावयाला सांपडावयाचें नाहीं. कोटयवधी जनतेच्या अंतःकरणामधले सर्व विसंवादी सूर स्वतःच्या षड्जाशीं जमवून घेऊन स्वातंत्र्याचें असें सुंदर संगीत पंचवीस वर्षेपर्यंत या देशांत एकसारखें गांधीजींनी घुमवीत ठेविले होते म्हणता ! जनतेनें जवाहरलाल नेहरूंचें ऐकावयाचें. जवाहरलालनीं गांधीजींचें ऐकावयाचें. गांधीजींनी परमेश्वराचें ऐकावयाचें. अशा सुरेल आणि लयबद्ध समन्वय जमून गेला होता या राष्ट्राचा. तें सारें मधुर मनोहर स्वप्न आतां कायमचें नाहींसे झालें ! गांधीजींचें आतां काय काय आठवायचें ? किती किती आठवायचें ? अनेक साध्या, सोप्या, अवघड आणि विलक्षण गोष्टींचा गांधीजींमध्यें अद्भुत आणि मनोहर संगम झालेला होता ! तो त्यांचा पंचा, तो त्यांची शेळी, तो त्यांचा आहार, तो चरखा, तें सोमवारचें मौन, तीं त्यांचीं उपोषणें, त्या त्यांच्या प्रार्थना आणि तो त्यांचा आश्रम हीं त्यांच्या त्यागी आणि तपस्वी जीवनाची सर्व वैशिष्टयें कल्यांतापर्यंत जगाच्या स्मरणांत रहातील ! ह्या सर्व गोष्टींचा ते हयात असतांना ज्यांनीं कोणी उपहास केला, त्यांना त्यांतील एकेक गोष्ट आठवून जन्मभर स्फूंदून स्फूंदून रडावें लागेल. गांधीजींचें माहात्म्य भारतानें ओळखलेंच नाहीं, असें कुणालाही म्हणतां येणार नाहीं. तथापि, आपल्या कांहीं देशबांधवांकडून गांधीजींची जी अवहेलना झाली, ती पाहून 'फार लहान आणि क्षुद्र माणसांच्या देशांत अतिशय मोठा पुरुष जन्माला आला' असेंच एकादे वेळीं उद्यांचें जग हळहळून म्हणेल. तथापि, या देशामध्यें जन्म घेऊन वेदांना, उपनिषदांना, ऋषींना, योग्यांना आणि साधुसंतांना प्रसविणाऱ्या या महान् देशाची पांच हजार वर्षांची प्राचीन परंपरा गांधीजींनी सांभाळली आणि देशाची अब्रू वांचवली यांत मुळींच संशय नाहीं. अडीच तपें भारताचें जीवनचक्र ज्या एका महान् आसाभोंवती फिरत होते, तो आस एकाएकी तुटल्यामुळें भारताचा तोल आज ढळल्यासारखा झालेला आहे. तीस वर्षें ज्या महन्मंगल मूर्तीची एकनिष्ठपणें भारतवर्ष पूजा करीत होतें, तो मूर्ति नाहींशी झाल्यामुळें आपलें स्वातंत्र्याचें मंदिर आज सुनें सुनें झाल्यासारखें वाटतें आहे. तथापि, गांधीजींचें शरीर आणि आत्मा भारतामधून हिरावून नेण्याचा काळपुरुषाचा कुटिल डाव मात्र सपशेल फसलेला आहे. नद्यानद्यांमधून

आणि तीर्थांतीर्थांमधून गांधीजींच्या पवित्र अस्थि आणि चिताभस्मांतलें तेजस्वी अणूं साऱ्या भारतामध्यें वहात जातील आणि या भूमीमधल्या प्रत्येक कणाकणाच्या हृदयांत घुसून बसतील. गांधीजींच्या तेजस्वी देहाचा साऱ्या भारताच्या देहांत आतां संचार होईल. मृत्यूनें गांधीजींचें शरीर नष्ट केलें नाहीं. त्यांच्या लहान देहाला विराट स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. शरीराच्या पिंजऱ्यांतून मुक्त झालेला गांधीजींचा महान् आत्मा आतां साऱ्या विश्वाचा संचार करावयास मोकळा झालेला आहे. भारताच्या सीमांनीं आजपर्यंत मर्यादित असलेला गांधीजींच्या आत्म्याचा दिव्य प्रकाश वाढत वाढत जाऊन चारी खंडाला आतां व्यापून टाकील! पृथ्वीतलावर कदाचित् यापुढें पूर्वीपेक्षाही भयंकर महायुद्धें होतील. मोठमोठीं राज्यें आणि साम्राज्यें धुळीला मिळतील. साऱ्या भूगोलावरून रक्ताचे पाट वाहूं लागतील. आणि मानवजातीचा भयंकर संहार होऊन तो या पृथ्वीतलावरून अजिबात नष्ट होते कीं काय, असें भय निर्माण होईल. तेव्हां भूतकालाच्या आकाशांत ध्रुवाप्रमाणें अढळ तेजानें चमकणारी महात्मा गांधीजींची देदीप्यमान मूर्तीच जगाला आशा आणि धीर देऊन मानवतेच्या उद्धाराचा दिव्य मार्ग दाखवील! खरोखरच, 'महात्मा गांधी अमर है!'




REFBK-0007922

आमचें तेजस्वी मराठी प्रकाशन

आचार्य अत्रे
हंशा आणि टाळ्या ५
पत्रकार अत्रे ३
शिरीष अत्रे
चैत्र पालवी २॥
ना. सी. फडके
अुजाडलं ! पण सूर्य कुठें आहे ? ५
प्रीतिपुष्प २॥
भा. वि. वरेरकर
माझा नाटकी संसार ३
शि. ल. करन्दीकर
सावरकरांचे सहकारी १॥
डॉ. वि. म. भट
अभिनव भारत ४
पिरोज आनंदकर
बाल बहिर्जी २
बा. वा. फाटक
मुंबअीचे मानकरी २
केशवराव भोळे
संगीताचे मानकरी २॥
ह. रा. महाजनी
अीश्वराची आत्महत्या ३
सौ. अनसुया कामत
आमची विलायतला प्रथम भेट ४
स्वयंपाकाचे कांहीं प्रकार २॥
र. गो. सरदेसाअी
आमचा संसार २॥
भा. वि. नाडकर्णी
राजाराणी २
कामदेव
कामदेवाच्या कथा १॥
मामा दुगल
प्रेमगीतें ·।=

स्वा. वि. दा. सावरकर
१८५७ चें स्वातंत्र्यसमर १२॥
हिन्दुत्व २॥
हिन्दुराद्दृष्ट्रर्शन ६
हिन्दुत्वाचे पंचप्राण ३
हिन्दुपदपादशाही ५
सिंहगड ·॥·
बाजी प्रभू ·॥·
चाफेकर–रानडे ·।=
तेजस्वी तारे २
नागरी लिपिशुद्धीचें आन्दोलन २॥
रणशिंग ३
वि. वा. हडप
भारतमाते अूठ ३
भारतमातेची हांक ३
भारतमातेचा शाप ३
भारतमाता वनवासी ३
भारतमातेचें दिव्य ३
भारतमाता की जय ३
सिंहाचे छावे ३
बापलेक ३
काँग्रेसचा कल्पवृक्ष १॥
संजीवनी मराठे
भावपुष्प १॥
वसुंधरा पटवर्धन
संसारशोभा २
वि. वि. बोकील
गांठभेट १॥
अनुभवी प्राध्यापक
प्राचीन मराठी वाङ्मय-साहाय्यक १।
बा. अ. देसाअी
झुन्झार महाराष्ट्र ·॥·
गो. वि. जोगळेकर
कबुतराची कथा ·।=

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४